मुक्तिनंतरचा गोवा

वामन राधाकृष्ण



1923
N-DEV
VAM

रु. २२५/-

GIFTED BY
RAJHAUNS VITARAN
1 – Meenakshi Building
Dr. Wolfango De Silva Marg
Panaji – 403001.

WORLD KONKANI CENTRE LIBRARY
2438
Acc. No.
विश्व कोंकणी पुस्तकालय



मुक्तिनंतरचा गोवा

वामन राधाकृष्ण

WORLD KONKANI CENTRE LIBRARY
विश्व कोंकणी पुस्तकालय

राजहंस

मुक्तिनंतरचा गोवा

प्रकाशन क्रमांक : 106

पहिली आवृत्ती : 1993

लेखक : वामन राधाकृष्ण

मुद्रक : राजहंस ऑफसेट
1–मीनाक्षी बिल्डिंग, डॉ. व्होल्फांगु द सिल्व्ह मार्ग,
पणजी, गोवा – 403 001

मुखपृष्ठ : गजानन च्यारी

WORLD KONKANI CENTRE LIBRARY
२४३८
विश्व कोंकणी

© प्रकाशक : राजहंस वितरण
1–मीनाक्षी बिल्डिंग, डॉ. व्होल्फांगु द सिल्व्ह मार्ग,
पणजी, गोवा – 403 001

1923
N -> Dev
VAM

ISBN 81-85854-05-X

दैनिक 'नवप्रभा'चे संपादक
श्री. सुरेश वाळवे याना–

WORLD KONKANI LIBRARY
Accn No: 001923

प्रस्तावना

सर्वसाधारणपणे इतिहासाच्या अभ्यासकाना उपयुक्त ठरेल असे गोव्याच्या इतिहासाचे दोन भाग पाडता येतील. मुक्तिपूर्वीचा गोवा हा एक भाग आणि मुक्तिनंतरचा गोवा हा दुसरा भाग. मुक्तिपूर्व गोव्याच्या इतिहासाची माहिती करून देणारे पुस्तक मी लिहिले. 'गोवा मुक्तिसंग्राम' हे पुस्तक मोठ्या भाग्याचे ! डॉ. राम मनोहर लोहिया यांचे निकटचे सहकारी, समाजवादी विचारसरणीचे धडाडीचे नेते सदाशिव बागायतकर यांच्या स्मृतीनिमित्त निघणाऱ्या ग्रंथ मालिकेतून हे पुस्तक त्यांच्या भगीनी डॉ. कमल बागायतकर आणि ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते गोपाळ मोकाशी यानी प्रकाशित केले. गोव्यातील मान्यवर संस्था गोमंत विद्या निकेतन मडगांव या संस्थेचे प्रथम साहित्य पारितोषिक या पुस्तकास मिळाले. पुण्याच्या केसरी मराठा संस्थेचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा साहित्य सम्राट न. चि. केळकर पुरस्कार या पुस्तकास प्राप्त झाला. कला अकादमीचे पारितोषिकही या पुस्तकाला मिळाले.

गोवा मुक्तिसंग्राम या पुस्तकाचे स्वागत चांगले झाले तरी गोव्याचा मुक्तीनंतरचा इतिहास मी लिहीन आणि त्याचे पुस्तक निघेल अशी कल्पना मी केली नव्हती. गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात जसा मी भाग घेतला तसाच मुक्तिनंतरच्या गोव्याच्या राजकीय व सामाजिक जीवनात मी भाग घेतला. प्रा. शंकर सरदेसाई भारतीय काँग्रेस गोवा प्रदेश शाखेचे सरचिटणीस असताना मी जनसंपर्काधिकारी होतो. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचा आणि संसदीय समितीचा मी सदस्य होतो. भाऊसाहेब बांदोडकर यांचा विश्वासू कार्यकर्ता होतो आणि तत्वासाठी भाऊसाहेबांविरुध्द बंड करणाऱ्या बंडखोरांपैकी पण मी एक होतो. मुक्तीनंतरच्या गोव्याचे राजकीय जीवन मला परिचित होते. त्यामुळे त्यासंबंधी लिहिणे मला कठीण नव्हते. माझ्यात एक उणीव आहे. कुणीतरी लिहा असे म्हटल्याशिवाय मला लिहावेसे वाटत नाही. दै. 'नवप्रभा'चे संपादक सुरेश वाळवे यानी मला आग्रह केला. त्यासंबंधीची प्रसिद्धीही

केली आणि 'पलाशीच्या सज्जातून' ही माझी लेखमाला दैनिक नवप्रभेतून प्रसिद्ध होऊ लागली. या लेखमालेवर वाचकानी प्रेम केले. मला पत्रे लिहून शाबासकी दिली. वास्कोचे लक्ष्मीकांत जी. कोलणकर यानी पत्र पाठवून या लेखमालेचे पुस्तक काढा व पहिली प्रत मला विकत द्या असे लिहिले. गोव्याचे अर्थशास्त्रज्ञ व संगीततज्ञ प्रभाकर आंगले यानी खास पत्र पाठवून माझे कौतुक केले. त्यानंतर अकस्मात एक दिवशी गोव्याचे तरुण व कल्पक प्रकाशक प्रभाकर भिडे मला भेटले व त्या लेखमालाचे पुस्तक काढू या असे म्हणाले. लेखमाला ठराविक दिवशी प्रसिद्ध होत होती व त्यामुळे घाईने लिहावे लागत होते. काही त्रूटी होत्या त्या नाहीशा केल्या, सारा मजकूर पुन्हा सुसंगतपणे लिहून मुद्रण प्रत प्रभाकर भिडे यांच्या हाती दिली.

वर्तमानपत्रातील संदर्भ मिळवण्याच्या कामी सेंट्रल लायब्ररीच्या श्रीमती कॉश्त यांचे मला सहाय्य झाले. त्याचप्रमाणे दैनिक नवप्रभाचे राया गोपीनाथ पिळगांवकर यांचीही मदत मला लाभली. मुद्रण प्रत तयार करण्याच्या बाबतीत श्री. विनोद झंजाळ यांचे सहाय्य लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे. सौ. पद्मश्री राधाकृष्ण हिच्या सहाय्याशिवाय लेखनाचे काम पूर्ण झाले नसते. सुरेश वाळवे यानी आग्रह केला नसता आणि प्रभाकर भिडे यानी प्रकाशनाचे काम हाती घेतले नसते तर हे पुस्तक वाचकांच्या हाती पडले नसते. मुक्त गोव्यातील लेखकांचे लेखन पुण्या मुंबईच्या लेखकांइतकेच दर्जेदार असते. पण त्याना संधी मिळत नाही आणि प्रकाशकांकडे धावपळ करायची सवड सापडत नाही. गोव्यातील लेखकांची ही अडचण दूर करणाचा प्रयत्न प्रभाकर भिडे करीत आहेत. गोव्याच्या सांस्कृतिक जीवनात ते एक मोलाची भर घालत आहेत.

वामन राधाकृष्ण

अनुक्रम

- लष्करी राजवट १
- पहिल्या निवडणुकीच्या वाटेवर १२
- संसदीय लोकशाहीची सुरवात २२
- ओपिनियन पोल : सार्वमत कौल ३४
- दुसरी सार्वत्रिक निवडणूक ४५
- सात आमदारांचे बंड ५३
- बांदोडकर पर्वाची अखेर ६६
- सौ. शशीकला काकोडकर कारकीर्द ७८
- गोव्यात काँग्रेस सत्तेवर ९८
- घटक राज्याच्या दिशेने १२०
- भाषा प्रस्थापन, साहित्य संवर्धन १३४
- १९८९ ची निवडणूक १४९
- राजकारण पक्षबदलूंचे १६८
- उपसंहार १७९

परिशिष्ठ

- विधान सभांचे निकाल २०१
- लोकसभांचे निकाल २६०
- ओपिनियन पोलचा निकाल २६७

: एक :

लष्करी राजवट

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा मुक्त झाला. गोव्याच्या भूमीवर तिसवाडी तालुक्यात आफोंस द आल्बुकेर्कने इ.स. १५१० मध्ये पाऊल ठेवले व तिसवाडी तालुका जिंकला. त्यानंतर तेहतीस वर्षांनी बारदेश व सासष्टी असे दोन तालुके ताब्यात घेतले. उरलेले आठ तालुके पोर्तुगीजांनी साम, दाम, दंड व भेदं असे उपाय योजून हळुहळू आपल्या घशाखाली घातले. तिसवाडी तालुका इ. स. १५१० मध्ये जिंकल्यामुळे गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता साडेचारशे वर्षे टिकून राहिली असे म्हटले जाते. प्रत्यक्षात तसे नाही. आज जो गोवा म्हणून ओळखला जातो, त्याच्या अकरा तालुक्यांपैकी एकच तालुका पोर्तुगीजांच्या हुकुमाखाली साडेचारशे वर्षे राहिला होता.

पोर्तुगालहून नियुक्त केलेला पोर्तुगीज गव्हर्नर जनरल, गोव्याचे राज्य चालवित असे. त्याचे नाममात्र सल्लागार मंडळ होते. त्यामध्ये मुख्य सचिव, आर्चबिशप, दोन लष्करी प्रमुख, ॲटर्नी जनरल, महसूल खात्याचे प्रमुख, आरोग्य खात्याचे प्रमुख आणि नगरपालिका प्रमुख एवढे अधिकारी असायचे. त्यांचा सल्ला मानला पाहिजे असे बंधन गव्हर्नर जनरलवर नव्हते. सारे निर्णय स्वतः गव्हर्नर जनरल घेत होते. लोकांच्या मताला किंमत नव्हती. पोर्तुगीज राजवटीविरुद्ध गोव्यामध्ये बंडे झाली. पण ती यशस्वी झाली नाहीत. अखेर डॉ. राम मनोहर लोहियानी नागरी स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह पर्व सुरू केले. क्रांतिकारकानी सशस्त्र प्रतिकार केला. पोर्तुगीजांचे जुलूम अतिरेकी स्वरुपात दिसू लागल्याबरोबर भारत सरकारने गोवा मुक्तिसाठी लष्करी कारवाई केली. 'ऑपरेशन विजय' विजयी झाले. मुक्तिमोहीम सुरू झाली. तेव्हा गोव्यामध्ये पोर्तुगीजांकडे ५५०० सैनिक होते. दमण व दीवमध्ये प्रत्येकी ७५० सैनिक होते. २९ नोव्हेंबर १९६१ रोजी गोवा मुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. मेजर जनरल के. पी. कॅन्डेथ यांच्या अधिपत्याखाली दक्षिण कमांडकडे सूत्रे सोपविण्यात आली. ११ डिसेंबर रोजी गोवा मुक्त करण्यासाठी बेळगांव येथे

लष्कर एकत्रित करण्यात आले व १८ डिसेंबर हा दिवस निश्चित करण्यात आला. गोवेकर हे तुमचे बांधव आहेत या भावनेने त्यांच्याशी वागा अशी ताकीद कमांडरने आपल्या अधिकाऱ्यांना दिली. ४८ तासात ही मोहीम पूर्ण झाली आणि गोव्यावरची पोर्तुगीज सत्ता संपली.

भारतीय लष्करी अधिकारी पणजीच्या सचिवालयात पोचले तेव्हा गव्हर्नर जनरल त्याना सापडले नाहीत. त्यांच्या कॅबीनमध्ये कागदपत्रे पसरलेली होती व टेबलावर ॲस्परीनच्या गोळ्या पडल्या होत्या. आपले राज्य कोसळणार हे पोर्तुगीज गव्हर्नर जनरलला कळले होते. विचार करून त्याचे डोके दुखत असावे व त्याने त्या गोळ्या गिळल्या असाव्यात. पोर्तुगीज गर्व्हनर जनरलची डोकेदुखी वाढली होती. आणि गोव्यातील जनतेची डोकेदुखी थांबली होती. परकीयांची राजवट संपली होती. स्वराज्य मिळाले होते. लोक खुष होते. भारतीय लष्कराचे स्वागत करीत होते. जे स्वप्न ते पहात होते ते साकार झाले होते. 'कौल मिळाला, फुटला नारळ, गुढी उभी झाली । आणि माऊली चढला कुंकुम पुन्हा तुझ्या भाळी ।। अठरा जून १९४६ रोजी कविवर्य बा. भ. बोरकर यानी लिहिलेल्या कवितेतील या ओळी १९ डिसेंबर १९६१ रोजी साकार झाल्या पण भीती झडली नाही. नीती चढली नाही आणि लोभ सुटला नाही.

भारताचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन म्हणाले, आम्ही वर्षानुवर्षे वाट पाहिली. सामोपचाराची बोलणी केली. संधी दिली आणि अखेर नाइलाजाने आम्हाला कारवाई करावी लागली. कुठल्याही राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आम्ही बाधा आणली नाही. पोर्तुगालवर आम्ही हल्ला केला नाही. दि. १९ डिसेंबर रोजी गोवा मुक्त झाला व २० रोजी लष्करी राज्यपालानी गोव्यात कुठल्याही माणसाशी वैरत्व ठेवले जाणार नाही. त्याचबरोबर हिंसा चालू देणार नाही असे जाहीर केले. गोव्यात झालेल्या सत्तांतराची तारीफ लंडनच्या 'डेली टेलीग्राफ' या दैनिकाने केली. गोव्यातील ज्या संस्था विवक्षित जातीच्या अगर समाजाच्या कल्याणासाठी चालवण्यात येतील त्यास प्रशासनाकडून मुळीच सहाय्य मिळणार नाही असे गोवा प्रशासनाने जाहीर केले.

गोवा मुक्त झाल्याबरोबर गोव्याची भाषा कोणती यासंबंधी वाद सुरू झाले. गोव्यात मराठीचे स्थान अबाधित रहावे म्हणून अखिल

गोमंतकीय मराठी भाषाभिमान्यांचे एक शिष्टमंडळ लष्करी राज्यपालाना भेटले. त्यामध्ये व्यंकटेश सरदेसाई, विश्वासराव चौगुले, नरसिंह सुकेरकर, डॉ. गोविंद वैद्य, डॉ. कृष्णा मर्तोबा संझगिरी हे होते. आठव्या कोकणी परिषदेमध्ये श्रीमती व्हायोलेट आल्वा यानी कोकणीचा ठेवा गमावू नका असा सल्ला दिला व आपल्या अध्यक्षीय भाषणात गोव्याचा असा विकास करा की आमच्या सुंदर गोव्याला वाईट रीतीने वागवल्याबद्दल पोर्तुगीजाना शरम वाटेल असे म्हटले. गोव्याच्या दर्जाबद्दल आणि भाषिक वादाबद्दल महाराष्ट्र व म्हैसूर (कर्नाटक) या दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यानी आपले विचार प्रगट केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यानी विलीनीकरणाचा प्रश्न आज नको असे म्हटले तर म्हैसूरचे मुख्यमंत्री कंठी यानी गोव्यामध्ये महाराष्ट्र व म्हैसूर या दोन्ही राज्यातले अधिकारी ठेवू नयेत अशी सूचना केली.

गोवा मुक्त झाला हे लुझो इंडियन समाजाला रुचले नाही. मिस्तिस (लुझो–इंडियन) पोरे टोळ्या करून सालाझाराचा जयजयकार व भारतीय नेत्याना शिव्या देत फिरू लागली. पण जनतेने त्यांची दादागिरी सहन केली नाही. लोकांचा विरोध पाहून त्यांची कोल्हेकुई बंद पडली. पण 'हेराल्द' या पणजीच्या पोर्तुगीज दैनिकाने भारतविरोधी प्रचार चालू ठेवला. हेराल्दच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी मोर्चा निघाला. मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. चंद्रकांत काकोडकर,मार्क फर्नांडिस, प्रा. डी. रिबेलो. वामन देसाई यांची सभेत भाषणे झाली. 'हेराल्द' च्या समर्थकानी पण मोर्चा काढला. 'हेराल्द' समर्थक व विरोधक अशा दोन गटामध्ये चकमक उडाली व पोलिसाना सौम्य लाठीमार करावा लागला.

गोव्यातील दोन हजाराहून अधिक लोकानी सह्या करून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सरचिटणीसाना एक निवेदन सादर केले. फिरंगी राजवटीत गेली साडेचारशे वर्षे गोव्यातील जनता एका क्रूर सरकारच्या पंजात सापडली होती. या जनतेने यत्किंचितही प्रतिकार केला तर परजलेल्या तलवारीने तिचा गळा कापून टाकण्याची त्या सरकारची तयारी होती. आमची प्रतिमा आणि व्यक्तिमत्व याना काही अर्थ नव्हता. या परिस्थितीतून विधात्याने एका महापुरुषाच्या द्वारे आमची सुटका केली. हा महापुरुष म्हणजे भारताचे पंतप्रधान पं. नेहरु हे होत. गोमंतकीय जनतेच्या

मुक्ततेचा क्षण जवळ येत आहे असे पाहून फिरंगी सरकारने पोलिसामध्ये गुंडांचा व गुन्हेगारांचा भरणा केला. त्यानी जुलूम जबरदस्तीने व धाकदपटशाने पोर्तुगीज सरकारला पाठिंबा देणाऱ्या सभामध्ये भाग घेण्याची सक्ती केली. गोव्यातील वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर ठळक अक्षरानिशी धादांत खोटे छापण्याची सक्ती केली. लक्षावधी गोवेकरानी सभेत भाग घेऊन पोर्तुगीज ध्वजास निष्ठा वाहिली व पोर्तुगीज नागरिक म्हणून रहाण्याचा निर्धार व्यक्त केला अशा खोट्या बातम्या छापल्या गेल्या. या साऱ्या छळातून लोकांची सुटका पं. नेहरुनी केली. याबद्दल आम्हाला झालेला आनंद आम्ही या निवेदनाद्वारा व्यक्त करीत आहोत.

पोर्तुगीजांच्या खोट्या प्रचाराला उत्तर देण्यासाठी हे निवेदन होते. गोवा मुक्त झाल्याचा आनंद नव्याणव टक्के लोकाना झाला होता. थोडेसे लोक काळोखाचे पुजारी होते. ते अस्वस्थ झाले होते. लुझो–इंडियन लोकाना पोर्तुगीज राजवटीत जास्त सवलती होत्या. त्या जातील व आपल्याला कुणी वाली उरणार नाही ही त्याना भीती वाटली. मुक्तिनंतर पकडले गेलेल्या पोर्तुगीज सैनिकांचे काय करावे हा प्रश्न अधिकाऱ्याना पडला होता. तो प्रश्न पं. नेहरुंच्या वक्तव्यामुळे सुटला. 'गोव्यातील पोर्तुगीज स्थानबद्ध सैनिकाना हलवून बराकीत ठेवण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. गोव्यात नित्याचे जीवन सुरळीतपणे चालावे म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. पोर्तुगीज स्थानबद्धाना गोव्यातून हलवल्यानंतर भारतीय फौज काढून घेण्यात येईल, अशी घोषणा पं. नेहरुनी केली. ते पुढे म्हणाले, जुन्या पोर्तुगीज राजवटीशी ज्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता आणि त्या राजवटीमुळे ज्यांचा खुप फायदा झाला असे काही लोक भारतीय कारभाराबद्दल भलत्यासलत्या गोष्टी व अफवा पसरवत आहेत. याच निवेदनावेळी पं. नेहरुनी न्यायदानात ढवळाढवळ करणार नाही असे म्हटले. हा उल्लेख एका घटनेमुळे पं. नेहरुना करावा लागला. आझाद गोमंतक दलाच्या एका कार्यकर्त्याने मुक्तिदिनापूर्वी एका माणसाला डिचोली येथे ठार मारले होते. खुनाच्या आरोपावरून त्या गुन्हेगाराला तुरुंगात टाकले होते. मुक्तीनंतर श्री. विश्वनाथ लवंदे यानी कोर्टाच्या दारात सत्याग्रह सुरू केला. तो खून नाही, ती राजकीय हत्त्या आहे म्हणून त्या कार्यकर्त्याला मुक्त करावे अशी श्री. लवंदे यानी मागणी

केली. लष्करी राज्यपालांच्या एडीसीनी डिचोलीच्या पोलिसाना तार करून त्या कार्यकर्त्याला मुक्त करण्याचा आदेश दिला. तो हुकूम घेऊन पोलिस डिचोलीच्या कोर्टात गेले. हुकुमानुसार न्यायाधिशानी त्या कार्यकर्त्याला सोडले व पणजी हायकोर्टाच्या न्यायाधिशाना ही घटना सांगितली. न्यायाधिशांची एक बैठक झाली व चार दिवसांच्या आत जर मुक्त केलेल्या माणसास परत पकडण्यात आले नाही तर सगळे न्यायाधीश राजीनामे देतील असे ठरवले. न्यायाधिशानी राजीनामे दिले तर कोर्ट चालवायला माणसे मिळणार कुठून ? असा मुद्दा ॲड्. पांडुरंग मुळगांवकर यानी मांडला. तेव्हा मुळगांवकर यानी लष्करी राज्यपालांशी याबाबत प्रथम बोलणी करून काय ते ठरवावे असा निर्णय घेण्यात आला. ॲड्. मुळगांवकर लष्करी राज्यपालाना भेटले. त्याना सगळे समजावून सांगितले. ॲड्. मुळगांवकर याना लष्करी राज्यपालानी आश्वासन दिले की कोर्टाच्या कामात सरकार हस्तक्षेप करणार नाही.

या घटनेसंबंधी खुलासा करताना, पं. नेहरु म्हणाले, भारताने गोव्यात कारवाई करण्यापूर्वी गेल्या वर्षीच्या १२ डिसेंबरला एक मनुष्य ठार झाला होता. ट्रिब्यूनलच्या एका न्यायाधिशाने काढलेल्या वॉरंटावरून या प्रकरणी दोघास अटक करण्यात आली. अटक केलेले लोक निर्दोष आहेत आणि विमोचनापूर्वी घडलेला खून हा राजकीय गुन्हा आहे असे निवेदन लष्करी गव्हर्नराना करण्यात आले. अटक केलेल्यांची तात्काळ सुटका करावी म्हणून काही राजकीय कार्यकर्त्यानी अन्नसत्याग्रह केला. या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. ठार झालेला इसम हा पोर्तुगीज अधिकाऱ्यांचा हेर होता आणि आझाद गोमंतक दलाच्या काही कार्यकर्त्यानी त्याचा खून केला होता असे आढळून आले. शिवाय या खुनाशी, अटक केलेल्या माणसाचा काही संबंध आहे असे सिद्ध करणारा पुरावा आढळला नाही. या गोष्टी लक्षात घेऊन आणि पुरावा नाही हे पाहून लष्करी गव्हर्नरनी अटक केलेल्यांची सुटका करण्याचा आदेश दिला. प्रजासत्ताक दिनी गोवा, दमण व दीवमधील सर्व राजकीय कैद्याना सार्वजनिक माफी देण्यात आली. त्याला अनुसरून हा आदेश होता. त्याप्रमाणे अटक केलेल्यांची सुटका करण्यात आली. ट्रिब्यूनलच्या जज्जानी राष्ट्रपतीना व इतराना तारा पाठवून निषेध व्यक्त केला. त्यानंतर लष्करी

गव्हर्नरनी जज्जाना या प्रकरणी पार्श्वभूमी समजावून सांगितली व आता त्यानी निषेध मागे घेतला आहे व हे प्रकरण मिटले आहे अशा आशयाची तार राष्ट्रपतीना पाठविली आहे. पं. नेहरुंच्या या खुलाशाने सर्वांचे समाधान झाले.

लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेले हे प्रयत्न चुकीचे होते असे म्हणता येणार नाही.

मुक्तीनंतर गोव्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मारक समिती स्थापन झाली. गोव्यातील एक सामाजिक कार्यकर्ते तुळशीदास मळकर्णेकर यानी लष्करी राज्यपालाना विनंती केली की आपण देणार असलेला शिवाजी महाराजांचा पुतळा त्यानी स्वीकारावा व त्या पुतळ्याची उभारणी सार्वजनिक ठिकाणी करावी. लष्करी राज्यपालानी प्रथम ही विनंती मान्य केली. पण नंतर ती अमान्य केली. श्रीमती लोरा डिसोझा यानी विरोध केल्यामुळे लष्करी राज्यपालानी पुतळा स्वीकारायला नकार दिला. या नकाराची प्रतिक्रिया गोव्यात झाली आणि शिवाजी महाराज व महात्मा गांधी स्मारक समिती स्थापन झाली. समितीने विनंतीवजा जाहीर निवेदन केले. निवेदनात म्हटले, ''गोवा हा पोर्तुगालचा भाग आहे हे जनतेच्या मनावर बिंबवण्याचा एक मार्ग म्हणून पोर्तुगीज राजवटीने गोमंतकात ठिकठिकाणी पोर्तुगीज राजपुरुषांची, वीरांची, कवींची आणि इतर अनेकांची स्मारके उभारली होती ती हलविली पाहिजेत आणि त्या ठिकाणी भारतीय पुण्यपुरुषांची ही स्मारके उभारली पाहिजेत, अशी मागणी गोमंतकीय जनतेने चालवली आहे. ही मागणी लक्षात घेऊन गेल्या ५ मे रोजी शिवजयंतीच्या मुहुर्तावर छत्रपती व राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मारक समितीची स्थापना झाली.

''शिवाजी महाराजांचे स्मारक गोमंतकात का व्हायला पाहिजे हे जनतेला पटवून देण्याची आवश्यकता नाही. महाराजांचा आणि गोमंतकाचा प्रत्यक्ष संबंध आला होता. बाटाबाटीच्या काळात अनेक निर्वासित कुटुंबानी आणि देव दैवतानी शिवाजीच्या राज्यात आसरा घेतला होता. गोमंतकातील तरुण पिढीने महाराजांचे देशप्रेमासारखे अनेक गुण अंगात बाणविणे आजच्या काळात जरूर असल्यामुळे एका भव्य पुतळ्याच्या रुपाने त्यांचे स्मारक उभारण्याचा समितीचा मानस आहे. हा

पुतळा वास्को शहरात उभारावा अशी कल्पना आहे.

महात्मा गांधी तर आधुनिक भारताचे राष्ट्रपिता. त्यांच्या तीस वर्षांच्या अविरत प्रयत्नाने आपला देश स्वतंत्र झाला आणि त्यांच्याच पुण्याईने व आशीर्वादाने गोमंतक मुक्त झाला. १९४५ साली डॉ. लोहियानी गोमंतकाच्या स्वातंत्र्यलढ्याचा प्रारंभ केला तेव्हा महात्मा गांधीनी या चळवळीला संपूर्ण पाठिंबा दर्शविला होता हे गोमंतकीय जनता विसरू शकणार नाही. महात्माजी केवळ राजकीय पुढारी नव्हते. एका नव्या तत्वज्ञानाचा महामंत्र त्यानी जगाला दिला म्हणून ख्रिस्त, बुद्ध यांच्या श्रेणीत जगाने त्याना बसवले आहे. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी हे त्यांचे आदर्श. ते गोमंतकीयांसमोर सतत रहावे म्हणून त्यांचा संपुर्णाकृती पुतळा पणजी राजधानीत उभा करावा असा संकल्प समितीने सोडला आहे. पणजी येथील मांडवी नदीत त्यांच्या पूज्य अस्थीच्या अंशाचे विसर्जन झाले होते हे लक्षात घेऊन मांडवी किनाऱ्यावरील जागेवरच त्यांचा पुतळा उभारावयाचा आहे.''

असे हे निवेदन समितीने केले व जनतेने फुल ना फुलाची पाकळी म्हणून द्रव्यसहाय्य करावे अशी प्रार्थना केली. समितीचे अध्यक्ष श्रीमान् विश्वासराव चौगुले होते. कोषाध्यक्ष दयानंद बांदोडकर हे होते, तर बा. द. सातोस्कर व तुळशीदास मळकर्णेकर हे कार्यवाह होते. गोव्यातील नामवंत व्यक्ती सभासद होत्या. त्यामध्ये अनंत पै पाणंदीकर, आल्व्हारु पेरैर, अँथनी डिसोझा, आर्सियान झ्याकीश, आपा करमळकर, बाळासाहेब राणे, बाळकृष्ण ठाकूर, भालचंद्र काणकोणकर, भगवंत नायक, कार्मू आझावेद, दामोदर मंगलजी, दत्ता खांडेपारकर, डॉ. गोविंद वैद्य, अॅड्. गोपाळ आपा कामत, गंगाधर अगरवाल, गणाधीश खांडेपारकर, गजानन गायतोंडे, जयवंतराव सरदेसाई, रामचंद्र बांदेकर, काशिनाथ दामोदर नायक, केशव कुंदे, डॉ. कृष्ण मर्तोबा संझगिरी, डॉ. मार्टीन्स, मलबाराव सरदेसाई, एम्. एस्. प्रभू, मुकुंद देसाई वरुसकर, नगिनदास ठक्कर, नरसिंह सुकेरकर, नागेश सांगेकर, पेद्रू कुन्हेयु आफोंस, प्रभाकर कुडचडकर, पुरुषोत्तम काकोडकर, पांडुरंग विठ्ठल कामत, पांडुरंग शिरोडकर, पांडुरंग मुळगांवकर, दत्ता तिंबले, रावराजे काकासाहेब पेडणेकर, रामनाथ घाणेकर, राजाराम पैंगीणकर, शंकर सरदेसाई, शेख मुसा, शिवराम फोंडू

देसाई, तुकाराम लोलयेकर, वासुदेव म. साळगांवकर, वामन एस्. कुंडईकर, विनायक कवळेकर, विठ्ठलराव धेंपे, विठ्ठल फळदेसाई, वसंत कारे, वसंत कारापूरकर, यशवंतराव द. चौगुले, यशवंत प्रभु देसाई, यशवंत नायक कुराडे हे मान्यवर होते. नावांचा क्रम आद्याक्षरांच्या क्रमाप्रमाणे ठेवला होता. एखाद्या सांस्कृतिक कार्यासाठी मुक्तीनंतर नजिकच्या काळात सर्व थरातील, सर्व जातीचे लोक एकत्र येत होते हे या नावावरून दिसून येते. नंतरच्या काळात पक्ष आले, विचारभिन्नता आली. अनेक तट निर्माण झाले. आजच्या सांस्कृतिक बैठकी भाषेच्या, जातीच्या अगर पक्षाच्या मंचावर होतात. आपण सारे गोमंतकीय आहोत, मग आमचा पक्ष, आमची भाषा, आमची जात, आमचा धर्म, कोणताही असो, ही भावना नाहीशी होत आहे. मुक्तीनंतरच्या नजिकच्या काळात आम्ही जे शिकलो ते आज गमावून बसलो आहोत.

मुक्तीनंतर गोवा कुठल्या राज्यात समाविष्ट करावा यासंबंधी चर्चा सुरू झाली. गोव्याचे वेगळे अस्तित्व टिकवावे असाही एक विचारप्रवाह लोकांमध्ये रुजू लागला. गोवा महाराष्ट्रात विलीन व्हावा असे नॅशनल काँग्रेस (गोवा) संस्थेचे मत पडले. गोमंतकाच्या, सर्वांच्या हिताच्या दृष्टीने गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण घडवून आणणे आवश्यक व अपरिहार्य आहे अशा अर्थाचा ठराव नॅशनल काँग्रेस गोवा या संस्थेने ११ मार्च १९६२ रोजी मंजूर केला व लष्करी राजवट संपुष्टात आणावी अशी मागणी केली. गोवा,दमण व दीव या प्रदेशात जन्म घेतलेल्या व या प्रदेशाचे रहिवाशी बनलेल्या लोकाना भारतीय नागरिकत्व देण्यात आल्याची घोषणा भारत सरकारने ९ एप्रिल ६२ रोजी केली. या घोषणेने प्रत्येक गोमंतकीय अधिकृतरीत्या भारतीय नागरिक झाला.

मुक्तीनंतरच्या काळात लष्करी प्रशासनापुढे काही प्रश्न होते. प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न होता, पोर्तुगीज कायदे 'जैसे थे' असल्यामुळे त्यातून काही समस्या निर्माण झाल्या होत्या. परदेशी मालाच्या आयातीबाबत धोरण काय ठेवावे हाही प्रश्न होता. ६१ सालात जेवढी आयात झाली त्याच्या एकअष्टमांश माल या वर्षी आयात करता येईल अशी परवानगी देण्यात आली. सोने, ऑटोमोबाईल, शंभर रुपयापेक्षा कमी किंमतीची घड्याळे, ट्रान्झिस्टर्स, रेफ्रीजरेटर्स, पंचवीस रुपयापेक्षा जास्त

किंमतीची पेने अशा वस्तू आयात करण्यावर बंदी घालण्यात आली. हे धोरण गोव्यातील व्यापारी वर्गाला पसंत पडले नाही. गोव्यात सतरा कोटी रुपयांची आयात होत होती. नव्या धोरणानुसार येथील व्यापारी वर्गाला फक्त सव्वा कोटी रुपयांचा माल आणण्यास परवानगी मिळाली होती.

गोवा मुक्त झाला तरी गोव्यात प्रवेश करायला परवाना लागत होता. हा परवाना म्हणजे नागरिकत्वाचा आणि भारत एकात्मतेचा अपमान आहे म्हणून १० मे रोजी परवाना न घेता आपण गोव्यात जाणार असे समाजवादी नेते मधू लिमये यानी जाहीर केले. संक्रमण काळात कुणी गैरफायदा घेऊ नये म्हणून ती व्यवस्था होती असे भारत सरकारने जाहीर केले. श्री. लिमये यानी परवान्याशिवाय गोव्यात प्रवेश केला. नंतर केंद्र सरकारने परवाना पद्धत रद्द केली.

इतिहासाला विरोध करू पहाणाऱ्या काही विघ्नसंतोषी गटानी वास्को आणि काणकोण येथे बॉंबस्फोट केले. गोव्यातील मूठभर लोकानी भारतीय अधिकाऱ्यांचे चारित्र्यहनन करण्याचे सत्र आरंभले. लष्करी राज्यपालांचे राजकीय सल्लागार हंडू यांच्याविरुद्ध मोहीम सुरू झाली. श्री. हंडू गोमंतकीयविरोधी आहेत. त्यांचा कारभार स्वच्छ नाही असा प्रचार झाला. पोर्तुगीज सरकारचे सेक्रेटरी जनरल आबेल कुलासो याना त्यांच्या रहात्या घरातून बाहेर काढले, त्यांची गाडी हिसकावून घेण्यात आली असा श्री. हंडू यांच्यावर आरोप झाला. पोर्तुगीज गव्हर्नर जनरल सिल्व्हा यांच्या पत्नीला त्यानी आश्रय दिला म्हणून हा सूड होता असे म्हटले गेले. पण कुलासो हे सरकारी अधिकारी नव्हते. त्याना सरकारी गाडी वापरण्याचा हक्क नव्हता असे श्री. हंडूंचे म्हणणे होते. हंडूंच्या ऐवजी गोमंतकीयाला सल्लागार म्हणून नेमावे या मागणीसाठी सेलीग्ने द गामा पिंत या महिलेने सचिवालयासमोर सत्याग्रह केला. हा सत्याग्रह म्हणजे एक थट्टेचा विषय होऊन बसला.

गोव्यातील पोर्तुगीज कैद्याना घेऊन जाण्यासाठी दोन पोर्तुगीज बोटी पाठविण्यात येणार असे लिस्बनहून जाहीर करण्यात आले. 'व्हेरा क्रूस' व 'पिद्रीया' या दोन बोटी कराचीला आल्या. दाबोळी ते कराची अशा विमानसेवेतून पोर्तुगीज कैद्याना पाठविण्यात आले. २ मे रोजी पोर्तुगीज स्थानबद्धाना पोर्तुगालला पाठविण्याचे काम सुरू झाले. दाबोळी ते कराची

मार्गावर विमानाने ५१ फेऱ्या केल्या. ४०६५ स्थानबद्धाना पोर्तुगालला पाठविण्यात आले. शेवटची फेरी १५ मे ६२ रोजी मारण्यात आली. त्यामध्ये गोव्याचे शेवटचे पोर्तुगाल गव्हर्नर जनरल व्हासाल द सिल्व्हा हे होते.

पोर्तुगीज स्थानबद्ध फोंड्याला होते. तिथे गोव्यातील मिस्तीस जाऊन रडत होते. पोर्तुगीज आणि ब्रिटिश राज्यकर्ते यामध्ये फार मोठा फरक होता. राज्यकर्ते म्हणून पोर्तुगीज अधिकारी कॅथोलिकापासून वेगळे राहिले नाहीत. अनेक पोर्तुगीज सैनिक कॅथोलिकांच्या घरी जात आणि तिथेच रहात. त्या घरातले एक असे ते वागत. त्यामुळे पोर्तुगीज गेले तेव्हा राज्यकर्ते गेले असे मिस्तिसना वाटले नाही. आपल्याला सहाय्य करणारे गेले असे त्याना वाटले व त्यानी पोर्तुगालला जाणे पसंत केले. गोव्याच्या मुक्तिमुळे दुःखी झालेले मूठभर मिस्तीस सोडले तर इतराना आनंद झाला होता. काही चिंतातूर जंतू नव्हते असे नाही. मासीयार मद्य आता महाग होणार, इटलीचे बटाटे खायला मिळणार नाही, मर्सिडिस टॅक्सी दिसणार नाही. 'सॅसकीन' व 'डबल घोडा' कापड पहायला मिळणार नाही अशी कुरकूर काहींची चालली होती. हे अपवाद होते. गोव्यातील बहुसंख्य हिंदू व सुशिक्षित ख्रिश्चन आनंदित झाले होते. भारत हा आपला देश आहे. म्हणून भारताशी झालेले विलीनीकरण हिंदूना आवडले होते. पारतंत्र्यापेक्षा स्वातंत्र्य बरे असे सुशिक्षित ख्रिश्चनाना वाटले होते. पोर्तुगीजांच्या राज्यापेक्षा आपले राज्य बरे ही त्यांची भावना होती. मुक्तिनंतर पोर्तुगीज भाषेचे महत्व कमी झाले. बोंदिय, बोतार्द, बों नोईत हे शब्द नाहीसे झाले. त्याऐवजी गुड मॉर्निंग, गुड आफ्टरनून, गुड नाईट हे शब्द आले. ओब्रिगाद ऐवजी थँक यू आले.

पोर्तुगीज स्थानबद्ध कैद्याना न्यायला आलेल्या बोटीतून ९१ गोमंतकीय आले. त्यामध्ये लक्ष्मीकांत भेंब्रे, पां. पु. शिरोडकर,निळकंठ कारापूरकर, नारायण हरी नाईक हे स्वातंत्र्यसेनानी होते. गोमंतकीय जनतेने त्यांचे भव्य स्वागत केले. सत्कार सभेत 'देश म्हणजे दगड धोंडे माती नव्हे. देश म्हणजे माणूस. यॉ देशातील आणि गोव्यातील सर्व माणसाचे जीवन सर्वांगानी समृद्ध होवो' अशी प्रार्थना स्वातंत्र्यसेनानी लक्ष्मीकांत भेंब्रे यानी केली. सर्वात मोठे दान म्हणजे प्राणदान. गोव्याच्या

विमोचनासाठी ज्यानी प्राणदान दिले ते खरे वीर असे भावपूर्ण उद्‌गार स्वातंत्र्यसेनानी नारायण हरी नाईक यानी काढले; तर आपल्या खेड्यातील लोकांचे जीवन सुधारेल तेव्हाच गोवा सुधारला असे म्हणता येईल असे सांगून स्वातंत्र्यसेनानी पां. पु. शिरोडकर यानी बहुसंख्य समाजाला वरिष्ठाकडून होणारे त्रास गोव्याच्या स्वातंत्र्ययुगात नाहीसे झाले पाहिजे असे सुचवले.

गोवा मुक्त करण्यासाठी ज्या संघटनेने कार्य केले ती नॅशनल काँग्रेस (गोवा) ठेवावी की नाही याचा विचार करण्यासाठी पणजीतील पीपल्स हायस्कूलच्या जागेत एक बैठक भरली. या बैठकीला पीटर आल्वारीस, गोपाळ आपा कामत, पांडुरंग मुळगांवकर, शंकर सरदेसाई, डॉ. विनायक मयेकर, अँथनी डिसोझा, प्रफुल्ल प्रियोळकर हजर होते. नॅशनल काँग्रेस (गोवा) हेच नाव ठेवावे असे या सभेत ठरले व नवी समिती निवडण्यात आली. या समितीचे एक प्रतिनिधी मंडळ पं. नेहरुना भेटले व गोव्याचे वेगळेपण राखले पाहिजे व मराठी–कोंकणी या दोन्ही भाषाना गोव्यात उत्तेजन मिळाले पाहिजे असे निवेदन दिले. त्यानंतर प्रा. शंकर सरदेसाई यानी पुढाकार घेऊन गोव्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची शाखा स्थापन करावी यासंबंधी चर्चा सुरू केली. ११ जुन १९६२ रोजी गोव्यामध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची शाखा सुरू करण्याचे ठरले. ७ जुन १९६२ रोजी लष्करी राजवट संपुष्टात आली व टी. शिवशंकर यानी गोव्याचे पहिले नायब राज्यपाल म्हणून सूत्रे हाती घेतली. लोककल्याण हे शासनाचे कार्य आहे असे त्यानी म्हटले. जगातील एक अत्यंत मोठ्या लोकशाही राष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून, जनतेचा एक सेवक म्हणून मोठ्या विनम्र भावाने मी माझ्या कार्याची सूत्रे हाती घेत आहे असे त्यानी सांगितले. गोव्यात लष्करी राजवट संपून नागरी प्रशासन सुरू झाले. पण काही राष्ट्रद्रोही घटकानी नायब राज्यपालांच्या कचेरीत बॉम्ब ठेवला. सूर्यप्रकाशाला भिणाऱ्या घुबडांच्या या विघ्नांची दखल कुणी घेतली नाही. नायब राज्यपालानी सांगितले, 'अधिकार ग्रहण केल्यानंतर गोव्यातील जनतेने माझ्या कारभारात सहभागी व्हावे असे मला वाटते.' एवढे म्हणून ते थांबले नाहीत. त्यानी सल्लागार समिती स्थापन केली. लोकशाहीच्या दिशेने चाललेल्या वाटचालीतील हे पहिले पाऊल होते.

: दोन :

पहिल्या निवडणुकीच्या वाटेवर

गोवा मुक्त झाला तरी पोर्तुगीज परत गोवा काबीज करणार असे काही लोकांना वाटत होते. सुरक्षा समितीत पोर्तुगालने मांडलेला प्रस्ताव कधी ना कधी संमत होईल व सालाझार परत येईल अशी आशा बाळगणारे काही महाभाग गोव्यात होते. कुठे रस्त्यावरच्या फलकाना काळा रंग फास, कुठे पाट्या उडवून टाक असे बालीश प्रयत्न ते लोक करीत होते. पोर्तुगीज काळात गोव्यात येणाऱ्या माणसाना देवीची लस टोचून घ्यावी लागत होती आणि त्यांच्या कपड्याना गंधकाची धुरी द्यावी लागत होती. गोवा मुक्त झाल्याबरोबर हा त्रास चुकेल असे वाटले होते. पण तो त्रास थांबवण्यात आला नाही. सुरुवातीच्या काळात 'इंडियन' म्हणजे अस्वच्छ, खरुज असलेला कुरूप प्राणी असा समज होता. इंडियामध्ये प्रचलित असलेले देवी, कॉलरा रोग पसरू नये म्हणून मुक्तिनंतरच्या सुरुवातीच्या काळात कॉलराचेही इंजेक्शन गोव्यात येणाऱ्या लोकाना देण्यात येई. काही पोर्तुगीज धार्जिण्या लोकानी भारतीयांबद्दल अफवा पसरावयाला सुरुवात केली. भारतीय अधिकाऱ्यानी काब राजमहल कसा लुटला? जाताना त्यानी किंमतीवान वस्तू कशा नेल्या याचे अतिशोक्तिपूर्ण वर्णन करण्यात येऊ लागले. काही लोकाना ते खरे वाटू लागले. कारण भारतातून येणाऱ्या भारतीयाना गोव्यात असलेल्या परदेशी मालाचे जबरदस्त आकर्षण दिसून येत होते. प्रत्येक भारतीय गोव्यातील शहरात फिरत होता व दुकानात शिरून परदेशी मालाची चौकशी करीत होता.

नागरी प्रशासनाला मदत करण्यासाठी नायब राज्यपालानी २९ जणांची सल्लागार समिती नेमली. या समितीच्या सदस्यानी वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना केल्या तरी सल्लागार समितीच्या निर्णयाचा प्रभाव गोव्याच्या प्रशासनावर पडला नाही. गोव्यामध्ये भाषिक व शैक्षणिक आंदोलने झाली. शेतकरी अधिवेशन भरले व ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या. गोवा मुक्त झाला कधी व भाषावाद गोव्यात शिरला कधी हे कळलेच नाही. गोव्यात कुठल्या भाषेत शिक्षण द्यावे हा प्रश्न उभा राहिला.

सरकारने गोव्यातील विद्यार्थ्यांना पोर्तुगीज, इंग्लिश, उर्दू, मराठी व कोंकणी अशा कोणत्याही एका भाषेतून प्राथमिक शिक्षण घेण्याची परवानगी दिली. सरकारच्या या आदेशानुसार बेचाळीस हजार विद्यार्थ्यांनी मराठीत शिक्षण घेण्यासाठी नावे नोंदवली. एवढ्या मुलाना शिकविण्यासाठी सरकारने शिक्षकांची भरती केली. पण नंतर ६३ च्या एप्रिल सुट्टीत सर्व शिक्षकाना रद्द केले.

एस्. एस्. सी. पास झालेल्या शिक्षकाना वगळून इतर सगळ्या शिक्षकानी परीक्षेला बसले पाहिजे असा दंडक घालण्यात आला. १३ मे १९६३ हा दिवस परीक्षेचां दिवस ठरविण्यात आला. त्याच सुमारास पालक परिषद भरली होती. ॲड्. सुशील कवळेकर अध्यक्ष म्हणून आले होते. दयानंद बाळकृष्ण बांदोडकर त्याना घेऊन आले. या परिषदेमध्ये शिक्षकांची बाजू प्रकाशराव हेब्बाळकर यानी मांडली. अनंतराव खाडिलकर यानी त्याना साथ दिली. परीक्षा घेणे हा अन्याय आहे असे हेब्बाळकर यानी सांगताच ॲड्. सुशील कवळेकर यानी त्याना पाठिंबा दिला. कवळेकर म्हणाले, मला कुणी आता एस्. एस्. सी. परीक्षेला बसायला सांगितले तर मी परीक्षेमध्ये पास होईन की नाही ही शंका आहे. परिषदेमधील शिक्षकांची गाऱ्हाणी ऐकून बांदोडकर यानी शिक्षकांच्या बाजूने उभे रहायचे ठरविले. या घटनेतून गोमंतक प्राथमिक शिक्षक संघ स्थापन करण्यात आला. दत्तात्रय देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. दरम्यान, परीक्षेमध्ये ऐंशी टक्के शिक्षक नापास झाल्याची बातमी पसरली. ३ जून १९६३ रोजी अरुण दोंदे यांच्या नेतृत्वाखाली सभा झाली व सभेमध्ये चार मागण्या मांडण्यात आल्या. १) ज्या शिक्षकानी दहा वर्षाहून जास्त काळ शिक्षकाची नोकरी केली आहे त्याना कसलीही परीक्षा न घेता कामावर घ्यावे व त्याना रिफ्रेशर कोर्स देण्यांत यावा. २) जे शिक्षक व्ह. फा. पास नाहीत पण ज्यानी पाच वर्षाहून जास्त काळ शिक्षकाची नोकरी केली आहे त्याना कामावर घेऊन परीक्षेला बसण्याची संधी द्यावी. ३) व्ह. फायनल अगर पी. एस्. सी. परीक्षा झालेल्याना नोकरीवर घ्यावे. त्यांची परीक्षा घेण्याचा अधिकार सरकारला नाही. ४) साठ वर्षे वयोमर्यादा झालेल्याना पेन्शन मिळावे.

या मागण्यावर चर्चा झाली पण नायब राज्यपाल निर्णय देईना.

तीनशे शिक्षक सचिवालयासमोर जमले. पार्वतीबाई वेरेकर यानी नायब राज्यपालाना सांगितले की आमची सहनशीलता आता संपलेली आहे. निर्णय ऐकल्याशिवाय आम्ही परत जाणार नाही. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत शिक्षक सचिवालयासमोर थांबले. पण राज्यपालानी निर्णय दिला नाही. शिक्षकानी माघार घ्यायची नाही असे ठरविले. दररोज शिक्षक जमत होते. श्रीमहालक्ष्मी देवालयाच्या मंडपात वस्तीला रहात होते. या आंदोलनाला सर्व तऱ्हेचा पाठिंबा भाऊसाहेब बांदोडकर यानी दिला. आर्थिक सहाय्य पण केले. शिक्षकानी गोव्यातील शहरातून निधी गोळा केला. या आंदोलनाला जनतेकडून प्रचंड पाठिंबा मिळाला. शिक्षक दररोज बैठा हरताळ पाळत होते. १ जुलै १९६३ रोजी गोवाभर हरताळ दिन साजरा झाला. मुक्त गोव्यातील तो पहिला 'गोवा बंद' होता. ॲड्. लक्ष्मीकांत भेंब्रे, माधव बीर, डॉ. राम हेगडे यानी शिक्षकांची बाजू मांडली. 'नोकरशाहीला घाबरता कशाला' असे ॲड्. लक्ष्मीकांत भेंब्रे म्हणाले. या लढ्याला पुरुषोत्तम काकोडकर व ॲड्. गोपाळ आपा कामत यानी विरोध दर्शविला.

सचिवालयामध्ये सल्लागार समितीची बैठक चालली होती. बैठकीसमोर शिक्षकांचा प्रश्न आला. सचिवालयाच्या दाराशी शिक्षकांच्या घोषणा चालू होत्या. सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार सरकारने परीक्षा रद्द केल्या. दहा वर्षाहून जास्त काळ शिक्षक म्हणून काम केलेल्याना नोकरीवर घ्यावे, व्ह. फा. परीक्षा नापास झालेल्याना परीक्षेला बसण्यासाठी वर्षाची मुदत द्यावी असे ठरले. या लढ्यामध्ये पार्वतीबाई वेरेकर, प्रकाशराव हेब्बाळकर आणि ताराबाई केणी यानी प्रामुख्याने भाग घेतला. शिवाय सकटे गुरुजी, खाडीलकर गुरुजी,मराठे गुरुजी यांचाही वाटा मोठा होता. वि. ना. लवंदे, दत्तात्रय देशपांडे, मुरलीधर राणे, रघुनाथ देशपांडे या नेत्यांचे मार्गदर्शन या आंदोलनाला लाभले.

गोव्यातील जनतेने अशी उघडपणे केलेली निदर्शने पाहिली नव्हती. आपल्या हक्कासाठी शिक्षक–शिक्षिका उपाशीपोटी राहून अठरा दिवस लढा चालवतात याचे कौतुक लोकाना वाटले व त्यानी शिक्षकांच्या या लढ्याला पाठिंबा दिला. काकोडकर व कामत यानी विरोध केला त्यामागे कारण होते, ते शिक्षकांच्या पात्रतेचे. शिक्षक चांगले नसतील तर मुलांचे नुकसान

होते ही भूमिका गोपाळ आपा कामत यांची होती पण परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षक चांगले शिकवतात व परीक्षा उत्तीर्ण न झालेले शिक्षक मुलाना चांगले शिकवत नाहीत असे म्हणणे शिक्षकांवर अन्याय करणारे होते. मुक्त गोव्यातील पहिला लढा म्हणून शिक्षकांच्या या लढ्याला महत्व आहे. यापूर्वी १८ ऑगस्ट १९६२ रोजी मोहन धारिया यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांचे अधिवेशन भरले होते व त्यामध्ये कूळकायदा, खंड किती द्यावा यासंबंधी चर्चा झाली होती. लष्करी राजवट संपली होती. नागरी प्रशासन लोकांचे प्रश्न् हाताळत होते आणि गोवा हळुहळू संसदीय लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करीत होता. लोकनियुक्त पंचायती हा विकेंद्रित लोकशाहीचा पाया होता. त्यामध्ये गोव्यात ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा जनतेने त्याचे उत्स्फूर्त स्वागत केले. निवडणुकीचा प्रकार सर्वसामान्य जनतेला नवीन होता. दरडोई मत असा प्रकार असल्यामुळे पांढरपेशा समाज ग्रामपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत समरस झाला नाही. पहिल्याच ग्रामपंचायत निवडणुकीत १२८ पुरुष व ६१ महिला बिनविरोध निवडून आल्या. साऱ्या ग्रामपंचायतींमधील १०३९ जागासाठी १३३६ पुरुष द १९२ महिला निवडणूक लढवित होत्या. सामान्य जनता निवडणुकीत रस घेत होती. पण बुद्धीमान सुशिक्षित समाज ग्रामपंचायतींच्या पहिल्या निवडणुकीपासून दूर राहिला होता. सामान्य लोकाबरोबर आपण निवडणूक लढवायची कशी ? या अहंकाराने तो ग्रासून गेला होता. परंतु नंतर आपली चूक या समाजाला कळून चुकली व विक्रेंद्रित लोकशाहीच्या चक्रामध्ये तोही गुंतून गेला.

याच सुमारास गोमंतक मराठी साहित्य संमेलन भरले. संमेलनामध्ये विलीनीकरणाचा ठराव आला. साहित्य संमेलनामध्ये विलीनीकरणाचा ठराव कशाला ? असा प्रश्न विरोधकानी केला. गोव्यामध्ये प्रत्यक्षात दोन तट पडले होते. पोर्तुगीजधार्जिण्या लोकांपासून मुक्त होण्यासाठी गोवा महाराष्ट्रात विलीन करावा असे काही लोकाना वाटत होते; तर गोवा वेगळे राज्य म्हणून राहिल्यास हितसंबंधी लोक गरिबाना पिळतील अशी भीती काहीना वाटत होती व त्यासाठी काहीना विलीनीकरण हवे होते. पारतंत्र्यामध्ये भारतीय संस्कृती टिकली ती मराठीमुळे असे काहींचे मत होते व त्यासाठी काहीना विलीनीकरण हवे होते. गोव्यातील काही

हितसंबंधी लोक सत्ता आपल्या हाती घेऊन गरिबाना लुबाडतील म्हणूनही काहीना विलीनीकरण हवे होते. विलीनीकरणवाद्यांची ही अशी कारणे होती.

उलट स्वातंत्र्य मिळालेले आहे. त्याचा उपयोग करून घेऊ या, महाराष्ट्रात विलीन होऊन आपले सत्व दुसऱ्याना देण्याऐवजी स्वतःचे भले करून घेऊ या अशी भूमिका संघराज्यवाल्यांची होती. महाराष्ट्राचा विस्तारवाद गोमंतकीयाना महाग पडेल असे त्याना वाटत होते. मराठीने भारतीय संस्कृती टिकवली म्हणून ती काही आपली भाषा होत नाही असे घटक राज्यवाल्यांचे म्हणणे होते. विचाराची ही दोन टोके साहित्य संमेलनासारख्या सांस्कृतिक क्षेत्रातही दिसत होती. गोमतंक मराठी साहित्य संमेलनामध्ये विलीनीकरणाचा ठराव झाला तो याच एका टोकातून. या संमेलनात देवदासी प्रथेचा कथानकात वापर करणाऱ्यांचा निषेध करणारा ठराव सौ. सविता रामनाथकर यानी मांडला. १४ जानेवारी १९६३ रोजी पद्मभूषण डॉ. विठ्ठल नागेश शिरोडकर यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या भूमीने केलेला सत्कार सर्वात मोठा सत्कार असे त्यानी सत्कारप्रसंगी भावपूर्ण उद्गार काढले. २१ फेब्रुवारी ६३ रोजी केंद्रीय गृहमंत्री लालबहादूर शास्त्री यानी महत्वाची घोषणा केली. इतर केंद्रशासित प्रदेशाबरोबर गोवा, दमण, दीव या केंद्रशासित प्रदेशाला कायदेमंडळ व मंत्रिमंडळ देण्याची तरतूद असणारे विधेयक लालबहादूर शास्त्री यानी मांडले. निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली.

शेष भारताच्या संसदीय लोकशाही परंपरेनुसार गोव्यातही निवडणुका होतील, विधीमंडळ स्थापन होईल, मंत्रिमंडळ राज्य चालविल याची खात्री राजकीय पुढाऱ्याना होती. फक्त वेळ कोणती तेवढा प्रश्न होता. तो प्रश्न आता सुटला होता. वेगवेगळ्या राजकीय पक्षानी आपले तंबू थाटले होते. मुक्तिनंतर नॅशनल काँग्रेस (गोवा) चे कार्य आता संपले. गोव्यामध्ये राष्ट्रीय पक्षाचे कार्य सुरू करायला आता हरकत नाही असे मत बहुतेकानी व्यक्त केले. एप्रिल १९६२ मध्ये पुरुषोत्तम काकोडकर यानी दिल्लीहून काँग्रेस सदस्यत्वाचे फॉर्म आणले व सभासद नोंदणी सुरू केली. जुन महिन्यात काँग्रेस सदस्यत्वाची बोलणी सुरू झाली. भाऊ काकोडकर यानी ठराविक लोकानाच फॉर्म दिले. आपल्या विरोधकाना फॉर्म दिले नाही

अशी त्यांच्यावर टीका झाली. काँग्रेसची अस्थायी समिती नेमली गेली व पुरुषोत्तम काकोडकर याना निमंत्रक नेमले गेले. डॉ. पुंडलिक गायतोंडे हे दुसरे निमंत्रक होते. ॲड्. पांडुरंग मुळगांवकर, ॲड्. गोपाळ आपा कामत, प्रा. शंकर सरदेसाई, डॉ. जे. एफ्. मार्टिन्स, डॉ. विनायक मयेकर, डॉ. राम हेगडे, ॲड्. लक्ष्मीकांत भेंब्रे, अँथनी डिसोझा, एन्. बी. राव, अल्वारू पेरैरा, डॉ. श्रीमती लॉरा डिसोझा व श्रीमती मित्रा बीर असे अस्थायी समितीचे सदस्य होते. अँथनी डिसोझा हे रहात असलेल्या सौझा पॉवल यांच्या घरी अस्थायी समितीची कचेरी ठेवण्यात आली. शिरोडा येथील पांडुरंग फोंडेकर यांच्या घरी अस्थायी समितीची पहिली बैठक भरली. १९६३ मध्ये काँग्रेस समितीच्या निवडणुका झाल्या आणि पुरुषोत्तम काकोडकर हे गोवा प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. मार्च १९६३ मध्ये गोव्यात भारतीय काँग्रेसची अधिकृत स्थापना झाली.

२० मे १९६३ रोजी पं. नेहरुंचे गोव्यात आगमन झाले. हजारो लोकानी त्यांचे स्वागत केले. भारतीय संघराज्यात गोव्याचे अस्तित्व वेगळे असावे असे सरकारने ठरविले आहे. गोव्याचे वेगळे व्यक्तिमत्व आगळे आहे, ते नाहीसे करणे, हिरावून घेणे अयोग्य ठरेल. सरकारच्या या निर्णयाविरुद्ध चळवळ केल्यास त्याचा काही उपयोग होणार नाही असे ते म्हणाले. जमीन कसणारा जमिनीचा मालक झाला पाहिजे असे प्रतिपादन पं. नेहरुनी शेतकरी संमेलनात केले. मडगांव येथे बोलताना गोव्यात स्वयंशासनाची संवय वाढवली पाहिजे असा सल्ला त्यानी दिला; तर पणजी येथील सभेत श्रमाची प्रतिष्ठा आणि सहकार्य यांच्या योगे प्रगती साधता येईल असे ते म्हणाले. पं. नेहरु श्री मंगेश देवस्थानला भेट द्यायला आले तेव्हा हरिजन मंडळी मंदिर प्रवेश करण्यास आम्हाला मदत करा असे फलक घेऊन उभी होती. पं. नेहरुनी त्यावर काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. देवदर्शन करून परतत असताना एक हरिजन पंडितजीना म्हणाला, 'पंडितजी आपका दर्शन हुआ', भगवान का दर्शन नही हुआ' पंडितजी त्याला म्हणाले, 'मैं आपसे सहमत हूँ' हरिजनाना मंदिर प्रवेश करू द्या असे पंडितजीनी म्हणायला हवे होते असे पंडितजींच्या असंख्य चाहत्याना वाटले. हा अपवाद वगळता पं. नेहरुंची गोवा भेट अविस्मरणीय झाली. त्यांची गोव्यातील भाषणे तात्विक बैठकीवर आधारलेली होती. एका

: तीन :

संसदीय लोकशाहीची सुरुवात

गोमंतकीय जनतेला निवडणुकांची तशी संवय नव्हती. पोर्तुगीजकाळात निवडणुका म्हणजे एक फार्स होता. मतदान फक्त थोड्याना होते आणि अधिकारी सांगेल त्याला मत देणे भाग पडत होते. मुक्तिनंतर ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या पण ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत सुशिक्षितानी, प्रतिष्ठितानी भाग घेतला नव्हता. सर्वसामान्य माणसांच्या भाऊगर्दीत आपण कशाला जायचे असा अहंभाव होता. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा प्रतिष्ठिताना जाग आली. विधानसभेचे सदस्य गोव्याचे राज्य चालवणार ही जाणीव झाल्याबरोबर निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले. निवडणुकीच्या रिंगणात काँग्रेस आणि प्रजासमाजवादी असे दोन राष्ट्रीय पक्ष होते. कम्युनिस्टांनी शेतकरी पक्ष या नावाखाली निवडणुका लढवायचे ठरवले होते. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष व युनायटेड गोवन्स हे दोन स्थानिक पक्ष निवडणुका लढवत होते. शिवाय अपक्ष उमेदवार होतेच.

गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण हे महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे उद्दिष्ट होते व गोव्याची मातृभाषा मराठी व कोकणी ही तिची बोली अशी भूमिका महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने घेतली होती. ६ मार्च १९६३ रोजी म्हार्दोळ येथे अधिकृतरीत्या म. गो. पक्षाची स्थापना झाली. सभेचे अध्यक्ष पां. पु. शिरोडकर होते. १९४६ च्या सुमारास बेळगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात विलीनीकरणाचा ठराव आचार्य अत्रे यानी मांडला. त्या ठरावाला पां. पु. शिरोडकर यानी अनुमोदन दिले. संमेलनाध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर गोव्यात आले आणि त्यानी विलीनीकरणाची बाजू एका सभेत मांडली. त्या सभेत काँग्रेसवाल्यांनी माडखोलकरांची हुर्यो केली. गोव्यातील पांढरपेशा समाज विलीनीकरणाला पूर्वीपासून विरोध करीत होता. त्यामुळे विलीनीकरणाचा प्रचार करणारा पक्ष निवडून येईल असे बड्या बड्याना वाटत नव्हते व उभे राहिलेल्या काँग्रेस उमेदवाराना आपण निवडून आणू अशा भ्रमात ते होते.

म. गो. पक्ष निवडून आला तर सहा महिने राज्य करायचे आणि त्यानंतर सर्वांनी राजीनामे द्यायचा असा डावपेच म. गो. ने आखला होता. बहुसंख्य आमदारानी राजीनामा देऊन विधानसभा बरखास्त करायची. पुन्हा निवडणुकीला उभे रहायचे आणि पुन्हा जिंकून पुन्हा राजीनामा द्यायचा असे ठरले होते. बांदोडकराना लोकसभेला रहायचे होते. एस्. एम्. जोशी बांदोडकराना म्हणाले, 'तुम्ही लोकसभेला उभे राहू नका. प्रजासमाजवादी पक्षाशी युती करा. आम्हाला लोकसभेची एक जागा आणि विधानसभेच्या चार जागा द्या. त्याबदली निवडणुकीचे प्रचारकार्य आम्ही करू' बांदोडकरानी पीटर अल्वॅरीश याना लोकसभेचे तिकीट दिले. पण विधानसभेच्या चार जागा नाकारल्या व दोन जागांवर राजी व्हा असे सांगितले. प्रजासमाजवादी पक्षाची यंत्रणा प्रचाराच्या कार्यात भाग घेऊ लागली. मतदार याद्या द्यायला पाहिजेत ही साधी गोष्ट त्यावेळी म. गो. कार्यकर्त्यांना माहीत नव्हती. प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीची यंत्रणा शिस्तबद्ध केली. महाराष्ट्र कॉंग्रेसचे पदाधिकारी कॉंग्रेसचा जरी प्रचार करीत होते तरी त्यांचा कल म. गो. पक्षाकडे होता. वसंतराव नाईक कॉंग्रेसचे निवडणूक साहित्य घेऊन गोव्यात आले तेव्हा ते भाऊसाहेब बांदोडकरांकडे राहिले. कॉंग्रेस कमिटीच्या सभेत याबाबत पुरुषोत्तम काकोडकर यानी आक्षेप घेतला. तेव्हा वसंतराव नाईक म्हणाले, 'बांदोडकर माझे मित्र आहेत. त्यांच्या घरी राहणे म्हणजे म. गो. चा प्रचार करणे नव्हे'. म. गो. पक्षाला महाराष्ट्र कॉंग्रेसचे सहाय्य होते व कॉंग्रेसला मुंबई कॉंग्रेसचे सहाय्य होते. परराज्यातील कमिट्यामुळे निवडणुकांचे निकाल बदलता येत नसतात हे निवडणुकांच्या धांदलीत नेते विसरले होते.

निवडणूक प्रचारासाठी कॉंग्रेसचे बडे नेते आले. पं. नेहरु आले नाहीत हे बरे झाले. कॉंग्रेसमधील विलीनीकरणवादी गटात कॉंग्रेस प्रचारासाठी पं. नेहरु येऊ नये असे वाटत होते. माधव बीर यानी विरोध प्रदर्शित केला होता. कॉंग्रेसमध्ये विलीनीकरणवाद्यानी जरी वेगळा गट स्थापन केला होता तरी त्याना पं. नेहरुबद्दल अत्यंत आदर होता आणि पं. नेहरुंच्या प्रचारसभेचा उपयोग झाला नाही, असे होणे त्याना नको होते. कॉंग्रेस बहुमताने गोव्यात येत नाही हे लालबहादूर शास्त्री यानी ओळखले होते. कॉंग्रेस पक्षाच्या सभाना गर्दी होईनाशी झाली. कॉंग्रेसने दुटप्पी धोरण

स्वीकारले. जुन्या काबिजादीमध्ये संघराज्याचा प्रचार केला तर नव्या काबिजादीमध्ये विलीनीकरणाचा प्रचार केला. विलीनीकरण म्हणजे महाराष्ट्राशी संपूर्ण विलीनीकरण नव्हे तर गोव्याची अस्मिता ठेवून स्वतंत्र असे आर्थिक सहाय्य मंडळ स्थापन करून विलीनीकरण असा मुद्दा मांडला गेला. काही प्रमाणात ही निवडणूक काकोडकरांविरुद्ध बांदोडकर अशी होती. काकोडकर हे सुशिक्षितांचे, पांढरपेशांचे प्रतिनिधीत्व करीत होते; तर बांदोडकर हे आम जनतेचे, श्रमिक लोकांचे प्रतिनिधीत्व करीत होते.

म. गो. पक्षातर्फे उभे राहिलेल्या उमेदवारांमध्ये पां. पु. शिरोडकर, विश्वनाथ लवंदे, नारायण नाईक, दत्ताराम चोपडेकर, दत्ताराम देसाई, शंभू पालयेकर हे स्वातंत्र्यसैनिक सोडले तर इतर उमेदवार लोकांच्या परिचयाचे नव्हते. उलट काँग्रेसच्या उमेदवारांमध्ये डॉ. जे. एफ्. मार्टिन्स, आपा करमळकर, माधव बीर, ॲड्. गोपाळ आपा कामत, ॲड्. पांडुरंग मुळगांवकर, तुकाराम काणकोणकर, प्रा. शंकर सरदेसाई, जयकृष्ण शिरोडकर, डॉ. राम हेगडे, ॲड्. लक्ष्मीकांत भेंब्रे, डॉ. विनायक मयेकर, रवींद्र केळेकर, पुरुषोत्तम काकोडकर हे स्वातंत्र्यसैनिक होते. श्रीमान वैकुंठ शेणवी धेंपे, माधवराव तळावलीकर असे उद्योगपती होते. जात आणि धर्म यावर विभागणी केल्यास दीव– दमण सोडून गोव्याच्या अठ्ठावीस उमेवारांमध्ये काँग्रेसने १३ सारस्वत, १० ख्रिश्चन व ५ बहुजनसमाज असे उमेदवार उभे केले होते. म. गो. उमेदवारांमध्ये ७ सारस्वत, २ ख्रिश्चन व उरलेले बहुजनसमाजातील होते. काँग्रेसने उच्चवर्णीय उमेदवार निवडले म्हणून काँग्रेस पडली असे सांगण्यात येते. हे खरे नाही. काँग्रेस विरोधकानी तसा प्रचार केला हे खरे पण निवडलेले उमेदवार हे निव्वळ सारस्वत होते म्हणून निवडले गेले या म्हणण्यात तथ्य नव्हते व त्यातले बहुसंख्य स्वातंत्र्य सैनिक होते. डिसोझा याना पणजी मतदारसंघ दिला होता तो त्यानी नाकारला. शिवराम आजगावकर याना मांद्रे मतदारसंघ दिला होता. त्यानी तो नाकारला. श्रीमती मित्रा बीर याना थिवी मतदार संघ दिला होता तो नंतर माधव बीर याना देण्यात आला.

निवडणुकीत भाऊसाहेब बांदोडकरांचा म. गो. पक्ष जिंकणार हे स्पष्ट झाले होते. उत्तर गोव्यामध्ये निवडणुकीची एक सभा ठरली होती. पण ठरलेल्या वेळी बांदोडकर व नाथ पै पोहाचू शकले नाहीत. रात्रीचे

अकरा वाजून गेले होते. नाथ पै बांदोडकराना म्हणाले, आता अकरा वाजून गेले आहेत, सभा रद्द करुया. लोक आमची वाट पाहून घरी गेले असतील. बांदोडकर म्हणाले, 'सभेला जाऊया. लोक आमची वाट पहात थांबले असतील.' रस्त्यावर काळोख होता. गांवाचा ठावठिकाणा नव्हता. सभेच्या गावाला कधी पोचू कळत नव्हते. इतक्यात अकस्मात पेटती चुडते घेऊन शंभर दोनशे लोकांचा समुदाय चालत येताना दिसला. ते दृश्य भावना हेलावून टाकणारे होते. आणखी एका सभेत एक वृद्धा मंचाच्या दिशेने येऊ लागली. कुठे चाललीस ? एकाने विचारले काही न बोलता ती मंचाजवळ गेली व बांदोडकराना म्हंणाली, 'तू दयानंद मरे' बांदोडकरानी मान हलविली. तसे ती म्हणाली, तुला आशिर्वाद द्यायला आले आहे आणि आपल्या हातातून आणलेली फूले तिने बांदोडकराना दिली. हे सारे प्रसंग पाहून बॅ. नाथ पै म्हणाले,' म. गो. पक्षाचा विजय निश्चित'

गोवा विधानसभेचे तीस सदस्य होते. दीव-दमण याचे प्रत्येकी एक असे दोन उमेदवार वगळता गोव्याचे २८ सदस्य होते. या २८ सदस्यांपैकी म. गो. पक्षाने १४ जागा जिंकल्या. म. गो. पुरस्कृत उमेदवार दोन निवडून आले. एकूण पहिल्या विधानसभेत म. गो. पक्षाचे सोळा उमेदवार निवडून आले. पेडणेहून काशीनाथ अनंत शेट गांवकर, मांद्रेहून विजय कामूलकर, शिवोलीहून पां. पु. शिरोडकर, म्हापशाहून रघुनाथ टोपले, थिवीहून शंभू पालयेकर, डिचोलीहून कुसुमाकर कडकडे, पाळीहून अच्युत शेणवी उसगांवकर, सांत–इस्तेवहून दत्ताराम चोपडेकर, मडकईहून वसंत वेलींगकर, शिरोड्याहून पुंडलिक सगुण नाईक, सांगेहून टोनी फर्नांडिस, काणकोणहून गणबा देसाई, केपेहून दत्ताराम देसाई, कुडचडेहून वि. सू. करमली असे १४ उमेदवार निवडून आले. म. गो. पुरस्कृत प्रजासमाजवादीचे जयसिंगराव व्यं. राणे व फोंड्याहून गजानन रायकर असे दोन मिळून म. गो. चे एकूण सोळा उमेदवार निवडून आले. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे चिटणीस जर्नादन शिंक्रे यानी स्वतंत्रपणे निवडूक लढवली. पक्षाबाहेरच्या व्यक्तीना उमेदवारी दिल्याबद्दल त्यानी निषेध नोंदवून उमेदवारी लढवली. ते पराभूत झाले.

युनायटेड गोवन्स पक्षाचे १२ उमेदवार निवडून आले. कळंगुटहून जॉन डिसोझा, हळदोण्याहून ऑर्लांद सिकेर लोबो, पणजीहून डॉ. जॅक

सिकेरा, सांताक्रुजहून जॉकी आराऊझ, सांत आंद्रेहून तेवतोन परेर, कुंकळ्ळीहून शाबास्तांव माझारेल, बाणावलीहून मावरीन फुर्तादि, नावेलीहून आल्वार फुर्तादि, मडगांवहून वासुदेव नारायण सरमळकर, कुडतरीहून इनियु अंतोनिया पिमेंत, कुठ्ठाळीहून डॉ. लुईश प्रॉत बार्बोझा आणि मुरगांवहून उर्मिदा मश्कारेन्हस असे बारा उमेदवार निवडून आले. काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून आला नाही. गोव्याच्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पडली ती दोन परस्पर विरोधी भूमिका घेतल्यामुळे असे म्हणणे बरोबर नाही. स्थानिक प्रश्नाबाबतीत राष्ट्रीय पक्षाचे कार्यकर्ते अनेकदा भिन्नभिन्न विचारांचा प्रचार करतात. बेळगांव सीमा प्रश्नावर कर्नाटकमधील काँग्रेसवाले आणि महाराष्ट्रातील काँग्रेसवाले वेगवेगळी भूमिका घेतात. गोव्यात काँग्रेस पडली ती वेगवेगळ्या भूमिका घेतल्या म्हणून नव्हे तर त्यानी उभे केलेले उमेदवार सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे नव्हते. काँग्रेसने उभ्या केलेल्या स्वातंत्र्य सैनिकाना मतदारानी झिडकारले याचा अर्थ मतदाराना स्वातंत्र्यसैनिक नको होते असा नव्हे. पोर्तुगीजांच्या राजवटीत भाषणस्वातंत्र नव्हते. त्यामुळे त्यांचे विचार लोकाना कळले नव्हते. सर्वसाधारण जनतेमध्ये स्वातंत्र्यसैनिकांबद्दल आदर होता पण काँग्रेस पक्षात राहून ते आपले प्रतिनिधीत्व करतील असे लोकाना वाटत नव्हते. जी काही मते काँग्रेसला पडली ती उमेदवारांच्या वैयक्तिक ओळखीने. काँग्रेसच्या लोकप्रियतेचा त्यात वाटा फार कमी होता. काँग्रेसने गोव्यात शाखा उघडल्या होत्या. पक्षीय निवडणुकीमध्ये तुल्यबळ चढाओढ झाली होती. पुरुषोत्तम काकोडकर विरुद्ध माधव बीर असा तो सामना होता. या निवडणुकीत काकोडकर याना तीन मते जास्त मिळाली होती. लोकशाहीचे शिक्षण काँग्रेस आपल्या कार्यकर्त्याना देत होती, परंतु लोकांची नाडी काँग्रेसने ओळखली नव्हती. बहुजनसमाज विलीनीकरणाच्या बाजूने होता. लोकगंगेचा प्रवाह विलीनीकरणाच्या बाजूने चालला होता. तो बरोबर होता की नाही हा मुद्दा वेगळा. त्या प्रवाहाची जाणीव काँग्रेस नेत्याना झाली नाही. त्यानी जर आपला पवित्रा बदलला असता तर गोव्यात वेगळे चित्र दिसले असते.

गोव्यातील साम्यवादी, शेतकरी पक्ष स्थापन करून उभे राहिले होते. कामगार क्षेत्र जर सोडले तर बहुसंख्य गोमंतकीयाना कम्युनिस्ट पक्षाबद्दल

माहिती नव्हती. नांव शेतकरी पक्ष असे होते पण उमेदवार कामगार नेते होते. २८ मतदार संघापैकी आठ मतदारसंघात शेतकरी पक्षाने आपले उमेदवार उभे केले होते. जेराल्ड पेरेर, नारायण आत्माराम देसाई, दिवाकर काकोडकर, जॉर्ज वाज, बेर्ता मिनेझिस ब्रागांझा असे साम्यवादी नेते निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. पण सगळेच पराभूत झाले. नारायण देसाई व जेराल्ड पेरेर तेवढे हजाराहून जास्त मते मिळवू शकले. जेराल्ड पेरेर याना मिळालेली मते कामगारांची होती. त्यांचा मतदारसंघ कामगार क्षेत्रातला होता. नारायण देसाई हे पेडणे मतदारसंघात उभे राहूनही त्याना १३२३ मते मिळाली ही उल्लेखनीय बाब होती. शेतकरी पक्षाच्या एकूण साऱ्या उमेदवाराना ४५९७ मते पडली. एकूण मतदानापैकी शेतकरी पक्षाला १.८४ टक्के मते मिळाली. अपक्ष उमेदवाराना अकरा टक्के मते मिळाली. पहिल्या निवडणुकीत ६१ अपक्ष उमेदवार होते.

गोव्यात जात आणि धर्म महत्वाचे होते. हिंदू हिंदूमध्ये जात वरचढ होती पण जात आणि धर्म यामध्ये संघर्ष झाला की जातीय भावना कोसळून पडत होती. डॉ. जॅक सिकेरा याना भाऊसाहेब बांदोडकर म्हणायचे, कितीही प्रयत्न केला तरी तुम्ही स्वतंत्रपणे राज्य करू शकणार नाही. तुम्हाला हिंदूंची मदत घ्यावी लागेल. गोव्याची रचना तशी होती. बिचारी काँग्रेस या दुष्टचक्रात सापडली होती. ना धड हिंदूंची, ना धड ख्रिश्चनांची असे तिचे स्वरूप होते. मतदार इतके आत्यंतिक झाले होते की ते माणसे पहात नव्हते. डॉ. राम हेगडे या झुंजार स्वातंत्र्यसेनानीविरुद्ध पुंडलिक नाईक नावाचे एक साधे कार्यकर्ते उभे होते. मतदारानी पुंडलिक नाईक याना निवडून दिले. मुक्तिनंतरच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास काँग्रेसने केला नाही. उंच मनोऱ्यात काँग्रेस नेते बसून राहिले.

गोवा मुक्त झाल्याबरोबर गोव्यात आर्थिक विकासाच्या गोष्टी सांगितल्या गेल्या पाहिजे होत्या. जनतेची आर्थिक सुधारणा होण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला पाहिजे होता. पोर्तुगीजांच्या वेळी पोर्तुगीजांचे राज्य ख्रिश्चनांचे राज्य आहे असे हिंदूना वाटत होते. मुक्तिनंतर हे राज्य हिंदूचे होईल असे ख्रिश्चनाना वाटत होते. त्या भीतीतून ते राजकीयदृष्ट्या संघटित झाले होते व त्यानी युनायटेड गोवन्स पक्ष स्थापन केला. म. गो. हा हिंदूचा पक्ष आणि यु. गो. हा ख्रिश्चनांचा पक्ष असे सगळ्याना वाटत

होते. पण दोन्ही पक्ष तसे सांगत नव्हते. आमचा पक्ष हिंदूंचा आहे असे तुम्ही म्हणता मग अमुक अमुक ख्रिश्चन आमच्या पक्षात कसे ? असे म. गो. चे नेते म्हणत होते. आमचा पक्ष ख्रिश्चनांचा आहे असे तुम्ही म्हणता मग अमुक अमुक हिंदू आमच्या पक्षात कसे ? असे यु. गो. वाले म्हणत होते. दोन्ही पक्षांचे विरोधक एकमेकांवर आरोप करीत होते. म. गो. पक्ष हा गोवा महाराष्ट्राला विकत आहे असा आरोप यु. गो. वाल्यांकडून होत होता. तर यु. गो. पक्ष पोर्तुगीजधार्जिणा आहे व या पक्षाचे नियंत्रण आर्चबिशपकडून होत आहे असा आरोप यु. गो. विरोधक करीत होते. या आरोपात आत्यंतिकपणा होता पण म. गो. हा हिंदूंचा आणि यु. गो. हा ख्रिश्चनांचा हे पहिल्या निवडणुकीवरून सिद्ध झाले. हिंदू बहुसंख्य असलेल्या मतदारसंघात म. गो. पक्ष निवडून आला, तर ख्रिश्चन बहुसंख्य असलेल्या मतदारसंघात यु. गो. पक्ष निवडून आला. बाणावलीमध्ये यु. गो. ला ५२४१ मते मिळाली तर म. गो. ला अवघी ३४८ मते पडली. कुठ्ठाळीमध्ये यु. गो. पक्षाला ५७३० मते मिळाली तर म. गो. पक्षाला अवघी ४८८ मते पडली. यु. गो. ने २४ उमेदवार उभे केले होते पण त्यांचे १२ उमेदवार निवडून आले. म. गो. ने २७ उमेदवार उभे केले त्यातून १४ उमेदवार निवडून आले. २ म. गो. पुरस्कृत प्रजासमाजवादी उमेदवार निवडून आले. म. गो. चे एकूण १६ व यु. गो. चे १२ असे हे १६ विरुद्ध १२ चे राजकारण गोव्यात सुरू झाले. या निवडणुकीत म. गो. चा एक ख्रिश्चन व यु. गो. चा एक हिंदू निवडून आला.

या निवडणुकीतला मतदार अशिक्षित होता. सिंह म्हटले की सिंहावर फुली मारत होता असा प्रचार होत होता त्यात थोडेसे तथ्य असले तरी संपूर्ण सत्य नव्हते. म. गो. पक्षाने प्रजासमाजवादी उमेदवाराना पाठिंबा दिला आहे असे कळल्याबरोबर सिंह निशाणी घेऊन उभे असलेल्या उमेदवाराना लोकानी मते दिली नाहीत. झोपडी निशाणी घेऊन उभे राहिलेल्या जयसिंगराव व्यं. राणे याना ३५८५ मते पडली. फोंडा येथे म. गो. पुरस्कृत प्रजासमाजवादी गजानन रायकर याना ५४२४ मते पडली; तर सिंह निशाणी असलेल्या ॲड्. मुकुंद शिंक्रे याना अवघी ७०० मते मिळाली.

या निवडणुकीत बहुसंख्य मतदारानी धर्मावर आधारीत अशा

पक्षाना मते दिली. राष्ट्रीय पक्षाना त्यानी जवळ केले नाही. याचे कारण भीती हे होते. सत्ता ख्रिश्चनांच्या हाती गेल्यास हिंदूना त्रास होईल असे बहुसंख्य हिंदूना वाटत होते आणि सत्ता हिंदूंच्या हाती गेल्यास ख्रिश्चनांना त्रास होईल असे ख्रिश्चनाना वाटत होते. गोव्यातील २८ मतदारसंघापैकी १६ मतदारसंघात हिंदू बहुसंख्य होते आणि १२ मतदारसंघात ख्रिश्चन बहुसंख्य होते. त्यामुळे १६ म. गो. चे व १२ यु. गो. चे उमेदवार निवडून येणे अपरिहार्य होते. १६ विरुद्ध १२ च्या राजकारणाचा अंत होणे जरुरीचे होते. संसदीय लोकशाहीमध्ये हिंदूंचे राज्य अगर ख्रिश्चनांचे राज्य असा विचार करणे चुकीचे होते. हे मतदाराना उशिरा कळले. उशिरा का होईना कळले हे बरे झाले. न पेक्षा जातीय तणावात गोवा होरपळून गेला असता.

पहिल्या निवडणुकीत यु. गो. ने २४ उमेदवार उभे केले. त्यामध्ये ९ हिंदू होते व एक मुसलमान होता. यु. गो. चा प्रभाव ख्रिश्चन मतदार जास्त असलेल्या जुन्या काबिजादीवर होता. नव्या काबिजादीवर यु. गो. प्रभाव टाकू शकला नाही. पहिल्या निवडणुकीत म. गो. पक्षाला महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांचे सहाय्य मिळाले. यु. गो. ला तसे बाहेरून सहाय्य मिळाले नाही. स्थानिक नेत्यांच्या बुद्धीमत्तेवर व संघटना चातुर्यावर यु. गो. ने जास्त भर दिला. या निवडणुकीत यु. गो. ला 'हात' हे निवडणूक चिन्ह मिळाले. या चिन्हावर टीका झाली. हा हात सेंट झेवियरचा हात आहे. तो दाखवून यु. गो. पक्ष ख्रिश्चन धर्मीयांच्या धार्मिक भावनेला आवाहन करीत आहे असे विरोधकानी म्हटले. त्यावेळी डॉ. जॅक सिकेरा म्हणाले, 'आम्ही निवडणूक चिन्ह म्हणून पाम वृक्षाचे झाड पसंत केले होते, पण निवडणूक आयोगाने आम्हाला हात हे चिन्ह दिले. डॉ. सिकेरानी खरी परिस्थिती सांगून विरोधकांचे तोंड बंद केले. यु. गो. ने लोकसभेची निवडणूक लढवली. यु. गो. ला विधानसभा निवडणुकीत बारा जागा मिळाल्या. असल्या तरी लोकसभा निवडणुकीत २७१,२८४ पैकी ७४०८१ मते मिळाली. यु. गो पक्ष लोकसभा निवडणुक हरला. मताच्या टक्केवारीप्रमाणे यु. गो. पक्षाला २७.८८ टक्के मते मिळाली. दक्षिण गोव्यामध्ये हे प्रमाण जास्त म्हणजे ३५.४० टक्के होते.

निवडणुकीच्या वेळी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यानी यु.गो. ची मागणी अराष्ट्रीय स्वरुपाची आहे अशी टीका केली. त्याना डॉ. सिकेरा

यानी उत्तर दिले. ते म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महाराष्ट्राला जो दर्जा हवा असे चव्हाण प्रतिपादन करीत होते तशाच प्रकारची मागणी यु. गो. करीत आहे. आमची मागणी जर अराष्ट्रीय ठरते तर त्याच मागणीवरून चव्हाण अराष्ट्रीय ठरतात. अशा व्यक्तीच्या हातात संरक्षण खाते सोपवणे योग्य नव्हते.' यु. गो. ची घोषणा 'आमचें गोंय आमकां जाय' अशी होती.

गोमंतकीय जनतेने म. गो. पक्षावर गोव्याचा राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी टाकली. मुख्यमंत्री कुणाला करायचे हा प्रश्न म. गो. नेतृत्वावर पडला. त्या घटनेचा वृत्तांत भाऊसाहेब बांदोडकर यानी दिला आहे. ते म्हणतात ''निवडणूक जिंकल्यानंतर लगेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याशी सल्लामसलत करण्यासाठी मुंबईत गेलो. गोव्याचे मुख्यमंत्रीपद कोणास द्यायचे याही मुद्द्यावर मी त्यांच्याशी सल्लामसलत करणार होतो. नामदार वसंतराव नाईक यांच्या बंगल्यावर त्यांच्याशी माझी मुलाखत सकाळी साडेआठ वाजता ठरली होती. सकाळचे सारे कार्यक्रम आटोपून मी त्यांच्या बंगल्याच्या दिशेने निघालो. त्या क्षणापर्यंत आणखी घटकाभरात मला स्वतःलाच गोमंतकाच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळण्याचा आग्रह होईल याची यत्किंचितही कल्पना नव्हती. किंबहुना आपण मुख्यमंत्री व्हावे या कल्पनेचा स्पर्शही माझ्या मनाला झाला नव्हता. पण वसंतरावानी मला वेठीला जुंपले. ते म्हणाले, 'हा विजय तुमच्यावरील जनतेच्या प्रेमामुळे तुम्ही मिळवला आहे. तेव्हा तुम्हीच मुख्यमंत्री झाले पाहिजे'. हे ऐकून मी दिङ्मुढ झालो. आमच्या कोकणीत एक सुंदर म्हण आहे तिचा भावार्थ असा, 'भावकादेवीला नव्हता नवरा म्हणून ती सल्लामसलतीस वेताळाकडे गेली. तर तिथे वेताळ तिला सल्ला देतो. म्हणतो, 'तूच माझी बाईल हो' अगदी तसेच झाले.

या सर्व अनपेक्षित घटनेमुळे व आग्रहामुळे मी किंचित भांबावल्यासारखा झालो. वसंतरावाना परोपरीने समजूत घालण्याची पराकाष्टा केली. पण ते माघार घेईना. स्वतःचा आग्रह कमी पडतो म्हणून की काय त्यानी बॅ. नाथ पै, एस्. एम्. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, जयवंतराव टिळक या पुढाऱ्याना व विद्वानाना माझी समजूत

घालण्यासाठी पाचारण केले व माझा नाईलाज झाला. गोमंतकीय जनतेचे माझ्यावरील प्रेम व विश्वास याची मला खात्री होती व जनतेसाठी आपण काहीतरी केले पाहिजे याचीही मला जाणीव होती. परंतु त्यासाठी मला मुख्यमंत्रीपद नको होते. जनतेची सेवा करण्याचे मार्ग मी स्वतंत्ररीत्या मनाशी ठरवले होते. राजकारणाचा मला अनुभव नाही. ही जबाबदारी मला नको आहे. कुणीतरी दुसरी व्यक्ती निवडू या, हा माझा युक्तीवाद निष्फळ ठरला. व एक नवीन जबाबदारी घेऊन मी मुंबईहून परत आलो.

गोव्यात आल्याबरोबर मी माझा विचार बदलेन अशी शंका आल्यामुळे त्या साऱ्या हिंतचिंतकानी बॅ. नाथ पै याना माझा पाठपुरावा करण्यासाठी गोव्यात पाठविले. त्यानी माझ्या पक्षाच्या लोकाना मी मुख्यमंत्री व्हावे असे सुचवले. तरीही माझा व्यक्तिगत निर्णय एका विशिष्ट गोष्टीवर अवलंबून ठेवला होता तो म्हणजे माझ्या उपास्य देवतेचा कौल. तो कौलही अनुकूल झाला व अशाच एका उजाडलेल्या दिवसाने मला गोमंतकाचा मुख्यमंत्री बनवले''.

या प्रसंगाची आठवण सांगताना सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या, ''सारे आमदार आमच्या बंगल्यावर जमले. बॅ. नाथ पै भाऊंबरोबर होते. भाऊ मला म्हणाले, हे सारें लोक मला मुख्यमंत्री व्हायला सांगत आहेत. भाऊ मग देवघरात गेले. कुठेलेही महत्वाचे निर्णय घेण्यापूर्वी आपल्या देवघरात जाऊन भाऊ ध्यानस्थ बसत आणि थोड्या वेळाने बाहेर येऊन आपला निर्णय सांगत. त्याप्रमाणे भाऊ देवघरात गेले. तिथे ध्यानस्थ बसले आणि थोड्या वेळाने बाहेर येऊन त्यानी आपला निर्णय सांगितला. मुख्यमंत्री होण्याची सूचना त्यानी मान्य केली. नाथ पै मला म्हणाले, ''कुणी काही विरोध केला नाही.''

म. ग़ो. निवडून आला तेव्हा पां. पु. शिरोडकर मुख्यमंत्री होतील असे सगळ्याना वाटले, पण तसे झाले नाही. याबाबत पां. पु. शिरोडकर म्हणाले, ''मी सारस्वतद्वेष्टा आहे अशी समजूत सर्वत्र पसरली होती. त्यामुळे माझ्यासारखा बहुजन समाजाकडे झुकणारा मुख्यमंत्री त्याना नको होता. ज. स. सुखठणकर इत्यादी मुंबईकरानी हा बनाव केला. १६ डिसेंबर १९६३ रोजी नेतेपदाची निवडणूक झाली. सचदेव हे त्यावेळी ना. राज्यपाल होते. आमदार शंभू पालयेकर याना मात्र या घटनेचा राग आला. ते इतके

चिडले की आमदारांच्या काढलेल्या फोटोमध्ये बसण्याचे त्यानी टाळले. २० डिसेंबर १९६३ रोजी मुक्त गोव्याचे पहिले मंत्रिमंडळ स्थापन झाले. भाऊसाहेब बांदोडकर मुख्यमंत्री झाले. वि. सू. करमली व टोनी फर्नांडिस हे दोन मंत्री त्यानी घेतले. टोनी फर्नांडिस मंत्रीपद मिळाल्याच्या आनंदात म्हणाले, ''मला छानपैकी सूट शिवून घ्यावा लागेल.'' एक मध्यमवर्गीय राजकीय कार्यकर्ता मंत्री होत आहे याचा आनंद सगळ्याना झाला. पां. पु. शिरोडकर हे मुक्त गोव्यातील लोकनियुक्त विधानसभेतील पहिले सभापती झाले.

भाऊसाहेब बांदोडकर यांची नेतेपदी निवड झाल्यानंतर वसंत वेलींगकर यानी त्यांच्यासाठी राजीनामा दिला. मडकई मतदारसंघातून बांदोडकर निवडून आले व गोव्याच्या राजकारणात एका दानशूर आणि स्वच्छ नेत्याचे आगमन झाले. विधानसभा सुरू झाल्यानंतर सहा महिन्यानी सर्वानी राजीनामे द्यायला पाहिजे होते. परंतु तसे झाले नाही. त्यामुळे बांदोडकराना विलीनीकरण खरोखर हवे होते का ? अशी शंका एस्. एम्. जोशी यांच्यासारख्या तपस्वी नेत्याच्या मनात येऊ लागली. विधानसभा अधिवेशनाच्यावेळी सुरुवाती सुरुवातीला भाऊसाहेब बांदोडकर आपली उपस्थिती टाळत असत. त्यांच्या या अनुपस्थितीबद्दल टीकाही होत असे. डॉ. जॅक सिकेरा त्यांची थट्टा उडवत असत. पण हळुहळू भाऊसाहेब उपस्थित राहू लागले आणि सडेतोड उत्तरे देऊ लागले. भाऊसाहेबांच्या उत्तराचे कौतुकही लोकांकडून होऊ लागले.

विधानसभेत म. गो. चे आमदार मराठीत बोलत होते. त्यावेळी आम्हाला न समजणाऱ्या भाषेत हे का बोलतात असा खोचक प्रश्न डॉ. सिकेरा करीत होते. एकदा आमदार टोपले यानी आपणास कोकणी कळत नाही असे म्हटले. तेव्हा आमदार सरमळकर यानी टोपले यानी लिहिलेले कोकणी पुस्तक सादर केले व तुम्हाला जर कोकणी कळत नाही तर हे पुस्तक कसे लिहिले असा प्रश्न केला. तेव्हा टोपले म्हणाले,'' हे पुस्तक कोकणी या मराठी बोलीतले आहे.''

याच सुमारास डॉ. जॅक सिकेरा यानी 'डेप्युटेशनिस्ट गो बॅक' ही चळवळ सुरू केली. गोव्यामध्ये त्यावेळी १२०५ डेप्युटेशनिस्ट होते. त्यापैकी ४५९ महाराष्ट्रीय आहेत अशी भूमिका डॉ. सिकेरा यानी घेतली. या

लोकाना परत बोलावून घेतले पाहिजे. त्याना गोव्यात ठेवता कामा नये अशी भूमिका डॉ. सिकेरा यानी घेतली. एका विशिष्ट समाजाकडून त्याना पाठिंबा मिळाला. गोव्यात त्यावेळी शेष भारतीयाविरुद्ध सर्वसामान्य जनतेच्या मनात आकस निर्माण झाला होता. ''सिकेर करता तें चूक न्हय. आमी गोंयकार आसताना हे भायले लोक कित्याक जाय ? आमी किदें हुशार ना ?'' असे सामान्य माणासाला वाटत होते. पण पोर्तुगीजांच्या वेळी सुद्धा डेप्युटेशनिस्ट होते. गोव्यातल्या पोलिसाना ज्यावेळी १७ रु. १२ आणे पगार मिळत होता त्यावेळी पोर्तुगीज पोलिसाना १२८ रु. पगार मिळत होता. गोव्याच्या सबइन्स्पेक्टरला ६० रु. व सार्जंटला १२८ रु. पगार मिळायचा. त्यावेळी पोर्तुगीज सार्जटला ४०० रु. पगार मिळत होता. डॉ. सिकेरा यांची ही चळवळ सामान्य माणसाला पटली नाही. डेप्युटेशनिस्ट लोकाना परत पाठविण्याचा निर्णय सरकारने घेतला पण ते यश डॉ. सिकेरा यांच्या चळवळीमुळे नव्हते. गोव्यातील प्रशासनाची पद्धत समजायला गोमंतकीय अधिकाऱ्याना वेळ लागला नाही. डेप्युटेशनिस्टांची गरज संपली. या चळवळीमुळे विलीनीकरण की वेगळे राज्य हा प्रश्न मोठ्या प्रमाणात जनतेसमोर येऊ लागला. लोकाना काय हवे आहे याचा विचार व्हायला हवा असा मुद्दा यातून निघाला आणि त्यातून 'ओपिनियन पोल' आला.

ओपिनियनपोल-सार्वमत कौल

१९६३ च्या निवडणुकीत म. गो. पक्ष निवडून आला. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचा विजय हा विलीनीकरणाचा विजय अशी घोषणा श्री. बांदोडकर यानी केली. गोव्याचे विलीनीकरण त्वरित व्हावे असा आग्रह त्यानी धरला. गोव्यातील काँग्रेस नेत्यानी गोव्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न पुढे ढकलावा अशी मागणी केली. निवडणुकीचा कौल हा विलीनीकरणाचा कौल नव्हे असे पुरुषोत्तम काकोडकर यानी पं. नेहरुंची भेट घेऊन सांगितले. दहा वर्षे विलीनीकरणाचा प्रश्न पुढे ढकलावा या मागणीच्या उपयुक्ततेबद्दल लोकमत तयार करण्यांसाठी स. का. पाटील गोव्यात आले. लोकाना स. का. पाटील यांची भूमिका पसंत पडली नाही. डिचोलीच्या एका सभेत स. का. पाटील यांची प्रतिमा जाळण्यात आली. पाटील नाराज होऊन परत दिल्लीला गेले. काँग्रेस नेते त्यांच्या भेटीस गेले तेव्हा 'हॅन्डस ऑफ गोवा'' असे उद्गार त्यानी काढले.

प. नेहरुंच्या निधनानंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. सर्वसामान्य जनतेचे मत त्यानी ओळखले होते. प्रत्यक्षात त्याना ते दिसावे म्हणून विलीनीकरण परिषद म. गो. पक्षाच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली. गोवा प्रदेश काँग्रेस समितीची राजकीय परिषद आणि म. गो. पुरस्कृत महाराष्ट्र–गोवा विलीनीकरण परिषद अशा दोन वेगवेगळ्या परिषदा पणजीत भरल्या. विलीनीकरण परिषदेला दहा हजाराहून जास्त प्रतिनिधी हजर होते. खेड्यापाड्यातील लोक बार्जमधून आले होते. बार्जेस कांपालवर लावल्या होत्या. एवढी प्रचंड गर्दी गोवा प्रथमच पहात होता. या परिषदेचे उद्घाटक बॅ. नाथ पै होते, ॲड्. लक्ष्मीकांत भेंब्रे अध्यक्ष होते. स्वागताध्यक्ष ॲड्. गोपाळ आपा कामत होते, नारायण देसाई, आल्फ्रेड आफोंस, देवीदास कुडचडकर, नारायण नाईक, रमेश देसाई व शिवाजी देसाई हे संयुक्त चिटणीस होते. माधवराव तळावलीकर व सुब्राय काशिनाथ नायक हे कोषाध्यक्ष होते. सदस्य म्हणून बा. द. सातोस्कर, नारायण पालेकर, एम्. एस्. प्रभू, रंगनाथ सांतू कामत, अँथनी डिसोझा, शशिकला काकोडकर, वसंत वेलींगकर, प्रभाकर घोडगे, तुळशीदास

मळकर्णेकर, शेख अली व माधव बीर यानी काम पाहिले. विलीनीकरण परिषदेमध्ये विलीनीकरणवादी काँग्रेसवाल्यानीही भाग घेतला होता याबाबत कोषाध्यक्ष माधवराव तळावलीकर म्हणाले, ''महाराष्ट्र व मराठी भाषा यासाठी आम्ही या परिषदेत भाग घेतला. ऐतिहासिक अपघातामुळे महाराष्ट्र आणि गोवा वेगळे झाले. महाराष्ट्र व गोवा यांची संस्कृती एक आहे असे मला वाटते. आमच्याकडे अजूनही पंढरपूरला जाऊन आलेल्या वारकऱ्याला भोजन देऊन सत्कार करतात. पंढरपूरला जाण्याची इच्छा कित्येक गोमंतकीयांच्या मनात वास करते. आमची भाषा मराठी हे आमचे मत प्रामाणिक आहे असे मला वाटते.''

विलीनीकरण परिषदेला जमलेला प्रचंड जनसमुदाय पाहून विलीनीकरणाचे पारडे जड झाले. काँग्रेसची राजकीय परिषद त्यामानाने प्रभावी ठरली नाही. विलीनीकरण परिषदेच्या अपयशाने खचून पुरुषोत्तम काकोडकर यानी राजीनामा दिला असे वृत्त मुंबईच्या 'फ्री प्रेस' व 'जनशक्ती' दैनिकाने प्रसिद्ध केले. काँग्रेस अध्यक्ष कामराज यानी त्यासंबंधी बोलायला नकार दिला. संघराज्य म्हणून गोवा दहा वर्षे रहावा आणि त्यानंतर विलीनीकरण करावे की नाही यासंबंधीचा निर्णय गोव्याच्या जनतेने घ्यावा या काँग्रेस संसदीय बोर्डाने संमत केलेल्या ठरावाबाबत यशवंतराव चव्हाण यानी आश्चर्य व्यक्त केले. त्या बैठकीला चव्हाण उपस्थित नव्हते पण त्या सभेच्या इतिवृत्ताला मंजुरी दिलेल्यामध्ये यशवंतराव चव्हाण आहेत असे काँग्रेसच्या सरचिटणीसानी सांगितले. दरम्यान, गोवा विधानसभेमध्ये २३ जानेवारी १९६५ रोजी गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण व्हावे हा बिनसरकारी ठराव मंजूर केला होता. यासंबंधी गोवा महाराष्ट्रात विलीन झाल्यास खास दर्जा दिला जाईल. गोव्यातील लोकांचा धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक वारसा टिकवला जाईल, असा ठराव महाराष्ट्र विधानसभेने केला. महाराष्ट्र विधानसभेने केलेल्या या ठरावाचा निषेध म्हैसूर विधानसभेने १२ मार्च १९६५ रोजी केला.

लालबहादूर शास्त्रींच्या कारकीर्दीत एका कॅबिनेट मिटिंगमध्ये गोव्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न मध्यपूर्व निवडणुका घेऊन ठरवण्याचा एक ठराव मंजूर झाला. गोव्यातील काँग्रेस नेते हतबल झाले. मध्यपूर्व निवडणुका झाल्या तर विलीनीकरणाच्या बाजूने कौल मिळेल असे

काँग्रेसवाल्याना वाटत होते. मतदारांची एकंदर मते एकत्र केली तर ती विलीनीकरणाच्या विरोधी आहे हे गोव्याचे काँग्रेसजन काँग्रेस श्रेष्ठीना सांगत होते. दहा वर्षे थांबून नंतर गोव्याचा प्रश्न सोडवा अशी गोवा प्रदेश काँग्रेसची मागणी होती. त्याची मागणी संमत होईल असे दिसेना. पुरुषोत्तम काकोडकर यांची मन:स्थिती बिघडली व त्यानी गोव्यातील काँग्रेस कचेरीच्या खर्चासाठी मित्रांकडून सोळा हजार रुपये आणले. त्यावेळचे प्रदेश काँग्रेस समितीचे सरचिटणीस लिगोरिया कॉंत कारव्हाल्यू यांच्याकडे दिले व ते दिल्लीला जाऊन शास्त्रीना भेटले. कामराजाना भेटले. स. का. पाटील मुंबईला होते म्हणून मुंबई व परत दिल्ली अशी फेरी मारली. त्यासंबंधी स्वतः पुरुषोत्तम काकोडकर म्हणतात, ''दिल्ली स्टेशनवरच्या वेटिंग रूममध्ये मी बसलो. काय झालं कोण जाणे ? चुकून ऋषीकेशला जाणाऱ्या आगगाडीत बसलो. गोव्याच्या प्रश्नाबाबत माझी भूमिका बरोबर की चूक यासंबंधीचा संघर्ष माझ्या मनात होता. ऋषीकेश स्टेशनवर गाडी पोचताच मी एक टांगा केला आणि देवळे दाखवायला सांगितले. नंतर तिथे मला एक मद्रासी साधु भेटला. तो म्हणाला, ''माझ्या झोपडीत दूध आहे. फळे आहेत. तुम्ही माझ्या झोपडीत या'' त्याच्या झोपडीत मी रात्रौ साडेतीन वाजता आंघोळ केली व रात्रौ साडेचार वाजता एकाच ठिकाणी बसून विचार करू लागलो. सकाळचे आठ कधी वाजले कळलेच नाही. मद्रासी साधुने जेव्हा मला ''योगीराज'' म्हणून हाक मारली तेव्हा मी भानावर आलो. ''मी आणि योगीराज'' असा प्रश्न मी त्याला केला तेव्हा तो म्हणाला ''हो ! तुम्ही योगीराज. साडेचार तास एकाच अवस्थेत ध्यान करणारें तुम्ही योगीराज नाहीतर कोण ?''तीन महिने मी ऋषीकेशला राहिलो. कधी कधी तो मद्रासी साधु मला म्हणत होता ''तिथले लोक मला पाकिस्तानी हेर म्हणतात.'' त्या तीन महिन्यात माझ्या मनातील संघर्ष संपला आणि एका निश्चित मुद्यावर मी येऊन पोचलो. तो मुद्दा म्हणजे ''माझी भूमिका बरोबर होती.''

पुरुषोत्तम काकोडकर अकस्मात नाहिसे झाले होते. त्यांच्या अदृश्य होण्याने काँग्रेस शाखेत प्रचंड खळबळ माजली. काही गोमंतकीय बुद्धीवाद्यानी महाराष्ट्राने काहीतरी काळबेरे केले असावे असा संशय व्यक्त केला. तीन महिन्यानी काकोडकर प्रगट झाले. काकोडकरांच्या गैरहजेरीत गोवा प्रदेशचे एक शिष्टमंडळ दिल्लीस गेले. त्यावेळी काँग्रेस अध्यक्ष

कामराज यानी या शिष्टमंडळाचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून घेतले नाही. ३१ मार्च १९६६ रोजी काकोडकर यानी पंतप्रधान इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, आपा करमळकर, नंदा व लिगोरयु कारव्हाल्यू याना पत्रे लिहिली. त्यांचे पत्र पोचल्याबरोबर लोकसभेत निवेदन झाले. २१ जून १९६६ या दिवशी काकोडकर हे कामराज याना भेटले. इंदिरा गांधीना भेटले. पंतप्रधान म्हणाल्या ''मुदतपूर्व निवडणुका घेण्याचे मंत्रिमंडळाने ठरवले आहे व त्यासाठी विधानसभा विसर्जित केली जाणार आहे.''

काकोंडकर नाराज झाले. नंतर ते मोरारजीना भेटले. ''३ सप्टेंबर १९६६ रोजी काँग्रेसच्या मध्यवर्ती संसदीय बोर्डाची बैठक आहे. त्यामध्ये कुणी ओपिनियन पोलची सूंचना केल्यास तुम्ही विरोध कराल का ?'' असा प्रश्न काकोडकर यानी मोरारजी देसाई याना केला. त्यानी ''नाही'' असे उत्तर दिले. ३ सप्टेंबर १९६६ रोजी काँग्रेस संसदीय बोर्डाची बैठक भरली. गोव्याचे भवितव्य ठरविण्यासाठी ओपिनियन पोल (सार्वमत कौल) घेण्याचा ठराव स. का. पाटील यानी मांडला व तो मंजूर झाला. या पोलमध्ये दोन पर्याय ठेवण्यात आले. संघप्रदेश हा एक पर्याय व गोवा महाराष्ट्रात व दमण दीव गुजरातमध्ये विलीन करणे हा दुसरा पर्याय होता. १ डिसेंबर १९६६ रोजी ओपिनियन पोल विधेयकाला लोकसभेने मंजुरी दिली.

भाऊसाहेब बांदोडकरानी ओपिनियन पोलचा निर्णय मान्य केला. माधव बीरनी पोलला विरोध केला. बांदोडकरानी पोलचा निर्णय मान्य कसा केला यासंबंधी चर्चा झाली. गोव्यामध्ये हिंदू बहुसंख्य असल्यामुळे पोल विलीनीकरणाच्या बाजूने जाईल असा तर्क होता. हिंदूंची मते ६० हजारानी जास्त होती. ही साठ हजार मते जिंकायला पुरेशी आहेत असे विलीनीकरणवाद्याना वाटत होते. विलीनीकरणवाद हा हिंदूंचा आणि संघराज्य हा ख्रिश्चनांचा असा विचारप्रवाह होता. पोल मान्य करता कामा नये असे अनेकांचे मत होते. पण भाऊसाहेबानी तो निर्णय मान्य केला. इतकेच नव्हे तर आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन टाकला. आपण सत्तेवर असलो तर मतदान निःपक्षपातीपणे होणार नाही असे भाऊसाहेबानी म्हटले. सत्तेवर असणाऱ्याना निवडणुकीत दबाव आणता येतो. सार्वमताचा कौल देताना मतदारापुढे कसलाच दबाव असता कामा नये. मुक्तपणे त्याने मत द्यायला पाहिजे असे बांदोडकरानी सांगितले व

त्यानी राजीनामा दिला. भारतीय राजकारणाच्या इतिहासात तो एक अभिमानास्पद निर्णय होता. हा निर्णय सम्राट अशोकाच्या राजत्यागासारखा होता असे मत त्यावेळी बहुजनसमाजातील अनेकानी व्यक्त केले. गोव्याचे भवितव्य ठरविण्यासाठी ऐंशी टक्के बहुमताची जरुरी असावी असे आचार्य काकासाहेब कालेलकर यानी सुचवले. ७ डिसेंबर रोजी ओपिनियन पोल कायद्याला राज्यसभेने मंजुरी दिली. १६ डिसेंबर रोजी ओपिनियन पोल कायद्याला राष्ट्रपतीनी मंजुरी दिली. १६ जानेवारी १९६७ हा दिवस ओपिनियन पोल निवडणूक दिवस म्हणून ठरविण्यात आला. १८ डिसेंबर रोजी गोवा विलीनीकरण आघाडीची स्थापना झाली. विलीनीकरणाच्या बाजूने महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, गोवा प्रदेश काँग्रेसमधील विलीनीकरणवादी गट, कम्युनिस्ट, महाराष्ट्र विलीनीकरण आघाडी, प्रजासमाजवादी पक्ष, जनसंघ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटना उभ्या राहिल्या; तर संघराज्याच्या बाजूने युनायटेड गोवन्स पक्षाचे दोन्ही गट, प्रदेश काँग्रेस समिती, विलीनीकरणविरोधी आघाडी, मुंबईची युनायटेड गोवन्स पार्टी या संघटना काम करू लागल्या. विलीनीकरणाच्या बाजूने दैनिक 'गोमंतक' आणि महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रे होती; तर गोव्यातील पोर्तुगीज व कोंकणी वृत्तपत्रे व 'राष्ट्रमत' मराठी दैनिक ही विलीनीकरणविरोधी प्रचार करीत होती.

२३ डिसेंबर रोजी विलीनीकरणासाठी फूल हे चिन्ह मिळाले तर संघराज्यासाठी दोन पाने. मतदानाची लढाई ''फूल'' आणि ''दोन पाने'' यामध्ये सुरू झाली. दोन्ही पक्ष जिद्दीने एकमेकांविरुद्ध उभे राहिले. एवढी जिद्द, एवढा अटीतटीचा सामना यानंतर कधी दिसला नाही. यावेळी साम, दाम, दंड, भेद हे सारे प्रकार दोन्ही बाजूनी हाताळले गेले. मारामाऱ्या झाल्या. घोषणांचे युद्ध झाले. तो सारा रोमहर्षक इतिहास म्हणजे गोव्याच्या इतिहासातील एक अविस्मरणीय इतिहास ठरला.

ओपिनियन पोल घ्यायचा ठरले तेव्हा मुंबई व इतरत्र रहाणाऱ्या गोमंतकीयाना मत द्यायचा आधिकार द्यावा की नको असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा विलीनीकरणवाद्यानी गोव्याबाहेरच्या गोमंतकीयाना मतदानाचा हक्क असू नये असा आग्रह धरला. हा आग्रह म्हणजे विलीनीकरणाचा पराभव अशी टीका संघ प्रदेशवाल्यानी केली. तर्कशास्त्रीय दृष्ट्या त्यांची टीका बरोबर होती. मुंबईत रहाणारे गोमंतकीय गोव्यात

रहाणाऱ्या गोमंतकीयाना भेटतात तेव्हा ''तुम्ही सुखी आहात असे म्हणतात'' महाराष्ट्राच्या मानाने गोव्यात गरिबी कमी आहे आणि विलीनीकरण झाल्यास ती वाढेल असे त्याना वाटते असे मत संघप्रदेशवाल्यानी व्यक्त केले आणि मनाला पटेल असा प्रश्न उभा केला. ''विलीनीकरणात जर खरोखर हित असते तर मुंबई–पुण्यात राहाणाऱ्या गोमंतकीयाना ते अधिक चांगले कळले नसते काय ? आणि गोव्याच्या विलीनीकरणासाठीही पुढाकार त्यानीच घेतला नसता काय ? पण तसे होत नाही. का ? विलीनीकरणात फायदा होत नाही म्हणूनच.''

गोव्याबाहेरच्या गोमंतकीयाना मत द्यायला विलीनीकरणवाद्यांचा विरोध होता तो बोगस मतदानाच्या भीतीने. वेगवेगळ्या नावाने हे लोक मतदान करतील व मतदानाचे पारडे आपल्या बाजूने झुकवतील असे विलीनीकरणवाद्याना वाटले. काही अंशी ते खरेही झाले. गोव्याबाहेर असणाऱ्या गोमंतकीयांचा हक्क मान्य करण्यात आला. मतदारांच्या यादीत नांव नोंदवण्याची सवलत त्याना मिळाली. कार्यकर्त्यांच्या बैठका सुरू झाल्या. महाराष्ट्रातून पत्रके, भिंत्तीपत्रके, घोषणापत्रके येऊ लागली. विलीनीकरणवाद्यामधील एक गट या प्रचाराविरुद्ध होता. गोव्याचे जनमानस ज्याना माहित नाही, त्यानी घोषवाक्ये लिहून पाठवावीत याचा त्याना राग येत होता. ''जिथे मुंबई तिथे गोवा'' किंवा ''कोल्हापूरची अंबाबाई शांतादुर्गेला भेटणार'' अशा अर्थाची घोषवाक्ये लोकांच्या मनाला भिडणारी नाहीत असे त्याना वाटत होते उलट ''नको तुमची श्रीखंडपुरी, आमची शीतकढी बरी'' अशी घोषवाक्ये लोकाना आवडत होती. विलीनीकरणवादी तरुण आमच्या गुणाला वाव द्या, घोषवाक्ये आम्हाला लिहू द्या असे म्हणत होते. महाराष्ट्रातून पेट्यानी भरलेली पत्रके येत होती. त्यांचे वाटप करणे एवढेच काम विलीनीकरणवादी तरुणांकडे होते.

महाराष्ट्रातून अमरशेख, साबळे, लीलाधर हेगडे यांची कलापथके आली होती. त्यांचे कार्यक्रम ठरवणे हे एक काम विलीनीकरणवादी तरुणाकडे सोपवले होते. खेड्यापाड्यातून येणाऱ्या लोकाना वक्त्यांची भाषणे नको होती. त्याना कलापथके हवी होती. कलापथके पहायला लोकांची गर्दी जमत होती. अमरशेख यांच्या आवाजाने लोकाना स्फूरण येंत होते. परंतु हा प्रचार ठराविक लोकासमोर होत होता. ते लोक फक्त हिंदू होते. कलापथकाना येणारे सारेच लोक फुलाला मत देतील असेही नव्हते.

सारांश, सारा प्रचार हिंदूंच्या भोवती फिरत होता. याच भाऊगर्दीत भवानी मातेच्या पादुका गोव्यात आल्या. त्यांची यात्रा पण सुरू झाली. पण त्या पादुका भवानीमातेच्या नाहीत असे उस्मानाबादच्या कलेक्टरानी कळवले आणि फजिती झाली.

ओपिनियन पोलच्या वेळी भाऊसाहेबानी केलेले दौरे महत्वाचे होते. सकाळी सहा ते रात्रौ दीड दोन वाजेपर्यंत भाऊंचे दौरे चालत. पण भाऊ कधी दमलेले दिसले नाहीत. महाराष्ट्रात विलीनीकरण झाल्यास विकासाचे विशाल क्षेत्र लाभेल आणि महाराष्ट्राची बाजारपेठ आपल्याला मिळेल असा मुद्दा मांडला जात होता. आणि दिल्लीहून मुंबई जवळ असे प्रतिपादन केले जात होते. या मुद्याची चिरफाड संघप्रदेशवाले करीत होते. विलीनीकरण नसताही गोव्यातील मान्यवंतानी कीर्ती मिळवली आहे असे सांगून डॉ. फ्रॉईलान मेल, डॉ. शिरोडकर, दलाल, मुळगांवकर, लक्ष्मण पै, आंजेलो, केसरबाई, मोगुबाई, खाप्रुमाम, लता मंगेशकर, जीतेंद्र अभिषेकी, मास्टर दत्ताराम इत्यादिंची नावे ते सांगत होते. दिल्लीपेक्षा मुंबई जवळ हे ठीक पण मुंबईपेक्षा पणजी जास्त जवळ नाही का ? असा प्रश्न संघराज्यवाले विचारीत होते. प्रचाराचा टेम्पो वाजत गेला की विलीनीकरणवाद्यांच्या कचेरीवर सोडा वॉटरच्या बाटल्या फेकल्या जाऊ लागल्या. एका विलीनीकरणवादी कार्यकर्त्याला संघप्रदेशच्या पुरस्कर्त्यानी गोणपाटात बांधले व सांतइनेजच्या नाल्यात फेकले. त्या कार्यकर्त्याने कसे बसे स्वतःला सोडवून घेतले व भीतीने कापत तो विलीनीकरणवाद्यांच्या कचेरीत पोचला. एकदा विलीनीकरणवाद्यांचा एक कार्यकर्ता पोलीस चौकीवर गेला तेव्हा पोलीस अधिकारी म्हणाला. ''तुम्ही ही अशी तक्रार करता आणि तिकडे बघा, त्या बायका फुलाच्या प्रचारकानी आमचा विनयभंग केला अशी तक्रार करीत आहेत.'' कुठले खरे आणि कुठले खोटे याचा खल न करता पोलीस अधिकारी तक्रारच नोंदवून घेत नव्हते. दंडेलीच्या तक्रारी संघवालेपण करीत होते. ''कुंडई येथे झालेली दगडफेक, दुर्भाट येथील हिंसक हल्ला, पणजीत स्त्रियांशी झालेले गैरवर्तन महाराष्ट्रवाद्यानी केले असा दावा संघवाले करीत होते तर मारामाऱ्या, सोडावॉटर बाटल्या फेकणे, अशा दंडेली संघवाले करीत आहे असे विलीनीकरणवादी म्हणत होते. दोन्ही बाजूने अतिशयोक्ती होत होती. पण टक्केवारीच काढायची झाली तर दंडेली संघवाल्यांकडून जास्त होत होती.

कारण ओपिनियन पोलची निवडणूक संघवाले जिद्दीने लढवत होते. निवडणूक हरली तर ती पुन्हा जिंकता येते पण ओपिनियन पोल हरला तर सारे संपले असे संघवाल्याना वाटत होते. विलीनीकरणवाद्यांचा प्रचार धार्मिक स्वरुपाचा होता. महाराष्ट्रातून येणारे लोक, कलापथके पाहून तुमची भिस्त परक्यावर अशी टीका होत होती. महाराष्ट्रातील कलापथके नकोत, वक्ते नकोत असे जनार्दन शिंक्रे यानी म्हटले होते. बोलता आले नाही तरी चालेल परंतु या निमित्ताने का होईना गोव्यातून वक्ते, नेते निर्माण करुया असे त्यांचे म्हणणे होते. विलीनीकरण आवश्यक आहे हे महाराष्ट्रीय लोकानी सांगून उपयोगी नाही, ते गोव्यातल्याच लोकानी सांगायला पाहिजे हे गोव्यातील विलीनीकरणवाद्यानी ध्यानात घेतले नाही. त्यांचा प्रचार गोव्यातील ख्रिश्चन धर्मीयापर्यंत पोहचलाच नाही. उलट शाबू देसाई यानी संघप्रदेश ज्योत फिरवली तिचा परिणाम जास्त झाला. 'राष्ट्रमत' दैनिकाचा प्रचार गोमंतकीयांच्या मनाला भिडणारा ठरला.

ओपिनियन पोलमध्ये डॉ. जॅक सिकेरा यांचा वाटा फार मोठा आहे. डॉ. जॅक सिकेरा त्या काळात सारा गोवा फिरले. दररोज ते साठ किलोमिटरहून जास्त प्रवास करीत होते. त्यानी १२० सभा घेतल्या. बांदोडकरानी १३३ सभा घेतल्या.

ओपिनियन पोलच्यावेळी विलीनीकरणवाद्यानी केलेला प्रचार हिंदू पुरता मर्यादित होता. 'राष्ट्रमत' दैनिकाने केलेला विरुद्ध प्रचारसुद्धा हिंदूपुरताच मर्यादित होता. तरीपण दै. 'राष्ट्रमत'ला श्रेय द्यायला हवे असे मला वाटते. हिंदू विलीनीकरणवादी आणि कॅथोलिक संघप्रदेशवाले असे स्पष्ट दिसत होते. हिंदू बहुसंख्य असल्यामुळे पोल जिंकू असे विलीनीकरणवादी लोकाना वाटत होते. जबरदस्त अशा आत्मविश्वासाने ते वागत होते. त्यांचा क़िल्ला पाडण्याचे काम ''राष्ट्रमत'' ने केले. ''राष्ट्रमत'' हे त्यावेळी संघराज्यमत बनले होते. ''ब्रम्हास्त्र'' हे श्री. उदय भेंब्रे यांचे सदर जबरदस्त प्रभाव टाकणारे होते. तर्कशुद्ध युक्तिवादाने तरुणाना आवाहन करण्याचे सामर्थ्य त्या सदरांत होते.

''गोमंतकीय समाजातील परंपरागत अशी धार्मिक व जातीय भेदाची काटेरी कुंपणे दूर करून सर्वधर्मसमभाव व माणुसकीचे नवे रक्त समाजाच्या धमन्यातून खेळण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. आपण पेजखाऊ, मासळीखाऊ, आहोत. विद्वता काय ती इतरांकडून शिकायची,

आपण नेहमी गुलामी वृत्तीने वागायचे ही न्यूनगंडाची भावना त्यागून आपल्या उज्ज्वल इतिहासाचे व थोर परंपरेचे आणि अभिमानास्पद अशा सांस्कृतिक ठेव्याचें दर्शन खुद्द गोमंतकीय बांधवना घडविणे हे आपले कर्तव्य आहे'' असे म्हणत त्यानी आपली वाटचाल सुरू केली. म. गो. च्या घोषणा कशा फोल आहेत हे सांगताना ब्रम्हास्त्र म्हणाले, 'महाराष्ट्रवादी गोमंतक'ने आपल्या इतर काही घोषणाही फोल ठरवल्या आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास गोवा वेगळा राहिला तर ख्रिश्चनांचे राज्य येईल, बामणांचे राज्य येईल, बहुजन समाजाच्या हातात राज्य कारभार येणारच नाही'' या घोषणांचे देता येईल. निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रवादी गोमंतकचे सरकार बनवले व स्वतः या घोषणातील फोलपणा चव्हाट्यावर आणला. ख्रिश्चनांचे राज्य आले नाही, ब्राम्हणांचेही आले नाही. गोवा वेगळा राहिला तरी बहुजन समाजाच्या हातात राज्यसूत्रे राहू शकतात याचा अनुभव गोमंतकीय जनतेला मिळाला. हा मुद्दा ''राष्ट्रमत'' ने मांडला. गोवा हा संघप्रदेश म्हणून राहिला तरी त्याचे फायदे काय होतील हे ''ब्रम्हास्त्र'' सदरात सांगितले ते असे–

गोवा संघप्रदेश राहिला तर गोव्याची स्वतःची विधानसभा व स्वतःचे मंत्रिमंडळ राहणार आहे. गोव्याच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून जादा अर्थसहाय्य मिळणार आहे. गोव्याचे सरकार गोव्यातच राहिल्याने व गोव्याचा प्रदेश छोटा असल्याने प्रत्येक लहान गांवाकडे व खेड्यांकडे लक्ष पुरवणे त्या सरकारला शक्य होणार आहे.

गोव्याचे दोन खासदार लोकसभेत बसू शकतील. त्यांच्याकडून गोव्याचा आवाज लोकसभेत घुमविणे शक्य होईल. गोवा संघप्रदेश असतानाही गोमंतकीयाना दूर ठेवून सरकारी नोकरीत इतरांची भरती केली जात आहे हे पाहिल्यास विलीनीकरण झाल्यानंतर गोव्यातील सरकारी नोकऱ्यांमध्ये कुणाची वर्णी लागेल याचे स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभे रहाते.

आणि विलीनीकरण झाल्यास गोव्यात विधानसभा व मंत्रिमंडळ राहणार नाही. राहील फक्त डेप्युटी कलेक्टर आणि बी. डी. ओ. गोव्यातून फक्त चार आमदार महाराष्ट्राच्या विधानसभेत जाऊ शकतील. आणि लोकसभेतील खासदार ? अर्धी राजधानी राहील मुंबईत. हायकोर्ट मुंबईत. आज जी कामे ज्युडिशियल कमिशनर कोर्टात होऊ शकतात त्या

कामासाठी मुंबईत हेलपाटे घालावे लागतील. खाजगी शेतांचे बांध फुटल्यास शेतकरी पणजीला जाऊन मंत्र्यांची, नायब राज्यपालांची व वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन सरकारी यंत्रणेला जागृत करू शकतात. विलीनीकरण झाल्यास त्याना या कामासाठी मुंबईत धावावे लागणार ? या शेतकऱ्याना पैसा मोनू पोरोब देणार की रंगनाथ सातू कामत देणार ?

विलीनीकरणवादी शिवाजींचा उल्लेख करून विलीनीकरणाचा जयजयकार करतात त्यावर ''ब्रम्हास्त्रा''चे भाष्य असे होते– छत्रपती शिवाजी महाराज हे राष्ट्रपुरुष आहेत. त्यांच्याविषयी गोव्याने सदैव आदर बाळगावा आणि हा आदर असाच रहाणार आहे. विलीनीकरण झाले तर तो वाढेल व न झाले तर वाढणार नाही असे मुळीच नाही. आणि शिवाजी महाराजांविषयी आदर बाळगण्यासाठी विलीनीकरण मागितले पाहिजे असेही नाही. महाराष्ट्राबाहेर शिवाजी महाराजांविषयी आदर नाही काय ? गोव्याचा खास घटक राबवून आपण महाराजांची शिकवण अंमलात आणू शकतो. त्यांचे यथोचित स्मारक करू शकतो. त्यासाठी विलीनीकरणाची काय आवश्यकता आहे ?'' ''राष्ट्रमत'' मधील प्रचार बुद्धिनिष्ठ होता व त्याचा प्रभाव सुशिक्षितांवर पडत होता.

विलीनीकरणवादी माणसाना आत्मविश्वास नाही असे म्हणत ''ब्रम्हास्त्र'' त्यांच्यावर प्रहार करी तो असा ''पोटभर जेवण नको एकच घास पुरे; घर नको, एकच खोली पुरे; अंगभर वस्त्रे नकोत, नुसती लंगोटी पुरे अशा मागण्या करणाऱ्या माणसाला जग शहाणे मानत नसते व तशा मागण्या करण्यात शहाणपणाही नसतो. त्या मागण्यात दिसतो फक्त न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव आणि परावलंबीत्वाचा ध्यास.''

पोलमध्ये ''राष्ट्रमत'' दैनिकाने केलेल्या प्रचारामुळे अनेक हिंदुंच्या मनात बदल झाला. पोल हरला तो शिक्षकांमुळे डेप्युटेशनिष्ट लोकामुळे आणि सरकारी अधिकाऱ्यामुळे असे म्हटले जाते, ते तितकेसे खरे नाही. चौतीस हजार मतांचा पडलेला फरक शिक्षकांच्या मूठभर मतानी पडला नाही. संघराज्याच्या बाजूने जवळजवळ सगळा कॅथोलिक होता. त्यामुळे दक्षिणेकडे फरक, जबरदस्त दिसू लागला. बाणावली मतदारसंघात संघराज्याला १०७६९ मते पडली तर विलीनीकरणवाद्याना केवळ ६२९. जिथे जिथे कॅथोलिक बहुमत होते तिथे तिथे संघराज्यासाठी भरघोस मते पडली.

उत्तर गोव्यामध्ये दोन्ही मतप्रणालींमध्ये प्रचंड प्रमाणात फरक नव्हता. ओपिनियन पोल निकालाच्यावेळी वि. सु. करमली कचेरीत बसले होते. पहिल्या दिवशी झालेल्या निकालात विलीनीकरणवाद्याना बहुमत होते. करमली खूष झाले आणि दुसऱ्या दिवशी असेच होईल, असे भाकीत करू लागले. आनंदाच्या भरात दुसऱ्या दिवशी दक्षिण गोव्यातील कॅथोलिक मतदारसंघ आहेत याची त्याना जाणीव झाली नाही. दुसऱ्या दिवशी संघराज्यवाल्यांचा विजय झाला तेव्हा करमली याना धक्काच बसला. ओपिनियन पोल आपण हरणार हे स्व. बांदोडकर याना मात्र माहित होते. म्हणून ते निकाल ऐकण्यास थांबले नाहीत, असे विरोधकांचे म्हणणे. १९६३ च्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी पण भाऊसाहेब पणजीत नव्हते. ओपिनियन पोल निकालामुळे गोव्याचे राजकीय चित्र वेगळ्या दिशेने झुकू लागले.

ओपिनियन पोलच्या वेळी ३४४३९२ मतदार होते त्यापैकी ३१७६३३ लोकानी मतदान केले. मतदान प्रचंड संख्येत झाले. ८१.७० टक्के मतदान झाले. प्रत्येकाने जिद्दीने मतदान केले. संघराज्याच्या बाजूने (दोन पाने) १७२१९१ मते पडली. ५४.२० टक्के मतदान संघराज्य वाद्यांच्या बाजूने झाले. विलीनीकरणाच्या बाजूने (फुल) १३८१७० मते पडली. ४३.५० टक्के मतदान विलीनीकरणाच्या बाजूने झाले. बाद मते ७२७२ झाली. त्यांची टक्केवारी (२.३०) अशी होती.

ओपिनियन पोल जिंकल्यानंतर डॉ. मनोहरराय सरदेसाई यानी सुरेख कविता केली. विलीनीकरणवाद्यानी फुल चिन्ह घेतले होते तर संघराज्यवाल्यांचे दोन पाने हे चिन्ह होते. निवडणूक जिंकल्यानंतर मतभेद संपले व सारे एक झाले. ते म्हणतात, ''जिखली पानां, 'जिखली पानां' पणून मनां जिखची आसात ! एकाच मोगा पासांत आता । सातूय लाखांक बांदचे आसात ।। १ ।। कोण घरचो, कोण भायलो । कोण भेदी, कोण चोर, । मनशांच्या रगताची तांबडी गुंज एकूच झर ।।२।। भावाक कांटो तोंपलो जाल्यार । म्हज्या आंगाक घाया जाता । शेजाऱ्यागेर फुलता फुल । म्हज्या घरांत परमळटा ।। ३ ।। आज म्हजे धाकटें भाट । उजवाडान भरून गेलां । नव्या गोंयांत एक जाल्यां । फुला, पानां, पानां, फुलां ।। ४।।

: पाच :

दुसरी सार्वत्रिक निवडणूक

ओपिनियन पोलचा निकाल लागल्यानंतर दोन्ही बाजूंचे नेते वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करू लागले. लढाई हरलो पण युद्ध हरलो नाही असे जरी म. गो. पक्षाने म्हटले तरी घटक राज्याच्या मागणीला पाठींबा देऊन त्यानी परिस्थितीची जाणीव ठेवली. बाबू नायक यांच्यासारख्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने सुद्धा ''हो भायलो, हो भितर्ल्लों हें आमी मानूंक जायना. पूण ते बराबर, हेंवूय खरें की गोंयचो भुरगो बेकार उरुंक जाय ना'' असे म्हटले. श्री. प्रभाकर आंगले यानी पण घटक राज्याचा पुरस्कार केला. मात्र ''गोवा वेगळा राहिला तर गोव्याचे व्यक्तिगत टिकवणे जमेल हा मुद्दा वेगळे गोंयवादी गोमंतकीय मांडत होते तो चुकीचा होता हे आता सिद्ध झाले आहे. गोव्याच्या औद्योगिकरणाबरोबर गोव्याबाहेरच्या लोकाची आवक वाढत चालली आहे आणि गोव्याचे वेगळेपण हळुहळू नाहीसे होत चालले आहे.'' असे ते म्हणाले, श्रीमती उर्मिला लीमा लैतांव या गोवा विधानसभेच्या सदस्या होत्या. त्यानी मात्र ''गोव्याचे वेगळेपण राखण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. गोव्याबाहेरचे शिक्षित लोक गोव्यात येतात व कमी पगारावर काम करतात. त्यामुळे गोव्यातील मुले मागे पडतात व बेकार रहाण्याचा त्यांच्यावर प्रसंग येतो'' असा मुद्दा मांडला.

ओपिनियन पोल विलीनीकरणवादी का हरले यासंबंधी बरीच चर्चा झाली. पण सर्वात गंमतीदार मिष्कील विधान त्यावेळी भाऊसाहेब बांदोडकर यानी केले. सांगली येथील एका समारंभानंतर गप्पागोष्टी चालल्या असता एकाने भाऊसाहेबाना विचारले, ''गोव्यामध्ये आपण एवढे लोकप्रिय असताना पोल आपल्या विरुद्ध का गेला ? त्यावर भाऊसाहेब म्हणाले, ''माझ्या लोकप्रियतेमुळे.'' त्यांच्या या उद्गाराने सारेजण चकीत झाले. त्यांचे हे आश्चर्य कमी करण्यासाठी भाऊसाहेब म्हणाले, ''विलीनीकरणविरोधी पक्षाने माझ्या लोकप्रियतेचे भांडवल करून पोल जिंकला. या लोकानी जनतेला असा सवाल टाकला– ''तुम्हाला तुमचा भाऊ मुख्यमंत्री म्हणून राहिला पाहिजे की नको ? गोवा जर महाराष्ट्रात

विलीन झाला तर भाऊसाहेब मुख्यमंत्री राहू शकणार नाहीत'' या उत्तरातला तर्कवाद बिनचूक आणि मिष्कीलही होता. एक गोष्ट खरी होती. ती ही की भाऊसाहेबांची लोकप्रियता बहुजन समाजात वाढत होती. ओपिनियन पोल आणि विलीनीकरणाचा प्रश्न सोडला तर इतर बाबतीत काही फरक पडला नाही. सोळा–बाराचे राजकारण तसेच राहिले.

ओपिनियन पोलनंतर लगेच २८ मार्च १९६७ रोजी विधानसभा निवडणूक झाली. पोलच्या विजयामुळे म. गो. पक्ष पराभूत होईल अशी अनेक निरीक्षकांची समजूत होती. परंतु म. गो. चे अध्यक्ष भाऊसाहेब बांदोडकर याना विजयाची खात्री होती. इतकेच नव्हे तर प्रजा समाजवादी पक्षाशी युती करण्याचे त्यानी नाकारले. ते म्हणाले, ''आमच्या पाठिंब्यावर पीटर आल्वारीश निवडून आले व त्यानी लोकसभेमध्ये काँग्रेसला विरोध केला. आमचे राज्य केंद्रशासित असल्यामुळे केंद्राचा विरोध आमच्या प्रगतीच्या दृष्टीने आम्हाला परवडणारा नाही.'' म. गो. ने स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. सत्तरीत जास्त मते मिळवणाऱ्या जयसिंगराव वेंकटराव राणे याना बांदोडकर म्हणाले, ''तुम्ही जर म. गो. त येत असाल तर आम्ही तुम्हाला सत्तरीची तिकीट देतो.'' जयसिंगरावानी नकार दिला व प्र. स. पक्षातर्फे उभे राहिले.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने प्रजा समाजवादी पक्षाशी युती करायची नाही असे ठरवले व उमेदवारांची निवड सुरू केली. काही मतदारसंघांबाबतीत मतभेद झाले. फोंडा मतदारसंघातून के. बी. नाईक यानी उभे रहायचे असे ठरले. सौ. शशिकला काकोडकर यानी निवडणुकीला उभे रहावे असे म. गो. संसदीय बोर्डाला वाटत नव्हते. म. गो. पक्षाने महिला विभाग काढावा व शशिकला काकोडकर यांच्या नेतृत्वाखाली बहुजनसमाजातील स्त्रियांच्या सुधारणेसाठी प्रयत्न व्हावेत असे संसदीय बोर्डाच्या सदस्यानी म्हटले. सांत इस्तेव्ह मतदार संघात दत्ताराम चोपडेकर आणि विनायक चोडणकर यांच्यामध्ये मतभेद आहेत म्हणून कृष्णनाथ बाबुराव नाईक यानी सांत इस्तेव्ह मतदारसंघात उभे रहावे असे ठरले. पण के. बी. नाईक कबूल झाले नाहीत. मग त्याना फोंडा मतदारसंघातून उभे करायचे ठरले. के. बी. नाईक कबूल झाले. शिरोडा मतदारसंघातून कुणाला उभे करायचे हे भाऊसाहेब बांदोडकर यानी ठरवायचे असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे फोंडा मतदारसंघात के.

बी. नाईक आणि शिरोड्यात शशिकला काकोडकर यांची नावे निश्चित झाली. पण नंतर निर्णय बदलण्यात आला. मतदारसंघातील उमेदवारांमध्ये बदल करण्यात आला. फोंड्याला शशिकला काकोडकर व शिरोड्याला के. बी. नाईक असा बदल झाला. के. बी. नाईक यानी शिरोड्याला उभे रहायला नकार दिला तेव्हा ऐन वेळेला वि. सू. करमली याना खास मोटार पाठवून बोलावण्यात आले व त्याना शिरोडा मतदारसंघात उभे करण्यात आले. प्रथम वि. सू. करमली याना कळंगुट मतदारसंघ देण्यात आला होता. वि. सू. करमली याना मुद्दाम पडेल मतदारसंघ देण्यात आला होता. के. बी. नाईक यांच्या नकारामुळे करमली याना शिरोडा मतदारसंघ मिळाला. म. गो. पक्षातर्फे तसा संसदीय बोर्ड होता. अँथनी डिसोझा, वामन राधाकृष्ण व कृष्णनाथ बाबुराव नाईक असे ते तीन सदस्य होते. अँथनी डिसोझा यांच्याकडे निवडणूक जाहीरनामा तयार करण्याचे काम सोपवण्यात आले. त्याप्रमाणे निवडणूक जाहीरनामा तयार झाला. उमेदवार निवडीचे काम तात्विक दृष्ट्या संसदीय बोर्डाकडे असायला पाहिजे होते. परंतु भाऊसाहेब बांदोडकर खुद्द ते काम करीत होते. एखादा कार्यकर्ता येऊन सांगायचा ''भाऊ, अमुक अमुक माणूस चांगला आहे. त्याला आमदार करा. भाऊना ते पटले की ती व्यक्ती म. गो. चा उमेदवार बनायची. प्रा. गोपाळ मयेकर यांच्याबाबतीत तसेच झाले. काका पानकर आणि काही कार्यकर्ते भाऊंकडे आले व म्हणाले ''मयेकर नावाचे एक प्रोफेसर आहेत, हुशार आहेत, विचार चांगले आहेत. बोलतात चांगले.'' भाऊना ते पटले व प्रा. गोपाळ मयेकर म. गो. चे म्हापसा मतदारसंघातील उमेदवार झाले.

या दुसऱ्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने यु. गो. पक्षाशी समझौता करण्याचा प्रयत्न केला. ''तुम्ही संघप्रदेशवाले, आम्ही संघप्रदेशवाले. आम्ही एक होऊ या'' असा तो प्रस्ताव होता. यु. गो. पक्षाचे डॉ. सिकेरा हुशार. आपण जिंकलेल्या जागा आपल्याकडे ठेवायच्या व न जिंकलेल्या जागा काँग्रेसला द्यायच्या अशी ती तडजोड होती. काँग्रेसने ती तडजोड मान्य केली नाही. शिवाय डॉ. सिकेरा याना मुख्यमंत्रीपद दिले जाईल असे काँग्रेसने आश्वासन द्यावे असे सिकेरा समर्थक म्हणत होते. काँग्रेस तसे आश्वासन द्यायला तयार नव्हती. दिल्लीवरून आदेश आला. ''पक्ष म्हणून काँग्रेस उभी रहाणार नाही. पण काँग्रेसजनाना वैयक्तिकरीत्या उभे

रहाण्यास परवानगी देण्यात आली. पहिल्या निवडणुकीच्या निकालाने काँग्रेस हळहळली होती. दुसऱ्या निवडणुकीत तसेच होऊ नये म्हणून ती खबरदारी होती. पण वैयक्तिकरीत्या काँग्रेसजनानी उभे रहायचे व निवडून आल्यास सत्ता घ्यायची असा तो डाव होता. यु. गो. पक्ष फुटला होता. सिकेरा गट आणि फुर्तादो गट असे दोन गट झाले होते. डॉ. सिकेरा हुकुमशाही पद्धतीने वागतात असा आरोप फुर्तादो गटाचा होता. दुसऱ्या निवडणुकीत म. गो. पक्ष, प्रजा समाजवादी, यु. गो. (सिकेरा गट) व यु. गो. (फुर्तादो गट) असे चार पक्ष उतरले. प्रजा समाजवादी पक्षाने पांच मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणे मतदारसंघातून शिवाजी देसाई, डिचोलीहून सांतु पळ, पाळीहून शिवाजी देसाई, सत्तरीहून जयसिंगराव वें. राणे व मुरगावहून अंकुश तांडेल. सिकेरा गटाने २८ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून श्रीकांत गोविंद प्रभु देसाई, मांद्रेहून मनोहर खानोलकर, शिवोलीहून झोफरीन डिसोझा, कळंगुटहून वालेतिन सिकेरा, हळदोणेहून ओर्लांद सिकेरा लोबो, म्हापशाहून तुकाराम कारेकर, थिवीहून नारायण नाचनोडकर, डिचोलीहून शिवाजी दुभाषी, पाळीहून सिरान मस्कारन्हस, सत्तरीहून दत्ताराम शिरोडकर, पणजीहून यशवंत देसाई, सांताक्रुजहून डॉ. जॅक सिकेरा, सांत आंद्रेहून तेवतोन पेरेर,सांत इस्तेवहून जेकस तिमोना, मडकईहून तुळशीदास कामत, फोंड्याहून शांताराम केशकामत, शिरोड्याहून फ्रान्सिस फर्नादिश, सांगेहून रमझान लतीफ, काणकोणहून मोतीलाल देसाई, केंपेहून सुहास दलाल, कुडचडेहून अब्दुल रझाक, कुंकळ्ळीहून रॉक सांतान, बाणावलीहून श्रीमती एल्. मिरांद, नावेलीहून लिओ वेल्हय, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून रॉक बार्रेत, कुठ्ठाळीहून डॉ. लुईश प्रोत बार्बोझा, मुरगांवहून रॉबर्ट मिनेझिस. यु. गो. फुर्ताद गटाने ६ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. कळंगुट मधून श्रीमती विल्या सौझा, सांताक्रुझमधून जे. एल्. आराउजो, कुंकळ्ळीहून आनास्तीय आल्मेद, बाणावलीहून लीमा लेतांव, नावेलीहून लॉयल फुर्ताद अल्वारू, कुडतरीहून एनीय पिमेंत, फुर्ताद गटाने दक्षिण गोव्यात प्रामुख्याने आपले उमेदवार उभे केले होते. म. गो. ने २५ मतदारसंघात उमेदवार उभे केले. पेडणेहून बाबल किनळेकर, मांद्रेहून अँथनी डिसोझा, शिवोलीहून पुनाजी आचरेकर, कळंगुटहून रामचंद्र मयेकर, हळदोणेहून नरसिंह महांबरे, म्हापसाहून गोपाळ मयेकर, थिवीहून

जयसिंगराव राणे, डिचोलीहून दत्ताराम चोपडेकर, पाळीहून अच्युत शेणवी उसगांवकर, सत्तरीहून गोपाळ आपा कामत, पणजीहून माधवराव तळावलीकर, सांताक्रुझहून आल्फ्रेड आफोंस, सांत आंद्रेहून आगुस्तिन मेल, सांत इस्तेव्हहून प्रताप बकाल, मडकईहून दयानंद बाळकृष्ण बांदोडकर, फोंड्याहून शशिकला काकोडकर, शिरोड्याहून विठ्ठल करमली, सांगेहून वासुदेव मोरजकर, काणकोणहून मंजू गांवकर, केंपेहून शांबा कृष्णराव देसाई, कुडचडेहून डॉ. निळू शांबा देसाई, कुंकळ्ळीहून मोहन जयवंत कालेकर, नावेलीहून पोलीफाम डिसील्व्हा, मडगांवहून व्यंकटरामन् श्री पुरुषोत्तम सांवर्डेकर, मुरगांवहून गजानन पाटील असे हे उमेदवार होते.

या निवडणुकीत म. गो. पक्षाने १६ जागा जिंकल्या व त्याना ११०९९० मते मिळाली. यु. गो. सिकेरा गटाने १२ जागा जिंकल्या व त्याना १०४४२९ मते मिळाली यु. गो. च्या फुर्तादो गटाला एकही जागा जिंकता आली नाही. म. गो. चे बाबल किनळेकर, अँथनी डिसोझा,पुनाजी आचरेकर, गोपाळ मयेकर, जयसिंगराव राणे,दत्ताराम चोपडेकर, अच्युत शेणवी उसगांवकर, गोपाळ आपा कामत, प्रताप बकाल, दयानंद बाळकृष्ण बांदोडकर, शशिकला काकोडकर, विठ्ठल करमली, वासुदेव मोरजकर, मंजू गांवकर, शांबा कृष्णराव देसाई, गजानन पाटील असे १६ उमेदवार निवडून आले. तर यु. गो. (सिकेरा गट) पक्षाचे व्हेलेंटीन सिकेरा, यशवंत देसाई. डॉ. जॅक सिकेरा, तेवतेन पेरेर, अब्दुल रझाक, रॉक सांतान फर्नांदिस, श्रीमती एल्. मिरांद, लिव्हो वेल्ह्य, अनंत नरसिंह नायक, रॉक बार्रेत, डॉ. लईश प्रोत बार्बोझा ओर्लांद सिकेर लोबो असे बारा उमेदवार निवडून आले. पहिल्या निवडणुकीत निर्माण झालेले १६×१२ चे राजकारण दुसऱ्या निवडणुकीतही कायम राहिले. या निवडणुकीत कॉंग्रेसचे बडे बडे नेते व्यक्तिगतरीत्या अपक्ष म्हणून उभे राहिले होते. पण सारेच्या सारे पडले. भाऊसाहेब बांदोडकर हे मडकई मतदारसंघातून उभे राहिले. त्याना ७८०० मते मिळाली. ही टक्केवारी ९२.४० टक्के होती. एक प्रकारचा तो उच्चांक होता. ५ एप्रिल १९६७ रोजी सभापती म्हणून गोपाळ आपा कामत यांची निवड झाली. उपसभापती म्हणून मंजू गांवकर यांची निवड झाली. मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यानी मंत्रिमंडळ बनवले. अँथनी डिसोझा व गोपाळराव मयेकर मंत्री झाले. अच्युत उसगांवकर राज्यमंत्री झाले.

नव्या सरकारात दोन सभासद नियुक्त करण्याचा अधिकार केंद्र सरकारने दिला. त्यानुसार हरिजन व गिरीजन याना प्रतिनिधीत्व द्यायचे बांदोडकरानी ठरवले व गिरीजनांचे प्रतिनिधी म्हणून जिवा गांवकर यांस व हरिजनांचे प्रतिनिधी म्हणून शांताराम मोतीराम कांबळी यांस नियुक्त केले. या दोन आमदारांच्या नियुक्तीचा राग डॉ. जॅक सिकेराना आला व त्यानी या नियुक्तीबद्दल निषेध व्यक्त केला आणि निषेधार्थ आपण असहकार करण्याची घोषणा केली. ही दोन सभासदांची नियुक्ती तात्विक नसून म. गो. पक्षाचे सरकार स्थीर करण्यासाठी आहे असे सिकेरानी म्हटले. शिवाय ते हरिजन गिरीजनांचे प्रतिनिधीत्व करणार आहेत हे कसे सिद्ध होते, असा सवाल केला. कुणबी वगैरे जमातीचा अनुसूचित जमातीमध्ये अंतर्भाव केला गेला नव्हता. डॉ. जॅक सिकेराने विधानसभेवर बहिष्कार जाहीर केल्याबरोबर ''बरे झाले सुंठीवाचून खोकला गेला'' असे उद्‌गार भाऊसाहेबानी काढले.

दुसऱ्या विधानसभेत सुरुवातीला युनायटेड गोवन्स पक्षाने नायब राज्यपालांचे भाषण ऐकून घ्यायचे नाही असे ठरवले. रॉक सांतान फर्नांदिस यानी पेपरवेट वाजवायला सुरुवात केली. भाषणाची प्रत फाडली. तुम्ही मागील भाषणात दिलेली आश्वासने पाळली नाहीत. तुमचे भाषण ऐकण्याची आमची इच्छा नाही असे युनायटेड गोवन्स पक्षाचे म्हणणे होते. भाषण ऐकायचे नसेल तर चालते व्हा असे आमदार गजानन पाटील यानी म्हटले. सौ. शशिकला काकोडकर यानी पण युनायटेड गोवन्सच्या त्या कृतीचा निषेध केला. युनायटेड गोवन्स पक्षाच्या या कृतीमुळे यु. गो. च्या सदस्यांचे सभासदत्व काही काळ रद्द करण्यात आले. पण सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा असा ठराव मंत्री टोनी डिसोझा यानी मांडला व संमत करून घेतला.

म. गो. पक्षाचे सरकार सत्तेवर येऊन चार महिने गेले असतील तोच म. गो. चे. काँग्रेसमध्ये विलीनीकरण व्हावे असा एक प्रस्ताव मांडला गेला. मोरारजी देसाईनी भाऊसाहेब बांदोडकर याना दिल्लीस बोलावून नेले. म. गो. आमदारामध्ये म. गो. ने काँग्रेसमध्ये जावे की न जावे यासंबंधी चर्चा सुरू झाली. आमदार दत्ताराम चोपडेकर यानी म. गो. ने काँग्रेसमध्ये जाऊ नये हे आपले मत स्पष्टपणे सांगितले. ६ ऑगस्ट १९६७ रोजी म. गो. च्या कार्यकारिणीची बैठक भरली गेली व काँग्रेसचे नेतृत्व बांदोडकरांकडे

गेल्याशिवाय काँग्रेसमध्ये जाऊ नये असा निर्णय घेतला. आमचे पंख तोडून आम्ही काँग्रेसमध्ये जाणार नाही असे बांदोडकरानी जाहीर केले. पण भाऊसाहेब काकोडकरांमुळे विलीनीकरण झाले नाही.

गोव्याला तांदूळ कमी मिळतो म्हणून १९६७ च्या ऑगस्टमध्ये हरताळाचा आदेश देण्यात आला. केद्राने तांदळाचा कोटा वाढवला. पंधराशे टन तांदूळ जास्त पाठविला जाईल असे केंद्रीय राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यानी जाहीर केले.

नव्या मंत्रिमंडळामध्ये बांदोडकर यानी विठ्ठल सू. करमली यांचा अंतर्भाव केला नव्हता. त्यामुळे त्यांच्यामध्ये नैराश्य आले होते. करमली चारित्र्यसंपन्न विद्वान आणि त्यागी होते. मंत्रीपद मिळाले नाही म्हणून त्यानी म. गो. सोडला नाही उलट पक्षाशी प्रामाणिक राहिले. आपल्या प्रामाणिकपणाचे चीज झाले नाही असे कदाचित त्याना वाटले असेल व त्यातून त्याना नैराश्य आले असेल. या नैराश्याचा परिणाम म्हणून २ सप्टेंबर १९६७ रोजी करमली यानी मुंबईत आत्महत्या केली.

वि. सू. करमलींच्या जागेवर कृष्णनाथ बाबुराव नाईक यांची निवड म. गो. पक्षाने केली. कृष्णनाथ नाईक हे क्षत्रिय भंडारी समाजाचे नेते होते. ते निवडून आले व कार्यकारिणीच्या सभामध्ये चकमकी उडू लागल्या. गोव्यामध्ये फक्त ठराविक नगरपालिका असाव्यात. उरलेल्या नगरपालिकांचे रुपांतर ग्रामपंचायतीत व्हावे असा निर्णय म. गो. पक्षाने घेतला. पण कृष्णनाथ व दत्ताराम चोपडेकर यानी त्या निर्णयाला विरोध केला व आहे त्या नगरपालिका ठेवायच्या असा आग्रह धरला.

यु. गो. ने पुन्हा विधानसभेवर बहिष्कार घालण्याची घोषणा केली. विरोधी पक्षाला सार्वजनिक समितीचे अध्यक्षपद न दिल्याच्या निषेधार्थ हा बहिष्कार होता. जुने गोवे येथील गांधींच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी प्रधानमंत्री इंदिरा गांधी गोव्यात आल्या व २० हजार लोकसमुदायापुढे त्यानी भाषण केले. ''प्रत्येक राज्याचे जसे काही वैशिष्ट्य असते तसे ते गोव्याचे आहे. मात्र कोणी आपला वेगळेपणा अट्टाहासाने धसास न लावता प्रमुख राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होण्याचा सदैव प्रयत्न केला पाहिजे.'' असे त्या म्हणाल्या.

गोव्यात बाँबस्फोट करून अराजक माजवण्याचा कट लिस्बनमध्ये झाला, कराचीमध्ये त्याला आकार मिळाला व गोव्यात त्याचा स्फोट झाला.

गोव्यात बॉंबस्फोट करण्यासाठी मोंतेर ४ जून ते २० जूनपर्यंत होता असे सांगण्यात आले व त्या बॉंबस्फोटाचा निकाल १९६७ च्या अखेरीस लागला. प्रमुख ओलीव्ह फर्नांदिश यास जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

दुसऱ्या निवडणुकीत यशस्वी झालेल्यांमध्ये बांदोडकरांविरुद्ध पुढे बंड करणाऱ्या व्यक्ती होत्या. असंतोषाची चाहूल दिसू लागली होती. दुसऱ्या विधानसभेत डॉ. जॅक सिकेरा यानी म. गो. सरकारने विकासासाठी काही केले नाही असा आरोप केला. तेव्हा ''एकवीस कोटी रुपये विकासासाठी खर्च केले. पण गोव्यात काहीच घडले नाही असे डॉ. सिकेरा याना म्हणावयाचे आहे की काय ?'' असा सवाल मुख्यमंत्री बांदोडकर यानी केला. याच सुमारास नायब राज्यपाल नकुल सेन आणि मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले व ना. राज्यपाल नकुल सेन यांची बदली करा अशी मागणी मुख्यमंत्र्यानी केली. ना. राज्यपालानी बिर्ला प्रकल्पाचे कागदपत्र आपल्या जवळ ठेवले असा आरोप बांदोडकरानी केला. पाच लाखांच्या गूळ प्रकल्पामध्ये त्यानी अडसर निर्माण केले. असेही बांदोडकर म्हणाले. विधानसभेमध्ये मांडवी पुलाच्या रेंगाळणाऱ्या कामाबद्दल तक्रारी झाल्या. रेंगाळत चाललेले बांधकाम पाहून हा पूल होईल की नाही अशी शंका सदस्यानी व्यक्त केली. गोगलगाईच्या गतीने ज्या पुलाचे काम चालले आहे तो पूल कोसळताना एक क्षण सुद्धा लागणार नाही हे बिचाऱ्याना माहित नव्हते. बांधकामासाठी जशी मांडवी पुलावर टीका झाली तशीच टीका तो पूल कोसळल्यामुळे होणार आहे याची कल्पना त्याना नव्हती. भविष्यामध्ये काय होणार आहे हे लोकप्रतिनीधीना कळले असते तर टीकेची धार कितीतरी पटीने कमी झाली असती.

: सहा :

सात आमदारांचे बंड

दुसऱ्या निवडणुकीच्या वेळी फोंडा येथून उभे राहू इच्छिणाऱ्या कृष्णनाथ बाबुराव नाईक याना फोंड्याऐवजी शिरोडा मतदारसंघात उभे रहाण्यास सांगितले गेले. त्यानी नकार दिला. त्यांची नाराजी कमी करण्यासाठी बांदोडकरानी त्याना म. गो. पक्षाचे उपाध्यक्षपद दिले उपाध्यक्षपद हे नाममात्र पद होते. सारे अधिकार पक्षाध्यक्षाकडे होते आणि पक्षाध्यक्ष तर भाऊसाहेब बांदोडकर होते. पक्षाध्यक्ष आणि कार्यकारिणीतील सदस्य यांच्यामध्ये कुरबुर सुरू झाली. करमलींच्या मृत्युनंतर झालेल्या पोटनिवडणुकीत कृष्णनाथ बाबुराव नाईक निवडून आले आणि विधानसभेतील त्यांची कामगिरी प्रशंसनीय ठरली. सभापती गोपाळ आपा कामत यानी त्यांची स्तुती केली. अंदाजपत्रकावरील नाईक यांच्या भाषणात सरकारवर टीका होऊ लागली. भाऊसाहेब बांदोडकर टीकेमुळे अस्वस्थ होऊ लागले. एकदा ते म्हणाले, ''आमदारानी सरकारला शहाणपणा शिकवण्याऐवजी आपल्या मतदार संघात काम करावे'' या टोमण्यामुळे के. बी. नाईक दुखावले. प्रत्येक आमदार जर आपल्या मतदारसंघापुरता पाहू लागला तर गोव्याचे हित कुणी पहायचे ? असे ते म्हणाले. सरकारला विरोध करण्याचे सत्र के. बी. नाईक यानी चालूच ठेवले होते आणि त्यामुळे के. बी. नाईक व भाऊसाहेब बांदोडकर यामधील मतभेद वाढत होते. हे मतभेद वाढू नये म्हणून के. बी. नाईक बांदोडकराना म्हणाले ''मला म. गो. चा पुढारी व्हायचे नाही. तुम्हीच आमचे पुढारी हे मी श्रीमहालसेच्या देवळांत शपथ घेऊन सांगायला तयार आहे. त्याप्रमाणे श्रीमहालसेच्या देवळात जायचे निश्चित झाले पण बांदोडकर ऐनवेळी म्हणाले 'देवळात जायची गरज नाही.''

त्यानंतर भाऊसाहेब बांदोडकर परदेशात गेले. आणि शिवजयंती आली. पणजीच्या भारतीय युवक संघटनेने शिवजयंती साजरी करायचे ठरवले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे याना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले. त्या विराट सभेत विशाल गोमंतक स्थापन व्हावा असे जनार्दन शिंक्रे यानी जाहीर केले. ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, ''अठरा

कॅरेटची लोकशाही मला मान्य नाही. शंभर टक्के लोकशाही अगर लोकहिताकडे हमी ठेवणारी हुकुमशाही मला हवी'' या घटनेमुळे आपल्या नेतृत्वाविरुद्ध कट रचला जात आहे अशी शंका बांदोडकरांच्या मनात आली व त्यानी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे सरचिटणीस एम्. एस्. प्रभु याना बडतर्फ केले. ''आपली बडतर्फी बेकायदेशीर आहे. पक्षाच्या परिषदमध्ये आपण निवडून आलो आहोत. सस्पेंड करण्याचा अधिकार अध्यक्षाना नाही. फक्त कार्यकारिणी मला सस्पेंड करू शकेल'' असे पत्रक एम्. एस्. प्रभु यानी काढले व बांदोडकराना आव्हान दिले. दुसऱ्या दिवशी ८ जून १९७० रोजी बांदोडकरांच्या निर्णयाविरुद्ध अकरा जणांच्या सह्यांचे पत्रक निघाले. हे पत्रक म. गो. चे उपाध्यक्ष कृष्णनाथ बाबुराव नाईक यानी प्रस्तुत केले. बांदोडकरानी कार्यकारिणीमध्ये दहा जणांची नियुक्ती केली. ही नियुक्ती म्हणजे पक्षाची सत्ता एकट्याकडे ठेवण्याचा प्रयत्न असे कृष्णनाथ बाबुराव नाईक म्हणाले. सरचिटणीसाची बडतर्फी आणि कार्यकारिणी वाढ ही बेकायदेशीर आहे अशा अर्थाच्या पत्रकावर ॲन्थनी डिसोझा, कृष्णनाथ नाईक, एम्. एस्. प्रभु, गोपाळ मयेकर, मंजू गांवकर, गजानन पाटील, वामन राधाकृष्ण, दत्ताराम चोपडेकर, जिवा गांवकर, शांताराम कांबळी व मोतीलाल बांदेकर यांच्या सह्या होत्या. यापैकी शांताराम कांबळी यानी या बंडखोरानी आपली सही जबरदस्तीने घेतली असे निवेदन केले. म. गो. च्या कार्यकारिणीची सभा टुरिस्ट हॉस्टेलमध्ये भरवण्यात आली होती. पण टुरिस्ट हॉस्टेल उपलब्ध होऊ न शकल्यामुळे ॲन्थनी डिसोझा यांच्या घरी ही बैठक झाली. कार्यकारिणीच्या अठरा सदस्यांपैकी पंधरा सदस्य उपस्थित राहिले. त्रि. ज. देसाई, काशिनाथ महाले व स्वतः बांदोडकर असे हे तीन सदस्य गैरहजर होते. कार्यकारिणीची वाढ सत्ता टिकवण्यासाठी केलेली नाही. पूर्वी ही कार्यकारिणी २७ जणांची होती. नंतर १८ ची झाली. कामात वाढ झाल्यामुळे कार्यकारिणी आपण वाढवली असे बांदोडकर म्हणाले. विरोधकानी अल्बर्ट कुन्हा यास धरून पकडून आणले असा आरोप बांदोडकर यानी केला. ''विरोधकांची ही चाल, हे वादळ अळमी–गांडुळासारखे आहे. थोडीशी चळवळ करून हे लोक थांबतील,'' असे उपहासपूर्ण उद्गार बांदोडकर यानी काढले. १० जून रोजी सात आमदारांच्या सह्या असलेला खलिता बांदोडकरांच्या हाती देण्यात आला.

उद्योगमंत्री ॲन्थनी डिसोझा, शिक्षणमंत्री प्रा. गोपाळराव मयेकर, उपसभापती मंजू गांवकर यांच्याबरोबर आमदार कृष्णनाथ नाईक, आमदार दत्ताराम चोपडेकर, आमदार गजानन पाटील व आमदार जीवा गांवकर यांच्या सह्या होत्या. बंडखोरानी बांदोडकरांवर बारा आरोप केले. हे आरोप असे होते. १) आपल्याला मिळालेल्या अधिकारांचा दुरुपयोग आपण स्वतःचा व्यापारधंदा व इतर व्यक्तिगत फायद्यासाठी केला. २) आपल्या तथाकथित विरोधकांवर द्वेष भावनेने सूड घेण्याच्या उद्देशाने आपण सत्तेचा गैरवापर केला. ३) टुरिस्ट हॉटेलमध्ये भरणाऱ्या कार्यकारिणीला प्रतिबंध करण्यासाठी आपण आपल्या अधिकाराचा उपयोग केलात व स्वतःच्याच पक्षाची अवहेलना केली. ४) आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी विचारविनीमय केल्याशिवाय आपण मंत्रिमंडळ बरखास्त करण्याचे निवेदन दिले. ५) विधानसभा व आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी यासंबंधीच्या परंपरेबद्दल अनादर व्यक्त केला. ६) या प्रदेशाच्या विकासासाठी आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांच्या प्रयत्नाना तुम्हीच विरोध केला व पुन्हा ''सहकारी अयशस्वी झाल्याने गोव्याचा विकास होऊ शकत नाही'' असे खोडसाळ विधान केले. ७) पक्षात चर्चा न करता धोरणविषयक अवास्तव घोषणा केल्या. ८) पक्षाच्या जाहीरनाम्यानुसार आवश्यक ते कायदे करण्यात आपण अपयश मिळवलेत. ९) शासकीय बाबतीत आपण केलेल्या एकतर्फी व हुकूमशाही निर्णयामुळे शासनात शिथिलता आली. १०) आपली वैयक्तिक मालमत्ता असल्यासारखी पक्ष बरखास्त करण्याची निवेदने केली. ११) सत्ता आपल्याच हाती केंद्रित रहावी यासाठी पक्षाची उभारणी लोकशाही पद्धतीने करण्याचे जाणीवपूर्वक टाळले. १२) आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी निधीचा गैरवापर केला. या साऱ्या आरोपांची शहानिशा होण्यासाठी आपण नेतृत्व सोडावे न पेक्षा आमचा पाठिंबा आम्हाला मागे घ्यावा लागेल.

या आरोपांचा धिक्कार म. गो. च्या नव्या कार्यकारिणीने केला. बांदोडकर नेतृत्व सोडत असल्याची घोषणा सौ. शशिकला काकोडकर यानी केली व नवा नेता निवडण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली. बांदोडकर मुख्यमंत्री पदाची खुर्ची सोडायला तयार झाले हा बंडखोरांचा विजय होता. परंतु नियती वेगळाच खेळ खेळत होती. सत्तेच्या राजकारणात जे होते तेच गोव्यात झाले.

भाऊसाहेब बांदोडकर सत्तेवरून खाली उतरणार या घोषणेची प्रतिक्रिया समिश्र होती. बुद्धिवंत, पांढरपेशा समाज आणि लोकशाहीच्या मूल्यांचा अभ्यासक त्या घोषणेने खुष झाला. पण ग्रामीण समाजातील बहुसंख्य नाराज झाला. बंडखोरांच्या बाजूला ग्रामीण समाज नव्हता असे नव्हे तर तो बहुसंख्येने नव्हता. सात आमदारानी केलेल्या बंडामुळे लोक विचार करू लागले. बांदोडकर यानी सत्तेवरून उतरण्याची घोषणा केली. पण पर्यायी नेतृत्व म्हणून सौ. शशिकला काकोडकर यांचे नाव सुचवले व काही अटी घातल्या. शशिकला काकोडकर यांचे नाव नेत्या म्हणून सुचवून मंत्रिमंडळाची नियुक्ती त्यांच्या पसंतीने होईल अशी अट घातली. नव्या मंत्रिमंडळाच्या धोरणात बंडखोराना ढवळाढवळ करता येणार नाही असेही सुचवले. या अटी बंडखोराना पसंत पडल्या नाहीत. बांदोडकर यांची ही कोलांटी उडी असे अँथनी डिसोझा यानी म्हटले. २३ जून १९७० रोजी सात आमदार मुख्यमंत्री बांदोडकरांचा पाठिंबा काढून घेणार असे जाहीर झाले. बांदोडकर याना अधिकारपदावर रहाण्याचा हक्क नाही त्यानी स्वतःहून राजीनामा दिला पाहिजे असे डॉ. जॅक सिकेरा यानी जाहीर केले. सौ. काकोडकर याना मुंख्यमंत्रीपद द्यायला आमची तयारी आहे. पण सूत्रे बांदोडकरांच्या हाती असता कामा नये असे बंडखोरांचे म्हणणे होते. उलट आज तुम्ही शशिकला काकोडकराना पाठिंबा देत आहात पण उद्या तो पाठिंबा काढून घेणार नाही कशावरून ? असे बांदोडकरांचे म्हणणे होते. याला उत्तर म्हणून अँथनी डिसोझा यानी ''जोपर्यंत स्वच्छ प्रशासन व पक्ष उद्दिष्टांचे पालन सौ. काकोडकर करतील तोपर्यंत आम्ही त्याना पाठिंबा देऊ'' असे म्हटले. दैनिक 'गोमंतक'चे संपादक माधव गडकरी यानी यासंबंधी बांदोडकरांवर अग्रलेखातून टीका केली. ''तो कर्ण नाही, तो धर्म नाही'' या आपल्या अग्रलेखात गडकरी यानी लिहिले, ''दिलेली कवचकुंडले परत मागावी किंवा धर्माने द्युतात हरलेला डाव नाकारावा असे घडले आहे. परंतु असे जेव्हा घडते तेव्हा समजावे तो कर्ण नव्हता, तो धर्म नव्हता.''

२८ जून १९७० रोजी म्हापसा येथे बांदोडकरांशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांची सभा झाली. सभेला प्रचंड गर्दी लोटली होती. त्या सभेत बंडखोरांवर आरोप करण्यात आले. त्या आरोपाना उत्तर देताना प्रा. मयेकर म्हणाले, ''हिंमत असेल तर आरोपांची चौकशी करा.'' अँथनी

डिसोझा म्हणाले,''सत्तेवर असणाऱ्यांनी काही केले तर आम्ही ते चालू देणार नाही. सत्तेवर असणाऱ्या पोर्तुगीजाविरुद्ध आम्ही लढा दिला'' मयेकरानी ठणकावून सांगितले ''आम्ही गरीब असूं परंतु सत्तेवर असणाऱ्या मुख्यमंत्र्याना आमच्या चारित्र्याचा सौदा करता येणार नाही.''

एकनिष्ठांची सभा म्हापसा येथे झाल्यानंतर बंडखोरानी पण म्हापसा येथे सभा घेतली. त्याही सभेला आठ हजारावर जास्त लोक होते. सभा मोडण्याचा प्रयत्न झाला. लाठीहल्ला पण झाला. विशेष गोष्ट अशी जे कार्यकर्ते बांदोडकरांच्या सभेला होते तेच कार्यकर्ते बंडखोरांच्या सभेला जमले होते. या बंडामुळे लोक विचार करू लागले होते. एक वेळ असा होता की बांदोडकरांविरुद्ध बोलणे कठीण होते. मार खावा लागला असता. पण बंडानंतर बंडखोरांच्या सभेत बांदोडकरांविरुद्ध पुष्कळ बोलण्यात आले आणि लोकानी टाळ्याही मारल्या. बहुजन समाजाच्या देवाला तडे पडले होते. बांदोडकरांवरील टीका लोक ऐकून घेत होते. बांदोडकर म्हणजे हुकुमशहा होऊन बसले होते. त्यावेळी विलीनीकरणाचा प्रश्न पुनः पुन्हा उकरून काढला जात होता. आता विलीनीकरणाचा प्रश्न उरला नाही असे बांदोडकरांनी म्हणताच त्यांच्याविरुद्ध गहजब करण्यात आला. बांदोडकरांचा विलीनकरणाला विरोध होता असा आरोप बंडखोरानी केला. बांदोडकर हे दानशूर माणूस म्हणून प्रसिद्ध आहेत. पण दानशूर माणूसच नेता होऊ शकतो असे नाही, असे आमदार दत्ताराम चोपडेकर यानी म्हटले व ''कर्णाला दातृत्व लाभले पण लोकानी नेतृत्व दिले ते कृष्णाला'' असा दाखला दिला. लोकाना तो दाखला आवडला. त्यावेळचे खासदार जनार्दन शिंक्रे यानी पत्रकार परिषदेमध्ये विधानसभा स्थगित करून राष्ट्रपती राजवट आणावी असे आपले मत सांगितले. ''काळजीवाहू मंत्रिमंडळ रहाण्याचा परवाना न देता राष्ट्रपती राजवट आणावी म्हणजे समान विचारसरणीचे आमदार एकत्रित येऊन मंत्रिमंडळ घडवू शकतील, असा विश्वास शिंक्रे यानी व्यक्त केला. यु. गो. शी सख्य करून त्यांचे राज्य बंडखोरांना आणायचे आहे असा आरोप झाला तेव्हा बंडखोरांचे नेते कृष्णनाथ बाबुराव नाईक यानी त्या आरोपाचा स्पष्टपणे इन्कार केला. गोवा, दमण व दीवची विधानसभा तीस लोकानी निवडलेल्या सदस्यांची व दोन नियुक्त सदस्यांची होती या बत्तीस आमदारांच्या विधानसभेत बांदोडकराना नऊ म. गो. आमदार व एक नियुक्त आमदार अशा दहा

जणांचा पाठिंबा होता. बांदोडकर मंत्रिमंडळ हे अल्पमतात होते. बंडखोरांच्या बैठका उपसभापती मंजू गांवकर यांच्या जुन्ता हाऊसमधील निवासस्थानी भरत होत्या. बंडखोरांची पत्रके तिथून निघायची. बांदोडकर सत्तेवरून खाली उतरणार व बंडखोरांचे नेते कृष्णनाथ बाबुराव नाईक मुख्यमंत्री होणार असे दिसून येताच गोव्यातील बडेबडे लोक मंजू गांवकरांच्या निवासस्थानी जमू लागले व कृष्णनाथ नाईक याना भेटण्याचा प्रयत्न करू लागले. बंडातील आपली भूमिका स्पष्ट करताना के. बी. नाईक म्हणाले, ''आम्हा चार आमदारांची भूमिका एक होती. मी, दत्ताराम चोपडेकर, मंजू गांवकर व जिवा गांवकर असे आम्ही चार जण होतो. म. गो. पक्ष फुटता कामा नये व यु. गो. चे सरकार सत्तेवर येता कामा नये असे आम्हाला वाटत होते. पण एकदा मी व मंजू गांवकर जेवण घेऊन मंजूच्या फ्लॅटवर आलो तेव्हा अँथनी डिसोझा कुणाशी तरी फोनवरून बोलत असताना आम्ही ऐकले. कुतुहलाने आम्ही त्यांचे बोलणे ऐकू लागलो. ''के. बी. नाईक सोडून इतराना समजावण्याचे काम मी करतो'' असे सरमळकरांशी टोनी बोलत होते व संयुक्त सरकार बनवण्याची त्यांची तयारी सुरू झाली होती. आमचा या गोष्टीला विरोध होता. म्हणून पाठिंबा काढून घ्यायचे पत्र मी ताबडतोब नायब राज्यपालांकडे दिले नाही.''

सात म. गो. आमदारांच्या या बंडाने इतरत्र जे घडते ते गोव्यात झाले. कुठली कार्यकारिणी खरी ? बांदोडकरांची की बंडखोरांची यासंबंधी वाद सुरू झाले. बांदोडकरानी बंडखोरांच्या कार्यकारिणीच्या सदस्याना तर बंडखोरानी बांदोडकराना बडतर्फ केले. पक्षासाठी आठ लाख रुपये आले त्याचे काय झाले ? असा सवाल बंडखोरांचे नेते कृष्णनाथ बाबुराव नाईक यानी केला. बांदोडकर म्हणतात आपण चौदा लाख रुपये पक्षासाठी खर्च केले. त्याचा तरी तपशील कुठे आहे. सात आमदारांचा पाठिंबा अधिकृतरीत्या काढून घेण्याचा ''सोहळा'' लांबत होता. बंडखोरांमध्ये धुसफूस चालू होती. २८ जुलै रोजी बंडखोरानी आपण बांदोडकरांचा पाठिंबा काढून घेतल्याचे ना. राज्यपालाना पत्र दिले व या नाट्याचा पहिला अंक पूर्ण झाला. पाठिंबा काढून घेतल्यानंतर गोव्यात यु. गो. ची राजवट आम्ही आणू देणार नाही. आलेच तर खऱ्या म. गो. चे सरकार सत्तेवर येईल असे आश्वासन बंडखोरानी दिले. या साऱ्या घडामोडी पाहता गोव्यात राष्ट्रपती राजवट हवी अशी मागणी काँग्रेसच्या गोवा शाखेचे

अध्यक्ष पुरुषोत्तम काकोडकर यानी केली. ३१ ऑगस्ट रोजी गोवा विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले. गोवा मुक्ती आघाडीने या दिवशी सत्याग्रह, धरणे, मोर्चे असा लढावू कार्यक्रम आखल्यामुळे सरकारने सचिवालयाभोवती १४४ कलम जाहीर केले. आघाडीच्या नेत्यानी या कलमाचा भंग करण्याचा निश्चय केला. प्रसपचे शिवाजी देसाई, उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे नारायण देसाई, टॅक्सीमेन युनियनचे आनास्तास आल्मेद, स्वातंत्र्यसैनिक संघटनेचे विश्वनाथ लवंदे व जोटिको डिसोझा, पंचायत समितीचे जयसिंगराव राणे, लोकपक्षाचे रवींद्र केळेकर यानी श्री. मोहन रानडे यांच्या नेतृत्वाखाली १४४ वे कलम मोडण्याचा प्रयत्न केला. पोलिसानी साऱ्या नेत्याना १४४ कलमान्वये अटक केली. कोर्टाने ही अटक बेकायदेशीर ठरवली व सत्याग्रहींची मुक्तता केली. पारतंत्र्यात असताना आपला मुलगा तुरुगांत व मुक्त गोव्यातही आपला मुलगा तुरुंगात असे उद्‌गार श्री. रानडे यांच्या वृद्ध मातोश्रीने काढले.

सात आमदारांच्या बंडाबाबत बोलताना स्वातंत्र्यवीर मोहन रानडे म्हणाले ''सात आमदारांच्या बंडामागची हालचाल प्रामुख्याने एम्. एस्. प्रभू यांची होती. त्याना सस्पेंड केल्यानंतर एम्. एस्. प्रभूनी पवित्रे घेतले आणि सात आमदाराना बंडास प्रवृत्त केले. मंत्रीपदाचा त्याग करणाऱ्या अँथनी डिसोझा आणि गोपाळराव मयेकर यांचा त्याग मोठा होता. मी त्यावेळी बंडाला पाठिंबा दिला तो काही धोरणामुळे. एका पक्षाच्या सरचिटणीसानी पक्षाच्या अध्यक्षावर आरोप केले होते. या आरोपांचे खंडन अध्यक्षानी करायला हवे होते. तसे त्यानी केले नाही हा राग माझा बांदोडकरांवर होता. शिवाय बांदोडकरानी स्वातंत्र्यसैनिकांविरुद्ध वक्तव्य केले होते. त्यासंबंधीही माझा राग होता.''

बांदोडकरांवरील आरोपांचा प्रश्न निघाला त्यावेळी मी त्याना म्हटले ''बांदोडकरांवर केलेले आरोप आज क्षुल्लक वाटतात. तुम्हाला तसे त्यावेळी वाटत होते का ?'' रानडे म्हणाले ''नाही. आम्ही त्यावेळी भारावून गेलो होतो. टोनी डिसोझा आणि इतर आम्ही मोहन धारिया याना भेटलो. मोहन धारिया यांचे त्यावेळी काँग्रेसमध्ये वजन होते. आरोपपत्र वाचून धारिया हंसले व म्हणाले, ''जी जमीन बळकावली असा तुमचा आरोप आहे. ती जमीन काही एकराची आहे. इथे आमच्याकडे एकरच्या एकर जमीन हडप केल्याची उदाहरणे आहेत. तुम्ही बांदोडकरांवर केलेले

आरोप इथल्या नेत्यांवर होणाऱ्या आरोपांच्या मानाने क्षुल्लक आहेत'' मोहन धारिया यांचे ते उद्गार आज मला आठवतात व हसूं येते. ''या बंडामागे ध्येयनिष्ठा, तत्वनिष्ठा होती असे तुम्हाला वाटते?''

रानडे म्हणाले ''सर्वच तत्वनिष्ठ होते असे मला वाटत नाही. त्यावेळचे दैनिक 'गोमंतक'चे संपादक माधव गडकरी नंतर भाऊसाहेब बांदोडकर यांच्या बाजूने लिहू लागले. सत्ता आणि लेखणी या पुस्तकामध्ये बांदोडकरांवर प्रहार करणारे गडकरी बदलले कसे ? माणूस बदलतो तो दोन कारणामुळे. माणसाचे मत बदलू शकते. आपल्या जुन्या मताबद्दल आपली चूक झाली असे तो प्रात्यक्षिकपणे कबूल करतो. माणसाचे मतपरिवर्तन हे पहिले कारण होय. माणसावर कोणाचा तरी दबाव येतो व तो माणूस बदलतो हे दुसरे कारण. गडकरी यांचे मतपरिवर्तन झाल्याचे त्यानी कुठे म्हटले नाही. अगर तशी कबुली कुठे दिलेली नाही. अर्थात कुणीतरी त्यांच्यावर दबाव आणला असला पाहिजे. वृत्तपत्राच्या मालकानी दबाव आणला असला पाहिजे. आणि तसे असेल तर जसा तत्वासाठी डिसोझा व मयेकर यानी मंत्रीपदाचा त्याग केला तसा गडकरी यानी संपादकपदाचा त्याग करायला पाहिजे होता. त्यानी तसं काही केलं नाही. आम्ही त्यावेळी स्वप्नाळू वातावरणात वावरत होतो.''

''त्यावेळी पक्ष बदलला असता, बांदोडकरांच्या बाजूने गेलो असतो तर बरे झाले असते असे आज तुम्हाला वाटते का ?'' माझ्या या प्रश्नाला उत्तर देताना मोहन रानडे म्हणाले, ''आज एका सामाजिक प्रकल्पासाठी मला या खात्यातून त्या खात्याकडे धावपळ करावी लागते. बांदोडकर असते तर ही धावपळ करावी लागली नसती. मी पोर्तुगीजांच्या तुरुगांतून सुटून गोव्यात आलो तेव्हा मला रहाण्यासाठी जागा हवी होती. माझे लग्न त्यावेळी झाले नव्हते. छोटीशी सुद्धा जागा मला मिळेना. मी एदुआर्द दियश याना माझी अडचण सांगितली. त्यानी भाऊसाहेबाना म्हटले आणि ताबडतोब भाऊसाहेबानी मला बोलावून घेतले. ते म्हणाले ''तुम्हाला रहायला जागा हवी असे मी ऐकले. माझ्याजवळ जागा आहे तिथे तुम्ही रहा'' मी गप्प राहिलो. त्यानी आपले खाजगी चिटणीस सामंत याना बोलावून घराच्या चाव्या हातात दिल्या व म्हणाले ''माझ्या घरात रहा.''
मी म्हटले ''भाडे किती देऊ ?''
भाऊसाहेब म्हणाले भाडे नको. असेच रहा.

मी उत्तर दिले ''बिनभाड्याच्या घरात इतके दिवस राहिलो. आता भाड्याच्या घरात रहायची इच्छा आहे'' भाडे घ्यायला ते तयार होईना. मी भाडे न देता रहायला तयार होईना.

आपल्या घराच्या चाव्या चटदिशी आणून देणारे भाऊसाहेब हे एकमेव गृहस्थ होते. त्यानंतर आणखी एक प्रसंग आठवतो. दादासाहेब कोंडके यांचा कार्यक्रम होता. कार्यक्रम चालू असताना भाऊसाहेबानी मला बाजूला बोलावून नेले व म्हटले ''आता लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. तुम्ही सिंह घेऊन उभे रहा. आम्ही तुम्हाला निवडून देतो.''

त्यानंतर मी दुसऱ्या पक्षाच्या उमेदवारासाठी भाषणे केली. पण कुठल्याच पक्षाने तुम्ही बुवा आमच्या पक्षातर्फे उभे रहा असे म्हटले नाही.

त्यावेळच्या परिस्थितीबाबत बोलताना रानडे म्हणाले ''आम्हाला बावनकशी सोने पाहिजे होते व ते या जगात मिळत नाही हे आम्हास माहीत नव्हते. बाहेरच्या जगाची कल्पना नव्हती. प्रामाणिकपणे जगण्याची संधी आम्हाला फक्त तुरुगांत मिळाली. आज मला वाटतं की बहुधा ती तिथेच मिळते. पत्रकार किंवा जे कोणी आमच्या बाजूने लिहितात त्याना ते सोयिस्कर असते म्हणून ते लिहितात. त्यामुळे आज कुणी माझ्या बाजूने लिहू लागला तर मी हुरळून जात नाही. आणि विरुद्ध लिहून आले तर वैतागून जात नाही.''

एकोणीस वर्षापासून झालेल्या बंडाच्या संदर्भात व्यक्त झालेली प्रतिक्रिया ही अशी होती. इतरांच्याही प्रतिक्रिया अशाच असतील का ? काही सांगता येत नाही.

सात म. गो. आमदारांच्या बंडाला पाठिंबा देणारे स्वातंत्र्यवीर मोहन रानडे यानी अठरा वर्षानंतर बंडाचे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विश्लेषण केले. त्यावेळी बांदोडकर गटाला पाठिंबा देणाऱ्यामध्ये आमदार जयसिंगराव आ. राणे हे प्रमुख होते. ''बांदोडकर हट्टी होते, आग्रही होते आणि लोकप्रिय 'हुकूमशहा' होते. तरीसुद्धा तुम्ही त्यावेळी बंडखोराना पाठिंबा दिला नाही. याचे कारण ?'' असा प्रश्न मी विचारला तेव्हा ते म्हणाले, ''बांदोडकरांविरुद्धची तक्रार बंडखोरानी आमदारांच्या बैठकीत करायला पाहिजे होती. पण त्यानी कधीच आम्हा लोकाना विश्वासात घेतले नाही. फुटल्यानंतर श्री. मंजू गावकर मला भेटले व म्हणाले, ''आमच्यात या.'' मी म्हटले ''फुटल्यानंतर तुम्ही आम्हाला गृहीत धरून विचारता. पूर्वी का

नाही विचारले ? कदाचित आलो असतो, कदाचित आलो नसतो. पण विचार केला असता. आता आमची नैतिक जबाबदारी आहे ती बांदोडकर याना पाठिंबा द्यायची'' बांदोडकरांची आणि बंडखोरांची बैठक झाली तेव्हा तिला आम्हाला आमंत्रण नव्हते. ती बैठक अपयशी ठरली. रात्रौ ११ वाजता अँथनी डिसोझा व गोपाळराव मयेकर यानी राजीनामे दिले. पहाटे ४ च्या सुमारास बांदोडकरांचा निरोप आला. त्यानी मला बोलावले होते. मी सकाळी सहाच्या सुमारास पोचलो. आरामखुर्चीवर ते बसले होते. भारलेल्या आवाजात ते म्हणाले, 'हे मंदिर मी उभे केले आहे. ते माझ्यामुळे जर मोडत असेल तर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यायला मी तयार आहे.'' त्यांच्या डोळ्यात पाणी आले. ''तुम्ही राजीनामा दिला तर मुख्यमंत्री कोण ?'' असे विचारताच ते म्हणाले, ''गजानन पाटील.'' मी आश्चर्यचकित झालो. पाटील हे बंडखोरात होते. त्याना मुख्यमंत्रीपद द्यायची तयारी भाऊसाहेब यानी केली होती..... श्री. राणे आपल्या आठवणी सांगत होते. आपल्या विरोधी गटातील आमदारास मुख्यमंत्रीपद देण्याची तयारी बांदोडकर यानी दाखवली याचे आश्चर्य मलाही वाटले. कुतुहलाने मी जयसिंगरावाना प्रश्न केला, ''पुढे काय झाले ?''

''पाटील यांच्या नावाला मी विरोध केला. ते अननुभवी आहेत. मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारायला लहान आहेत.''

''तसे असेल तर टोनी डिसोझाला मुख्यमंत्री करूया.''

नंतर संयुक्त बैठक झाली. टोनीचे नाव सुचवताच दत्ताराम चोपडेकर यानी श्री. के. बी. नाईक यांचे नाव सुचवले.

दोन नावे आल्यामुळे एकमत होईल असे वाटले नाही.

टोनी म्हणाले, ''यासंबंधीचा निर्णय नंतर घेऊ या.'' अशा रीतीने ती बैठक संपायला आली. बांदोडकर म्हणाले, ''नेता एकमताने निवडता येत नसेल तर मी राजीनामा देणार नाही.'' या साऱ्या प्रकारामुळे कोंडी काही सुटेना. तेव्हा जयसिंगरावानी शशिकला काकोडकर यांचे नाव सुचविले. बंडखोरांचा आग्रह असा होता की भाऊसाहेबानी मुख्यमंत्रीपद सोडावे व पक्षाध्यक्षपद ठेवावे. त्यादृष्टीने सौ. काकोडकर मुख्यमंत्री झाल्या तर बरे असे जयसिंगरावानी म्हटले. सत्तेवर असताना समजा सौ. काकोडकर यांची धोरणे चुकली तर अंकुश ठेवायला पिता या नात्याने बांदोडकर उपयुक्त ठरतील असा तर्कवाद जयसिंगरावानी केला. पण अखेर

बंड फिसकटले. सत्तेवर बांदोडकरच राहिले.''

''मंजू गांवकरविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याचे प्रयोजन काय होते ?''

जयसिंगराव म्हणाले ''तो ठराव मी मांडला होता. शिवाय बंडखोरांच्या राजकारणातील हवा काढून घ्यावी हा त्यामागचा हेतू होता. आम्ही बहुमताने अविश्वासाचा ठराव संमत करून घेतला असता पण मंजूने शेवटच्या क्षणाला राजीनामा दिला.''

जयसिंगराव राणे यांच्या मुलाखतीवरून आपण त्यावेळी बांदोडकराना पाठिंबा दिला हे बरोबर होते असे त्यांचे मत कायम असल्याचे दिसून आले. एक गोष्ट मात्र मला जाणवली ती ही की बंडखोरानी इतर आमदाराना विश्वासात घेतले नाही. त्यामुळे बांदोडकरांवर रुसलेले आमदार बंडखोराना मिळू शकले नाही. ''तुम्ही ग्रुप करता ना, मग करा, असे त्यांचे म्हणणे होते. सात आमदाराना आणखी आमदार मिळाले असते तर इतिहास वेगळा झाला असता. बंडखोरानी आपल्या बंडाची बातमी गुप्त ठेवली. बैठका बंदिस्त ठेवल्या. त्याऐवजी महात्मा गांधींप्रमाणे उघड सर्वांना आवाहन करून बंड पुकारले असते तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते. राजकारणात जर आणि तरला अर्थ नसतो. जे झाले ते झाले असे म्हणायचे असते. आणि त्यापासून शहाणे होऊन पुढील मार्ग शोधायचा असतो.

भाऊसाहेब बांदोडकर यांच्याविरुद्ध बंड केलेल्या आमदारांचा राजकीय दृष्ट्या पराभव झाला खरा, पण म. गो. पक्षांतर्गत असंतोष थंडावला नाही. बंडाच्या वेळी बांदोडकरांच्या बाजूने उभे राहिलेले शिवराम आजगांवकर अखेर बंडखोर बनले व त्यांची सुद्धा हकालपट्टी झाली. ज्या गोष्टी बंडखोर सांगत होते त्याच गोष्टींचा आग्रह त्यानी नंतर धरला. बंडाच्यावेळी ते बांदोडकरांशी एकनिष्ठ राहिले. त्यासंबंधी बोलताना शिवराम आजगांवकर म्हणाले, ''ही घटना घडली तेव्हा एम्. एस्. प्रभु अमेरिकेला जायला निघाले होते. बांदोडकरानी त्याना सस्पेंड केले. टोनी डिसोझा यानी फोन करून सगळे सांगितले. प्रभुनी दौरा रद्द केला आणि सगळ्याना संघटित केले. आमचे म्हणणे असे होते की प्रभुंची वकिली घेऊन तुम्ही जनतेसमोर गेलात तर जनता तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही. उलट बांदोडकरांची वागण्याची पद्धत, त्यांची हुकूमशाही प्रवृत्ती लोकाना

समजावून सांगितल्यास त्याचा परिणाम होईल. बांदोडकरांवर लोकांचा विश्वास होता. त्यांच्यावर तुम्ही केवढेही मोठे आरोप करा, पण लोकांचा त्यावर विश्वास बसणार नाही. आमचे म्हणणे बंडखोराना पटले नाही. त्यानी आम्हाला वगळून बंड पुकारले, बंडखोरानी टुरिस्ट हॉस्टेलमध्ये सभा बोलावली. बांदोडकरानी टुरिस्ट हॉस्टेल अगोदर राखून ठेवले. आम्ही सगळे दुसरीकडे गेलो. त्यासुमारास बांदोडकर मुंबईहून परतलेले. तेव्हा मी म्हटले, म. गो. चे अध्यक्ष मुंबईहून परतले आहेत. अध्यक्ष उपस्थित असताना उपाध्यक्षाना बैठक बोलावण्याचा अधिकार नाही. मग आम्ही बांदोडकराना फोन केला. बांदोडकर म्हणाले, ''या. अल्तिनवर कार्यकारिणीची बैठक भरवू या.''

बंडखोर तयार होईना. मी म्हटले, ''आपापसातील मतभेद एकमेकांसमोर प्रगट करूया.'' त्यानंतर बांदोडकर व टोनी डिसोझा यांची भेट घडवून आणली. पण ती भेट यशस्वी ठरली नाही. चोपडेकर हे रागारागाने आले आणि त्यानी बैठक बिघडून टाकली.

बांदोडकरांच्या बाजूने उभे राहिलेले म. गो. नेते बांदोडकरांच्या वागण्यावर खुष होते असे नव्हते. बांदोडकरांचे नेतृत्व त्याना पसंत होते. बांदोडकरांचे पक्षीय धोरण त्याना पसंत होते. पण त्या नेतृत्वाच्या वागणुकीत बदल त्याना हवा होता. उलट बंडखोराना बांदोडकरांचे नेतृत्व नको होते. शिवाय बांदोडकरांच्या कार्यपद्धतीला त्यांचा विरोध होता. एम्. एस्. प्रभुंच्या सस्पेंन्शननंतर हे बंड सुरू झाले हेच मुळी चुकले. तसे पाहिले तर पक्षांतर्गत विरोध पूर्वीच सुरू झाला होता.

सात आमदारांचे बंड राजकीयदृष्ट्या अयशस्वी ठरले. भाऊसाहेब बांदोडकरानी यु. गो. मधील पांच आमदारांचा पाठिंबा मिळवला आणि सत्ता आपल्या हाती ठेवली सात आमदारांच्या बंडाचे नेतृत्व कृष्णनाथ बाबुराव नाईक यानी केले. दोन मंत्र्यानी राजीनामे दिले. अँथनी डिसोझा आणि प्रा. गोपाळराव मयेकर या दोन मंत्र्यानी सत्तेचा मोह दूर सारला व तत्वनिष्ठा दाखवली. या दोघांवर तसे आरोप नव्हते. कुणी त्याना खाली उतरा असे सांगितले नव्हते. भाऊसाहेब बांदोडकर यांची वर्तणूक त्याना पसंत नव्हती म्हणून त्यानी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांचा त्याग मोठा होता. पण याबरोबर आणखी एक आमदार जिवा भागडू गांवकर यांचाही त्याग मोठा होता. त्यानी आपल्या बाजूने यादे म्हणून

बांदोडकरानी अनेक आमिषें दाखवली. पण मध्यमवर्गीय असे जिवा गावकर मोहाला बळी पडले नाहीत. त्यानी बंडखोराना सोडून दिले नाही. बंडखोरांनी आपला पाठिंबा काढून घेण्याबाबतीत वेळ घालवला. या मधल्या काळाचा फायदा बांदोडकरांनी घेतला व सत्ता टिकवली. म. गो. मध्ये जशी फूट पडली तशी यु. गो. मध्ये फूट पडली. बंडखोर म. गो. पेक्षा बांदोडकर परवडले असे म्हणणारा ओर्लांद सिकेरा लोबो गट फुटला. ते चार व अब्दुल रझाक एक असे पाच आमदार फुटले व ते बांदोडकरांच्या बाजूने उभे राहिले. बांदोडकरांवर विश्वासदर्शक ठराव विधानसभेत मांडण्यात आला तेव्हा ठरावाच्या बाजूने ९ म. गो. आमदार, १ नियुक्त आमदार, २ दीव दमणचे आमदार असे आमदार व पांच यु. गो. चा फुटीर आर्लांद सिकेरा लोबो गट असे १७ आमदार उभे राहिले तर विरोधी ठरावाच्या विरुद्ध ६ बंडखोर आमदार १ नियुक्त व ७ यु. गो. सिकेरा गटाचे आमदार मिळून १४ उभे राहिले. १७ विरूद्ध १४ मतानी बांदोडकरावरील विश्वासदर्शक ठराव संमत झाला.

यु. गो. चे पाच आमदार आपल्या बाजूला वळवून बांदोडकर जिंकले व सात आमदारांचे बंड राजकीय दृष्ट्या फसले. पण ते बंड अयशस्वी झाले असे म्हणता येईल का ? या बंडात बांदोडकर जिंकले का ? गोव्याच्या स्वातंत्र्योत्तर काळात ओपिनियन पोलइतकेच या बंडाला महत्व आहे.

: सात :

बांदोडकर पर्वाची अखेर

सात म. गो. बंडखोर आमदारांपैकी तिघे काँग्रेसमध्ये गेल्यामुळे बंडाची हवाच निघून गेली. बंडखोरांमध्ये एकी नाही. नेतृत्वाबद्दल वाद आहे. आपापसात पाय ओढणारे हे बंडखोर बांदोडकरांशी झुंज कशी देणार? असा प्रश्न लोक विचारू लागले. तिघानी काँग्रेसमध्ये जाता कामा नये होते असे के. बी. नाईक यांचे समर्थक म्हणू लागले तर सर्वच बंडखोर काँग्रेमध्ये गेले असते तर केंद्र सरकारला विचार करावा लागला असता असे मयेकर–डिसोझा समर्थक म्हणू लागले. तीन बंडखोरांच्या खटपटीमुळे निदान बांदोडकरांवरील आरोपांची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती कपूर यांचा आयोग तर नेमला गेला. सातही आमदार काँग्रेसमध्ये गेले असते तर गोव्याचे वातावरण बदलले असते असे काँग्रेस समर्थकांचे म्हणणे पडले. के. बी. नी पाठिंबा काढून घ्यायचे पत्र द्यायला उशीर लावला आणि त्यामुळे आमदार आपल्या बाजूने वळवायला बांदोडकराना संधी मिळाली असा मुद्दा काहीनी मांडला. के. बी. या बाबतीत स्पष्ट होते. यु. गो. च्या मदतीने आम्हाला सत्ता नको अशी त्यांची भूमिका होती. बाबल किनळेकर यांच्या मृत्युमुळे रिकाम्या झालेल्या जागेसाठी पेडणे येथे पोटनिवडणूक झाली. तर्कशुद्ध विचारसरणी आणि तात्त्विक मुद्दे याबाबतीत विरोधक प्रचारात उजवे होते. पण बहुजन समाज अजूनही ''सिंहा''वर विश्वास ठेवून होता. या पोटनिवडणुकीत म. गो. चीच सरशी झाली.

याच सुमारास लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक जाहीर झाली. उत्तर गोव्यातून म. गो. चे श्री. माधवराव तळावलीकर उभे राहिले तर काँग्रेसतर्फे श्री. पुरुषोत्तम काकोडकर होते. दक्षिण गोवा मतदारसंघात म. गो. पुरस्कृत रेदुआल्द कॉश्त उभे होते तर त्यांचे विरोधक इराज्मू सिकेर होते. निवडणुकीमध्ये उत्तरेस काकोडकर निवडून आले. या विजयावर भाष्य करताना मोहन रानडे म्हणतात, ''आम्ही सगळ्यानी काकोडकर निवडून यावेत म्हणून प्रयत्न केले. ते दिल्लीस गेले की गोव्यातील काँग्रेस व्यवस्थित करता येईल या आशेने त्यांचा आम्ही प्रचार केला. श्री. तळावलीकराना फक्त तीन हजार मते पडली. त्यांच्या भाषणात नेहमीच

एक सुर असे. ते म्हणत, ''मी कोणा व्यक्तीचा उमेदवार नाही. ''गोमंतकाचा विकास'' हा जाहीरनामा असलेल्या म. गो. चा मी उमेदवार आहे.'' बांदोडकर मंदिरे बांधतात या आरोपाला उत्तर देताना तळावलीकर म्हणत ''बांदोडकर ज्ञान मंदिरे, व्यायाम मंदिरे, उद्योग मंदिरे पण बांधतात.''

दक्षिणेकडे मात्र इराज्मू जास्त मतानी निवडून आले. म. गो. ला पराभव पत्करावा लागला. आपले हे अपयश कार्यकर्त्यांच्या कामचुकारपणामुळे आले असे बांदोडकरानी भाष्य केले. बांदोडकरांचा राग बंडखोरांवर होता. बंडखोरांपैकी अधिकारपदावर कुणी नव्हते. मंत्र्यानी राजीनामे दिले होते. उपसभापती मंजू गांवकर तेवढे अधिकारपदावर होते. जुंता हाऊसच्या पाचव्या मजल्यावर त्यांचे निवासस्थान होते. तिथेच बंडखोरांच्या बैठकी भरत होत्या. ते निवास्थान सर्वांच्या तोंडी झाले होते. अनेक म. गो. कार्यकर्त्याना ते खुपत होते. याचा परिणाम म्हणून उपसभापतीपदावर अविश्वासाचा ठराव आणण्याचे ठरले. श्री. पुनाजी आचरेकर यानी श्री. गांवकर यांच्यावरील अविश्वासाचा ठराव मांडला. तत्वाना मूठमाती देण्याऐवजी मी खुर्ची सोडीन असे श्री. गावकर यानी मोठ्या दिमाखात म्हटले व खरे केले. अकस्मात दिलेल्या राजीनाम्यामुळे म. गो. पक्षाचा डाव फसला. अविश्वासाचा ठराव त्याना संमत करायचा होता. उपसभापतींचा राजीनामा मंजूर करू नका असे सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या. पण सभापतीनी गांवकरांचा राजीनामा मंजूर केला. बांदोडकरानी श्री. शांबा देसाई याना उपसभापतीपद दिले. मराठ्याना राग येऊ नये म्हणून एका मराठ्याऐवजी दुसरा मराठा त्यानी उभा केला.

सात बंडखोरांपैकी काँग्रेसमध्ये न गेलेल्या आमदारानी नव महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष स्थापन केला. मराठी व विलीनीकरण यावर जास्त भर दिला व १९७२ च्या निवडणुकीत हा पक्ष उभा राहिला. या निवडणुकीचे वैशिष्ट्य असे की अखिल भारतीय पक्षाचे उमेदवार उभे राहिले होते. पण सगळे पराभूत झाले. नव महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या उमेदवाराना मराठीवादी मतदारानी मते दिली नाहीत. नव म. गो. ला मत दिले तर मते फुटतील व यु. गो. निवडून येईल या भीतीने मतदारानी बांदोडकरांच्या ''सिंह''ला जवळ केले. काही झाले तरी आम्ही यु. गो. ला निवडून आणणार नाही, असे बहुसंख्य हिंदु मतदारानी ठरवले आणि नव म.

गो. सपशेल पराभूत झाला. या निवडणुकीत प्रतापसिंह राणे म. गो. तिकिटावर निवडून आले. एक नवा नेता राजकारणात चमकू लागला. याच सुमारास कामगार नेते, स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय देशपांडे यांचे निधन झाले. त्याना श्रध्दांजली वाहण्यासाठी प्रचंड जनसमुदाय लोटला होता. मैलभर लांब रांग लागली होती. स्वतंत्र गोव्यामध्ये कामगार चळवळ दिवसेंदिवस मूळ धरत होती. गोव्यातील आकाशवाणीचे धोरण पक्षपातीपणाचे आहे असा आरोप मुख्यमंत्री बांदोडकर यानी केला. श्री. भाऊ काकोडकराना गोव्यात काही किंमत नसताना आकाशवाणी त्याना भलतेच महत्व देते असा बांदोडकरांचा आरोप होता. त्याचे खंडन अर्थातच श्री. काकोडकरानी केले.

गोव्यातील नगरपालिकांची पहिली निवडणूक याच वर्षी झाली. गोव्यातल्या तेरा नगरपालिकांचे १२५ वॉर्ड होते. त्यासाठी ४१२ उमेदवार उभे राहिले होते. निवडणुकांचा निकाल लागला. पणजी आणि मडगांव या नगरपालिका यु. गो. कडे गेल्या. म्हापसा, वास्को व फोंडा येथे नागरिक आघाड्या यशस्वी झाल्या. या निवडणुकीमध्ये जनसंघाचा धुव्वा उडाला. म्हापसा नगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात बांदोडकर गट उभा राहिला होता. त्यांचा सपशेल पराभव झाला. या अपयशाची जबाबदारी स्वतःकडे घेऊन म. गो. चिटणीस मोतीलाल बांदेकर यानी राजीनामा दिला. श्री. एम्. एस्. प्रभूना सस्पेंड केल्यानंतर भाऊसाहेबानी श्री. बांदेकर यांची चिटणीसपदी नियुक्ती केली होती. फोंड्याला नगर सुधार आघाडीचे विश्वनाथ नाईक यांचा गट जिंकला होता. आजच्या संदर्भात आणखी एक महत्वाची घटना १९७० मध्ये घडली. सात वर्षे मांडवी पुलाचे चाललेले काम पुरे झाले व १३ नोव्हेंबर ७० रोजी तो वाहतुकीसाठी खुला झाला. पुलाच्या कामाबद्दल अनेक तक्रारी झाल्या होत्या, चर्चाही झाली होती. टीका प्रखर होती. पण ज्या पुलाला सात वर्षे लागली तो पूल १६ वर्षात कोसळेल असे वाटले नव्हते.

यानंतर चार–पाच दिवसानी बंडखोरांचे तीन खांबे कोसळले. बंडखोरांचे एक प्रमुख नेते ॲथनी डिसोझा १७ नोव्हेंबर रोजी काँग्रेसमध्ये गेले. स्वच्छ शासन, सामाजिक व आर्थिक प्रश्नांची समाजवादी दृष्टिकोनातून सोडवणूक हीच गोव्याची आजची गरज असल्याने मी आज खुल्या मनाने माझ्या पूर्वीच्या पक्षामध्ये परत येत आहे. असे निवेदन त्यानी

केले. त्याना श्री. रानडे यानी पाठिंबा दिला. गोव्यातील राजकीय आघाड्या या प्रादेशिक आघाड्या आहेत, असे श्री. रानडे म्हणाले व काँग्रेसमध्ये ''तरुण तुर्क'' व्हा अशी त्यानी डिसोझा याना सूचना केली. त्यानंतर ७ डिसेंबर रोजी प्रा. गोपाळराव मयेकर व गजानन पाटील हेही काँग्रेसमध्ये सामील झाले. गोव्यातील अस्थिरता येथील राजकारणात भारतीय पक्षांचा प्रवेश झाल्याने नाहीशी होणार आहे, असा आशावाद काँग्रेमध्ये परतताना या दोन नेत्यानी प्रगट केला. पेडणे मतदारसंघातील म. गो. चे आमदार बाबल किनळेकर यांच्या निधनामुळे तेथे पोटनिवडणूक झाली. नवकाँग्रेसचे अर्जुन परब, म. गो. चे भालचंद्र किनळेकर, कम्युनिस्टांचे नारायण देसाई व सदानंद बोंद्रे असे चार उमेदवार रिंगणात उतरले. बंडखोरांच्या सात आमदारांपैकी तीन काँग्रेसमध्ये शिरल्यामुळे उरलेल्या चार आमदारांचा वेगळा गट झाला. कृष्णनाथ बाबुराव नाईक, दत्ताराम चोपडेकर, मंजू गांवकर व जिवा गांवकर यांच्या नेतृत्वाखाली नव महाराष्ट्रवादी पक्ष स्थापन झाला. गोव्याच्या राजकारणात या नव्या पक्षाला स्थान मिळाले का?

नव महाराष्ट्रवादी पक्ष निवडणुकीत उभे राहाण्यापूर्वी त्यांची व बांदोडकरांची बोलणी झाली. त्यासंबंधी के. बी. नाईक म्हणतात. ''नंतर आम्ही नव महाराष्ट्रवादी पक्ष स्थापन केला. १९७२ च्या निवडणुकीपूर्वी आमचे व बांदोडकरांचे बोलणे झाले. तुम्ही एकटे या असे बांदोडकर मला म्हणत व मी आलो तर सहकाऱ्यांसकट येईन असे मी म्हणत होतो. १९७२ च्या निवडणुकीत जागा वाटण्यासंबंधी बोलणी झाली. बांदोडकर म्हणाले, ''आम्ही तुम्हाला तीन जागा देऊ. एक तुम्हाला, दुसरी दत्ताराम चोपडेकर याना व तिसरी मंजू गांवकर याना.''

मी म्हटले,''आम्हाला चार जागा द्या. चवथी जिवा गांवकर याना द्या. जिवा गांवकर याना तिकीट द्यायला बांदोडकर कसेच तयार नव्हते. जिवाला मी नॉमिनेट केले. त्याने तुमच्या बरोबर जावे हे मला पसंत पडले नाही. असे ते म्हणू लागले. जिवा गावकरमुळे आमच्या वाटाघाटी फिसकटल्या. आम्ही नव महाराष्ट्रवादी पक्षातर्फे उभे राहिलो. उत्तरेकडे दत्ताराम आणि दक्षिणेकडे मंजू गांवकर असे लोकसभेचे उमेदवार ठरले. उत्तरेत उभे राहिलेले दत्ताराम चोपडेकर यानी आपले नांव मागे घेतले व आमच्या मतदारानी पुरुषोत्तम काकोडकर याना मते दिली. आमच्या

मतावर पुरुषोत्तम काकोडकर निवडून आले व दक्षिणेकडे मंजू गांवकर यास नऊ हजाराहून जास्त मते पडल्यामुळे म. गो. चे अधिकृत उमेदवार रेदुआल्द कॉश्त पराभूत झाले. ज्या सात आमदारानी बंड केले ते सारे एकत्रित राहिले असते तर बंडाचा परिणाम वेगळा झाला असता. पण तीन आमदार व एम्. एस्. प्रभू असे चार जण काँग्रेसमध्ये गेल्यामुळे आमची शक्ती दुभंगून गेली.''

१९७२ च्या निवडणुकीत स्थानिक पक्षामध्ये नव महाराष्ट्रवादी पक्षाने भर घातली. म. गो. पक्ष, यु. गो. पक्ष आणि नव म. गो. असे तीन स्थानिक पक्ष उभे राहिले. काँग्रेस, कम्युनिस्ट, सोशलीस्ट, मार्क्सवादी आणि जनसंघ हे राष्ट्रीय पक्ष पण निवडणुकीच्या रिंगणात उतरले. काँग्रेसने १७ मतदार संघात उमेदवार उभे केले. पेडणेहून रघुराज देशप्रभू, मांद्रेहून विजय कामुलकर, म्हापशाहून सुरेश आमोणकर, थिवीहून गोपाळ मयेकर, पाळीहून प्रभाकर उसगांवकर, सत्तरीहून गोपाळ आपा कामत, पणजीहून व्हिक्टर सिमोईश, सांत आंद्रेहून विश्वनाथ लवंदे, सांत इस्तेव्हहून प्रफुल्ल प्रियोळकर, डिचोलीतून रमेश सरदेसाई, फोंड्याहून जगन्नाथ घाणेकर, शिरोड्याहून सुलोचना काटकर, सांगेहून देवीदास कुडचडकर, कुडचडेहून कॉत कार्ल्व्हाल्यू, मडगांवहून मधु तिंबले, कुठ्ठाळीहून तेलू मश्कारेन्हस,मुरगांवहून अँथनी डिसोझा या उमेदवारांमध्ये गोपाळ आपा कामत, विश्वनाथ लवंदे, प्रफुल्ल प्रियोळकर, तेलू मश्कारेन्स, अँथनी डिसोझासारखे स्वातंत्र्यसैनिक होते. कम्युनिस्टानी ५ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून गोपीनाथ राव, डिचोलीहून जॉर्ज व्हाझ, नावेलीहून श्यामराव मडकईकर, मडगांवहून नारायण देसाई, मुरगांवहून जेराल्ड परेर. मार्क्सवादी पक्षाने दोन मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. सांताक्रुजहून विनायक पालेकर, कुडचडेहून जुआंव पेरेर, असे त्यांचे उमेदवार होते. समाजवादी पक्षाने चार मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. डिचोलीहून शिवाजी देसाई, पाळीहून आफ्रीयल आंतोन, सत्तरीहून जयसिंग वे. राणे, कुंकळीहून आनास्तास आल्मेद हे उभे राहिले. जनसंघाने नऊ मतदारसंघात आपापले उमेदवार उभे केले. पेडणेहून शिवनाथ वाळके, थिवीहून मधुकर गाड, सत्तरीहून लक्ष्मण जोशी, फोंड्याहून गिरी सावंत, शिरोड्याहून गोपीनाथ नाईक, सांगेहून श्रीरंग प्रभू देसाई, नावेलीहून प्रकाश कवळेकर, मडगांवहून प्रकाश कवळेकर, मुरगांवहून

विश्वनाथ आर्लेकर असे जनसंघाचे उमेदवार होते. हे झाले साऱ्या राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार. गोव्यात म. गो. पक्ष, यु. गो. पक्ष आणि नव म. गो. या तीन स्थानिक पक्षानी आपले उमेदवार उभे केले होते. म. गो. पक्षाने तेवीस मतदार संघातून आपले उमेदवार उभे केले. पेडणहून जयसिंगराव राणे, मांद्रेहून दयानंद बाळकृष्ण बांदोडकर, शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, कळंगुटहून अँथनी डिक्रूझ, म्हापसाहून रघुवीर पानकर, थिवीहून पुनाजी आचरेकर, डिचोलीहून शशिकला काकोडकर, पाळीहून अच्युत उसगावकर, पणजीहून बाबन नाईक, सांत आंद्रेहून आगुस्तीन मेल, सांत इस्तेव्हहून विनायक चोडणकर, मडकईहून कृष्णा बांदोडकर, फोंड्याहून रोहिदास नाईक, शिरोड्याहून जयकृष्ण नाईक,सांगेहून वासुदेव मोरजकर, काणकोणहून गणबा देसाई, केपेहून दुलो कुर्टीकर, कुडचडेहून अनिल प्रभुदेसाई, कुंकळीहून जॉकिश फर्नांडिस, नावेलीहून एलु मिरांदा, मडगांवहून गोपाळ विर्जीनकर, मुरगांवहून वसंत जोशी व सत्तरीहून प्रतापसिंह राणे असे म. गो. चे उमेदवार होते. युनायटेड गोवन्स पक्षाने सव्वीस मतदारसंघातून आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून श्रीधर प्रभूदेसाई, मांद्रेहून सांतास्निन कुन्हा, शिवोलीहून विल्फ्रेड डिसोझा, कळंगुटहून जगदीश राव, हळदोणेहून सिल्वेर सोझा, म्हापशाहून श्रीरंग नार्वेकर, थिवीहून रवींद्र प्रभू, डिचोलीहून शिवाजी दुभाषी, सत्तरीहून दत्ताराम शिरोडकर, पणजीहून यशवंत देसाई, सांताक्रुजहून जॅक सिकेरा, सांत आंद्रेहून तेवतेन पेरेर, सांत इस्तेव्हहून श्रीकांत देसाई, शिरोड्याहून नारायण तेंडुलकर, फोंड्याहून यशवंत पै रायकर, सांगेहून दत्ता नाडकर्णी, काणकोणहून श्रीरंग प्रभू देसाई, केपेहून मोलू देसाई, कुडचडेहून भानुदास करमली, कुंकळीहून रॉक सांतान फर्नांडिस, बाणावलीहून वासुदेव सरमळकर, नावेलीहून लिओ वेल्हयु, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून एदुआर्द फालेरो, कुठ्ठाळीहून लुईश प्रॉत बार्बोझा, मुरगांवहून आन्ताइत लोबो असे उमेदवार होते. नवमहाराष्ट्रवादी पक्षाने पंधरा मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून श्रीकांत गाड, मांद्रेहून बाबलो वाडजी, शिवोलीहून चंद्रकांत परुळेकर, म्हापशाहून रामचंद्र मयेकर, डिचोलीहून दत्ताराम चोपडेकर, पाळीहून कृष्णनाथ बाबुराव नाईक, सत्तरीहून विश्वनाथ कवठणकर, सांत इस्तेव्हहून वामन राधाकृष्ण, मडकईहून चंद्रकांत केरकर, फोंड्याहून विश्वनाथ नाईक, शिरोड्याहून

जिवा गांवकर, सांगेहून काशिनाथ नाईक, काणकोणहून मंजू गांवकर, केपेहून शंकर फळदेसाई, कुडचडेहून जयवंत नाईक.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने आपल्या उमेदवारात गौड मराठा समाजाला स्थान दिले. यु. गो. च्या यादीमध्ये सोळा हिंन्दू होते. आपला पक्ष केवळ ख्रिश्चनांचा नाही हे त्याना दाखवायचे होते.

१९७२ मध्ये म. गो. मध्ये फूट पडली. बंडखोर गटापैकी काही आमदार काँग्रेसमध्ये गेले. काहीनी नव म. गो. पक्ष स्थापन केला. पण मतदारानी पुन्हा म. गो. आणि यु. गो. ला मत दिले. म. गो. चे उमेदवार पेडणेहून जयसिंगराव राणे, मान्द्रेहून दयानंद बाळकृष्ण बांदोडकर, शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, डिचोलीहून शशिकला काकोडकर, म्हापशाहून रघुवीर पानकर, थिवीहून पुनाजी आचरेकर, पाळीहून अच्युत उसगांवकर, सत्तरीहून प्रतापसिंग राणे, पणजीहून बाबन नाईक, सांत इस्तेव्हहून विनायक चोडणकर, मडगांवहून कृष्णा बांदोडकर, फोंड्याहून रोहिदास नाईक, शिरोड्याहून जयकृष्ण नाईक, सांगेहून वासुदेव मोरजकर, काणकोणहून गणबा देसाई, केपेहून दुलो कुर्टीकर, कुडचडेहून अनिल प्रभू देसाई, मुरगांवहून वसंत जोशी निवडून आले तर यु. गो. चे उमेदवार कळंगुटमधून जगदीश राव, सांताक्रूझहून डॉ. जॅक सिकेरा, सांत आंद्रेहून तियोतेन पेरेरा, कुंकळीहून रॉक सांतान फर्नांडिस, बाणावलीहून वासुदेव सरमळकर, नावेलीहून लिओ वेल्ह्य, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून एदुआर्द फालेरो, कुठ्ठाळीहून डॉ. लुईश बार्बोझा व हळदोणेहून सिल्व्हेर सोझा निवडून आले. १३ मार्च ७२ रोजी बांदोडकर मंत्रिमंडळ स्थापन झाले. अच्युतराव उसगांवकर, प्रतापसिंह राणे मंत्री झाले. सौ. शशिकला काकोडकर राज्यमंत्री झाल्या.

गोव्यामध्ये जवळजवळ दीड हजार सरकारी प्राथमिक शाळा सुरू झाल्या. दर वर्षी दीड ते दोन लाख मागासलेल्या मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. गोव्यात जातीय संस्था सुरु झाल्या. परंतु समाजातील विद्यार्थ्यांबरोबरच जातपात लक्षात न घेता इतर समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण गोमंतक मराठा समाजाने स्वीकारले. इतकेच नव्हे तर गोमंतक मराठा समाजाच्या वतीने व भाऊसाहेब बांदोडकर यांच्या मदतीने पाठवलेला पहिला विद्यार्थी गोमंतक मराठा समाजाचा नव्हता तर, क्षत्रिय भंडारी समाजाचा होता. जातपातीची कुंपणे मोडण्याचे सामाजिक

कार्य अशा रीतीने सुरू झाले. आंतरजातीय, आंतरधर्मीय लग्ने होऊ लागली. गोवा क्षत्रिय मराठा समाजाचे अधिवेशन जगन्नाथ चोडणकर यांच्या नेतृत्वाखाली म्हापसा येथे भरले.

१९७३ साल उजाडले. पण गोव्यामध्ये काँग्रेस पक्ष रुजू शकला नाही. जवळजवळ दहा वर्षे गोव्यामध्ये दोन स्थानिक पक्ष राजकारणाची सूत्रे हालवत होते. आणि दोन धर्मीयांची सुखदुःखे व्यक्त करीत होते. या ध्रुवीकरणामुळे गोव्याची प्रगती खुंटते याची जाणीव कुणाला नव्हती. कॅथॉलिकांचे राज्य येऊ नये म्हणून बहुजनसमाज ठराविक पक्ष घेऊन बसला होता. तर हिंदुचीच सत्ता मुक्तीनंतर रहावी याची खंत मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात कॅथॉलिकाना होती. काँग्रेसने खरे म्हटले तर ही फळी फोडायला हवी होती. पण तसे झाले नाही. गोवा प्रदेश अस्थायी समितीच्या अध्यक्षा म्हणून सौ. सुलोचना काटकर यांची नियुक्ती झाली तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ टुरिस्टमध्ये मेजवानी आयोजित करण्यात आली. देशामध्ये आणि गोव्यामध्ये दुष्काळाची चिन्हे दिसत असताना मेजवान्या काँग्रेसवाल्यानी झोडाव्या याचे दुःख युवक क्रांती दलाला झाले आणि त्यानी टुरिस्ट हॉस्टेलसमोर निदर्शने केली. गिरीश नार्वेकर व कृष्णा वायंगणकर यानी निदर्शनाचे नेत्वृत्व केले. आणि गोव्यामध्ये परिस्थिती बिकट असताना मेजवानी झोडताच कशाला ? अशा घोषणा दिल्या. निदर्शने पाहून मेजवानीस आलेले अनेक निमंत्रित पाहुणे परतले. गोव्यामध्ये जे जे करावे ते उलट व्हावे असा प्रकार काँग्रेसबाबतीत होऊ लागला. ''काँग्रेसचे राजकारण हे मांडवी हॉटेलपुरते मर्यादित आहे.'' अशी टीका होऊ लागली. ही टीका सर्वसामान्य माणसापासून केंद्रीय मंत्र्यापर्यंत होऊ लागली. केंद्रीय दळणवळण खात्याचे उपमंत्री जगन्नाथ पहाडिया हे गोव्यात आले आणि पत्रकारपरिषदेत त्यानी काँग्रेसचे वाभाडेच काढले. गोव्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यानी गेल्या दहा वर्षात स्थानिक सरकार व केंद्र सरकार यांच्यावर टीका करण्यापलीकडे काही काम केले नाही असे ते म्हणाले. गोरगरिबाकडे जाऊन लोकांचे प्रश्न सोडवण्याचे काम काँग्रेसने करायला पाहिजे होते. पण काँग्रेसने त्या दृष्टीने हालचाल केलेली नाही. हरिजन-गिरीजनांचे या गोव्यात ज्या समस्या आहेत त्या समस्याना काँग्रेसने स्पर्शही केला नाही अशी टीका पहाडिया यानी केली. काँग्रेसच्या गोव्यातील नेत्यानी सर्वसामान्य जनतेकडे दुर्लक्ष केले असा आरोप त्यानी

केला. काँग्रेसच्या मंत्र्यानी काँग्रेसवर आरोप करावा यासारखे दुर्भाग्य नव्हते.

गोव्याची नवी विधानसभा सुरू झाली. सभापती नारायण फुगरो यानी नायब राज्यपाल शिशिरकुमार बानर्जी यांचे मानाने स्वागत केले. गोव्यामध्ये १९७३ साली १५७७५ सरकारी कर्मचारी असल्याचे सरकारने जाहीर केले. नाटकाना कर माफ मग तियात्राना कर माफ का नाही. यासारखे प्रश्न त्यावेळी विचारण्यात आले. मुख्यमंत्री बांदोडकर यानी धर्म, जात व प्रांतावरून यु. गो. पक्ष भेद पसरवतो असे आरोप केले. यु. गो. पक्षाने अर्थात हे आरोप फेटाळून लावले.

बांदोडकर जिंकले होते. त्यांच्या लोकप्रियतेस बाधा आली नव्हती. त्यांचा ६२ वा वाढदिवस मोठ्या थाटात संपन्न झाला. आपल्या वाढदिवसाच्या सोहळ्यात बोलताना भाऊसाहेब बांदोडकर म्हणाले, ''दुसऱ्यासाठी आनंद निर्माण करण्यात खरा आनंद आहे. तुम्हाला जर खराखुरा आनंद उपभोगायचा असेल तर दुसऱ्यासाठी आनंद निर्माण करा. मी स्वतः तसा प्रयत्न करत असतो.'' सर्वापासून लांब राहून सेवा करणे मला आवडते. परंतु माझी आवड मला पूर्ण करता आली नाही असाही विनोद बांदोडकरानी केला. पोर्तुगीजांच्या राजवटीत आम्ही कैदी होतो. माझ्या आजूबाजूला पोलीस असतात. तसा मी अजूनही कैदीच आहे'' असे मिष्किलपणे ते म्हणाले. बांदोडकरांच्या वाढदिवसात सर्व थरातील लोक उपस्थित होते. हे एक वैशिष्ट्य होते. याच सुमारास पणजीत आझाद मैदानावर हुतात्मा स्मारकाचे उद्‌घाटन झाले. जनरल के. बी. कँडेथ यांच्या हस्ते झालेल्या त्या सोहळ्याला एक भावस्पर्शी स्वरूप आले होते. १९७३ मध्ये राष्ट्रपती गिरी यानी गोव्याला भेट दिली. साळावली प्रकल्पाचा पायाभरणी सोहळा त्यांच्या हस्ते झाला. नगरपालिका आणि पंचायत पदाधिकाऱ्यांसमोर भाषण करताना राष्ट्रपतीनी महत्वाचे मुद्दे मांडले. ते म्हणाले, ''कर गोळा करणे याचे नियंत्रण करताना नगरपालिका व पंचायती याना अधिक जबाबदार व अधिक समर्थ बनवले पाहिजे. कारण त्या त्या विभागातील गरजांची आणि लोकांची त्याना अधिक चांगली कल्पना असते. केवळ केंद्रीय पातळीवरून होणारे नियोजन व अंमलबजावणी उपयोग नाही.'' पंचायत राज्यपद्धती सबल आणि समृद्ध करण्याची जी योजना आज मांडली जात आहे तिचा उच्चार भूतपूर्व राष्ट्रपती गिरी यानी गोव्यात केला होता हे विशेष.

नियतीचा खेळ अतर्क्य असतो. त्याला तर्काची संगती नसते. माणसाच्या जीवनाशी नियती खेळ खेळते आणि त्याचे जीवन कधी समृद्ध करते तर कधी उध्वस्त. एखाद्या परिसराची जडण घडण व्यवस्थित होत आहे असे वाटावे तोच नियती त्याला कलाटणी देऊन वेगळेच घडवून आणते. गोव्याच्या बाबतीत हेच झाले. १९६१ साली गोवा मुक्त झाला व गोव्याने संसदीय लोकशाहीची वाट सुरू केली. पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आपले उमेदवार उभे केले. पण ते सर्वच्या सर्व पराभूत झाले. आणि भाऊसाहेब बांदोडकर यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष सत्तेवर आला. गोव्यातील काँग्रेस पक्षाचे धोरण पसंत नसल्यामुळे भाऊसाहेब बांदोडकर यानी म. गो. पक्षाचे नेतृत्व केले आणि काँग्रेसला सत्तेपासून वंचित केले.

मध्यंतरीच्या काळात म.गो. पक्षाने काँग्रेसमध्ये सामील व्हावे अशी हालचाल सुरू झाली. पण ती हालचाल यश मिळवू शकली नाही. भाऊसाहेब बांदोडकरांची कारकीर्द १९७३ पर्यंत चालली आणि भाऊसाहेबांच्या मृत्यूमुळे तिची अखेर झाली. भाऊसाहेबांचा काँग्रेसमधील प्रवेश जवळजवळ निश्चित झाला होता. उमाशंकर दीक्षित यानी केलेल्या वाटाघाटीमुळे जवळजवळ म. गो. पक्ष काँग्रेस पक्षात जाण्याच्या तयारीत होता. भाऊंच्या अटी काँग्रेस श्रेष्ठीना मान्य झाल्या होत्या. त्यात मुख्य अशा तीन अटी होत्या. काँग्रेसच्या निवडणुका बांदोडकरांच्या सल्ल्यानुसार व्हाव्यात ही पहिली अट होती. निवडणुकीमध्ये जे काँग्रेस उमेदवार उभे केले जातील ते बहुसंख्येने बहुजनसमाजाचे असावेत ही दुसरी अट होती आणि मंत्रिमंडळात ख्रिश्चनांचा समावेश असावा ही तिसरी अट होती. या अटी संमत झाल्या होत्या आणि कदाचित भाऊसाहेब बांदोडकर काँग्रेसमध्ये गेले असते.

पण नियतीने आपला खेळ सुरू केला. १२ ऑगस्ट १९७३ रोजी भाऊसाहेब बांदोडकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मडगांवच्या संस्कृत प्रचारणी सभेच्या कार्यक्रमास ते उपस्थित होते. तोच त्यांचा अखेरचा कार्यक्रम. त्यानंतर नेहमीप्रमाणे ते कांपालवर जिमखान्यावर जाऊन आले. आणि रात्रौ साडे दहाच्या सुमारास त्यांचा देहान्त झाला. सारा गोवा शोकाकूल झाला. सूर्याने एकाएकी मावळावे, तळपत्या शुक्रताऱ्याने धरित्रीवर झेप घ्यावी तसे काहीसे घडले. अशा

शब्दानी पत्रकारानी त्यांच्या निधनाचे वर्णन केले. त्यांचे सुपूत्र सिद्धार्थ बांदोडकर त्यावेळी गोव्याबाहेर होते. ते त्वरित आले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक पण आले.

मृत्युपूर्वी बांदोडकरांनी 'कसेल त्याची जमीन' विधेयक विधानसभेत मांडले होते. कोमुनिदादच्या विसर्जनाची घोषणा कायदेमंत्री प्रतापसिंह राणे यानी केली होती. मुंडकार कायदा संमत व्हावा अशी भाऊसाहेबांची इच्छा होती. त्यांची इच्छा पूर्ण झाली नाही. भाऊसाहेबांच्या अनेक इच्छा अपुऱ्या राहिल्या. भाऊसाहेब बांदोडकर याना आदरांजली व्यक्त करण्यासाठी सबंध गोवा त्यांच्या आल्तीन येथील निवासस्थानी लोटला. आपल्या नेत्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लोकांची रांग लागली. आणि ही रांग दुपारी खाली मुख्य चर्चच्या कोपऱ्यापर्यंत येऊन पोचली. एवढा प्रचंड जनसमुदाय गोव्याने कधी पाहिला नव्हता. त्याना आदरांजली वाहताना एका वक्त्याने भाऊंचे शब्द उद्धृत केले ''मनुष्य जन्माला येतो तो लढाई करीत येतो. आयुष्यभर तो लढाई करतो आणि अखेर मृत्युशी लढाई करीत तो जातो.'' भाऊसाहेबानी गोव्यातील बहुजनसमाजाच्या कल्याणासाठी झुंज दिली. भाऊसाहेबांचे सारेच अनोखे होतो. गोव्यातल्या बहुतेकाना ते ओळखत होते. श्रीमंताप्रमाणे गरीबही त्याना आवडत होते. गोव्यामध्ये भारतीय संस्कृती आहे. देवदेवळे आहेत हे त्यानी दाखवून दिले. भाऊसाहेबांच्या निधनामुळे गोव्यातले एक लोकप्रिय पर्व अखेरीस आले. भाऊसाहेब आणखी काही वर्षे राहिले असते तर ते लोकप्रिय हुकुमशहा झाले असते. भाऊ बोले आणि गोवा हाले अशी परिस्थिती निर्माण झाली असती. भाऊसाहेबांबद्दल पूर्वी ग. दि. माडगूळकरानी कविता केली. होती. ''सिंधु सागराने, आपले काळीज दिले आहे या माणसाला, खवळेल उसळेल पण सीमा सुटणार नाहीत । माडाच्या झाडाने उंची दिली आहे याच्या मनाला, मेघाना मस्तक टेकावे अशी संपत्तीची येरझार सदैव असते याच्या घराच्या पायरीशी । ती अनंत हातानी देते याला । हा दोन हातानी देतो हजारोंना । म्हणून–चंचला महालसा होऊन विसावते, याच्या देवघरात, ।''

भाऊंच्या निधनानंतर सर्वात सिनियर म्हणून अच्युत उसगांवकर यांचे नाव पुढे सुचवण्यात आले. पण आमदारानी भाऊसाहेबांच्या कन्या सौ. शशिकला काकोडकर यांच्या नावाला अनुमती दिली. सौ. शशिकला

काकोडकर गोव्याच्या दुसऱ्या–मुख्यमंत्री झाल्या. कॅबिनेट मंत्री अच्युतराव उसगांवकर व प्रतापसिंह राणे यांचा शपथविधी मुख्यमंत्री शशिकला काकोडकर यांच्या समवेत झाला. भाऊसाहेबांच्या मृत्युमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी बहुजनसमाजाची गोव्यात एकता दृढ झाली पाहिजे असे आवाहन करण्यात आले. भाऊंचे अपुरे राहिलेले कार्य पुरे करण्याच्या प्रयत्नांची पराकाष्टा मी करीन असे मुख्यमंत्री शशिकला काकोडकर यानी जाहीर केले. पित्यामागून पुत्रीची कारकीर्द सुरू झाली.

: आठ :

सौ. शशीकला काकोडकर कारकीर्द

गोव्याच्या मुख्यमंत्री सौ. शशिकला काकोडकर याना आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीस कोकाकोला प्रकरण हाताळावे लागले. कोकाकोला कारखान्यात झालेल्या गोळीबारातून हे प्रकरण सुरू झाली होते. इतरत्र होणाऱ्या गोळीबारात सरकार पक्षाला जबाबदार धरण्यात येते आणि विरोधी पक्ष गोळीबाराचे निमित्त धरुन सरकारपक्षावर टीकेचा भडीमार करतो. गोव्यात उलट परिस्थिती होती. हा गोळीबार विरोधी पक्षाच्या नेत्यानी आणि कार्यकर्त्यानी केला असे जाहीर झाले होते. सरकारपक्षाचा त्यात संबंध नव्हता. ही चळवळ सीटू संघटनेने केली होती. पण इंटक वगैरे साऱ्या कामगार संघटना कोला चळवळीत सामील झाल्या होत्या. या चळवळीला राज्यकर्त्यांची सहानुभूती होती. गोव्याचे सरकार कायदा व सुव्यवस्था राखू शकत नाही म्हणून हे सरकार बडतर्फ करून गोव्यात राष्ट्रपती राजवट आणावी अशी मागणी विरोधी पक्षाने केली होती. युनायटेड गोवन्स पक्ष हा कामगारविरोधी पक्ष आहे अशी तक्रार सुरू झाली होती. त्याचा परिणाम बाणावली निवडणुकीत झाला. आमदार वासुदेवराव सरमळकर यांच्या दुःखद निधनामुळे बाणावली मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. त्या निवडणूकीत म. गो. चे लुता फेरांव निवडून आले. परंतु म. गो. चे लुता फेरांव व डॉ. विल्फ्रेड डिसोझा यामधील मताचा फरक अल्पसा असल्यामुळे फेर मतमोजणी झाली. दोन्ही उमेदवारांची मते समान झाल्यामुळे न्यायमूर्तीनी सोडत काढली. त्यामध्ये विल्फ्रेड डिसोझा यानी बाजी मारली. पण सोडत न्यायमूर्तीनी स्वतः काढली असे म्हणून लुता फेरांव सर्वोच्च न्यायालयात गेले. डॉ. डिसोझा याना मतदानाचा आणि बोलण्याचा अधिकार दिला गेला नाही. दरम्यान, विधान सभा बरखास्त झाली.

गोव्याच्या मुख्यमंत्री असताना सौ. शशिकला काकोडकर यानी काही क्षेत्रांत केलेले कार्य महत्वाचे होते. कसेल त्याची जमीन, शहर नियोजन, गुमास्ता याबाबत त्यानी केलेले कायदे लोकसंमत झाले. शिवाय गोव्यामध्ये असलेले पुराभिलेख पुराणवस्तू यांचे संरक्षण करणारा कायदा त्याच वेळी संमत करण्यात आला. गोवा विद्यापीठसाठाच्या सागेसंबंधी

मात्र टीका होऊ लागली. विद्यापीठासाठी कुंडई पठारीशी जागा ठरवण्यात आली होती. त्यासंबंधी टीका सुरू झाली. भारतातील शिक्षणतज्ञांच्या समितीने सुचवलेल्या काही जागापैकी ती एक जागा होती. शिवाय ७३ पासून या जागेची तयारी सुरु होती. जमीन ताब्यात घेणे वगैरे व्यवहार सुरू झाले होते. असे असताना अकस्मात टीका होऊ लागली तेव्हा सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या. ''एवढा प्रोसेस होईपर्यंत तुम्ही गप्प का बसला ? तुम्हाला ती जागा नको होती तर त्यावेळी तुम्ही विरोध का नाही केला ?'' कुंडईचे पठार ही जागा विद्यापीठासाठी निवडण्यामागे काही कारणे होती. गोव्यामध्ये एकच विद्यापीठ होणार होते, हे विद्यापीठ शहराच्या कटकटीपासून दूर असावे ही कुंडईची जागा निवडण्यामागची भूमिका होती.

या विद्यापीठामध्ये संलग्न महाविद्यालये रहाणार होती. शिवाय प्रकल्पातही महाविद्यालये ठेवावीत असाही सुर होता. इतक्या दूर पठारावर गोवा विद्यापीठाची जागा का ठेवली ? अशी टीका करणाऱ्याना सौ. शशिकला काकोडकर यानी मोंतगिरीचे उदाहरण दिले. पाश्चात्य तज्ञ मोक्याच्या जागा कशा निवडतात व त्याना नंतर महत्व कसे येते हे सांगितले. एवढी सुंदर जागा का बदलली गेली याबाबत सौ. शशिकला म्हणाल्या. ''गोवा विद्यापीठाची जागा बदलण्यामागे केवळ राजकीय हेतू होता.''

गोव्यातील रस्ते अरुंद होते. त्याना वळणे जास्त. हे रस्ते रुंद व्हावे आणि शक्यतो वळणे कमी करावी यासाठी प्रयत्न झाले. काही रस्ते वळण घेऊन पुढेजात. त्यांची अंतरे कमी करण्याचे प्रयत्न झाले. रस्ते करण्यामागे शेतकऱ्यांच्या मालाना बाजारपेठ मिळावी हा हेतू होता. खेड्यात तयार होणारा माल दलाल विकत घेत व बाजारात विकत. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी किंमत मिळे. शेतकरी अगर बागाईतदार स्वतः होऊन आपला माल बाजारात घेऊन गेले तर त्याना जास्त फायदा मिळणार या हेतूने ग्रामीण परिसरातील रस्त्यावर जास्त भर देण्यात आला. रस्ते सांकव व पूल याना प्राधान्य देण्यात आले. याच कारकीर्दीत त्यासंबंधीचा मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. हा मास्टर प्लॅन शंभर कोटी रुपयांचा होता. परंतु काकोडकर मंत्रिमंडळ आपली कारकीर्द पूर्ण करू न शकल्यामुळे त्या मास्टर प्लॅनची कार्यवाही त्यांच्या कारकीर्दीत होऊ शकली नाही.

कला अकादमी प्रकल्पाबद्दल सौ. शशिकला काकोडकर यांच्यावर टीका झाली. कला अकादमी प्रकल्पा संबंधी बोलताना सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या. ''कला अकादमीच्या प्रकल्पाची कल्पना भाऊंची होती. मांडवी पुलाकडे जागा निवडली होती. भाऊंचे ते स्वप्न पुरे व्हावे अशी माझी इच्छा होती. मी ही गोष्ट आमच्या अधिकारी वर्गाला सांगितली. ते म्हणाले, ''सध्या बांधकामावर बंदी आहे. शिवाय हा प्रकल्प एक कोटीचा आहे. त्याला मंजुरी मिळणे कठीण आहे.'' मी मुख्यमंत्रीपद घेतल्यानंतर पहिल्यांदाच दिल्लीला जात होते. त्यामुळे सुरुवातीसच माझ्या योजनेला नकार मिळणे बरे दिसणार नाही असे त्यांचे मत होते. कला अकादमीची योजना नियोजन मंडळापुढे ठेवू नका असे अधिकाऱ्यांचे म्हणणे होते.''

''मग तुम्ही काय केलंत'' असा प्रश्न सौ. शशिकला काकोडकर याना विचारला. तेव्हा त्या म्हणाल्या,''मी कला अकादमीची योजना नियोजन मंडळापुढे ठेवायचा निर्णय घेतला. त्यावेळी डेप्युटी चेअरमन डी. पी. धार होते. नियोजन मंडळाची प्राथमिक बोलणी राज्याचे मुख्य सचिव आणि इतर मुख्य अधिकाऱ्याशी होत असे व नंतर मुख्यमंत्र्याबरोबर बैठक होत होती. आमचे अधिकारी कला अकादमीचा प्रकल्प मांडावयालाच तयार नव्हते. तो मंजूर होणार नाही असे त्याना वाटत होते. नियोजन मंडळाच्या बैठकीपूर्वी दोन दिवस मी दिल्लीला गेले आणि पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी याना कला अकादमीच्या प्रकल्पाची माहिती दिली. या प्रकल्पामध्ये भारतीय आणि पाश्चात्य संगीताचा मिलाफ होणार आहे. दोन्ही संगीतपद्धती एका छत्राखाली आणायचा माझा विचार आहे असे मी पंतप्रधानाना सांगितले. सांस्कृतिक गोष्टी व्हायला पाहिजे असा आग्रह धरला. पंतप्रधान इंदिरा गांधीनी माझे म्हणणे ऐकून घेतले व तुम्ही याबाबत धारकडे बोला असे सुचवले.

दुसऱ्या दिवशी मी धारपाशी बोलले. ते प्रथम म्हणाले,''बांधकामावर सध्या बंदी आहे. त्याबरोबर मी कला अकादमी प्रकल्पाची संपूर्ण माहिती दिली. माझे बोलणे ऐकून घेतल्याबरोबर ते म्हणाले, ''तुमची योजना संमत होईल. हाव कॅन आय रिफ्यूज टू लेडीज ? त्यांच्या या बोलण्यावरून पंतप्रधानानी त्यांना फोन करून प्रकल्पासंबंधी सांगितले असावे अशी मी मनाशी गांठ बांधली.''

कला अकादमी संपूर्ण प्रकल्पाला दिनानाथ मंगेशकर अकादमी असे नाव देण्याचा शशिकला काकोडकरांचा विचार होता. केवळ नाट्यगृहाला नव्हे. कला अकादमी प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याबरोबर अधिकारी म्हणाले, ''तुमचे म्हणणे प्रभावी ठरले.''

त्यावेळी गोव्यामध्ये गोवा औद्योगिक वसाहती विकास महामंडळ होते व औद्योगिक वसाहती ठिकठिकाणी होत्या. खोर्ली, सांकवळ, मडगांव व म्हापसा येथे वसाहती चालल्या होत्या. गोव्यात बेकारी वाढत होती. खाण व्यवसाय आज ना उद्या कमी कमी होत जाणार होता. गोव्याची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी आर्थिक विकास मंडळ स्थापन करण्याची गरज होती. मुख्यमंत्रीपद घेतल्यानंतर ईडीसी स्थापन करण्यासाठी सौ. शशिकला काकोडकर यानी पुढाकार घेतला.

एक गोष्ट कळून चुकली होती की केंद्र सरकारचे जेवढे सहाय्य मिळायला हवे होते तेवढे मिळत नव्हते. ईडीसीबद्दल गृहमंत्रालयाकडे बोलणे आवश्यक होते. त्यानी रिझर्व्ह बँकेची अडचण सांगितली. सौ. काकोडकर स्वतः मुंबईत डेप्युटी गव्हर्नरला भेटल्या. नंतर १४ राष्ट्रीय बँकांची गोव्यात बैठक घेतली व ईडीसीने गोव्यात आपले कार्य सुरू केले. अशा या महत्वाच्या महामंडळाकडे कर्तबगार व्यक्ती हव्यात म्हणून गोव्याच्या औद्योगिक क्षेत्रातील दोन मान्यवर व्यक्तीना त्यानी नियुक्त केले. त्यामुळे काही आमदार नाराज झाले. ''कुठल्याही गोष्टीच्या कामासाठी पाया भक्कम असला पाहिजे. विचार व दृष्टी साफ असली पाहिजे'' असे काकोडकर म्हणाल्या.

सौ. शशिकला काकोडकर यानी मुख्यमंत्रीपदाच्या आपल्या पहिल्या कारकीर्दीत मुंडकार कायदा, कसेल त्याची जमीन यासारखे अनेक कायदे केले. कला अकादमी प्रकल्प व आर्थिक विकास महामंडळासारख्या संस्था कार्यान्वित केल्या. म. गो. पक्षाचे समर्थक बस चालक आहेत व बस लॉबी त्याना पाठिंबा देते आणि म्हणून म. गो. पक्ष बसचे राष्ट्रीयकरण करत नाही असा आरोप होता. हा आरोप खोटा होता, असे सौ. काकोडकर म्हणाल्या,

मार्च ७५ मध्ये विधानसभेने मुंडकार कायदा संमत केला. हा कायदा मांडला गेला तेव्हा विरोधी सदस्य हजर राहिले नाही. मतदान झाले तेव्हा विधेयकांच्या बाजूने १६ मते पडली. एदुआर्द फालेरो तटस्थ राहिले. हा कायदा तयार होईपर्यंत मुंडकराना हुसकावून लावण्यापासून संरक्षण

देणारा कायदा संमत करण्यात आला होता. यावर टीका करताना आमदार रॉक सांतान यानी म्हटले की पोर्तुगीज कायदा रद्द केल्याने केंद्र सरकार, स्थानिक सरकार, प्रोव्हेदोरिया, नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्या जागेतील मुंडकरांना हुसकावण्यापासून संरक्षण रहात नाही. काहीनी ''या कायद्यामुळे मुंडकार पद्धत नष्ट होणार नाही'' असे भाष्य केले. हे विधेयक त्यावेळेचे महसूलमंत्री प्रतापसिंह राणे यानी मांडले. या निमित्ताने कोमुनिदादीचे विसर्जन करावे अशी सूचना काहीनी मांडली. विरोधी पक्षाचे आमदार लुईश बार्बोझा यानी हा कायदा भाटकरांच्या बाजूने आहे असे म्हटले. यावर आमदार रघुवीर पानकर म्हणाले, ''मुंडकाराबद्दल तुम्हाला जर एवढा पुळका आहे तर तुम्ही ऐन वेळेला गैरहजर का ?''

मुख्यमंत्री शशिकला यांच्यावर आरोपाना याच अधिवेशनात सुरुवात झाली. मुख्यमंत्र्यांवर आपले पती व आपले नातेवाईक याना त्या सवलती देत असल्याचा आरोप लावण्यात आला. मुख्यमंत्र्याचे नातेवाईक असणे हा गुन्हा झाला आहे काय ? असा सवाल मुख्यमंत्र्यानी केला. कला अकादमीच्या प्रकल्पाचे डिझायनर म्हणून सौ. शशिकला काकोडकर यानी आपल्या बहिणीचे यजमान शरद वेंगुर्लेकर याना दिल्याचे विरोधकानी म्हटले. पण हे आरोप खोटे असल्याचे सांगून सौ. काकोडकर म्हणाल्या, ''कला अकादमी प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम चार्लस कोरीया याना दिले असून स्ट्रक्चरल डिझायनचे काम शरद वेंगुर्लेकर यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. पण त्याना ही कंत्राटे मिळाली ती आपण मुख्यमंत्री होण्यापूर्वी''

मे ७५ महिन्यात गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याचे मुख्य नेते पीटर अल्वारीस यांचे निधन झाले. मडगावहून आगगाडीने मुंबईस जाताना चिंचवड येथे त्याना हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचा अंत झाला. पीटर अल्वारीस यांचे स्मारक गोव्यात झाले नाही याचे दुःख नेहमी जाणवते. याच महिन्यात पणजी व गोव्यातील शहरात भूकंपाचा धक्का बसला. ''पोर्तुगीज असताना असे काही झाले नव्हते'' असे उद्गार जुन्या माणसानी काढले. म. गो. विरोधकाना या भूकंपामागे राज्यकर्त्यांची उदासीनता दिसली. सप्टेंबरमध्ये पश्चिम विभागीय महामंडळाची बैठक झाली. मुख्यमंत्री शशिकला काकोडकर यानी गोव्याच्या विकासासाठी तेरेखोल व सातार्डा पुलाची आवश्यकता प्रतिपादन केली. बस

राष्ट्रीयीकरणाचे श्रेय राणे सरकारला मिळते. पण प्रत्यक्षात ही योजना सौ. शशिकला काकोडकरानी आपल्या कारकीर्दीत आखली होती असे त्यांचे म्हणणे आहे. बसमालकांची एक लॉबी सत्ताधारी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला पाठिंबा देत आहे म्हणून तो पक्ष बस राष्ट्रीयकरण करू पहात नाही असा एक आरोप केला जात होता. पण सौ. काकोडकर यानी बस राष्ट्रीयकरणाच्या दिशेनी पावले टाकली होती. खास हासुमणी कमिटी नेमण्यात आली होती. केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये बसचे राष्ट्रीयकरण झाले होते. पण राष्ट्रीयकरणामुळे बससेवा ढिली पडली आहे असे तिथल्या अधिकाऱ्यांचे म्हणणे होते: तज्ञांच्या मते केवळ राष्ट्रीयीकरण उपयोगी नाही. तर राज्यामध्ये समांतर अशी खाजगी बस वाहतूक असणे योग्य होते. बसचे राष्ट्रीयकरण केल्यास किती नुकसानभरपाई द्यावी लागेल याचा अंदाज सौ. काकोडकरानी घेतला होता. नुकसान भरपाई म्हणून अंदाजे ९ कोटी रुपये द्यावे लागणार होते. ७९ सालच्या मध्यावर बसचे राष्ट्रीयकरण आकारात येणार होते. पण काकोडकर मंत्रिमंडळ कोसळल्यामुळे बस राष्ट्रीयकरणाच्या योजना बारगळल्या.

नवी दिल्ली सरकार बिगर काँग्रेसी सरकारे उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत आहे असा आरोप त्यावेळी होत होता. गोव्यातले म. गो. सरकार पाडण्याचा प्रयत्न काँग्रेस करील अशी भीती गोव्यातील म. गो. समर्थकाना वाटत होती. ती शशिकला काकोडकर यानी दूर केली. म्हापसा येथे भरलेल्या पक्षाच्या अधिवेशनात त्यानी ठणकावून सांगितले की म. गो. पक्ष लोकशाही पद्धतीने वावरणारा पक्ष आहे. त्या पक्षाचे सरकार उलथून पाडणे कुणालाही शक्य नाही. देशाच्या घटनेवर म. गो. पक्षाची नितांत श्रद्धा आहे असेही त्यानी स्पष्ट केले. गोव्याचा स्थानिक काँग्रेस पक्ष म. गो. पक्षाचे सरकार कोसळावे या दृष्टीने प्रयत्न करीत होता. त्यात उद्देशून एका ज्येष्ठ पत्रकाराने असे उद्‌गार काढले की गोव्यातील काँग्रेस अध्यक्षा २० कलमी कार्यक्रमासंबंधी दौरे करण्याऐवजी सत्याग्रह करीत होत्या. त्यामुळे म. गो. पक्ष बरखास्त करण्याऐवजी स्थानिक काँग्रेस बडतर्फ केल्यास हिताचे ठरेल.

याच सुमारास बोरीच्या नव्या पुलाची घोषणा झाली. काकोडकर मंत्रीमंडळाने दारुबंदी संबंधी एक महत्वाचा निर्णय घेतला. दर महिन्याच्या एक तारखेला यापुढे गोव्यातील बार आणि तावेर्न बंद राहील, एकवीस

वर्षाखालील तरुणांना बारमध्ये दारु मिळणार नाही व शाळा, धार्मिक स्थळे यांच्या शेजारी असणाऱ्या जवळजवळ आठशे बारांशे लायसेंन्स रद्द करण्यात येईल असा कार्यक्रम जाहीर झाला. या कार्यक्रमाचे नंतर तीन तेरा वाजले.

काकोडकर मंत्रीमंडळाने पेडणे, काणकोण, वाळपई, केपे या नगरपालिका बरखास्त केल्या. आर्थिकदृष्ट्या या नगरपालिका कमकुमवत असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असे सरकारने जाहीर केले. नगरपालिका रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर उरलेल्यानगरपालिकांच्या निवडणुकांत म. गो. पक्ष अधिकृतरीत्या निवडणुका लढवील असेही जाहीर करण्यात आले.

याहून सर्वात महत्वाची गोष्ट घडली ती ही की विधानसभेत घटक राज्यांची मागणी संमत करण्यात आली. यासंबंधीचा ठराव आमदार रघुवीर पानकर यानी मांडला व त्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री काकोडकर म्हणाल्या, ''घटक राज्याचा प्रश्न म. गो. पक्षाने कधी भावनेने केला नाही. आज घटक राज्य मागण्या जोगी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आम्ही गोवा हे घटक राज्य असावे ही मागणी करीत आहोत.'' गोव्यात भरलेले अखिल भारतीय कीर्तनसंमेलन ही महत्वाची घटना होती. धुंडामहाराज देगलूरकर यांच्यासारखे ज्येष्ठ संत गोव्यात आले आणि त्यांचे अमृतमय प्रवचन ऐकायला मिळाले ही जमेची बाब होती. पेडणे मतदारसंघ राखीव मतदारसंघ म्हणून जाहीर करण्यात आला. गोवा शालांत बोर्डाचा निकाल फारच कमी लागला. त्याविरुद्ध आरडाओरड झाली. पण नव्या अभ्यासक्रमाखाली परीक्षा झाल्यामुळे निकाल कमी लागणे क्रमप्राप्त होते. इतर राज्यातही सुरुवातीला असेच झाले असा खुलासा सरकारने केला. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्याबरोबर गोव्यात सर्व पक्षामध्ये धांदल उडाली. काँग्रेसने आपले उमेदवार जाहीर केले. उत्तरेकडे पुरुषोत्तम काकोडकर यांचे नाव जाहीर होताच विरोधी लाट काँग्रेसजनामध्ये उठली. उत्तरेमध्ये काकोडकर निवडून येणे कठीण असे मत बहुतेकानी व्यक्त केले. पूर्वीच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसवाल्यानी काकोडकर याना मत दिले ते गोव्यातील त्यांची कटकट नाहीशी व्हावी म्हणून आणि नव म. गो. वाल्यानी काकोडकराना मते दिली. ती म. गो. च्या कटू भावनेमुळे. तशी परिस्थिती या खेपेला नव्हती. उत्तर गोवा हा बहुतांशी म. गो. कार्यकर्त्यानी भरलेला. त्यामुळे काकोडकर निवडून येणे कठीण असे ठामपणे काँग्रेसजन

बोलू लागले. दक्षिणेकडे इराज्मू सिकेरा हे यु. गो. पक्षाचे प्रतिनिधित्व करत नव्हते. त्यांचा भालोद पक्ष गोव्यात रुजला नव्हता. त्यामुळे एदुआर्द फालेरोंचे पारडे जड होते. अपेक्षेप्रमाणे उत्तरेकडे काँग्रेस उमेदवार पुरुषोत्तम काकोडकर पडले व दक्षिणेकडे काँग्रेस एदुआर्द फालेरो निवडून आले. म. गो. पक्षाने आपले उमेदवार निवडायला उशीर लावला. उत्तर गोव्यात म. गो. चे उमेदवार ॲड्. अमृत कासार ठरले. तर दक्षिण गोव्यात म. गो. उमेदवार रिबेरो ठरले. ॲड्. अमृत कासार हे म. गो. युवक संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते होते. म. गो. शी त्यांचे संबंध होते. त्यामुळे कासार निवडून येतील असे भविष्य अनेकानी वर्तविले होते. ते भविष्य खरे ठरले. उलट दक्षिणेकडे रिबेरो पडणार असे म. गो. चेच कार्यकर्ते म्हणत होते. त्याप्रमाणे रिबेरो पडले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीचे निकाल आले होते. उत्तरेकडे जनताचे शिवाजी देसाई याना २३७८७ मते मिळाली होती. काँग्रेसचे पुरुषोत्तम काकोडकर याना ५५८६७ मते मिळाली तर म. गो. चे ॲड्. अमृत कासार याना ६६९३३ मते मिळाली होती. पोस्टल मते धरून पुरुषोत्तम काकोडकर यांचा अमृत कासार यानी ११०७० मतानी पराभव केला होता. दक्षिणेकडे इराज्मू सिकेरा चांगली मते घेतील अशी अपेक्षा होती. ते जिंकणार नाही याची खात्री होती. पण झुंज व्यवस्थित देतील असे वाटले होते. पण प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. दक्षिणेकडचा लोकसभा निवडणुकीचा निकाल असा होता. काँग्रेसचे उमेदवार एदुआर्द फालेरो याना ६१२८३ मते मिळाली तर म. गो. चे रिबेरो याना ५१८१५ मते पडली. भालोदचे इराज्मू सिकेरा याना १९२८२ मते पडली.

गोव्याच्या निवडणुकीत ''अजब है गोवा के लोग'' असाच प्रकार दिसून आला. मागील निवडणुकीत भारतात काँग्रेस जिंकली पण गोव्यात काँग्रेस हरली. १९७७ मध्ये भारतात काँग्रेस हरली पण गोव्यात दक्षिणेकडे काँग्रेस जिंकली. लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर म. गो. चे विजयी उमेदवार ॲड्. अमृत कासार म्हणाले, –''माझा विजय हा गोव्याच्या सामान्य जनतेचा विजय आहे.''

गोव्याला भारताच्या राजकीय प्रवाहांत आणण्याचे बरेचसे श्रेय इराज्मू सिकेरा याना आहे. गोव्यात काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष तिसऱ्या क्रमांकावर होता. आणि बाकीचे राष्ट्रीय पक्ष गोव्यात नावापुरते होते. प्रथम दोन क्रमांकाच्या जागा म. गो. आणि यु. गो. या दोन स्थानिक पक्षाकडे

कायम स्वरुपाच्या होत्या. १६ विरुद्ध १२ असे गणित गोव्यात चालत होते. त्याला आळा घातला तो इराज्मू सिकेरा यानी. त्यानी स्वतः भालोद राष्ट्रीय पक्ष स्वीकारला व शेवटी यु. गो. पक्ष विसर्जित केला. या पूर्वी यु. गो. पक्षात दोनदा फूट पडली होती. पहिल्यांदा फुर्तादि गट वेगळा झाला होता. नंतर ओर्लांद सिकेर लोबो गट फुटला. त्यानंतर अनंत नरसिंह नायक गट फुटला. नायक गटाकडे चार आमदार होते. डॉ. जॅक सिकेरा यु. गो. पक्ष म्हणजे आपली कुटुंबीय बाब आहे आशा थाटात वागतात असा आरोप झाला. अनंत नरसिंह नायक कांपाल येथील कार्यकारिणीच्या सभेतून बाहेर पडले व त्यानी मांडवी हॉटेलमध्ये वेगळी सभा घेतली. यु. गो. च्या दोन कार्यकारण्या झाल्या. अनंतर नरसिंह नायक गटाने सिकेरा याची कार्यकारिणी बेकायदेशीर ठरवली व सभासदाना बडतर्फ केले. तर सिकेरा गटाने नायक यांची कार्यकारिणी बेकायदेशीर ठरवली.

डॉ. सिकेरा यानी आपला प्रादेशिक पक्ष बरखास्त केला होता. अँथनी डिसोझा यानी डॉ. सिकेरांच्या निर्णयाचे स्वागत केले. राष्ट्रीय पक्षाना गोव्यात बरे दिवस येत होते. कायदामंत्री श्री. प्रतापसिंह राणे यानी म. गो. चा राजीनामा दिला व ते काँग्रेस पक्षात सामील झाले. त्यांचे ते धाडसी पाऊल होते. त्यांच्या राजीनाम्याचा म. गो. पक्षावर काहीच परिणाम होणार नाही असे म. गो. च्या अध्यक्षा सौ. शशिकला काकोडकर यानी म्हटले तरी वारे उलट्या दिशेने वाहू लागले होते.

भाऊसाहेब बांदोडकर यांच्याविरुद्ध बंड केलेल्या आमदारांचा राजकीय दृष्ट्या पराभव झाला खरा, पण म. गो. पक्षांतर्गत असंतोष थंडावला नाही. बंडाच्या वेळी बांदोडकरांच्या बाजूने उभे राहिलेले शिवराम आजगांवकर अखेर बंडखोर बनले व त्यांची सुद्धा हकालपट्टी झाली. ज्या गोष्टी बंडखोर सांगत होते त्याच गोष्टींचा आग्रह त्यानी नंतर केला.

''यात्रिक''या पाक्षिकाने म. गो. पक्षात घटना नाही हे सांगण्याचा प्रयत्न केला होता. पक्ष नोंदणीच्या वेळी निवडणूक आयोगाकडे घटना द्यावी लागते. म. गो. पक्षाला घटना नाही असे कसे म्हणता ? असा प्रतिसवाल करण्यात आला होता. निवडणूक आयोगाकडे देण्यात आलेली घटना ही तांत्रिक बाब पुरी करण्यासाठी दिली होती. पण त्यानुसार काम चालत नव्हते. ती घटना पाळली जात नव्हती. असा ''यांत्रिक''चा दावा होता. १९७२ साली करण्यात आलेली घटनेची मागणी त्यावेळी तात्पुरती

शीतपेटीत ठेवण्यात आली तरी १९७७ साली ती पुन्हा कार्यकर्त्यांसमोर आली. त्यावेळी स्थापन झालेल्या बांदोडकर प्रोग्रेसिव फोरमने ती पुन्हा मांडली. घटनेची मागणी करताना फोरमचे निमंत्रक म्हणतात ''गोव्यात पंधरा वर्षे राज्य करणाऱ्या आमच्या पक्षाला घटना नसावी ही खरोखरच खेदाची गोष्ट आहे. पक्ष कार्यकर्त्यानी थेट निवडलेल्या प्रतिनिधीनी तयार केलेली आणि सर्व सदस्याना संमत असलेली घटना पक्षाला असायला हवी. हे तत्व सर्व पक्षानी मान्य केले आहेच व त्याची अंमलबजावणी केली आहे. या तत्वाला अपवाद फक्त आमच्या पक्षाचा असावा. घटनेत आवश्यक ती तरतूद केल्याशिवाय सदस्य नोंदणी केली जाऊ नये. या फोरमने त्यावेळी अस्थायी समितीची मागणी केली व या समितीमध्ये सामाजिक कार्यकर्ते, क्रियाशील म. गो. कार्यकर्ते, बुद्धिवंत आणि राजकारणी यांचा या समितीत समावेश असावा. खुल्या व मोकळ्या वातावरणात निवडणूक घेऊन सर्व घटकाना या समितीत प्रतिनिधीत्व मिळावे असे म्हटले. फोरमने पक्षनेत्याकडे मागण्या केल्या त्या अशा मागण्या–

आमच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या इच्छाआकांक्षा आपल्यासमोर मांडताना त्यांच्यावतीने आम्ही खालील मागण्या करीत आहोत :–

१) पक्ष घटना तयार करण्यासाठी एक समिती नियुक्त करणे.

अ) नजिकच्या काळात पक्ष नेस्तनाबूत होण्याचा धोका टाळून पक्ष वाचविण्यासाठी अशा समितींची आवश्यकता आहे.

ब) घटनेत आवश्यक ती तरतूद केल्याशिवाय सदस्य नोंदणी मोहीम हाती घेऊ नये.

क) घटना नसताना संघटना निवडणूक आणि अशा प्रकारे निवडलेल्या समित्यांचे कार्य तसेच बहुसंख्य कार्यकर्त्यानी अव्हेरलेली पक्ष कार्यकारिणी कायम ठेवण्याचा प्रयत्न करणे बेकायदा आहे.

ड) लेखी घटना नसलेल्या पक्षाला जनतेकडून मान्यता मिळण्याची अपेक्षा धरणे चुकीचे आहे. घटना नसताना पदाधिकाऱ्यांच्या कारवायावर अंकुश ठेवणे अशक्य आहे आणि आजकाल हाच सावळागोंधळ पक्षात चालू आहे.

इ) पक्षाला घटना नसल्याने पक्षांतर्गत उपलब्ध असलेल्या बुद्धीमत्तेचा आणि शक्तीचा पक्षहितासाठी वापर करण्याची संधी मिळत नाही.

२) सध्याची पक्ष कार्यकारिणी बरखास्त करणे. –

अ) सध्याची स्वयंभू पक्ष कार्यकारिणी कुठून प्रगट झाली. किंवा त्यांची

निवड कोणी केली याची पक्ष कार्यकर्त्यांना आज कोणतीच माहिती नाही. काही हितसंबंधीयानी पक्ष कार्यकारिणीवर स्वतःची नियुक्ती करून घेतली आहे. या कार्यकारणीमुळे पक्षहिताला बाधा शयेत असून पक्षाला विशाल दृष्टीकोन लाभणे अशक्य आहे.

ब) आजच्या घटकेची मोठी जबाबदारी पेलण्याची पात्रता किंवा तयारी सध्याच्या पक्ष कार्यकारिणी सदस्याकडे नसल्याने ही कार्यकारिणी अकार्यक्षम बनली आहे. आपला वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी हे सदस्य आपली शक्ती आणि वेळ खर्ची घालत असल्याने पक्ष कार्यासाठी त्याना वेळच मिळत नाही.

क) समाजाच्या विविध घटकात, आणि वेगवेगळ्या थरातील लोकाना या समितीत कोणतेही प्रतिनिधीत्व देण्यात आलेच नाही.

ड) पक्ष कार्यकर्त्यांनी केलेल्या खऱ्याखुऱ्या कार्याचे श्रेय त्याना सदासर्वकाळ मिळाले पाहिजे आणि पक्ष कार्यकारिणीत स्थान देऊन त्यांच्या कार्याचे चीज झाले पाहिजे.

३) अस्थायी समितीची नियुक्ती–

अ) सामाजिक कार्यकर्ते, क्रियाशील म. गो. कार्यकर्ते, बुद्धीवंत आणि राजकारणी यांचा या समितीत समावेश असावा. खुल्या आणि मोकळ्या वातावरणात निवडणून घेऊन सर्व घटकाना या समितीत प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे.

ब) पक्षाची घटना तयार करून, पक्ष कार्यकर्त्याकडून ती संमत करून घेण्याचे काम या अस्थायी समितीने केले पाहिजे. हे काम पूर्ण झाल्यावर घटनेतील तरतुदीनुसार पक्ष कार्यकारिणी निवडण्यासाठी पक्ष निवडणूक घेण्यात यावी.

म. गो. च्या दोन आमदारानी म. गो. मध्ये लोकशाहीचे वातावरण नाही, कार्यकारिणी निवडलेली नाही. नेमलेली आहे अशी तक्रार केली. आमदार दयानंद नार्वेकर व दिलखुष देसाई यानी कार्यकारिणी बरखास्त करा अशी मागणी केली. पण म. गो. पक्ष हे आमचे घर आहे. त्या घराला पडलेले भोक बुझवले व सारे व्यवस्थित केले तर ते घर आम्ही मोडणार नाही असे बंडखोर आमदारानी सांगितले.

१९७६ च्या १० फेब्रुवारीला राष्ट्रपतीनी मुंडकार कायद्यास मान्यता दिली. ४२००० मुंडकाराना ते रहात असलेल्या घराची मालकी मिळाली. ११ मार्च रोजी नियोजन व विकास मंत्री अच्युत उसगांवकर यानी साळावली धरण प्रकल्पाचे भूमिपूजन केले. १७ मार्च १९७७ रोजी राणे समितीने कोमुनिदादवरचा आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये कामुनिदाद विसर्जनाची शिफारस होती.

जनता पक्ष सत्तेवर आल्याबरोबर विशाल गोमंतकाचा प्रश्न चर्चेसाठी आला. पंतप्रधान मोरारजी देसाई यानी विशाल गोमंतकाचा प्रस्ताव फेटाळून लावला. जनता, काँग्रेस आणि आणि म. गो. या गोव्यातील तिन्ही पक्षानी घटक राज्यावर भर दिल्यामुळे घटक राज्य नजिक आले आहे असे दिसून आले. देशामध्ये आणीबाणीचा धिक्कार मतदारानी केल्यामुळे पक्षांतर्गत लोकशाहीचे वारे सर्वत्र फिरू लागले. म. गो. पक्षातही त्याचे पडसाद उमटले. म. गो. चे खासदार ॲड् अमृत कासार यानी पक्षाचे लोकशाहीकरण व्हावे आणि पक्षाची लिखित घटना असावी अशी मागणी केली व पक्षाचे अध्यक्षपद आणि मुख्यमंत्रीपद एकाच व्यक्तिकडे असू नये असे सुचविले.

यु. गा. पक्ष विसर्जित झाल्यानंतर यु. गो. तील एक गट काँग्रेसमध्ये गेला. सिकेरा गट जनता पक्षात गेला. १९७७ च्या निवडणुकीत डॉ. सिकेरा जनता पक्षात गेले. जून ७७ मध्ये निवडणुका झाल्या. १९७७ च्या निवडणुकीमध्ये म. गो. हा एकच स्थानिक पक्ष राहिला. काँग्रेस, जनता या राष्ट्रीय पक्षाबरोबर म. गो. ने आपले उमेदवार उभे केले.

म. गो. ने २८ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून देऊ मांद्रेकर, मांद्रेहून रमाकांत खलप, शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, कळंगुटहून राऊल फर्नांडिश, म्हापशाहून सुरेंद्र शिरसाट, थिवीहून दयानंद नार्वेकर, डिचोलीहून शशिकला काकोडकर, पाळीहून अच्युत शेणवी उसगांवकर, सत्तरीहून जयसिंगराव व्यं. राणे, पणजीहून डॉ. काशिनाथ सरदेसाई,. सांताक्रुजहून मान्यूअल फर्नांडिश, कुंभारजुवेहून विनायक चोडणकर, सांत आंद्रेहून रघुवीर पानकर, मडकईहून कृष्णा बांदोडकर, फोंड्याहून रोहिदास नाईक, शिरोड्याहून जयकृष्ण शिरोडकर, सांगेहून सदाशिव मराठे, रिवणहून दिलखुष देसाई, काणकोणहून वासु पायक गांवकर, केपेहून सतीश देसाई, कुंकळीहून बाबू देसाई, बाणावलीहून

जॉकीन कार्दोझ, नावेलीहून शांताराम कदम, मडगांवहून पांडुरंग शं. वैद्य, कुडतरीहून पेद्रू सोझा, कुठ्ठाणीहून पेद्रु कुलास, दाभोळीहून शंकर लाड, मुरगांवहून वसंत जोशी असे उमेदवार उभे केले.

काँग्रेसने २७ मतदारसंघातून आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून रामदास मोरजकर, मांद्रेहून गोपाळ परब, शिवोलीहून रमेश गोलतकर, म्हापशाहून श्रीरंग नार्वेकर, थिवीहून सिल्वेर सौझा, डिचोलीहून विनायक वा. नाईक, पाळीहून लक्ष्मीकांत सुर्लकर, सत्तरीहून प्रतापसिंग राणे, पणजीहून आताइत लोबो, सांताक्रूजहून आनास्तासियू मोंतेर, कुंभारजुवेहून मनोहर परब गांवकर, सांत आंद्रेहून डॉ. श्रीपाद कुंकळीकर, कळंगूटहून जगदीश राव, फोंड्याहून ज्यॉईल्द आगीयार, शिरोड्याहून वसंत शिरोडकर, सांगेहून रामदास नाईक तारी, रिवणहून मोलू देसाई, काणकोणहून मार्टीन फर्नादीश, केपेहून वैकुंठ देसाई, कुंकळीहून सातान फर्नांडिश, बाणावलीहून लॉरेन्स कोत, नावेलीहून लिओ वेल्हयू, मडगांवहून अंनत नरसिंह नायक, कुडतरीहून फ्रान्सीस सार्दिन, कुठ्ठाळीहून फ्रॉइलान माशाद, दाभोळीहून हरक्युलान दोरादो, मुसगांवहून शेख हसन हरुण, असे उमेदवार उभे केले.

जनता पक्षाने २८ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून विश्वनाथ आर्लेकर, मांद्रेहून सांतान फर्नादिश, शिवोलीहून पुनाजी आचरेकर, कळंगुटहून मार्क फर्नादिश, म्हापशाहून जी. वाय. भंडारे, थिवीहून रिबेरो फर्दीन, डिचोलीहून जयसिंगराव आ. राणे, पाळीहून चंदू कासकर, सत्तरीहून देवीदास पेडणेकर, पणजीहून माधव बीर, सांताक्रुजहून डॉ. जॅक सिकेरा, कुंभारजुवेहून श्रीकांत देसाई, सांत आंद्रेहून तिओतेन पेरेर, मडकईहून मधू वेलींगकर, फोंड्याहून गजानन रायकर, शिरोड्याहून सविता रामनाथकर, सांगेहून संजय हरी प्रभू देसाई, रिवणहून सुलभा शांबा देसाई, काणकोणहून गोपाळ प्रभू केपेहून गणेश देसाई, कुंकळीहून फेर्दीन रिबेलो, बाणावलीहून बारेटो आस्मिना, नावेलीहून जीतेंद्र सरमळकर, मडगांवहून मारियो कॉरल, कुडतरीहून मॅक्यूएल आगीयार, कुठ्ठीळीहून इलासिय शावीयर, दाभोळीहून नेल्सन फर्नादिश, मुरगांवहून अनिल सरमळकर असे उमेदवार होते.

गोव्याच्या पहिल्या तीन निवडणुकीत मतदार बदलले नव्हते. स्थानिक पक्षाकडे त्यांचा कल होता. १९७७ मध्ये परिस्थिती बदलली.

मतदारानी आपली मते राष्ट्रीय पक्षांच्या बाजूने टाकायला सुरुवात केली. गोव्यात नगण्य असलेल्या काँग्रेसला दहा जागा मिळाल्या. याची कारणे अनेक आहेत. स्थानिक पक्षाच्या नेतृत्वाविरुद्ध टाकलेली ती नकारात्मक मते होती. प्रतापसिंह राणे, अंनत नरसिंह नायक, यांच्यासारख्यानी काँग्रेस पक्ष स्वीकारल्यामुळे अनेक कार्यकर्त्यानी काँग्रेसला मते दिली. तिसरे कारण म्हणजे इतकी वर्षे कॅथॉलिक समाजाला यु. गो. पक्ष हा आपला पक्ष असा वाटत होता. त्या पक्षामध्ये सुद्धा ब्राम्हण–ब्राम्हणेत वाद शिरला आणि पक्षाला अंतस्थ मतभेदाचे ग्रहण लागले. आपला पक्ष गेला, आता काँग्रेसशिवाय आपल्याला तरणोपाय नाही असे त्याना वाटले त्यांची आणि काँग्रेसवादी हिंदूची मते काँग्रेसला मिळाल्यामुळे काँग्रेसला दहा जागा मिळाल्या. त्यातील प्रतापसिंह राणे, अनंत नरसिंह नायक, हे त्यांच्या वैयक्तिक लोकप्रियतेमुळे जिंकले. डॉ. कुंकळीकर, शेख हसन, लक्ष्मीकांत सुर्लकर याना जागा मिळाल्या त्या कॅथॉलिक, मुस्लिम व काही हिंदू अशा बेरजेमुळे ख्रिश्चन बहुसंख्य असलेले मतदारसंघ काँग्रेसने जिंकले. ख्रिश्चन मतदारसंघ काँग्रेसला गमवावे लागले तिथे जनताचे उमेदवार आले. डॉ. जॅक सिकेरा वैयक्तिक प्रभावामुळे निवडून आले. पेडणे हा राखीव मतदारसंघ होता. तो म. गो. ने सहज जिंकला. म. गो. पेक्षा कितीतरी कमी मते जनता व काँग्रेस उमेदवाराना मिळाली. मांद्रे मतदारसंघात रमाकांत खलप २००० मते जास्त मिळवून यशस्वी झाले. कळंगुटचा मतदारसंघ जनता उमेदवाराने अवघ्या २८५ मतानी गमावला. सांत आंद्रे मतदार संघात म. गो. फक्त १६२ मतानी हरला. इतरत्र काँग्रेसचा विजय फार मोठ्या मतानी झाला होता. १९७७ च्या निवडणुकीत म. गो. पक्षाचे उमेदवार पेडणेहून देऊ मांद्रेकर, मांद्रेहून रमाकांत खलप, शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, कळंगुटहून राऊल फर्नांदिश, म्हापशाहून सुरेंद्र सिरसाट, थिवीहून दयानंद नार्वेकर, डिचोलीहून शशिकला काकोडकर,कुंभारजुवेहून विनायक चोडणकर,मडकईहून कृष्णा बांदोडकर, फोंड्याहून रोहिदास नाईक, शिरोड्याहून जयकृष्ण शिरोडकर, सांगूहून सदाशिव मराठे, रिवणहून दिलखुष देसाई, काणकोणहून वासु पायक गावकर, दाभोळीहून शंकर लाड असे पंधरा उमेदवार निवडून आले. काँग्रेस पक्षातर्फे पाळीहून लक्ष्मीकांत सुर्लकर, सत्तरीहून प्रतापसिंह राणे, सांत आंद्रेहून डॉ. श्रीपाद कुंकळीकर, केपेहून वैकुंठ देसाई, बाणावलीहून

लॉरेन्स कांत, नावेलीहून लिओ वेल्हय, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून फ्रान्सिस सार्दिन, कुठ्ठाळीहून फ्रॉईलान माशाद व मुरगांहून शेख हसन असे दहा उमेदवार निवडून आले. जनता पक्षातर्फे पणजीहून माधव बीर, कुंकळीहून फर्दीन रिबेलो आणि सांताक्रुजहून डॉ. जॅक सिकेरा निवडून आले. विधीमंडळात जनता पक्षाचे कार्य नोंद घेण्याजोगे झाले. या निवडुकीत एक दोन ठिकाणी जनतामुळे म. गो. चा उमेदवार पडला. म. गो. चे मंत्री अच्युत उसगांवकरांचा पराभव जनता उमेदवाराने ८०७ मते मिळवून त्याची मते कमी केल्यामुळे झाला.

या निवडणुकीत दीवहून नारायण फुग्रो निवडून आले व दमणहून माखनभाय भेटेला हे उमेदवार निवडून आले. दोन्ही उमेदवार अपक्ष होते. ७ जून ७७ रोजी शशिकला काकोडकर मंत्रिमंडळ सत्तेवर आले. कृषीमंत्री म्हणून विनायक चोडणकर, कायदेमंत्री म्हणून शंकर लाड व राज्यमंत्री म्हणून राउल फर्नांदिश याची वर्णी लागली. नायब राज्यपाल शिशीरकुमार बॅनर्जी हे होते. कला अकादमीने केसरबाई केरकर संगीत समारोह सुरू केला. राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यानी गोव्याला भेट दिली. राष्टपतींच्या हस्ते कोलवाळ पुलाचा कोनशीला समारोह झाला.

रापणकार चळवळीने चळवळीने गोव्यामध्ये जागृती आणली. रापणकारांची चळवळ सुरू झाली. ट्रॉलर्सविरुद्ध रापणकार असा तो संघर्ष होता. या रापणकारांच्या आंदोलनात १४४ वे कलम लावण्यात आले होते व ते मोडण्यासाठी प्रयत्नही झाले होते. ट्रॉलर्सनी खोल समुद्रात जाऊन मासे पकडायचे असा संकेत होता. पण अनेक ट्रॉलर्स खोल समुद्रात जाण्याऐवजी जवळच मासे मारतात आणि रापणीची जाळी तोडून टाकतात अशी रापणकारांची तक्रार होती, ट्रॉलर्सवाले बहुसंख्येने हिंदू होते व पैसेवाले होते. उलट काणकोण सोडले तर इतरत्र रांपणकार बहुसंख्येने ख्रिश्चन होते व ते श्रीमंत नव्हते. रांपणकार विरुद्ध ट्रॉलर्सवाले असा हा संघर्ष फार दिवस टिकला. या आंदोलनात 'रापणकाराचो एकवोट' ही संघटना स्थापन झाली. मोहन रानडे हे तिचे अध्यक्ष व व्हिक्टोरिया फर्नांडिस संघटनेच्या सेक्रेटरी होत्या. भाऊसाहेब बांदोडकरांच्या पुतळ्यापाशी रांपणकारांचे उपोषण सुरू. झाले. हे उपोषण गोव्याच्या इतिहासात गाजले. उपोषणाचा दिवस मोठ्या अक्षराने फळ्यावर लिहिला जात होता. येणारे जाणारे लोक मोठ्या चवीने तो आकडा वाचत होते.

सालदाना व फोन्सेक हे नेते या चळवळीने गोव्याला दिले. सामाजिक जीवनामध्ये गोव्यात एक वादळ निर्माण व्हायला सुरुवात झाली. मांद्रे येथील एका हॉटेलामालकास त्याने हॉटेलमध्ये हरिजनास प्रवश नाकारला म्हणून अटक करण्यात आली. या घटनेमुळे अस्पृश्यताविरोधी धोरणाबाबत सरकार खंबीर आहे हे दिसून आले. वेळसाव येथे मत्स्यसंहार झाला. त्याचे पडसाद गोवाभर उमटले. रापणकार चळवळ गाजली. गावडा, कुणबी या जमातींचा समावेश मागास वर्गात व्हावा यासाठी गोवा सरकार प्रयत्नशील राहील अशी घोषणा मुख्यमंत्री सौ. शशिकला काकोडकर यानी केली.

२५ मार्च १९७८ रोजी एक धमाल झाली. या वर्षाचे अंदाजपत्रक अर्थमंत्र्यानी सादर करण्यापूर्वीच दैनिक 'गोमंतक' मधून प्रसिद्ध झाले. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेले अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक यातील साम्य विरोधकानी दाखविले. मुख्यमंत्र्यानी अंदाजपत्रक फोडण्यात विरोधकांचा हात असल्याचे निवेदन केले व अंदाजपत्रक फुटल्याची प्रच्छन्न कबुली दिली. विरोधकानी गहजब केला. गोपनीय कागदपत्र अगोदर प्रसिद्ध केले या आरोपाखाली दैनिक गोमंतकच्या संपादक कचेरीची झडती घेण्यात आली. पण पोलीसाना कसलाच पुरावा मिळाला नाही. सरकारी छापखान्यातील एका कर्मचाऱ्याचे वकील ॲड्. गोपाळ तांबा होते. दैनिक 'गोमंतक' चे तत्कालीन प्रतिनिधी र. वि. प्रभुगावकर यांची मैत्री ॲड्. तांबाशी होती. यावरून पोलिसानी असाही तर्क केला की, सरकारी छापखान्यातील त्या कर्मचाऱ्यामार्फत ॲड्. तांबा यांच्याकडून प्रभुगांवकर यानी अंदाजपत्रकाची प्रत मिळविली. पण या तर्कामध्ये काही तथ्य नव्हते. सरकारी छापखान्यातील एका कर्मचाऱ्याने अंदाजपत्रकाचे एक छोटेसे पृष्ठ शाईचा हात पुसून बाहेर पडले होते. त्या कागदावरून चातुर्याने गोमंतकच्या संपादक मंडळाने तंतोतंत खरे दिसणारे अंदाजपत्रक तयार केले होते. अंदाजपत्रक फुटल्यानंतर जी तात्विक चर्चा झाली त्यावेळी एका तज्ञाने असे म्हटले की केंद्रशासित प्रदेशाला स्वतःचे असे अंदाजपत्रक नसते. त्यामुळे ते गोपनीय नसते. जे उद्या प्रसिद्ध होणार होते ते आज प्रसिद्ध करण्यात काही अर्थ नाही. जे सरकार दडवू पहाते ते प्रकाशित करण्यात अर्थ असतो असे मुंबईचे पत्रकार म्हणू लागले.

गोव्याबाबत हीच परिस्थिती होती. कुठल्या सालात किती पैसे मंजूर करायचे हे केंद्र सरकार ठरवते. केंद्रशासित प्रदेशाचे विकास आयुक्त मुख्य

सचिव आणि अर्थ सचिव यांची बैठक नियोजन आयोगाबरोबर भरते. नियोजन मंडळ प्रत्येक खात्याला ठराविक रक्कम देते. त्यावर चर्चा होते. व अखेर रकमाना मान्यता मिळते. त्यानंतर दुसरी बैठक नियोजन आयोग व अर्थमंत्री यांची होते व मंजूर करण्यात आलेली खातेवार रक्कम थोडीशी वाढवून संमत केली जाते. मंजूर झालेल्या रकमेची माहिती प्रेसनोट काढून विकास आयुक्त देतात. त्यावर्षी पण अंदाजपत्रकाच्यापूर्वी काही दिवस विकास आयुक्तानी असे नोट काढून मागण्यांची मंजूर झालेली रक्कम सांगितली होती. तिचा व्यवस्थित वापर करण्यात आला होता. महसूल प्रकार अगोदर जाहीर करणे अनुचित होते. पण तीही बाब विधानसभेसमोर आली होती. संकल्पित अंदाजपत्रक अक्कलहुशारीने तयार करण्यात आले होते. अंदाजपत्रक फुटले नाही तो एक अंदाज आहे असे म्हणून सरकारला ही बाब महत्वाची नाही असे म्हणता आले असते. पण अंदाजपत्रक फुटले असे जाहीर करून व त्याची जबाबदारी विरोधी पक्षावर घालून सरकार स्वतः त्रासात पडले. अखेर सरकारला ही केस मागे घ्यावी लागली. या धक्यातून म. गो. सरकार सावरते न सावरते तोच संजीवनी ऊस कारखान्यातील मळी प्रकरण उद्‌भवले व सरकार आणखी खचले. पावसाने संजीवनीची मळी वाहून गेल्याने पाणी दूषित झाले व मत्स्यसंहार झाला. सुरुवातीला हे प्रकरण गंभीर नाही अशी सारवासारव केली. पण पिण्याचे पाणी सुद्धा दूषित झाल्याने मामला गंभीर असल्याचे सरकारला कबूल करावे लागले. सर्वसामान्य माणूस तर घाबरला होता पण सरकारचे सुद्धा धैर्य खचले होते. मळी कुठे टाकावी याचासुद्धा निर्णय होत नव्हता.

गोव्यातील एक समाजकार्यकर्त्या व स्वातंत्र्य सैनिका सौ. मित्रा बीर यांचे अपघाती निधन झाले. भाजपचे गोव्यातील नेते जी. वाय्. भांडारे यांची पत्नी सौ. नलिनी भांडारे पण या अपघातात ठार झाल्या. ऑगस्टच्या अखेर गोव्यात फार मोठा अपघात झाला. पणजी येथील टूरिस्ट हॉस्टेलच्या फुटपाथवर गप्पा मारत उभे असलेले स्वातंत्र्यवीर मार्क फर्नांडिस व एव्हेग्रीयू जॉर्ज यांच्या वर बस येऊन आदळली व त्यात त्यांचा अंत झाला. गोव्यातील लोकमानसात रुतलेल्या म. गो. पक्षामध्ये फूट पडण्याची चिन्हे दिसू लागली. पक्षामध्ये लोकशाही नाही असे एक गट म्हणत होता आणि सत्ताधारी गट जणु काय हा विरोध नगण्य आहे या थाटात वावरत होता. कॉंग्रेसमध्ये फूट पडली होती. त्याचे पडसाद गोव्यात उमटले होते. अखिल

भारतीय काँग्रेसमध्ये फूट पडल्याने काँग्रेसवर आधारीत प्रादेशिक पक्ष काढावा असा प्रवाह सुरू झाला. पण तो टिकला नाही. अनंत नायक गट मात्र तटस्थ राहिला.

१९७९ सालाची सुरूवात आंदोलनाने झाली. बस वाहतुकीच्या तिकिटामध्ये पन्नास टक्के विद्यार्थ्यांनी सूट मिळावी म्हणून हे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात विद्यार्थ्यांचा विजय झाला. सुरुवातीला शाळा कॉलेजाच्या मार्गावरील प्रवासासाठी पन्नास टक्के सूट मिळेल असे जाहीर झाले. मग कुठेही प्रवास करताना पन्नास टक्के सूट मिळेल असा निर्णय झाला या जानेवारीच्या सुरुवातीला दत्ताराम चोपडेकर यांचे निधन झाले. कसेल त्याची जमीन या तत्वासाठी व मराठीसाठी या तडफदार तरुणाने आपले जीवन घालवले. साऱ्या शेतकऱ्याना ते देव असे वाटत होते. या काळात आमदार दयानंद नार्वेकर व दिलखूष देसाई यानी म. गो. मधील अलोकशाही प्रवृत्तीवर ताशेरे झाडले होते. म. गो. पक्षाचे नेते त्यांच्यावर नाराज झाले होते. म. गो. पक्षामध्ये निष्ठावान आणि बंडखोर गट पडले. बंडखोर आमदार हे सडेतोड आमदार आहेत अशी प्रसिद्धी काही वृत्तपत्रातून देण्यात आली. म. गो. पक्षाने बंडखोरांच्या कारवायांची गंभीरपणे दखल घेतली. म. गो. पक्षाची कार्यकारिणी, विधीमंडळ सदस्य व कार्यकर्ते याची संयुक्त बैठक घेण्यात आली व या बैठकीत ठराव घेण्यात आला 'गेल्या सात–आठ महिन्यात दोन आमदार दयानंद नार्वेकर व दिलखुष देसाई यानी पक्षविरोधी कारवाया केल्या. बेजबाबदार वक्तव्ये केली. विधानसभेत सरकारविरोधी भूमिका घेतली व म. गो. सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न केला याबद्दल तुम्हाला कारणे दाखवा नोटीस का बजावू नये असे या ठरावात म्हटले होते. त्यानंतर म. गो पक्षाची पोंबुर्फा येथे सभा झाली. या सभेंत आपले म्हणणे मांडण्याची आपणास परवानगी द्या अशी विनंती दयानंद नार्वेकर यानी केली. पण त्यासाठी तुम्ही वेगळी सभा घ्या असे पक्षाध्यक्ष व मुख्यमंत्री सौ. शशिकला काकोडकरनी सांगितले व तुम्हाला जर बाजू मांडायची होती तर म्हापसा येथील सभेत कां आला नाही असा सवाल त्यानी केला. या बैठकीच्या वेळी गोव्यात नव्हतो. असे नार्वेकर म्हणाले. पण अध्यक्षानंतर कोणालाही बोलता येणार नाही असे मुख्यमंत्री शशिकला काकोडकर म्हणाल्या. सडेतोड आमदारापैकी दिलखुष देसाई यानी जांबावली येथे सभा घेऊन विश्वास

संमत ठराव मंजूर करून घेतला. त्यावेळी अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस अहमंद कुरेशी गोव्यात आले होते. ते म्हणाले, ''म. गो. चे सरकार आम्ही पाडणार नाही. पण कोसळले तर आमचे सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करू.''

विधानसभेमध्ये काँग्रेस आमदार लिओ व्हेल्यू यानी ठराव मांडला. ''सचिवालयाच्या इमारतीतील विधीमंडळ शाखेचा मुख्य दरवाजा केवळ अधिवेशनावेळी उघडा न ठेवता सर्व कामाच्या दिवशी तो उघडा ठेवावा'' असा तो ठराव होता. नार्वेकर व दिलखुश देसाई यानी ठरावाच्या बाजूने मत दिले. १४ विरुद्ध १४ अशी मतांची विभागणी झाली. सभापती फुगरो यानी ठरावाच्या बाजून मत दिले व सरकारचा पराभव झाला. त्यावेळी म. गो. चे १५ आमदार होते काँग्रेसचे १० आमदार होते. जनताचे ३ आमदार होते. व अपक्ष २ होते. एक सभापती फुगरो व भतेला हे दोन अपक्ष आमदार होते. अपक्ष भतेला यांचा म. गो. पक्षाला पाठिंबा होता म्हणून म. गो. पक्षाला १६ आमदारांचा पाठिंबा होता. म. गो. आमदारांपैकी दोन विरुद्ध गेल्यामुळे त्याचे पाठबळ १४ वर आले. उलट काँग्रेसचे १०, जनताचे ३ व बंडखोर म. गो. आमदार मिळून १५ वर आले असते. पण काँग्रेसचे आमदार डॉ. कुंकळीकर याना मतदान करता येत नव्हते. त्यांचे निवडणुकीबाबतचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले होते. त्यामुळे १४ विरुद्ध १४ असे मतदान होत होते.

विधानसभेत अंदाजपत्रकी मागण्यावर मतमोजणी झाली तेव्हा १४ विरुद्ध मतदान झाले. सभापती पुगरो यानी सरकारपक्षातर्फे मतदान केले व मागण्या मंजूर झाल्या. संसदीय परंपरेनुसार मताचा वापर आपण करू असे सभापती फुगरो यानी सांगितले. म. गो. चे सरकार अल्पमतात आहे. अशा परिस्थितीत मागण्या मांडू देणे ही लोकशाहीची थट्टा आहे असे माधव बीर म्हणाले आणि त्याचसुमारास म. गो. पक्षाला धक्का देणारी घटना घडली. मंत्रिमंडळातील कायदेमंत्री शंकर लाड यानी राजीनामा दिला. त्याचबरोबर म. गो. चे १३ आमदार झाले व विरोधकांची संख्या १७ झाली. विरोदी गटाने शंकर लाड याना नेता निवडले. विरोधी पक्षाचे सरकार गोव्यात येणार असे जवळजवळ ठरले. त्यावेळी राज्यपाल प्रतापसिंह गिल होते. म. गो. पक्षाच्या कार्यकारिणीतही बंड होऊ लागले. शशिकलाताईनी म. गो. चे अध्यक्षपद सोडावे असा आग्रह अमृत कासार यानी धरला.

निष्ठावान म. गो. कार्यकर्त्यांनी शंकर लाड यांच्या निवासस्थानी निदर्शने केली. विधानसभेत निष्ठावान आमदारानी गोंधळ केला. सभापतींना 'ट्रेटर' म्हटले. पेपरवेट फेकले, गांधीजींचा पुतळा भिरकावून मारला. गंमत अशी की गोंधळ करायला चंद्रकांत चोडणकर, वासु पायक व सुरेंद्र सिरसाट होते. त्यावेळी जो हा गोंधळ आपण केला तो बरोबर होता का ? असा प्रश्न या आमदारानी मनाशी केला तर त्याचे उत्तर ते आज काय देतील ?

विरोधकाना शंकर लाड यांच्या नेतृत्वाखाली सरकार हवे होते. पण मोरारजी देसाईनी तसे होऊ.दिले नाही. गोव्यात राष्ट्रपती राजवट आली. बंडखोरांची स्वप्ने गोव्यात खरी होऊ द्यायची नाही असें नियतीने ठरवले.

२७ एप्रिल १९७९ रोजी गोव्यावर राष्ट्रपती राजवट जारी करण्यात आली.

TRE LIBRARY
WORLD
विश्व कोंकणी

गोव्यात कॉँग्रेस सत्तेवर

२७ एप्रिल १९७९ मध्ये गोव्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली व ३ जाने १९८० रोजी सार्वत्रिक निवडणुका झाल्या. विधानसभेच्या तीस व लोकसभेच्या दोन सदस्यासाठी या निवडणुका झाल्या. देशामध्ये राष्ट्रीय पक्ष फुटले होते 'इंदिरा कॉँग्रेस', अर्स कॉँग्रेस, जनता व जनता (एस) असे विभाजन झाले होते व म. गो. मध्ये कासार गट, देसाई गट अशी फुटकळ फूट पडली होती. या साऱ्याचा परिणाम निवडणुकीवर झाला होता. प्रत्येक पक्षाचे उमेदवार १९८० च्या निवडणुकीत उभे राहिले. इंदिरा कॉँग्रेसने ५ मतदार संघात आपले उमेदवार उभे केले. पेडणे मतदारसंघात रामदास मोरजकर, मांद्रे मतदार संघात गोपाळ परब, शिवोली मतदारसंघात प्रफुल्ल प्रियोळकर, कुंभारजुवे मतदारसंघातून वसंत कुंकळीकर असे उमेदवार उभे केले. अर्स कॉँग्रेसने २२ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. कळंगुटहून डॉ. विल्फ्रेड डिसोझा, म्हापशाहून श्यामसुंदर नेवगी, थिवीहून दयानंद नार्वेकर, पाळीहून रमेश सरदेसाई, सत्तरीहून प्रतापसिंह राणे,सांताक्रुजहून मायकेल फर्नांडिस, सांत आंद्रेहून तेवतेन पेरेर, मडकईहून तुकाराम काणकोणकर, फोंड्याहून जॉइल्द आगीयार, शिरोड्याहून रामचंद्र ऊर्फ बाबय प्रभू, सांगेहून गुरुदास तारी, रिवणहून दिलखुष देसाई, काणकोणहून वासु पायक गांवकर, केंपेहून वैकुंठ देसाई, कुंकळीहून मारीया वाज, बाणावलीहून फ्रान्सिस मोंत क्रूज, नावेलीहून लुइझिन फालेरो, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून फ्रान्सिस सार्दिन, कुठ्ळ्ळीहून फ्रायलान माशादो, दाभोळीहून हरक्युलान दोरादो, मुरगांवहून शेख हसन हरुण असे उमेदवार उभे केले. जनता पक्ष २३ मतदारसंघात उभा राहिला. पेडणेहून एन. बी. राव, मांद्रेहून विष्णु तेलंग, शिवोलीहून कान्होबा नाईक, कळंगुटहून भालचंद्र नाईक, म्हापशाहून रघुनाथ टोपले, थिवीहून लक्ष्मण गोवेकर, पाळीहून पांडुरंग सावंत, सत्तरीहून जयसिंगराव राणे, पणजीहून माधव बीर, सांताक्रूजहून माधव धोंड, कुंभारजुवेहून सीताराम फडते बांदोडकर, सांत आंद्रेहून श्रीमती व्हिक्टोरिया फर्नांदिश, मडकईहून निशीकांत शेट, फोंड्याहून रमेश

च्यारी, सांगेहून नागेश तारी, रिवणहून मुकुंद पंचवाडकर, केपेहून संजय प्रभू देसाई, कुंकळीहून फर्दीन रिबेलो, बाणावलीहून जुआंव बार्रेट, नावेलीहून आदम बेग फकीर, कुठ्ठाळीहून एल्. एल्. आफोंस, दाभोळीहून प्रकाश परुळेकर, मुरगांवहून जयवंत सरदेसाई हे जनता पक्षाचे उमेदवार होते. जनता एस्. ने ११ मतदारसंघात आपले उमेदवाार उभे केले. शिवोलीहून सिल्व्हेर फर्नांदिस, कळंगुटहून पुनाजी आचरेकर, म्हापशाहून नारायण नाचनोडकर, सांताक्रुजहून डॉ. जॅक सिकेरा, कुंभारजुवेहून श्रीकांत देसाई, पणजीहून यशवंत सीताराम देसाई, काणकोणहून शरद फळदेसाई, केपेहून यादवेंद्र-व्ही. देसाई, बाणावलीहून एडवर्ड ब्रागांझा, मडगांवहून ज्योतिंद्र सरमळकर, दाभोळीहून नेल्सन फर्नांडिस, असे उमेदवार उभे केले. मार्क्सवादी पक्षाने फोंड्याहून शंकर खांडेकर, सांगेहून अनंत बेतकीकर, केपेहून अशोक नाटेकर, दाभोळीहून सीताराम मांद्रेकर व मुरगांवहून लुईजा जेराल्ड पेरेर असे ५ उमेदवार उभे केले. सदानंद गडेकर व भालचंद्र फटू देसाई हे म. गो. देसाई गट म्हणून अनुक्रमे शिवोली व सांगे मतदारसंघातून उभे राहिले. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने पेडणेहून देऊ मांद्रेकर, मांद्रेहून रमाकांत खलप, शिवोलीहून लाडू साळगांवकर, कळंगुटहून फ्रान्सिस डिसोझा, म्हापशाहून सुरेंद्र सिरसाट, थिवीहून मदन चोडणकर, डिचोलीहून सौ. शशिकला काकोडकर, पाळीहून विष्णु नाईक, सत्तरीहून सदानंद तेंडुलकर, पणजीहून बाबन नाईक, सांताक्रुजहून फ्रान्सिस ब्रांको, कुंभारजुवेहून विनायक चोडणकर, सांत आंद्रेहून श्रीपाद कुंकळीकर, मडकईहून बाबुसो गांवकर, फोंड्याहून रवी नाईक, शिरोड्याहून जयकृष्ण नाईक, सांगेहून विनायक करमलकर, रिवणहून जिवा वेळीप, काणकोणहून एकनाथ नमशीकर, केपेहून विठ्ठल नाईक, कुंकळ्ळीहून आफ्टानिया वाज, बाणावलीहून राऊल कारदोझ, नावेलीहून बेनेडिक्ट निमोरियो, मडगांवहून गोकुळदास शिरोडकर, कुडतरीहून शाबास्त्यांव कोल, कुठ्ठाळीहून कायतान बार्रेट, दाभोळीहून शंकर बांदेकर व मुरगांवहून जगन्नाथ आरोलकर असे २८ मतदार संघातून उमेदवार उभे केले. या निवडणुकीत अनेकानी आपले पक्ष बदलले. चंद्रकांत चोडणकर व हरीश झाट्ये हे अपक्ष म्हणून उभे राहिले. प्रतापसिंह राणे, दयानंद नार्वेकर, दिलखुष देसाई, वासु पायक गांवकर हे अर्स काँग्रेसवाले झाले. डॉ. जॅक सिकेरांचे अनुयायी पण फुटले व अर्स काँग्रेसमध्ये सामील झाले.

या निवडणुकीत कारणे कोणती का असेना, म. गो. पक्षाचा पराभव दिसत होता. म. गो. चे पेडणे, मांद्रे, कुंभारजुवे, मडकई हे बालेकिल्ले सोडले तर म. गो. ची शाश्वती दिसत नव्हती. डिचोलीतून हरीश झांट्येंची बाजू उजवी दिसत होती. बंडखोर म. गो. आमदार दयानंद नार्वेकर व दिलखुष देसाई काँग्रेस अर्सला मिळाले होते. ख्रिश्चन व मुसलमान मतदार काँग्रेसला मते देणार हे निश्चित झाले होते. अशा परिस्थितीत १९८० च्या निवडणुकीला प्रारंभ झाला होता. १९६३,६७,७२,७७ या चार निवडणुकीत सत्ता गाजवणाऱ्या म. गो. पक्षाला प्रचंड हादरा बसणार होता. निकाल लागला आणि अर्स काँग्रेसचा विजय झाला. म. गो. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये विश्लेषण सुरू झाले. या परिणामाची मिमांसा करताना काहीनी गोव्यातील मतदारांमध्ये बिगर गोमंतकीय कल्पनेबाहेर वाढले व त्यानी काँग्रेसला मते दिली असे निदान केले तर काहीनी हे नकारात्मक मतदान आहे असे भाष्य केले. कारणे कोणती का असेना, गोव्याच्या राजकीय इतिहासात वळण लावणारी ही निवडणूक होती. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत एदुआर्द फालेरो ९७४९२ मतानी निवडून आले. म. गो. चे उमेदवार कायतानो डेव्हिड गोमिश याना ५६५३७ मते मिळाली. जनता उमेदवाराला ७५३७ एवढी किरकोळ मते मिळाली. इराज्मू सिकेरा जनता एस्. चे उमेदवार होते. त्याना ३०४० मते मिळाली. उत्तरेकडे म. गो. च्या श्रीमती संयोगिता राणे सरदेसाई याना ७०७३९ मते मिळाली. काँग्रेस आय्चे पुरुषोत्तम काकोडकर याना ४३०३० मते मिळाली. जनता एस्. चे पां. पु. शिरोडकर याना ९०१५, रवींद्र केळेकर याना १६८४१ मते मिळाली. अपक्ष म्हणून उभे राहिलेले गोपाळ मयेकर याना ४२०९७ मते मिळाली.

गोव्याच्या पहिल्या चार निवडणुकीत आणि १९८० च्या निवडणुकीत फार मोठा फरक झाला. पहिल्या चार निवडणुकीत म. गो. आणि यु. गो. असे दोन स्थानिक पक्ष एकमेकासमोर दंड थोपटून उभे रहायचे आणि निकाल काय असेल हे सांगायला संगणकाची गरज नसायची. उत्तरेकडे म. गो. पक्षाला अमुक जागा मिळणार हे शाळकरी पोरगी सुद्धा सांगायची आणि दक्षिणेकडे यु. गो. पक्षाला किती जागा मिळणार हे एखादी 'कपेल'मधील घंटा वाजवणारी व्यक्ती सुद्धा सांगायची. १९८० मध्ये सगळीकडे फूट पडली. राष्ट्रीय पातळीवर

काँग्रेसमध्ये फूट पडली आणि गोमंतकीय माणूस राष्ट्रीय प्रवाहात गटांगळ्या खाऊ लागल्यामुळे स्थानिक पक्षातही फूट पडली. इंदिरा काँग्रेस, अर्स काँग्रेस अशी काँग्रेसमध्ये फूट पडली. जनता आणि जनता एस्. अशी जनता पक्षात फूट पडली. शिवाय अपक्षही उमेदवारीसाठी उभे राहिले. या फाटाफुटीतून गोव्यात वेगळे चित्र दिसू लागले. १९८० च्या निवडणुकीत म. गो. पक्षातर्फे पेडणेहून देऊ मांद्रेकर, मांद्रेहून रमाकांत खलप, पाळीहून विष्णु नाईक, कुंभारजुवेहून विनायक चोडणकर, मडकईहून बाबुसो गांवकर, दमणहून नरसिंह तांडेल व दीवहून सामजीभाई सोळंकी असे सात उमेदवार निवडून आले. अर्स काँग्रेसतर्फे कळंगुटहून डॉ. विल्फ्रेड डिसोझा, थिवीहून दयानंद नार्वेकर, सत्तरीहून प्रतापसिंह राणे, सांताक्रुजहून मायकेल फर्नांडिस, सांत आंद्रेहून तेवतेन पेरेरा, फोंड्याहून जोईल्द आगीयार, शिरोड्याहून बाबय प्रभू, सांगेहून गुरुदास तारी, रिवणहून दिलखुष देसाई, काणकोणहून वासु पायक गांवकर, केपेहून वैकुंठ देसाई, कुंकळीहून मारिया वाज, बाणावलीहून फ्रान्सिस क्रुज, नावेलीहून लुईझिन फालेरो, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून फ्रान्सिस सार्दिन, म्हापशाहून शामसुंदर नेवगी, कुठ्ठाळीहून फ्रायलॉन माशादो, दाबोळीहून हर्क्युलान दोरादो, आणि मुरगांवहून शेख हसन हरुण असे २० उमेदवार निवडून आले. अपक्ष म्हणून उभे राहिलेले शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, डिचोलीहून हरीश झांट्ये व पणजीहून विष्णु अनंत नायक हे तिघेजण निवडून आले. म. गो. ७, अर्स काँग्रेस २० व अपक्ष ३ असे चित्र १९८० च्या निवडणुकीनंतर दिसले.

निवडणुकीत प्रत्यक्ष इंदिरा काँग्रेस हरली. पण अर्स काँग्रेसचे उमेदवार इंदिरा काँग्रेसमध्ये गेल्यामुळे इंदिरा काँग्रेस जिंकली. चंद्रकांत चोडणकर व हरीश झांट्ये हे अपक्ष म्हणून उभे राहिलेले व जिंकून आलेले उमेदवार काँग्रेसमध्ये सामील झाले व गोव्यामध्ये काँग्रेस सत्तेवर आली.

निवडणुकीला राहिलेल्या इतर पक्षांचे पानीपत झाले. जनता, जनता एस, क्रांतिकारी पक्ष, कम्युनिस्ट मार्क्सवादी, म. गो. देसाई गट हे पक्ष गडगडले. काही अपवाद सोडले तर बहुतेकांची डिपॉझिट्स जप्त झाली. मागील निवडणुकीपेक्षा ज्यांची मते वाढली पण जे निवडून आले नाहीत अशापैकी गोपाळ परब, रामदास मोरजकर, श्रीपाद कुंकळ्ळीकर, शशी पणजीकर, जयकृष्ण नाईक हे होते. पक्ष सोडल्यानंतर किंवा पक्षानी

तिकीट नाकारल्यानंतर अपक्ष म्हणून निवडून येणे कठीण असते. पण चंद्रकांत चोडणकर म. गो. तर्फे १९७२ मध्ये निवडून आले. ७७ मध्ये म. गो. तर्फे निवडून आले आणि १९८० मध्ये अपक्ष म्हणून निवडून आले. विरोधी पक्षानी असे काही उमेदवार उभे केले होते त्याना राजकीय ज्ञान नव्हते. जनता आणि जनता एस्. मधला फरक कळत नव्हता. इतकेच काय संसदीय लोकशाहीचीही त्याना माहिती नव्हती. ते पडले हे एका अर्थी गोव्याच्या हिताचे झाले.

१९७१ पर्यंत लोकसभेच्या निवडणुकीत दमण मतदारसंघ दक्षिण लोकसभा मतदारसंघात होता तर दीव मतदारसंघ उत्तर गोवा लोकसभा मतदारसंघात होता. १९८० मध्ये झालेल्या निवडणुकीत दीव व दमण दोन्ही मतदारसंघ उत्तर गोवा लोकसभा मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले. १९८० मध्ये राजकीय जीवन बदलले. गोव्यामध्ये काँग्रेसची सत्ता आली. गोवा राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला.

त्या काळात एक महत्वाची सांस्कृतिक घडामोड घडली. नानु तारकर पेडणेकर जन्मशताब्दी समारोह मोठ्या थाटात साजरा झाला. गोव्यातील एक मान्यता पावलेले समाजसुधारक म्हणून नानू तारकर पेडणेकर यांची ख्याती होती. बहुजनसमाज त्याना मानत होता. जुन्या समाजसुधारणांचा उजाळा या निमित्ताने झाला आणि केवळ राजकीय दृष्टिकोनातून पहाण्याची सवय झालेल्या बुध्दिजीवाना ही घटना आवडली. राजकीय क्षीतिजावर त्यावेळी हळुहळू ढग येत होते. म. गो. ला निवडणूक आयोगाने सिंह चिन्ह दिल्यामुळे म. गो. कासार गट अस्वस्थ झाला. सिंह हे निवडणूक चिन्ह काकोडकर गटाला देणे योग्य नाही अशी तक्रार कासार गटाने केली. पण त्यांचा विरोध टिकला नाही. कासार गटाचे उपाध्यक्ष शंकर लाड व सरचिटणीस आजगांवकर यानी राजीनामे दिले व कासार गट संपुष्टात आला. निवडणुका जाहीर झाल्या. या पूर्वीच्या निवडणुका १ जून १९७७ रोजी झाल्या होत्या. अडीच वर्षात गोव्यात पुन्हा निवडणुका होत होत्या. म. गो. पक्षाच्या अंतस्थ लाथाळीमुळे ही परिस्थिती आली होती. मंत्री फुटले, आमदारानी बंड केले व सरकार कोसळले. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक येत होती. ही पार्श्वभूमी लक्षात न घेता नाराज झालेल्याना जवळ करण्याची तयारी म. गो. पक्षाने दाखविली नाही. म. गो. पक्षाने निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यातील दारुबंदीबाबतचे

म. गो. धोरण मतदारात आमीष दाखवणारे होते. दारुबंदीबाबत जाहीरनाम्यात म्हटले होते, ''दारुबंदी लागू करणार नसल्याची ग्वाही म. गो. पक्ष पूर्णपणे देत आहे. दारूबंदी लागू करण्याचे प्रयत्न झाले हे खरे. सबंध देशात दारूबंदी आली तर आम्ही त्याला साथ देऊ असे आमचे म्हणणे होते. अलिकडच्या घटनांनी दारूबंदी फसल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे. दारूबंदीतून रेंदेरांच्या जीवन मरणाचा प्रश्न निगडीत आहे. दारुबंदी आणून पन्नास हजार कुटुंबियांच्या चरितार्थाचे साधन आम्ही काढून घेणार नाही. गोमंतकीय लोक मितपेयी आहेत. आणि त्यामुळे दारूपोटी सामाजिक प्रश्न निर्माण होण्याची भीती कमी आहे.'' निवडणूक जाहीरनाम्यातील कलमे कोणी वाचत असेल याबद्दल मी साशंक आहे. परंतु जाहीरनाम्यातील कलमे ही सत्ताधारी पक्षाला अंकुश ठरत असतात हे विसरून चालणार नाही. ३ जानेवारी १९८० रोजी निवडणुका जाहीर झाल्या. म. गो. पक्ष अठरा जागा जिंकेल असा होरा म. गो. समर्थकानी काढला. विरोधकानी म. गो. बारा ते चौदा जागा जिंकेल असे अनुमान केले. परंतु काँग्रेस पक्षाने किमया केली. शेष भारतामध्ये इंदिरा काँग्रेस जिंकली. गोव्यामध्ये अर्स काँग्रेस जिंकली. म. गो. पक्ष निवडून येऊ नये ही नकारात्मक भूमिका सर्व संभाव्य मतदारानी घेतली. पणजी मतदारसंघात माधव बीर व प्रियोळकर याना मत दिल्यास म. गो. उमेदवार निवडून येईल म्हणून अपक्ष विष्णु नायक याना मते दिली. म. गो. चे पारंपारिक मतदार फुटले. म. गो. पक्षाचे अक्षरशः पानीपत झाले. शशिकला काकोडकर यानी पक्ष कार्यकर्त्यांचे धैर्य खचू नये म्हणून आवाहन केले. त्या म्हणाल्या, ''पराभवाने खचू नका. ही तात्पुरती अवस्था आहे.''

गोव्यामध्ये काँग्रेस सरकार स्थापन झाले. सर्वात तरुण मंत्रिमंडळ अशी शिफारस झाली. राणे त्यावेळी ४१ वर्षांचे होते. जोइल्द आगीयार ४१ वर्षे, सार्दिन ३१ वर्षे तर नार्वेकर २९ वर्षे अशी त्यांची वये होती. माशादो सभापती बनले. नंतर शेख हसन आरोग्यमंत्री झाले. मंत्रिमंडळ वाढवण्यात आले. झाट्येना पण मंत्रिमंडळात स्थान मिळाले. सारे सभासद इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाले व गोव्यातील सरकार इंदिरा काँग्रेस सरकार बनले. गोव्यातील आमदारांचा इंदिरा काँग्रेस प्रवेश हा जनतेचा व मतदारांचा उपमर्द आहे असे विरोधकानी म्हटले. आणि त्याच सुमारास सौ. शशिकला काकोडकर यानी धक्का देणारे निवेदन केले. म. गो. पक्ष

काँग्रेसमध्ये सामील झाल्याचे व आमचे पाच आमदार इंदिरा काँग्रेस आमदारांबरोबर बसतील असे त्या म्हणाल्या. हा माझा निर्णय नाही. हा निर्णय कार्यकारिणीने, मध्यवर्ती समितीने फेब्रुवारीत घेतला होता असे त्यानी सांगितले. काही कार्यकर्ते म. गो. पक्ष ठेवू इच्छितात, त्याचे काय ? असा प्रश्न सौ. काकोडकर याना विचारला तेव्हा त्या म्हणाल्या, ''म. गो. पक्ष आता कुठे आहे ? वाटल्यास त्यानी दुसरा पक्ष काढावा.'' सौ. शशिकला काकोडकर यानी घेतलेल्या पत्रकार परिषदेला मोतीलाल बांदेकर, रघुवीर पानकर व विनायक चोडणकर उपस्थित होते. असंख्य कार्यकर्त्यांना शशिकला काकोडकर यांचे हे धोरण पटले नाही. त्यानी म. गो. पक्ष टिकवण्याचा निश्चय केला व तसा निर्णयही घेतला. ॲड् मुकुंद शिंक्रे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी स्थापन झाली. बाबन नाईक, अनिल प्रभुदेसाई उपाध्यक्ष झाले. वसंतराव जोशी खजिनदार झाले. मंगलदास नाईक व शिवराम आजगांवकर सरचिटणीस बनले. रमाकांत खलप व बाबुसो गांवकर या आमदारानी आम्ही म. गो. चेच आहोत असे जाहीर केले. सौ. शशिकला काकोडकर याना काँग्रेस कार्यकारिणीमध्ये महत्वाचे स्थान द्यायला काँग्रेस विधीमंडळ सदस्यानी विरोध केला. आमच्या पक्षजनांकडून आमची मानहानी होते असे विनायक चोडणकर म्हणू लागले. सौ. काकोडकर यांची पक्षातून सहा वर्षे हकालपट्टी करण्यात आली. म्हापसा येथे प्रचंड सभा झाली. दलित व बहुजन समाजाच्या विकासासाठी म. गो. पक्षाची गरज प्रतिपादन करण्यात आली. बुद्धीवादाचे राज्य चालत नाही. सामान्य माणसात राज्यकर्त्यांबद्दल आदर, विश्वास व आपलेपणा वाटेल तेच राज्य चालवण्यास योग्य असतात व तेच राज्य चालवू शकतात, अशा अर्थाचे उद्‌गार ॲड्. मुकुंद शिंक्रे यानी काढले. म. गो. पक्ष टिकवण्यासाठी रमाकांत खलप व बाबुसो गांवकर यानी सिंहाचे प्रयत्न केले व एक नवा अध्याय सुरू केला.

१९८० च्या निवडणुकीने गोव्याचे राजकीय चित्र बदलायला सुरुवात झाल्यामुळे ती निवडणूक महत्वाची आहे. प्रत्येक निवडणुकीच्यावेळी निकाल कसा लागेल यावर अनेकजण पैजा लावतात. १९८० मध्ये सुद्धा तशा पैजा लागल्या होत्या. म. गो. चे समर्थक म. गो. ला अठरा जागा मिळतील असे म्हणत होते तर विरोधकांच्या मते म. गो. ला चौदाहून जास्त जागा मिळणार नव्हत्या. पण म. गो. चे पानीपत होईल

असे मात्र कुणाला वाटले नव्हते.

प्रत्येक निवडणुकीत म. गो. चा पराभव करण्याची इच्छा विरोधक बाळगत होते पण बहुजन समाजाच्या आश्रयामुळे आणि पारंपारिक मतामुळे विरोधकाना म. गो. चे जनमानसातील स्थान कमी करणे शक्य झाले नाही. या खेपेला कुठल्या ना कुठल्या कारणानी म. गो. ला पाडण्याचा निर्धार मतदारानी केला होता. सांताक्रुजला डॉ. जॅक सिकेरा याना मत दिले तर मते फुटतील व म. गो. निवडून येईल म्हणून तिथल्या मतदारानी डॉ. सिकेरा याना वगळले आणि काँग्रेस उमेदवार निवडून आणला. पणजीतील मते फुटून म. गो. निवडून येईल म्हणून विधानसभेत उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या श्री. माधव बीरना वगळून संपूर्णपणे अपक्ष उमेदवार विष्णु अनंत नायक याना निवडून आणले.

म. गो. पक्षाचे बंडखोर निवडून येणार नाहीत असा प्रचार त्यावेळी झाला. म. गो. पक्षातून फुटून बाहेर पडलेले निकामी होतात असा समज पसरवला होता. म. गो. पक्षातून कुणी फुटू नये हा त्यामागचा हेतू होता. पण सर्वश्री चंद्रकांत चोडणकर, दयानंद नार्वेकर, दिलखुष देसाई, वासु पायक गांवकर फुटून काँग्रेसमध्ये गेले व निवडूनही आले. म. गो. पक्षाने कार्यकर्ते जवळ केले नाहीत. ग्रामीण परिसरही काही ठिकाणी बदलला. अण्णा झांट्ये याना डिचोली परिसराप्रमाणे ग्रामीण परिसरानेही मते दिली. पक्षद्रोह करणाऱ्यांना तिकिटे मिळणार नाहीत, असे म. गो. ने जाहीर केले. पण दुसऱ्या पक्षातील माणसे घेतली. आपल्या पक्षातून बाहेर पडणारे पक्षद्रोही, आपल्याकडे येणारे ते समजूतदार असे प्रतिपादन केले व कार्यकर्त्यांना दुखवले.

म. गो. पक्ष निवडणुकीत पडला तो चुकीच्या निवडीमुळे, म. गो. नेतृत्वाला गर्व चढला. गर्वाचे घर खाली झाले. शिवोलीला मागील खेपेला गोवा क्षत्रिय मराठा समाजाचा उमेदवार उभा केला. ८० मध्ये बदलून दुसऱ्या ज्ञातीतील उमेदवार पाहिजे असा नेतृत्वाने आग्रह धरला. त्यामुळे एक समाज दुखावला. कार्यकर्ते व जाती दुखवण्याचे काम म. गो. पक्ष सातत्याने करीत आला. गोवा मुक्तीनंतर पहिले सरकार आले त्यावेळी पां. पु. शिरोडकर व शंभू पालयेकर यानी बंड केले. त्यानंतर सात आमदारानी बंड केले. सौ. काकोडकर यांच्या पहिल्या मंत्रिमंडळातील प्रतापसिंह राणे काँग्रेसमध्ये गेले. दुसऱ्या मंत्रिमंडळातील शंकर लाड फुटले व त्यानी

निवडणूक जवळ आणली. म. गो. त फाटाफूट नेहमी होत आली आहे. म. गो. पक्षात कार्य कसे झाले, पक्षाची कारकीर्द कशी झाली हे ठरवताना काही गोष्टीकडे लक्ष टाकूया. पक्ष संघटित होता का ? म. गो. च्या विविध स्तरावर लोकजागृतीचे कार्य व्यवस्थित चालले होते का ? हे प्रथम पाहिले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या कार्याचे स्वरूप पाहिले पाहिजे व ठरवलेल्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा परामर्ष घेतला पाहिजे.

गेल्या इतक्या वर्षात म. गो. पक्षाचे संघटनात्मक कार्य झालेच नाही. म. गो. ला कार्यकर्ते हजारो लाभले पण या हजारो कार्यकर्त्याना बांधणारी दोरी नाही. या पक्षाने सत्ता भोगली पण सेक्रेटरी पक्षाचा कधीच झाला नाही. तो पक्षाध्यक्षांचा सेक्रेटरी होता. लोकशाही पद्धत स्वीकारली नाही. पक्षीय निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे कार्यकर्ते बांधले पाहिजेत. याची खंत निर्माण झाली नाही. म. गो. ची स्थापना ख्रिश्चन व उच्चवर्गीय हिंदू यांचे वर्चस्व येऊ नये म्हणून झाली. पण हिंदू-ख्रिश्चन व उच्चवर्गीय हिंदू यांची आर्थिक परिस्थिती सामान्य असेल तर ते सारे एकाच दाव्यातले हे उमगण्याचा प्रयत्न झाला नाही. पक्ष संघटना नाही समर्थ असे नेतृत्व नाही त्यामुळे पां. पु. शिरोडकर, अँथनी डिसोझा, प्रा. मयेकर, प्रतापसिंह राणे,शंकर लाड निर्माण झाले व बंडखोरीची परंपरा टिकून राहिली.

भाऊसाहेब बांदोडकरांच्या काय किंवा शशिकला काकोडकरताईच्या काय-मंत्रिमंडळाच्या बैठका एकतंत्री स्वरुपाच्या होत होत्या. सहकारी तत्वाना त्यामध्ये स्थान नव्हते. कार्यकर्त्यांमध्ये निष्ठा निर्माण करण्याचे काम झाले नाही. निष्ठा सक्तीतून, दडपणातून, बेपर्वाईतून निर्माण होत नाही हे म. गो. नेते विसरले. सतरा वर्षे ज्या पक्षाचे मंत्रिमंडळ या प्रदेशात राहिले त्या प्रत्येक मंत्रिमंडळातील मंत्री फुटला. हे असे कुठेच झालेले नाही. बंड ही म. गो. परंपरा बनली.

इ. स. १९८० च्या निवडणुकीनंतर गोव्याच्या राजकीय इतिहासाला वेगळे वळण लागले. गोव्यात पूर्वी दोन स्थानिक पक्षांचे वर्चस्व होते. म. गो. आणि यु. गो. या दोन भिंतीनी गोव्याचा समाज विभागत आहे असे चिन्ह दिसत होते व यु. गो. ने हिंदु मतदाराना आपल्याकडे ओढून आणल्याशिवाय यु. गो. सत्तेवर येणार नाही असे मत बहुतेकांचे होते. यु. गो. च्या पदाधिकाऱ्याना हे मत पटले असावे व भिंतीशी टक्कर देत वेळ फुकट दवडण्याऐवजी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचे ठरवले असावे.

कारणे कोणतेही का असेना राष्ट्रीय पक्ष गोव्यात रुजण्याची चिन्हे दिसू लागली. त्यात म. गो. नेतृत्वाबद्दल नाराजी निर्माण झाली व नकारात्मक भूमिकेमुळे काँग्रेस पक्ष बळकट झाला व त्याची चिन्हे १९८० मध्ये दिसली. म. गो. चे गोव्यात फक्त सात आमदार निवडून आले आणि म. गो. चें पानीपत झाले. ही तात्पुरती अवस्था आहे असे म. गो. पक्षाध्यक्षा शशिकलाताईनी म्हटले खरे पण त्यानी आपला पक्षच विसर्जित करण्याचा निर्णय घेतला.

या काळांत सामाजिक स्तरावर महत्वाची घटना घडली. गोमंतक मराठा समाजाने आपली स्वतंःची इमारत बांधली व उद्घाटन सोहळा सुरेखपणे संपन्न केला. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी त्यानी वसतीगृह उघडले व त्यामध्ये सर्वजातीच्या महिलाना जागा द्यायचे ठरवले. स्वतःच्या जातीपुरते न पहाता सर्व जातीना समावून घेणारी सामाजिक संस्था म्हणून गोमंतक मराठा समाजाचे नांव आणखी उज्वल झाले. याच कालावधीत कामोइश पुतळा प्रकरण राष्ट्रवाद्याना एकत्रित करायला कारणीभूत झाले. मार्क प्रकरणी सार्दिन याना प्रायश्चित्त भोगावे लागले.

राजकीय दृष्ट्या गोव्याला धक्के बसले त्याच बरोबर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या पदाधिकाऱ्याना निवडणूक आयुक्तांकडून धक्के मिळाले. म. गो. पदाधिकाऱ्यांच्या मते आम्ही पक्ष विसर्जित केला. त्यानंतर दुसरा कुणी त्या नावाने पक्ष चालवू शकत नाही. म. गो. च्या नावाचा फायदा कुणी घेऊ नये असे त्यांचे मत होते. परंतु पक्ष विसर्जनाबरोबर आणखी काही प्रश्नानी म. गो. पदाधिकाऱ्यांना हैराण केले. या पक्षविसर्जनासंबंधी निवडणूक आयुक्तांकडे तक्रार झाली तेव्हा निवडणूक आयुक्त अकबर यानी काही प्रश्न उपस्थित केले. पक्षविसर्जन करताना अगर पक्षाची घटना रद्द करताना सर्व साधारण सभेची संमती घ्यावी लागते. तशी ती पक्षाध्यक्षा सौ. शशिकला काकोडकर यानी घेतली नव्हती. पण तसे त्यानी कबूल केले नाही. त्या म्हणाल्या, पक्ष विसर्जित करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेमध्ये फेब्रुवारी महिन्यात घेतला होता. निवडणूक आयुक्त म्हणाले, ''ठीक आहे. तसे असेल तर सर्वसाधारण सभेची आमंत्रणपत्रिका दाखवा'' म. गो. चे तत्कालीन सरचिटणीस पुष्पशील केरकर म्हणाले, ''आम्ही आमंत्रण पत्रिका काढल्या नव्हत्या. आम्ही तोंडीच सर्वांना सांगितले होते.'' अकबर म्हणाले, ''तुमचे सभासद किती आहे'' केरकर

म्हणाले ''दीड हजार.'' त्यानंतर अकबर यानी आश्चर्याने म्हटले ''दीड हजार सभासदाना तोंडी सांगितले होते काय ? '' निवडणूक आयुक्तांनी यावर आपला निर्णय दिला तो असा. ते म्हणाले,'' पक्ष विसर्जनाबरोबर घटना रद्द करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत संमत केल्याशिवाय पक्ष विसर्जित झाला असे गृहीत धरता येत नाही. अशावेळी एक सामान्य सभासद देखील पक्षाचे पुनरुज्जीवन करू शकतो.''

म. गो. पक्षाचे पुनरुज्जीवन करण्याचे महत्वाचे काम त्यावेळी आमदार रमाकांत खलप व आमदार बाबुसो गांवकर यानी प्रामुख्याने केले. शिवाय गोव्यातील सर्वसामान्य जनतेला ''सिंहा''ची ढाल हवी होती. सिंह हा आपला तारणकर्ता असे त्याना वाटत होते. यावेळी फेब्रुवारी १९८१ महिन्यात जनगणना जाहीर झाली. गोमंतकीयानी आपली भाषा कोंकणी आहे असे जाहीर करावे असे आव्हान कोकणी भाषा मंडळाने केले. ३१ मार्च रोजी जम्मू-काश्मिरचे राज्यपाल असेलेले जगमोहन गोव्याचे नायब राज्यपाल झाले. तुर्कमन गेट प्रकरणी ज्याच्यावर जनता पक्षाने टीकेची आग सोडली त्या जगमोहन याना काही काळ दूर ठेवावे म्हणून त्यांची बदली गोव्यात केली आहे असे निरीक्षकांचे म्हणणे पडले. पणजी मार्केटमध्ये लागलेल्या आगीने पणजी बाजारात व्यापार करणारे व्यापारी दुःखी झाले. गोमंतकीयाना आणखी एक दुःख सहन करावे लागले. गोव्याचे स्वातंत्र्यसेनानी व माजी मंत्री टोनी डिसोझा यांच्या मृत्यूचे दुःख गोमंतकीयाना असह्य झाले. १५ ऑगस्ट १९५४ रोजी गोव्यात सत्याग्रह करण्यासाठी तीन तुकड्या तीन ठिकाणाहून आल्या. माजाळीमार्गे आलेल्या तुकडीचे नेतृत्व टोनीबाबनी केले होते. आपल्या चांगल्या नोकरीचा त्याग करून हा बहादूर ख्रिश्चन तरुण न भिता सत्यागृहामध्ये सामील झाला होता. त्यानंतर पणजी नगरपालिकेचे अध्यक्ष व मंत्री या नात्याने त्यानी जनतेची सेवा केली. १५ ऑगस्ट १९५४ रोजी सत्याग्रह तुकड्या घेऊन आलेले तिन्ही स्वातंत्र्यसेनानी आज हयात नाहीत. त्यांची स्मृती जागृत ठेवण्याचे काम गोमंतकीय जनतेने केले नाही. १९८१ साली मार्क फर्नांडिस स्मृतिदिन साजरा झाला तेव्हा पणजी येथील टुरिस्ट हॉस्टेलला मार्क फर्नांडिस नाव द्यावे अशी एक सूचना झाली होती. टोनी डिसोझा, मार्क फर्नांडिस व आल्फ्रेड आफोंस यांची आठवण न ठेवण्याइतके का आपण कृतघ्न आहोत ?

गोवा मुक्तीनंतर वेगवेगळ्या समाजानी आपआपली अधिवेशने भरवण्यास सुरुवात केली. गोवा क्षत्रिय मराठा समाज, गोमंतक मराठा समाज, रजक मराठा समाज, त्वष्टा कासार समाज, विश्वकर्मा समाज, दैवज्ञ ब्राम्हण समाज या समाजानी आपआपले तंबू थाटले. इ. स. १९८१ च्या मध्यास क्षत्रिय भंडारी समाजाचे अधिवेशन भरले. सेवानिवृत्त न्यायाधिश मनमोहन कांबळी यानी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाज प्रबोधनपर विचार मांडला. सर्व जातींशी सहकार्य करून स्वतःबरोबर देशाचीही उन्नती तुम्हाला करता येईल अशी मौलिक सूचना त्यानी केली.

राजकीय क्षेत्रात धुसफूस पुन्हा सुरू झाली. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष पक्षाध्यक्षा शशिकला काकोडकर यानी खालसा करून टाकला. पण आमदार रमाकांत खलप, आमदार बाबुसो गांवकर यानी पक्ष चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. इतर अनेक पुढाऱ्यांनी त्याना सहकार्य दिले. सिंह निशाणी कुणाला द्यायची की शीतपेटीत ठेवायची याबद्दल निवडणूक आयुक्तांपुढे चर्चा सुरू झाली. म. गो. पक्ष असा चक्रव्युहामध्ये सापडला होता. त्यामुळे पक्षातील बंडाळीचा आजार त्याला लागला नव्हता. उलट इंदिरा काँग्रेस विधीमंडळ सदस्यामंध्ये कुरकूर सुरू झाली. मंत्र्यावर आरोप होऊ लागले. मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे हे आपल्या मंत्रिमंडळात बदल करणार अशी बातमी पसरली व मंत्रिमंडळात बदल करण्यात येऊ नये हे सांगण्यासाठी कृषीमंत्री आगीयार दिल्लीला गेले. काँग्रेस मंत्रिमंडळातल्या सदस्यानी दिल्लीवारी करायची, मतभेद मिटवण्यासाठी दिल्लीहून दूत यायचे हे चालू झाले. आगीयार, शेख हसन दिल्लीला गेले. पक्षश्रेष्ठी सांगतील तसे आपण वागू असे मुख्यमंत्री म्हणाले. या खेपेला मतभेद संपुष्टात आले नाहीत. आगीयार यानी राजीनामा दिला. राजीनामा मंजूर करण्याबाबत शिफारस करताना मुख्यमंत्र्यानी मी राजीनामा मागितला नाही असा खुलासा केला.

आगीयारनंतर दयानंद नार्वेकर यानी राजीनामा दिला. भांडणे दीड वर्षे चालू आहेत. भांडणे नाहीशी व्हावी व ऐक्य साधावे म्हणून मी राजीनामा देत आहे असे नार्वेकर म्हणाले. मुख्यमंत्री राणे यानी डॉ. विल्फ्रेड डिसोझा व अनंत नरसिंह नायक याना मंत्रिमंडळात स्थान दिले. डॉ. डिसोझा याना आरोग्यखाते तर बाबू नायक याना उद्योग खाते देण्यात आले. मुख्यमंत्री राणे यानी बहुमत सिद्ध करावे असे आगीयार म्हणाले. पण

त्या मागणीत तथ्य नव्हते. मंत्रिमंडळात दोन ब्राम्हण असावेत याबद्दल बहुजनसमाजाला खंत आहे अशी टीका केली जाते. त्यासंबंधी बाबू नायक म्हणाले "झांट्ये व मी हे दोन ब्राम्हण मंत्रिमंडळात आहोत हे खरे पण मला बहुजनसमाजाचा पाठींबा आहे. मी बहुजन समाजाचा आहे. शिवाय बहुजनसमाजाला ब्राम्हण नको या म्हणण्यात तथ्य नाही. कारण डिचोलीच्या बहुजनसमाजाने झांट्ये याना निवडून दिले आहे."

इंदिरा काँग्रेस विधीमंडळ सदस्यामधील कुरकूर काही थांबली नाही. उपसभापतींवर अविश्वासाचा ठराव आणण्याचे असंतुष्टानी ठरवले. ठराव मागे घ्यावा ही श्रेष्ठींची इच्छा आहे असे सांगण्यात आले. डॉ. विल्फ्रेड डिसोझा यानी मध्यस्ती केली. त्यांची मध्यस्ती यशस्वी झाली. दरम्यान म. गो. पक्षाचे नवे अस्तित्व मान्य करण्यात आले. सिंह चिन्ह त्याना मिळाले. या घटनेची खिल्ली मुख्यमंत्री राणे यानी उडवली. ते म्हणाले, "सिंह कधीच संपला. उरली आहे ती कोल्हेकुई." म. गो. पक्ष कार्यकर्त्यांनी सिंह मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. पक्षत्याग केलेल्यानी पक्षामध्ये परत यावे असे आवाहन करण्यात आले. पक्षाध्यक्षा सौ. शशिकला काकोडकरबद्दल मात्र मौन पाळण्यात आले.

राणे मंत्रिमंडळाने शिक्षणखात्यातील नवी घोषणा केली. शालान्त परीक्षेपर्यंत शिक्षण मोफत देण्याचा निर्णय शिक्षणमंत्री हरीश झांट्ये यानी जाहीर केला. गोव्यात दूरदर्शन प्रसारण केंद्राचा शिलान्यास सोहळा केंद्रीय मंत्री वसंत साठे यांच्या हस्ते करण्यात आला. गोव्यात स्वतंत्रता सैनिक परिषद भरली. गृहमंत्री झैलसिंग या परिषदेला उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिकांचे प्रश्न या परिषदेत चर्चिले गेले. मुक्तीनंतरची वीस वर्षे उलटली पण स्वातंत्र्यसैनिकांचे प्रश्न सुटले नाहीत. राजकीय पक्षातील बंडाळी संपली नाही. सुशेगाद गोमंतकीयांचा सुशेगादपणा मात्र हळुहळू नाहिसा होऊ लागला.

इ. स. १९८२ हे वर्ष महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या पुनरुज्जीवनाचे वर्ष होते असे म्हणायला हरकत नाही. म. गो. पक्षाध्यक्षा सौ. शशिकला काकोडकर यानी पक्ष विसर्जित केला. तो पक्ष दुसऱ्या कुणाच्या हाती पडू नये अशी त्यांची इच्छा होती. सोम्या गोम्याच्या हाती या पक्षाची सूत्रे पडली तर पक्षाची परंपरा डागळली जाईल अशी भीती त्याना वाटत असावी. कारण कोणतेही असेना, म. गो. पक्ष पुनःप्रस्थापित

होऊ नये म्हणून त्यानी खटपट केली. निवडणूक आयुक्तानी पक्ष कुणीही पुन्हा चालवू शकतो अशा हमीचा निर्णय दिला. रमाकांत खलप व बाबुसो गांवकर यानी पुढाकार घेतला. ॲड्. मुकुंद शिंक्रे यांचे तत्वनिष्ठ मार्गदर्शन त्याना लाभले. आणि गोव्यातील जनतेने त्यांच्या प्रयत्नाना पाठिंबा दिला.

डिचोली येथे म. गो. पक्षाचा मेळावा भरला. मेळाव्यात एम्. एस्. प्रभूनी भाषण करून सांगितले की बहुजन समाजाचे कल्याण करणारा हा पक्ष आहे व या पक्षाचा ध्वज फडकत ठेवण्यासाठी मी जीवनभर प्रयत्न करीन. पंचायत निवडणुकामध्ये म. गो. समर्थकाना ऐंशी टक्के मते मिळाली. व ग्रामीण परिसरात म. गो. पक्ष रूजला आहे हे सिद्ध झाले. राजकारणात स्थानिक पक्ष मान्यता प्राप्त करत असताना गोव्याचे सुप्रसिद्ध कवी बा. भ. बोरकर यांच्या ''सासाय'' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. १७ व्या गोमंतक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना बा. द. सातोस्कर यानी गोव्यातील साहित्य कार्याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे, असे प्रतिपादन केले. गोव्यातील कार्निवाल हा गोमंतकीय संस्कृतीचा भाग नाही हे जाणकाराना जाणवू लागले. कार्निवालमुळे नैतिक -हास होतो अशी टीका होऊ लागली. कार्निवालला पर्यायी उत्सव म्हणून राष्ट्रवादी कार्यकर्त्यानी शिमगोत्सव मोठ्या प्रमाणात आणि आकर्षक पद्धतीने करायचे ठरवले. लोकांचा चांगला प्रतिसाद लाभला. पौराणिक कथावर आधारित चित्ररथानी शिमगोत्सवाला रंग आला. गोव्यातील अस्वच्छतेकडे आणि प्रदूषणाकडे ना. राज्यपाल जगमोहन यानी लक्ष दिले व पणजी टोंक येथील घाणीचा नाला स्वच्छ करण्याचा आदेश काढला. तो आदेश सात वर्षापूर्वी काढला होता. त्या आदेशाचे काय झाले ते सांगायला आजही वहात असलेला घाणेरडा नाला पुरेसा आहे.

म. गो. पक्षाला पुन्हा प्रस्थापित करण्याचे कार्य कार्यकर्त्यानी सुरू केले होते. ठिकठिकाणी मेळावे, शिबिरे आयोजित केली होती. सौ. शशिकला काकोडकर याना म. गो. मध्ये आणण्याचे प्रयत्न होत होते. दयानंद नगरात संपन्न झालेल्या म. गो. अधिवेशनात श्रीमती सुनंदाबाई बांदोडकर यानी गोव्याचे नंदनवन करण्याचे भाऊंचे स्वप्न साकार करा असा आशीर्वाद दिला. म. गो. पक्षात सामील होण्याचा आपला विचार नाही असे सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या व स्थानिक काँग्रेस नेते

महत्व देत नाहीत अशी तक्रार केली. म. गो. पक्षाची अधिवेशने भरतात, त्याना पैसा कुठून मिळतो या टीकेला उत्तर देताना आम्ही हे पैसे आमच्या मावळ्यांकडून घेतो असे म. गो. च्या प्रवक्त्याने म्हटले. त्यावर मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे म्हणाले, ''पैसा मांवळ्यांकडून घेतला असेल पण हे मावळे वातानुकूलीत मोटारीतून फिरणारे आहेत आणि वातानुकूलित केबिनमध्ये बसणारे आहेत. म. गो. पक्षाकडे कार्यक्रम नाही. केवळ आरोप करून व ठराव संमत करून काम होत नसते यावर खलप म्हणाले, ''निवडणुका घ्या व जिंकून दाखवा'' पैसे कुठून घेतले यासंबंधी खुलासा करताना खलप म्हणाले, ''आमच्या कार्यकर्त्यानी ५५ हजार रुपये जमवून दिले. शिबिराला तेवढे पुरेसे होते.''

गोव्यात शिवजयंती थाटात साजरी होऊ लागली. ''मूठभर देशद्रोही देशाला पोखरू शकणार नाही असे शिवजयंती महोत्सवात मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यानी प्रतिपादन केले. मराठीचे कट्टे पुरस्कर्ते व म. गो. चे आद्य संस्थापक जनार्दन शिंक्रे यानी शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची महान परंपरा सांगितली. गोव्यात विचाराचे आणखी एक प्रबोधन झाले. ''मूलभूत हक्क शाबूत आहे तोवर अल्पसंख्यांकाना भीती नाही''असे विचार त्यानी प्रगट केले. म. गो. पुनःप्रस्थापित होण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची ही सुरुवात होती. म. गो. पक्षाचे नांव बदलण्याचा निर्णय घेतला जात आहे असे म. गो. चे त्यावेळचे अध्यक्ष रमाकांत खलप यानी म्हटले. सर्वसाधारण गोव्यातील ग्रामीण परिसर अजूनही म. गो. मय आहे. त्यांच्याही विचाराचा विचार झाला पाहिजे. नपेक्षा तडकाफडकी निर्णय घेतला जाईल. त्या निर्णयावर एखादा आव्हान देईल आणि म. गो. पक्ष पुन्हा विस्थापित होईल. मागील इतिहासातील चुका पुन्हा होता कामा नये, पण सत्ता कुणाला द्यायची हे नियती ठरवते, त्याला तुम्ही आम्ही काय करणार?

गोवा प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी सौ. सुलोचना काटकर यांची नियुक्ती करण्यात आली. श्रीमती आयरिन बार्रुश यांच्या जागी सौ. काटकर यांची नियुक्ती झाली. त्यांच्या नियुक्तीच्या प्रतिक्रिया संमिश्र होत्या. सौ. सुलोचना काटकर यानी पक्षश्रेष्ठींच्या विश्वासास पात्र होण्याचा मी प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. याच सुमारास 'लोगोस' बोट मांडवीत उभी राहिली. त्या बोटीवर पुस्तकांचे प्रदर्शन होते. विविध

विषयावरची पुस्तके जहाजावर होती. पण धार्मिक पुस्तकावर भर दिला जात होता. हा धर्मांतराचा डाव आहे असा आरोप काहीनी केला. पण त्यामध्ये तथ्य नव्हते. या काळात जबरदस्तीने धर्मांतर शक्य नव्हते. ख्रिस्ती धर्मप्रसारकानी आपल्या धर्माचा प्रचार केला तर त्यांचे काही चुकत नव्हते. जो तो आपल्या धर्माचा प्रसार करणारच असेही म्हणणारे अनेक जण त्यावेळच्या चर्चेत भाग घेत होते. कर्मठ आणि उदारमतवादी अशा तत्वांची चर्चा लोगोस जहाजाच्या निमित्ताने झाली हे बरे झाले. त्यामुळे निदान आपण अशा प्रचाराच्या बाबतीत मागे पडतो हे हिंन्दू धर्मप्रचारकाना कळले.

गोव्याला घटक राज्य मिळावे या दृष्टीने खटपट चालू होती. घटक राज्याचा दर्जा मिळविण्यासाठी प्रथम आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावे लागेल असे मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यानी म्हटले. याच सुमारास दूधसागर धबधब्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवला. दूधसागर धबधब्याच्या माथ्यावरील नदीच्या पाण्याचा प्रवाह अडवून ते पाणी कर्नाटकाच्या हद्दीत येणाऱ्या शेतीसाठी वापरण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतल्याची बातमी प्रसिद्ध झाली. या निर्णयाची गंभीर दखल गोवा सरकारने घेतली व आपला विरोध प्रगट केला. रमाकांत खलप यानी इंदिराजीना पत्र पाठवले व दूधसागर धबधब्याचे पाणी तोडू नये अशी विनंती केली. राणे यानीही प्रयत्न केले.

याच काळात प्रसिद्ध जकात चोर सुकूर बाखिया प्रकरण उद्भवले व त्याने गोव्यात खूपच खळबळ माजली. आग्वाद तुरुंगांतून सुकूर पळाल्याची बातमी आली. आग्वाद तुरुंगात तो राजासारखा वावरत होता असेही प्रसिद्ध झाले. काही अधिकाऱ्याना पकडण्यात आले. जेलगार्डचा गूढ मृत्यू झाला. आणि सर्वात मोठा आश्चर्याचा धक्का बसला तो सुकूर बाखिया नाहिसा झाल्यामुळे. सुकूर तुरुंगातून पळाला नसल्याचे जाहीर झाले. विधानसभेत मुख्यमंत्री म्हणाले, "१० एप्रिल १९८२ रोजी सुकूर याला आग्वादमध्ये आणले. सुटकेचा आदेश २९ मे रोजी मिळाला व ३० मे रोजी सुकूरची सुटका करण्यात आली. "तो खरोखरच बाखिया होता का ? त्याला ओळखणारे कोण होते?" असा प्रश्न आमदार दोरादो यानी विचारला. २९ जुलै १९८२ रोजी दमणच्या ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटने सुकूरला जामिनावर सोडला. त्या जामिनाबद्दल असंतोष प्रगट झाला. आणि सर्वात कहर म्हणजे न्याय आयुक्तांसमोर हजेरी लावण्यास आलेल्या

सुकूर यास पकडण्यात आले, पण पोलीस पकडत असताना सुकूर याच्या अंगरक्षकानी मारामारी केली. अडथळा आणण्याचा प्रयत्न केला.

ना. सार्दिन याना बत्ता आयोगाने निर्दोषी ठरवले व आरोपातून मुक्त केले. १९८२ मध्ये साखळी–डिचोलीला पूर आला. वाळवंट नदी भरून गेली. पुरग्रस्तांसाठी म. गो. पक्षाने २५००० रुपये दिले. नायब राज्यपाल जगमोहन याना परत बोलावण्यात आले व लतीफ यानी हंगामी ना. राज्यपाल म्हणून सूत्रे घेतली. गोव्याच्या सामाजिक इतिहासाला धक्का देणाऱ्या दोन घटना घडल्या. समाजसुधारक राजाराम पैंगीणकर व शिक्षणतज्ञ दादा सुकेरकर या दोन मान्यवंताचे निधन झाले. राजाराम पैंगीणकर हे गोमंतक मराठा समाजाचे खंदे लढवय्ये. गायक समाजातील वेश्या व्यवसाय बंद करणे, मुलीना शिक्षण देऊन त्यांची लग्ने लावून देणे, हुंडा घ्यायला प्रतिबंध करणे, पुनर्विवाह करणे इत्यादी सामाजिक सुधारणा त्यानी केल्या. गोव्याचे कर्वे असे त्याना म्हणायला हवे. सुकेरकर यानी शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले. मुंबई हायकोर्टाचे गोवा खंडपीठ सुरू झाले. त्यावेळी न्यायमूर्ती चंद्रचुड यानी न्यायदानात समाजाच्या अपेक्षा लक्षात ठेवा असे प्रतिपादन केले.

पणजी येथील श्रीमहालक्ष्मी प्रासादिक वाचन मंदिराचा सोहळा ग. प्र. प्रधान यांच्या हस्ते संपन्न झाला. ग्रंथालये ही मला तीर्थक्षेत्रासारखी पवित्र आहेत असे भावपूर्ण उद्‌गार त्यानी काढले. कांपालवर इंदिराजी आल्या. त्यांच्या भाषणाला प्रचंड जनसमुदाय जमला. परराज्यातील नागरिक नाहीत असे एकही राज्य नाही असा वास्तववादी दृष्टिकोन त्यानी गोमंतकीयांसमोर ठेवला व आपण एकाच देशाचे नागरिक आहोत या भावनेने वागा, असा सल्ला दिला.

इ. स. १९८३ मध्ये गोव्यातील दोन प्रमुख पक्षामधील फूट अटळ झाली. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष आणि इंदिरा काँग्रेस पक्ष दोन्ही पक्ष आपापसातील मतभेदामुळे फुटले गेले. म. गो. पक्षाचे विसर्जन करून सौ. शशिकला काकोडकर इंदिरा काँग्रेसमध्ये शिरल्या आणि पस्तावल्या. म. गो. पक्ष त्यांचा होता. मन मानेल तसे निर्णय त्याना घेता येत होते. इंदिरा काँग्रेसमध्ये त्यांची दखल कोणी घेईना. अखेर त्याना काँग्रेस समितीच्या उपाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. काँग्रेसमध्ये चाललेल्या बजबजपुरीबद्दलची तक्रार त्यानी काँग्रेस श्रेंष्ठीकडे केली. पण श्रेष्ठी त्याची

दखल घेईना. म्हणून त्या वैतागल्या. त्यांनी पदाधिकारी म्हणून रहाण्यात अर्थ नाही हे ओळखले व समर्थकाना वाट मोकळी करून दिली. शशिकला काकोडकरना म. गो. पक्षात घ्या असा आग्रह काकोडकर समर्थक धरू लागला. सौ. काकोडकर नवा पक्ष काढण्याच्या विचारात आहेत अशी बातमी प्रसिद्ध झाली. सौ. काकोडकर म. गो. पक्षात यायला उत्सुक आहेत असे दिसताच काकोडकर विरोधी गट घाबरला व त्यानी काकोडकर येऊ नये म्हणून तांत्रिक मुद्दे उपस्थित करायला सुरुवात केली. त्यातून एक शंका बोलली जाऊ लागली. सौ. शशिकला काकोडकर याना पक्षात घ्यायला म. गो. चे अधिकारी मुद्दाम उशीर लावत आहेत असा उघड आरोप होऊ लागला. ही कुरबूर एवढी वाढली की विलंब लावला जात नाही असा उघड खुलासा रमाकांत खलप याना करावा लागला. काँग्रेस पक्षाशी आपले नाते तोडून टाकण्याचा निर्धार सौ. काकोडकर गटाच्या आमदारानी केला. जुलैमध्ये देऊ मांद्रेकर, विष्णु रामा नाईक व विनायक चोडणकर यानी काँग्रेस पक्षाचा त्याग केला. काँग्रेस पक्षाने आपल्या कारकिर्दीत नगरपालिका निवडणूक घेतल्या नाहीत. वास्कोत झालेली दंगल दडपण्यासाठी लष्कर बोलवावे लागले असे आरोप विनायक चोडणकर यानी केले व काँग्रेसचा नाकर्तेपणा दाखवला. म. गो. च्या खुल्या अधिवेशनात शशिकलाताईंच्या म. गो. प्रवेशावर शिक्कामोर्तब होणार असे सांगितले जात होते. पण अधिवेशन भरवण्याबाबत टंगळमंगळ केली जात होती. अखेर खुले अधिवेशन भरवण्याचे ठरले. पण तेही पुढे ढकलण्याचे ठरते आहे असे कळताच सौ. शशिकला काकोडकरानी त्याच दिवशी अधिवेशन भरणार असे जाहीर केले पण ते अधिवेशन अधिकृत नाही अशी घोषणा ॲड्. मुकुंद शिंक्रे यानी केली. २० नोव्हेंबरच्या अधिवेशनात काकोडकर यांची म. गो. पक्षातून कायमची हकालपट्टी करण्यात आली. म. गो. पक्षामधील व्यक्तिगत हेवेदावे कोणत्या थराला पोचले होते याचे ते उदाहरण होते, सहा वर्षानंतर परिस्थिती बदलणार व ज्यांची कायमची हकालपट्टी करण्यात आली, त्याच काकोडकर म. गो. पक्षाच्या अधिकृत आमदार म्हणून विधानसभेत बसणार याची त्याना कल्पना नव्हती. म. गो. च्या दोन्ही गटानी आपलीच म. गो. खरी असा दावा केला व सिंह आपणालाच मिळणार असे शशिकलाताईनी म्हटले. ही झाली म. गो. आघाडीची हकिकत.

घटक राज्याची मागणी जोर धरू लागली. दीव-दमण वगळून गोव्याला घटक राज्याचा दर्जा हवा अशी भूमिका राणे यानी मांडली व राज्याच्या मागणीसंबंधीचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी त्यावेळचे अतिरिक्त विकास आयुक्त शशिकांत गंधे यांच्यावर सोपवल्याचे जाहीर केले. घटक राज्याची गाडी अशा रीतीने सुरू झाली. नवे नायब राज्यपाल म्हणून के. बी. सतारवाला यांची नियुक्ती झाली. इंग्रजी शाळामध्ये तिसरी भाषा म्हणून मराठी व कोकणी या भाषा सक्तीच्या असे धोरण जाहीर करण्यात आले. कामोइश हटाव हे आंदोलन सुरू झाले व ३० ऑक्टोबर रोजी कामोइश पुतळा हलवला गेला.

इंदिरा काँग्रेस पक्षातही कुरबूर चालू होती. इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस गोविंद पानवेलकर यानी पत्रक काढून गोवा प्रदेश इंदिरा काँग्रेस समिती व विद्यमान इंदिरा काँग्रेस सरकार या दोन्हींची आमुलाग्र पुनर्रचना होणे जरुरीचे आहे असे सांगितेले. सौ. काटकर व दयानंद नार्वेकर यांच्या मागणीला आपण पाठिंबा जाहीर केला. दरम्यान राणे नेतृत्वामध्ये बदल हवा अशी मागणी करण्यासाठी डॉ. विल्फ्रेड डिसोझा, सौ. काटकर याना भेटले असा गौप्यस्पोट विनायक चोडणकर यानी केला. यावर आपण सौ. काटकर याना भेटलोच नाही, विनायक चोडणकर खोटे बोलतात असे डॉ. विली म्हणाले. डॉ. विली दिशाभूल करीत आहेत अशी प्रतिक्रिया विनायक चोडणकर यानी व्यक्त केली व आपले म्हणणे खरे असल्याचे सांगितले. राणे नेतृत्त्व बदलले जावे ही मोहीम वाढली. माशादो,विली आणि इतर आठ आमदारानी एक गट बनवला. ''आपल्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात राहू इच्छित नाही'' असे डॉ. विल्फ्रेड डिसोझा यानी सांगितले. डॉ. विलीनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर ''सुंठीवाचून खोकला गेला'' असे मुख्यमंत्री राणे म्हणाले.

राणे विरोधी गटाचे प्रवक्ते म्हणू लागले की आम्ही पंधरा आहोत विली गट १० आमदार, काकोडकर गट ३ आमदार व म. गो. चे २ आमदार असे एकूण पंधरा आमदार असल्याचे त्यानी जाहीर केले. डॉ. विलीनी राष्ट्रपती राजवटीची मागणी केली. इंदिरा काँग्रेसचे फर्नांडिस म्हणाले, ''डॉ. विलींची मागणी गैर आहे'' व त्यानी विली गटाला राणे सरकारवर अविश्वासाचा ठराव आणून संमत करून दाखवा असे आव्हान दिले. डॉ. विलींचा राजीनामा लोंबकळत ठेवण्यात आला. चंद्रकांत

चोडणकर यानी आपली सरकारला पाठिंब्याची भूमिका जाहीर केली. पक्षाच्या जाहीरनाम्याची आणि पक्षाच्या ध्येयधोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यास अपेशी ठरलेल्या अध्यक्षा सौ. सुलोचना काटकर व मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांच्यावर ठपका ठेवून काँग्रेस समितीच्या १७ सदस्यानी इंदिरा काँग्रेस सोडली. घटक राज्य व कोकणीचा घटनेच्या आठव्या परिशिष्टात समावेश करण्याची मागणी हे एक स्वप्नच ठरले असाही आरोप त्या लोकानी केला. १४ सप्टेंबर १९८३ रोजी 'गोवा काँग्रेस' या नव्या पक्षाची स्थापना झाल्याची घोषणा निमंत्रक विष्णु अनंत नायक यानी केली. डॉ. विली डिसोझा यांचा राजीनामा संमत करण्यात आला. चोगम रिट्रीजची तयारी गोव्यात वर्षभर चालली. रस्ते दुरुस्त झाले. रस्त्यावर दिवे लावण्यात आले. पाहुणे म्हणून आलेल्या माननीय राजकारणी व्यक्तीनी गोव्याची स्तुती केली. याच वर्षी कार्निवालविरुद्ध ख्रिस्ती धर्मगुरुनी आवाज उठवला. कार्निवाल हा ख्रिस्ती सण नाही. त्याला प्रोत्साहन देऊ नका असा आदेश गोव्यातील कॅथॉलिकाना चर्चने दिला. कार्निवालच्या रुपाने गोमंतकीय संस्कृतीची विटंबना थांबवावी असाच सूर विचारी नागरिकानी काढला व चर्चच्या आदेशाला संमती दिली.

१९८४ साल हे निवडणुकीचे साल ठरले ते इंदिराजींच्या हत्येमुळे. इंदिराजींची हत्या झाल्यामुळे लोकसभेच्या निवडणुका घोषित झाल्या व त्या निवडणुकीबरोबर गोवा विधानसभेच्याही निवडणुका जाहीर झाल्या. १९८४ साल गोव्यात उजाडले ते राष्ट्रपती झैलसिंग यांच्या आगमनामुळे. अकरा नगरपालिका व एकशे पंचाण्णव ग्रामपंचायतींच्या वतीने राष्ट्रपतींचा सत्कार करण्यात आला. सत्कार थाटामाटात झाला. परंतु राष्ट्रपतीना दिलेल्या मानपत्रात मराठीला स्थान नाही याबद्दल म. गो. चे सरचिटणीस रमाकांत खलप यानी निषेध व्यक्त केला. यावेळी बोलताना खलप म्हणाले, ''या सरकारने कोंकणीचा बट्याबोळ केला आहे व आता मराठीही नेस्तनाबूत करू पहात आहे. मराठी व कोंकणीला समान मानाचा दर्जा देण्याऐवजी इंग्रजी भाषेचे जोखड हे सरकार लादत आहेत.''

या वर्षी सौ. शशिकला काकोडकर गट म. गो. पक्ष यांचा समझोता होण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. ''शशिकला काकोडकर यानी स्वतः निवडलेली कार्यकारिणी बरखास्त करून व सिंह निशाणीवरचा आपला दावा मागे घेतला तर आपण म. गो. सरचिटणीसपदाचा राजीनामा देण्यास

तयार आहे असे रमाकांत खलप यानी जाहीर केले. एकीकरणाची त्यांची इच्छा प्रामाणिक असल्यास त्या आपली सूचना स्वीकारतील असेही त्यानी म्हटले. शशिकला काकोडकर यानी दावा मागे घेतल्याची घोषणा केली नाही. दरम्यान, निवडणूक आयुक्त आर्. के. त्रिवेदी यानी मुकुंद शिंक्रे यांच्या अध्यक्षतेखाली असेलल्या महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षास सिंह निशाणी मुक्रर केली. म. गो. गटास आनंद झाला. परंतु शशिकला काकोडकर गटामध्ये नैराश्य पसरले. पण निशाणी हे केवळ साधन. आम्ही लढाई हरलो तरी युद्ध जिंकू असे सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या. सात दिवसात काकोडकर यानी आपल्या अनुयायासह म. गो. पक्षात यावे असे खलपानी म्हटले. नंतर वाटाघाटीचे आवाहन करण्यात आले. पण दुर्दैवाने त्या वाटाघाटी सफल झाल्या नाहीत. सौ. शशिकला काकोडकर यानी भाऊसाहेब बांदोडकर गोमंतक पक्ष स्थापन केला व स्वतंत्रपणे आपल्या पक्षातर्फे निवडणूक लढवली.

इंदिरा काँग्रेस आघाडीवर सुद्धा नाराजी होती. मुख्यमंत्री राणे यांच्यावर अविश्वासाचा ठराव दाखल करण्यात आला पण तो फेटाळण्यात आला. राणे यांच्या बाजूने सतरा आमदारानी मतदान केले. मार्च १९८४ मध्ये सभापती माशादो यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्यात आला. दिलखुष देसाई व दयानंद नार्वेकर यानी ठराव मांडला. सभापती माशादो पक्षपात करतात. विधानसभेवर नियंत्रण ठेवणे त्याना जमत नाही. म्हणून ऐनवेळेत ते कामकाज तहकूब ठेवतात. सभापती शांत असायला पाहिजेत. पण ते संतप्त होतात असे त्या ठरावाच्या प्रसंगी बोलण्यात आले. माशादो यानी आपल्यावरचे आरोप निरर्थक व बिनबुडाचे आहे असे म्हटले. ठराव १७ विरुद्ध १३ मतानी संमत झाला. सभापती माशादो याना सभापतीपदाचा राजीनामा द्यावा लागला. नंतर सभापतीपदासाठी दयानंद नार्वेकर यांचे नाव सत्ताधारी गटानी सुचविले. विरोधी पक्षातर्फे डॉ. विल्फ्रेड डिसोझा यानी आमदार रमाकांत खलप यांचे नाव सभापतीपदासाठी सुचवले. विनायक चोडणकर यानी अनुमोदन दिले. सभापती म्हणून दयानंद नार्वेकर निवडून आले. दयानंद नार्वेकर यानी पक्षहितासाठी म्हणून १४ जून १९८१ रोजी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. ऑगस्टमध्ये माँत क्रुझ याना क्रीडा, पंचायत व शिष्टाचार मंत्री करण्यात आले. या वर्षी संयोगिता राणे गोवा काँग्रेस पक्षामध्ये गेल्या. डॉ. विल्फ्रेड डिसोझा यांच्या

राजीनाम्यामुळे रिकामी जागा भरण्याच्या दृष्टीने व मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासंबंधी चर्चा करण्यासाठी विश्वनाथ प्रतापसिंह यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली. गोवा मुक्त करण्यासाठी शिवछत्रपती यशस्वी झाले असते तर गोव्याचा इतिहास बदलला असता असे भावपूर्ण उद्‌गार शिवजयंती उत्सवाच्यावेळी मुख्यमत्री प्रतासिंह राणे यानी काढले.

बेकायदा जंगलतोड करणाऱ्या गुंडाकडून वनकर्मचाऱ्याना मारहाण झाल्याची घटना घडली. एका आमदाराचा या प्रकरणी हात असल्याचे जाहीर झाले. पण त्या आमदाराने इन्कार केला. आमदार दिलखुष देसाई यांच्यावर हल्ला करण्यात आला. मडकई येथे दुर्घटना घडली व २५ जणांचे मृतदेह सांपडले. 'गोमंतक'ने निधी उभारला व अपघातग्रस्त कुटुंबाना दिलासा दिला. या वर्षी मुष्ठिफंड संस्थेने आपला अमृतमहोत्सव संपन्न केला. चोऱ्यांचे प्रमाण वाढू लागले. गेल्या दीड वर्षात ११३५ चोऱ्या झाल्याचे सांगण्यात आले. कॅपिटेशन फीच्या विरोधी विद्यार्थ्यानी आंदोलन उभारले. एक दिवस शिक्षणसंचालनालय ताब्यात घेतले.

१९८४ सालामध्ये दोन मान्यवर गोमंतकीयांचे निधन झाले. बाकीबाब बोरकर आणि मास्टर दत्ताराम यांच्या निधनामुळे गोव्याच्या सांस्कृतिक जीवनात न भरून येणारी पोकळी निर्माण झाली. मराठी काव्यक्षेत्रात तेजाने तळपणारे बाकीबाब हे केवळ कवी नव्हते तर तत्वचिंतक होते. त्यानी कोंकणी वाङ्‌मयही समृद्ध केले. 'जीवन त्याना कळले हो मी पण ज्याचे पक्व फळापरी सहजपणे गळले हो' अशा आशयाच्या ओळी लिहाव्या त्या बाकीबाबनी. मास्टर दत्ताराम म्हणजे मराठी रंगभूमीवरील शिवाजी. शिवाजीच्या भूमिकेत ते ज्यावेळी रंगभूमीवर येत त्यावेळी साऱ्या प्रेक्षकाना प्रत्यक्ष छत्रपती अवतरल्याचा भास होई. गर्व नसलेल्या त्या महान कलाकाराने रंगभूमीला प्रतिष्ठा मिळवून दिली. याच वर्षी गोव्यात ६४ वे नाट्यसंमेलन भरले. ज्योत्स्ना भोळे अध्यक्ष होत्या. गरम नाटकाविरुद्ध त्यानी आवाज उठवला. इंदिरा गांधींच्या निधनामुळे सर्वत्र निवडणुका जाहीर झाल्या.

: दहा :

घटक राज्याच्या दिशेने

१९८४ च्या निवडणुकीमध्ये इंदिरा काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, जनता पक्ष या राष्ट्रीय पक्षानी भाग घेतला तर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, भाऊसाहेब बांदोडकर गोमंतक पक्ष, गोवा काँग्रेस, गोमंत लोक पक्ष हे स्थानिक पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले. इंदिरा काँग्रेसने पेडणेहून शंभू भाऊ बांदेकर, मांद्रेहून गोपाळ परब, शिवोलीहून चंद्रकांत चोडणकर, कळंगुटहून व्यंकटेश शिरोडकर, म्हापशाहून उल्हास धुरी, थिवीहून दयानंद नार्वेकर, डिचोलीहून हरीश झांट्ये, पाळीहून चंद्रकांत वेरेकर, सत्तरीहून प्रतापसिंह राणे, पणजीहून जे. बी. गोन्साल्वीश, सांताक्रुजहून कास्तील मोंतेर, कुंभारजुवेहून प्रेमानंद महांबरे, सांत आंद्रेहून श्रीपाद कुंकळीकर, मडकईहून शाम महानंदू नाईक, फोंड्याहून अनिल गावणेकर, शिरोड्याहून सुभाष शिरोडकर, सांगेहून पांडू वासु नाईक, रिवणहून शंकर फळदेसाई, काणकोणहून वासु पायक गांवकर, केंपेहून वैकुंठ देसाई, कुंकळीहून मानू फर्नांडिस, बाणावलीहून फ्रान्सिस मोंत क्रुज, नावेलीहून लुईझिन फालेरो, मडगांवहून अनंत नरसिंह नायक, कुडतरीहून फ्रान्सिस सार्दिन, कुठ्ठाळीहून लुईश प्रोत बार्बोझा, दाभोळीहून सायमन डिसोझा, मुरगांवहून शेख हसन हरुण असे २८ उमेदवार उभे केले. भाजपने पणजीहून मुकुंद पंचवाडकर, शिवोलीहून सुभाष कोरगांवकर, म्हापशाहून चंद्रकांत पंडीत, थिवीहून जासीन डिसोझा, पणजीहून जयप्रकाश सरमळकर, कुंभारजुवेहून लुईश आफोंस, फोंड्याहून माधव कोरडे, शिरोड्याहून नारायण शेट शिरोडकर, सांगेहून नागेश तारी, रिवणहून राघोबा सावंत देसाई, काणकोणहून प्रकाश शांता देसाई, केपेहून विठू होडारकर, नावेलीहून विलास नाईक, मुरगांवहून आशा सरमळकर, मडकईहून काशिनाथ परब, असे पंधरा मतदार संघातून आपले उमेदवार उभे केले. जनता पक्षाने सांताक्रुजहून व्हितोरिया फर्नांडिस, कुंकळीहून फर्दिन रिबेलो, मडगांवहून जितेंद्र सरमळकर, असे उमेदवार उभे केले. कम्युनिस्ट पक्षाने मांद्रेहून नामदेव हरमलकर, पाळीहून बभ्रुवाहन गांवसकर, सत्तरीहून व्हिन्सी गोन्साल्वीस, सांत आंद्रेहून दायश सांतीगो,

सांगेहून मंगलदास पावसकर, असे उमेदवार उभे केले. मार्क्सवादी पक्षाने डिचोलीहून कमलाकांत गोडेकर, केपेहून पुंडलिक गोपी नाईक, मुरगांवहून सीताराम मांद्रेकर असे उमेदवार उभे केले. स्थानिक पक्षापैकी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने २७ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून मनोहर राजाराम पेडणेकर, मांद्रेहून रमाकांत खलप, शिवोलीहून अशोक तुकाराम नाईक, कळंगुटहून श्रीकांत मळीक, म्हापशाहून चंद्रशेखर दिवकर, थिवीहून पंढरीनाथ पोळ, डिचोलीहून विनायक वासुदेव नाईक, पाळीहून दशरथ परब, सत्तरीहून वासुदेव सडेकर, पणजीहून बाबन नाईक, कुंभारजुवेहून काशिनाथ जल्मी, सांत आंद्रेहून दशरथ सावंत, मडकईहून बाबुसो गांवकर, फोंड्याहून रवी नाईक, शिरोड्याहून गजानन निळू नाईक, सांगेहून विनायक करमळकर, रिवणहून प्रकाश वेळीप, काणकोणहून उल्हास फळदेसाई, केंपेहून पॅट्रीक दिनेझ, कुंकळीहून दत्ताराम देव देसाई, नावेलीहून ग्रेगोरिया सांतान शावियेर, मडगांवहून गिलमन फर्नांडिस, कुडतरीहून सोमनाथ लोटलीकर, कुठ्ठाळीहून लिओनार्ड लोब, दाभोळीहून महादेव नारायण नाईक, मुरगांवहून पद्मनाभ आमोणकर, हे म. गो. चे उमेदवार होते. गोवा काँग्रेसने २६ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. पेडणेहून बाबलो हरिजन, मांद्रेहून रत्नकांत शेटगांवकर, शिवोलीहून गोपी दत्ताराम नाईक, कळंगुटहून विल्फ्रेड डिसोझा, म्हापशाहून श्यामसुंदर नेवगी, थिवीहून गाब्रीयल आल्वारीश, डिचोलीहून गोपी दत्ताराम नाईक, पाळीहून शंकर सुब्राय कर्पे,सत्तरीहून संयोगिता राणे, पणजीहून रामकृष्ण मांद्रेकर, सांताक्रुजहून मायकल फर्नांडिश, कुंभारजुवेहून दुमिंग आब्रेव, सांत आंद्रेहून तेवतेन पेरर, मडकईहून कृष्णा गावडे, शिरोड्याहून आग्नेल डिकॉस्ता, सांगेहून पंढरी पुंडलिक नाईक, रिवणहून घुगरो गांवकर, काणकोणहून सुरेश काणकोणकर, केपेहून डॉमनिक फर्नांडिस, कुंकळीहून मोतीलाल रघुनाथ नाईक देसाई, बाणावलीहून चर्चिल आलेमांव, नावेलीहून लुईझिन फालेरो, कुडतरीहून कायतान मार्सेलिन, कुठ्ठाळीहून आलेस डिसिल्व्हा, दाभोळीहून विश्वनाथ आर्लेकर, मुरगांवहून कायतान दोरादो, असे त्यांचे उमेदवार होते. सौ. शशिकला काकोडकर यांच्या भाबांगो पक्षाने पेडणेहून देऊ मांद्रेकर, मांद्रेहून राजेंद्र देशप्रभू, शिवोलीहून श्याम कळंगुटकर, कळंगुटहून तुळशीदास तेली म्हापशाहून चंद्रकांत कोचकर, थिवीहून

अनील हळर्णकर, डिचोलीहून अनंत तेली, पाळीहून लक्ष्मीकांत शेणवी सुर्लकर, सत्तरीहून अच्युत शेणवी उसगांवकर, पणजीहून प्रभाकर सिलीमखान, कुंभारजुवेहून विनायक चोडणकर, सांत आंद्रेहून गणेश पोपट काणकोणकर, मडकईहून शशिकला काकोडकर, फोंड्याहून रामचंद्र तुकाराम प्रभू, शिरोड्याहून जयकृष्ण शिरोडकर, सांगेहून मधु नागू गांवकर, रिवणहून दिनानाथ फळदेसाई, काणकोणहून शशिकला काकोडकर,केपेहून विठोबा नागू तांडेल, नावेलीहून गोकुळदास शिरोडकर, कुठ्ठाळीहून वासुदेव वेर्णेकर, दाभोळीहून शंकर साळगांवकर, मुरगांवहून विल्फ्रेड मिस्कीत असे उमेदवार उभे केले. गोमंत लोकपक्षाने मांद्रेहून अर्जुन फडते, शिवोलीहून गोपीनाथ परुळेकर, थिवीहून आग्नेल फेर्रांव, सांताक्रुजहून रवींद्र खांडेपारकर, सांत आंद्रेहून दिलीप काणकोणकर, फोंड्याहून अँथनी फोसेंका, शिरोड्याहून लक्ष्मण भिकू नाईक, काणकोणहून मार्टीन फर्नांडिस, बाणावलीहून फ्रान्सिस रोड्रीग्ज, कुठ्ठाळीहून आंतोनिय फर्नांडिस, दाभोळीहून लुईजा जेराल्ड पेरेर आणि मुरगांवहून व्हिक्टर डायस असे उमेदवार उभे केले.

इ. स. १९८४ च्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे मांद्रेहून रमाकांत खलप, म्हापशाहून चंद्रकांत दिवकर, कुंभारजुवेहून डॉ. काशीनाथ जल्मी, मडकईहून बाबुसो गांवकर, रिवणहून प्रकाश वेळीप, कळंगुटहून श्रीकांत मळीक, शिवोलीहून अशोक नाईक व फोंड्याहून रवी नाईक असे आठ उमेदवार निवडून आले. इंदिरा काँग्रेस पक्षाचे पेडणेहून शंभू भाऊ बांदेकर, थिवीहून दयानंद नार्वेकर, पाळीहून चंद्रकांत वेरेकर, सत्तरीहून प्रतापसिंह राणे, पणजीहून जे. बी. गोन्साल्विस, सांत आंद्रेहून श्रीपाद कुंकळीकर, शिरोड्याहून सुभाष शिरोडकर, डिचोलीहून हरीश झांट्ये, मुरगांवहून शेख हसन, बाणावलीहून मोंत क्रुझ, कुडतरीहून फ्रान्सिस सार्दिन, कुंकळीहून मानु फर्नांडिस, सांगेहून पांडू वासु नाईक, केपेहून वैकुंठ देसाई, काणकोणहून वासु पायक गांवकर, दाभोळीहून सायमन डिसोझा व कुठ्ठाळीहून डॉ. बार्बोझा असे सतरा उमेदवार निवडून आले. गोवा काँग्रेसचे नावेलीहून लुईझिन फालेरो निवडून आले तर अपक्ष म्हणून सांताक्रुजहून फ्रान्सिस ब्रांको आणि मडगांवहून उदय भेंब्रे निवडून आले. मतदारानी ही अशी विभागणी केली होती. इंदिरा काँग्रेस पक्षास बहुमत मिळाल्यामुळे इंदिरा काँग्रेसचे सरकार गोव्यात आले व प्रतापसिंग

राणे मुख्यमंत्री झाले. नायब राज्यपाल डॉ. गोपालसिंग म्हणाले, ''प्रथमच राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहात गोवा सामील झाला. राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील प्रयत्नासाठी धर्म, जात आणि प्रादेशिक अधिष्ठान तत्व गोव्याने झुगारून दिले'' राष्ट्रीय पक्षाला सत्तेवर आणून गोव्यातील जनतेचे स्वतःच राष्ट्रीय प्रवाहात झोकून दिले हे खरे पण राष्ट्रीय प्रवाहातील काही अनिष्ट प्रवाह गोव्याच्या प्रवाहात मिसळले गेले. अर्थात प्रगतीबरोबर लोकसंख्येची वाढ, झोपडपट्टींच्या समस्या, बेरोजगार, संप हे प्रकार येणे अपरिहार्य होते.

गोवा विधानसभेत सौ. संगीता परब, सौ. सुलोचना काटकर व श्रीमती फिलिक्स फारीया या तीन महिलांची नियुक्ती करण्यात आली. विरोधकानी या नियुक्तीवर आक्षेप घेतला. सभापती म्हणून श्री. दयानंद नार्वेकर व उपाध्यक्षपदी डॉ. सोळंकी यांची निवड झाली.

गोव्यात जंगलतोड बेसुमार प्रमाणात वाढत होती. सुदैवाने सुंदरलाल बहुगुणा गोव्यात आले व त्यानी गोमंतकीयांची कान उघडणी केली. गोव्याच्या निसर्गरम्य वातावरणाने येथील कलाकारांच्या कलाविकासाला चालना मिळाली व या भूमीने देशाला तलामभूत ठरलेले गायक, वादक व चित्रकार पुरवले. गोव्याचीही परंपरा अखंड चालू रहाण्यासाठी येथील निसर्गसौंदर्याचा –हास आवरणे महत्वाचे आहे असे ते म्हणाले.

गोव्यातील नगरपालिका पक्षीय पातळीवरून न लढवण्याचा निर्णय गोवा प्रदेश इंदिरा काँग्रेस समितीने घेतला. कोकणी लेखक संमेलन रामानंद सागर यानी आपल्या विचारानी समृद्ध केले. भाषा जिवंत व समर्थ बनवणे ही जबाबदारी लेखकाची आहे असे स्पष्टपणे त्यानी सांगितले. नगरपालिका निवडणुकामध्ये काँग्रेसप्रणीत आघाड्याना कुठेच बहुमत मिळाले नाही. नागरी आघाड्या मडगांव, केपे नगरपालिकेमध्ये यशस्वी झाल्या. पणजी नगरपालिका बाशिक गटाने जिंकली. जुलै १९८५ मध्ये गोवा विद्यापीठ सुरू झाले. या वर्षी रिक्षा व मोटारीना मीटर बसवण्याचे ठरले. पण तो निर्णय लांबणीवर टाकण्यात आला. गोव्याचे नामवंत स्वातंत्र्यसेनानी मराठीचे अभिमानी लक्ष्मीकांत भेंब्रे यांचे निधन झाले. पोर्तुगालला सुद्धा ज्यानी ज्ञान साधना केली तो ज्ञानतपस्वी गोमंतकीयाना सोडून गेला. त्याचे निधन म्हणजे गोव्यातील सांस्कृतिक जीवनाची हानी

म्हटली पाहिजे. नेमेची येतो मग पावसाळा या म्हणीप्रमाणे राणेवर अविश्वासाचा ठराव मांडला गेला व तो फेटाळण्यात आला.

या वर्षी कोकणी–मराठी वादाला सुरुवात झाली. कोकणीविषयक सरकारच्या आडमुठ्या धोरणाचा निषेध म्हणून कोकणी समर्थकांचा मोठा मोर्चा निघाला. त्या मोर्चाला उद्देशून मुख्यमंत्री म्हणाले, ''भाषिकवाद उकरून काढून नुकसानीची पुनरावृत्ती करू नका'' व त्यानी खोचक प्रश्न विचारला. ते म्हणाले, ''मुलांना अगोदर कोकणी शिकवा'' यानंतर इंदिरा काँग्रेस प्रदेश समिती आणि विधीमंडळ सदस्य यांच्या संयुक्त बैठकीत एक ठराव केला ''गोव्याची कोकणी तसेच दमण व दीवची गुजराथी राज्यभाषा करून मराठीला योग्य स्थान दिले जाईल'' असा हा ठराव करून सरकारने कोलीत दाखवून देवचारास ओढून आणला. या ठरावाने मराठी व कोकणी दोन्ही भाषिक वैतागले. कोकणीवाद्यानी सरकारला इशारा दिला. ''कोकणी राज्यभाषा, घटनेच्या आठव्या परिशिष्टात कोकणीचा समावेश आणि गोव्याचे घटक राज्य या तीन मागण्या येत्या नव्वद दिवसात नोव्हेंबरपर्यंत पूर्ण न केल्यास सत्याग्रह व इतर प्रकारचे आंदोलन सुरू केले जाईल'' असा हा इशारा 'कोकणी प्रजेचो आवाज कृती समिती' ने दिला. मराठीला दुय्यम स्थान कदापि सहन करणार नाही असे म्हणत मराठीप्रेमी कार्यकर्त्यांनी निषेध सभा भरवल्या, उपोषणे सुरू केली, मेळावे आयोजित केले. उत्तर गोव्यामध्ये निदर्शने सुरू झाली. आंदोलनामध्ये संयम पाळा, लोकभावनांची कदर राखू असे मुख्यमंत्री म्हणाले. मडगांव येथे भरलेल्या मराठीप्रेमी जनतेच्या मेळाव्याच्या वेळी विरोधकानी गडबड केली. मेळाव्याला येणाऱ्या प्रतिनीधींच्या वाहतुकीत अडथळे आणले. त्या गुंडगिरीचा निषेध म्हणून पुन्हा सभा झाल्या. गजानन रायकर म्हणाले, ''कोकणी आमच्या रक्तात आहे पण मराठीने आम्हास स्वातंत्र्य दिले.'' दरम्यान कोकणी प्रजेचो आवाज कृती समितीने दिलेल्या इशाऱ्याचा काल संपला. सत्याग्रह करण्याचे निश्चित झाले आणि १४ नोव्हेंबर १९८५ हा दिवस उजाडला.

''कोकणी प्रजेचो आवाज'' ने दिलेली मुदत १४ नोव्हेंबर १९८५ ला संपली. कोकणीवाद्यानी पणजी आझाद मैदानावर महामेळावा भरवला व त्यामध्ये कोकणी हीच राज्यभाषा झाली पाहिजे असा आग्रह धरला. ''कोकणी ही गोव्याची लोकभाषा. सगळे गोवेकर ही भाषा बोलतात व

समजतात. हिंन्दू, ख्रिश्चन आणि मुसलमान गोवेकरांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोकणी हे साधन झाले पाहिजे म्हणून आज नेहरू जयंतीदिनी १४ नोव्हेंबर १९८५ रोजी भरलेला हा गोवेकरांचा महामेळावा एकमुखाने मागणी करीत आहे की, कोकणी हीच संघप्रदेशाची राज्यभाषा झाली पाहिजे'' महामेळाव्यात हा ठराव संमत झाला. या ठरावात मराठीवाद्यांच्या ''उठा गोमंतकीयानो'' या घोषणेचा उपहास करण्यात आला होता. ''गोवेकर हा झोपून राहिलेला नाही त्याला उठा गोंयकरा अशी कोणीही साद घालण्याची गरज नाही.''

या मेळाव्याच्या दिवशी काही समाजकंटकानी पणजी शहरात हैदोस घातला. गुंडगिरी केली. मराठी राज्यभाषा प्रस्थापन समितीने गुंडगिरीचा निषेध केला. मराठीवाद्याना जाळा अशा दिलेल्या घोषणा प्रक्षोभक होत्या असे म्हटले. या गुंडगिरीची न्यायालयीन चौकशी करा अशी मागणी रमाकांत खलप यानी केली. पणजी येथे भरलेल्या कोकणी महामेळाव्याला उत्तर म्हणून मडगांव येथे मराठीप्रेमीनी प्रचंड मेळावा भरवला, परंतु कोकणी समर्थकानी या मेळाव्याला जाणाऱ्या टेम्पोना अडवले. दगडफेक केली आणि मेळावा यशस्वी होऊ नये म्हणून प्रयत्न केले. मराठी व कोकणी या दोन्ही भाषेच्या समर्थकानी आपापले विचार मांडावयास सुरुवात केली. भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी मराठीही राज्यभाषा हवी असे प्रतिपादन करण्यात येऊ लागले. दोन्ही भाषांच्या आत्यंतिक अभिमान्यानी गोव्याची शांतता बिघडवून टाकली. याला उपाय म्हणून नायब राज्यपालानी गोमंतकीय नेत्याना बोलावून आणले व त्यानी संयुक्तपणे जाहीर निवेदन केले. ''कोणत्याही 'बंद'चे आवाहन करणार नाही, कोणतेही 'रास्ता रोको', आंदोलन करणार नाही, कोणत्याही विशिष्ट भाषेसंबंधात यापुढे निदर्शने करणार नाही' इतर बाबीप्रमाणे भाषेच्या प्रश्नासाठी निर्णय विधानसभेत केला जाईल'' असे ते निवेदन होते. सुलोचना काटकर, रमाकांत खलप, लुईझिन फालेरो, उदय भेंब्रे, डॉ. विली डिसोझा, गोविंद पानवेलकर व बाबन नाईक या मान्यवंताच्या सह्या होत्या. कोकणी भाषेचा आवाज आणि मराप्रस या दोन्ही संघटनांच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांच्या सह्या या निवेदनाखाली नव्हत्या.

गोव्यातील शांतता बिघडू नये म्हणून आर्चबिशप पात्रियार्क यानी गोव्याच्या जनतेला आवाहन केले. आवाहनात त्यानी म्हटले की गोव्यातील

सर्व बंधुभगिनीमध्ये परस्पर विश्वासाचे, सामंजस्याचे वातावरण निर्माण व्हावे यासाठी आम्ही अंतःकरणापासून परमेश्वराची प्रार्थना करून त्याच्या कृपेची अपेक्षा करतो. आर्चबिशप पात्रियार्कच्या या आवाहनाला सर्वधर्मीय विचारवंतांचा चांगला प्रतिसाद मिळाला. राजकीय नेत्यांच्या आवाहनाला कोकणी आणि मराठी समर्थकानी प्रतिसाद दिला नाही. दोन्ही भाषिकामध्ये संघर्ष होऊ लागले. गुंडगिरीचा निषेध म्हणून पणजी, फोंडा, शिरोड्यात 'बंद' कार्यक्रम झाला. हा बंद शांततापूर्ण होता. याच सुमारास घटक राज्याचा प्रस्ताव सरकारिया आयोगापुढे मांडण्यात आला. मराठी राज्यभाषा व्हावी म्हणून सर्व तालुक्यातून निवेदने सादर करण्यात आली. १९ डिसेंबर १९८५ रोजी राजीव गांधी गोव्यात आले. मुक्ति लढ्यातील एकात्मतेची जाणीव कायम ठेवा असा संदेश त्यानी दिला. राष्ट्रीय एकात्मता बाजूलाच राहिली. भाषिक एकात्मता त्यावेळी गोव्यात नव्हती. एकमेकाविरुद्ध आकस होता, गैरसमज होता, तेढ होती. ही तेढ वाढत होती.

पोप जॉन पॉल हे भारतात आले. भारताच्या भूमिवर पाऊल टाकल्याबरोर त्यानी भारतभूमीचे चुंबन घेतले. गोवा प्रदेश हा सुंदर प्रदेश आहे आणि गोव्यातील लोक आनंदी आहेत या शब्दात पोपनी गोव्याची स्तुती केली.

गोव्यातील शांतता बिघडली होती. गोवा विधानसभेचे अधिवेशन सुरू होणार होते. या प्रसंगी मोर्चा निघणार अशी बातमी होती. पुन्हा प्रसंगी मोर्चा निघेल व पुन्हा शांतता बिघडेल यामुळे गोव्यातील साऱ्या दैनिकाच्या संपादकानी जनतेला शांतता पाळण्याचे आवाहन केले. पण त्याचाही उपयोग झाला नाही. कोकणी समर्थकांचा मोर्चा निघाला. गुंडानी पाईपलाईन ताब्यात घेतली. कदंब बसेस जाळण्यात आल्या. दहशत निर्माण झाली. पुन्हा वातावरण पेटले. याच धामधुमीत चार्लश शोभराज 'ओ कोकेरो' या पर्वरीच्या हॉटिलमध्ये पकडला गेला. त्याच्या सहकाऱ्यालाही पकडण्यात आले. दिल्लीच्या तिहार जेलमधून शोभराज पळाला होता. या कालावधीत साहित्य क्षेत्रात लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या निधनामुळे पोकळी निर्माण झाली. सामाजिक क्षेत्रातील महत्वाची घटना म्हणजे गोमंतक मराठी समाजाच्या हिरक महोत्सव होय. गोव्यातील इतिहासात वेगळे स्थान निर्माण करणारी ही संस्था आहे अशा शब्दांत

मुख्यमंत्री राणे यानी संस्थेचा गौरव केला. गोव्याच्या इतिहासातला हा कटुतेचा काळ संपला पाहिजे अशीच सदिच्छा बहुतेकानी प्रगट केली.

इ. स. १९८६ हे वर्ष गोव्याच्या इतिहासांत हिंसाचाराचे वर्ष म्हणून मानायला पाहिजे. गोव्याच्या संपत्ती आणि समजूतदार संस्कृतीला गालबोट लागणाऱ्या घटना या वर्षात घडल्या. यामध्ये दोष कुणाला द्यायचा ? कोकणी वादी लोकाना ? की मराठीवादी लोकाना ? यावर्षी जे हिंसाचार झाले, हैदोस झाला तो सारा अनिष्ट प्रकार तात्विक दृष्ट्या विचार करणाऱ्या कोकणीवाद्यानी अगर मराठीवाद्यानी केला नव्हता. त्या त्या भाषा अभिमानी समाजकंटकाकडून झाला होता व त्यामध्ये भाषेतील अभिमानी बुडून गेले होते. आपल्या डोळ्याना त्यानी पट्ट्या बांधल्या होत्या.

त्या वर्षातील राजकीय नेत्यांची वक्तव्ये आणि निवेदने पाहिली की गंमत वाटते. हरीश झांट्ये म्हणाले, ''मी जन्माने महाराष्ट्रीय. मराठीप्रेमी असताना मराठीला विरोध कसा करीन ?'' कोकणवाद्यानी वैकुंठ देसाई यांच्या केबिनमध्ये ज्यावेळी घोषणा दिल्या तेव्हा घोषणावाल्याना ''संयम पाळा'' असे चर्चिल आलेमांवनी म्हटले, असे सरकारी प्रवक्त्याने त्यावेळी म्हटले. वैकुंठ देसाई कोकणी शिष्टमंडळाशी अशिष्टपणे वागले असे निदर्शकानी म्हटले तर आपण फारच संयम दाखवला असे वैकुंठ देसाई यानी म्हटले.

मे १९८६ रोजी एदुआर्द फालेरो याना केंद्रीय मंत्रिमंडळात परराष्ट्र व्यवहार खात्याचे राज्यमंत्री म्हणून घेण्यात आले. तेव्हा गोव्यात आनंदाचे स्वर उमटले. एदुआर्द फालेरो यानी यु. गो. पक्षाचे सदस्य म्हणून राजकारणात प्रवेश केला. १९७२ मध्ये कुडतरी मतदारसंघात ते निवडून आले. १९७५ ते ७७ मध्ये ते विरोधी पक्ष नेते होते. नंतर ते लोकसभेमध्ये निवडून आले. १९७८ मध्ये आंतरराष्ट्रीय संसदीय परिषदेमध्ये त्यानी भारताचे प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे लोकांनी अभिनंदन केले. काँग्रेसवाल्यानी त्यांचा सत्कार केला. सत्काराच्या वेळी युवक नेते मावीन गुदिन्हो यानी फालेरो याना कोकणीबद्दल प्रयत्न करा अशी सूचना केली. त्याबरोबर शंभराहून जास्त मराठीवादी काँग्रेसजन उठले व त्यानी मराठीच्या घोषणा दिल्या. एदुआर्द फालेरो म्हणाले, ''आपण सारे काँग्रेसजन आहोत. आपले मतभेद विचारविनिमय करून सोडवले

पाहिजेत.'' व त्यानी भाषिक वादाने मते दुभंगू देऊ नका असे आवाहन केले. एदुआर्द फालेरो यानी भाषेसंबंधी घेतलेले धोरण संयमी होते आणि सामंजस्याचे होते. पण दोन्ही भाषेच्या समर्थकानी आपली बाजू मांडताना शांतता स्वीकारली नाही.

कोकणीवाद्यानी आगशी या आपल्या बोलेकिल्ल्यातून आंदोलन सुरु केले. मागील अनुभवावरून आता शांतता बिघडेल अशी भीती सुजाण नागरिकाना वाटली व त्यानी शांतता पाळा असे आवाहन करायला सुरुवात केली. पण कोकणीवाद्यानी आगाशी वाटा रोखून दगडफेक करायला सुरूवात केली. लाठीमार झाला, अश्रुधूर सोडण्यात आला, दगडफेकही झाली. याच गडबडीत सरकारने जाहीर केले की, राज्यभाषा म्हणून देवनागरी कोकणी राहील. राज्यभाषा न करता मराठीला अधिकार दिले जातील. सरकारी प्रकाशानेही मराठीत प्रसिद्ध केली जातील. सरकारचे हे धोरण जाहीर होताच ही काँग्रेसची मृत्युंघंटा आहे असे रमाकांत खलप यानी जाहीर केले. केवळ कोकणी हा बहुजनसमाजाचा अपमान आहे असे आमदार वासु पायक गांवकार यानी म्हटले. फक्त केवळ कोकणी ही राज्यभाषा होईल. असे म्हटल्याबरोबर मराठी समर्थकानी रस्ते रोखले, वाहनांची मोडतोड केली. शिरोडा येथे एक बस व दोन जीप जाळण्यात आल्या. भाषावादाचे आंदोलन दोन्ही बाजूने सुरू झाले. मराठीच्या चळवळीला जोर येण्यासाठी सौ. शशिकला यानी बिनशर्त म. गो. मध्ये प्रवेश करण्याची इच्छा प्रदर्शित केली. या गडबडीत हे वादग्रस्त भाषाविषयक विधेयक मुख्यमंत्र्यानी बनवले आहे असे शेख हसन म्हणाले. राज्यभाषाविधेयकास विरोध करण्यासाठी सुभाष शिरोडकर, वासु पायक गांवकर, शंभू भाऊ बांदेकर, चंद्रकांत वेरेकर, पांडू वासु नाईक, जीवनभाई प्रभाकार व सौ. संगीता परब व सोळंकी असे आठ आमदार सज्ज झाले. धडक मोर्चा मराठी प्रेमिकानी काढला. हे आठ आमदार व हरीश झांट्ये यानी दोन्ही भाषाना समान हक्क दिला पाहिजे असे आपले धोरण स्पष्ट केले दोन्ही भाषासमर्थकानी एकमेकावर आरोप केले. मराठी समर्थकाना महाराष्ट्र पैसे देते तर कोकणी समर्थक दुबई–कुवेतवरुन पैसे आणतात असे एकमेकांवर आरोप झाले. दोघानीही आरोपांचा इन्कार केला. वास्को येथे कोकणी समर्थकानी दंगल घडवली. मराठीवाद्यावर हल्ले होऊ लागले. मराठीचे आंदोलन प्रखर करण्यासाठी एकोपा आवश्यक आहे

ही जाणीव घेऊन शशिकला काकोडकरवरील शिस्तभंग कारवाई रद्द करण्यात आली. म. गो. मध्ये भाबांगो विलीन झाला.

एकोणीस डिसेंबर मुक्तीदिनी राष्ट्रपती झैलसिंग आले तेव्हा कोकणी समर्थकानी आपले आंदोलन तीव्र केले. राष्ट्रपती झैलसिंग म्हणाले, ''घटक राज्य मिळेल, राज्यभाषेचा प्रश्न सुटेल. पण संयम आवश्यक आहे.'' पण संयम पाळायचे कुणी ? असा प्रश्न निर्माण झाला. दक्षिण गोव्यात हुल्लडबाजी वाढली. पोलीस स्टेशनवर हल्ले झाले, रेल्वे पूल उखडले गेले, पाण्याचा पाईप फोडला गेला, दुकाने फोडली गेली, नेवरा–डोंगरी भागात दोन गटामध्ये चकमकी उडाल्या. दोन बळी पडले. या भाषिक आंदोलनात बळी पडलेल्या माणसाची संख्या सात झाली. भाषिक दंगली वाढू लागल्या. भाषा प्रश्नावर निवडूका घ्या, मतदार देतील तो कौल आम्ही शिरोधार्थ मानू असे खलप म्हणाले. २५ डिर्सेबर ८६ रोजी शेख हसन, झांट्ये, सार्दिन व बार्बोझा यानी राजीनामे दिले. पण हे राजीनामे म्हणजे 'फार्स' आहे असे वासु पायक म्हणाले.

गोव्याच्या स्वातंत्र लढ्याचा इतिहास हा प्रा. मनोहर हिरबा सरदेसाई यानी लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध झाला. ५ जुलै १९८६ रोजी मांडवी पूल कोसळला आणि प्रवाशांच्या त्रासाला सीमा राहिली नाही. मांडवी पूल कोसळणे हा एक भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. तो व्यवस्थित बांधला गेला नाही अशी टीका होऊ लागली. चौकशी समितीमार्फत या प्रश्नाचा शोध घेण्यात येईल असे जाहीर झाले. थोर स्वातंत्र्यसेनानी टी. बी. कुन्हा यांच्या पार्थिव देहाचे अवशेष आझाद मैदानावर ठेवण्यात आले. राष्ट्रपती झैलसिंग यांच्या हस्ते लता मंगेशेकर यांचा सत्कार झाला. या प्रसंगी झैलसिंग म्हणाले, ''श्रीकृष्णाच्या मुरलीच्या धूनवर गोकुळातील गोपी जशा आपले देहभान विसरून जात तशी जादू लताजींच्या आवाजात असून त्यांचा मधूर स्वर ही ईश्वराने जगाला दिलेली देणगी आहे.'' झैलसिंग या प्रसंगी छान बोलले. लताजींचे सुरेख वर्णन त्यानी केले. १९८६ हे गोमंतकीयांची झोप मोड करणारे वर्ष ठरले. भाषिक वादामुळे शेजारधर्म विसकटला. दोन धर्मीय दुरावू लागले. येत्या वर्षात हे हिंसाचार चालू रहातील ही भीती लोकाना वाटू लागली. या दोन्ही भाषिकाना कुणीतरी जवळ आणायला हवे होते. तसे ते झाले नाही आणि १९८७ साल उजाडले.

राणे मंत्रिमंडळातील चार मंत्र्यानी २६ डिसेंबर १९८६ रोजी दिलेले

राजीनामे हा एक फार्स आहे असे वासु पायक यानी म्हटले ते अखेर खरे ठरले. या मंत्र्यानी राजीनामा पाठवून दिला व कामकाजावर बहिष्कार घातला. मंत्र्यांची कामे ते करेनासे झाले. त्या त्या मंत्र्यांची खाती मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यानी आपल्याकडे घेतली व या मंत्र्याना काढून टाका अशी मागणी श्रेष्ठीकडे केली. या पेचप्रसंगावर तोडगा काढण्यासाठी आर. एस्. भाटीया व चिंतामणी पाणीग्रही निरीक्षक म्हणून आले. खासदार शांताराम नाईक यानी मध्यस्थी केली. श्रेष्ठींचा आदेश आला व चारही मंत्र्यानी राजीनामे मागे घेतले. विरोधकानी राजीनामा हा एक फार्स होता अशी टीका सुरु केली. दरम्यान, कोकणीसाठी आंदोलन सुरू होते. राष्ट्रध्वजाचा अपमान श्री. चर्चिल आलेमाव यानी केला अशी बातमी पसरली. राष्ट्रवादी जनता संतप्त झाली. स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटनेने या प्रकारचा निषेध केला व चर्चिल आलेमांव अजून पकडले गेले नाही याचे आश्चर्य व्यक्त करण्यात आले. राष्ट्रध्वजप्रकरणी चर्चिल आलेमाव याना अटक न केल्यास आपण उपोषण करू असे स्वातंत्र्य सैनिक श्रीमती लॉरा डिसोझानी जाहीर केले. दुसऱ्या आघाडीवर महाराष्ट्रवादी गोमंतक व भाबांगोचे अधिकृतरीत्या विलीनीकरण झाले.

कोकणी समर्थक व मराठी समर्थक यांच्या शाब्दीक चकमकी चालू होत्या. महाराष्ट्रातून पैसा आणला हे सिद्ध झाल्यास मी राजीनामा देईन असे आमदार डॉ. जल्मी यानी जाहीर केले. मराठी व कोकणी या दोन्हीना राज्यभाषेचा दर्जा देणे हाच तोडगा आहे असे जाहीर झाले. कोकणी हीच राज्यभाषा आहे असे जाहीर केल्याने गोव्यात ख्रिश्चनांचा छळ चालला आहे असे गोवा काँग्रेसचे सरचिटणीस लुईझिन फालेरो यानी सांगितले. कोकणीच्या बाजूने आपले मत जाहीर केल्याबद्दल स्थानिक जनता पक्ष समितीचे फर्दीन रिबेलो यांची उचलबांगडी केली. भाषावादाचे परिणाम प्रत्येक पक्षावर आणि प्रत्येक नेत्यावर होऊ लागले.

४ फेब्रुवारी १९८७ रोजी गोवा विधानसभेत भाषा विधेयक घाईघाईने मांडण्यात आले व २१ विरुद्ध ८ मतानी संमत करून घेण्यात आले. कोकणीला राज्यभाषेचा दर्जा आणि गोव्यासाठी मराठी व दमण दीवसाठी गुजराथी व सर्व शासकीय कामकाजासाठी वापर करण्याच्या तरतुदींची दुरुस्ती करुन जुलै १९८६ मध्ये मांडलेले विधेयक २१ विरुद्ध ८ मतानी संमत करण्यात आले.

विरोधी मत देऊन म. गो. सदस्यानी सभात्याग केला. सरकारने मागील दाराने मराठीची सक्ती विधेयकाद्वारा केल्याचा आरोप करुन लईझिन फालेरो यानी सभात्याग केला. आमदार उदय भेंब्रे व फ्रांन्सिस ब्रांको यानीही मराठीसाठी केलेल्या तरतुदीच्या निषेधार्थ सभात्याग केला. कोकणीला राज्यभाषेचा दर्जा दिल्यास मराठीवर आक्रमण होईल किंवा मराठीवर परिणाम होईल ही भीती अनाठायी आहे असे मुख्यमंत्री राणे म्हणाले. मराठी जनतेचा हा विश्वासघात आहे असे सौ. शशिकला काकोडकर म्हणाल्या. हे तर कुटील कारस्थान आहे असे मराठी राज्यभाषा प्रस्थापन समितीच्या प्रवक्त्यानी-म्हटले.

गूपचूप हे विधेयक संमत करून घेतल्याबद्दल मराठी जनतेने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. पेडणे बंद झाला. उत्तर गोव्यात बस वाहतूक बंद पडली. पेडणे–कोलावळ जवळजवळ चार दिवस बंद राहिले. कोकणी व मराठी या दोन्ही भाषासमर्थकांचे समाधान या विधेयकाने झाले नाही तरी राज्याभाषा समस्येवर तोडगा काढल्याबद्दल राजीव गांधी यांची प्रशंसा गोवा प्रदेश इंदिरा काँग्रेस समितीने केली. व घटक राज्य द्या अशी विनंती केली. म्हापसा मराठी साहित्य संमेलनात कोकणी–मराठी भाषाभगिनींची ताटातूट करु नका असे रणजीत देसाई म्हणाले व त्यानी मराठी समर्थकांची नाराजी अंगावर ओढून घेतली. गोव्यात लौकरच घटक राज्य मिळेल अशी घोषणा गृहराज्यमंत्री चिंतामणी पाणीग्रही यानी केली. घटक राज्याची चर्चा करण्यासाठी गोव्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ राजीव गांधीना भेटायला गेले. तिथे चर्चा झाली. ८ मे रोजी गोव्याचे घटक राज्य व दमण दीवचा संघप्रदेश बनवण्यासंबंधी विधेयक मांडले गेले. ५७ वी घटना दुरुस्ती विधेयक १९८७ मांडले गेले. राज्यासंबंधी आपले विचार मांडताना अर्थतज्ञ प्रभाकर आंगले म्हणाले, ''शंभर कोटी रुपयांची तूट कशी भरुन काढायची याचा विचार झाला पाहिजे'' या विधेयकात चाळीस आमदारांची तरतूद झाली. पण गोवा राज्यात साठ आमदार असावेत असे इराज्मू सिकेर म्हणाले. गोवा काँग्रेसने पण साठ आमदारांची सूचना केली. विधेयकाला ३१५ खासदारानी पाठिंबा दिला. 'देशाचा या एका सुंदर प्रदेशात हे सुंदर लोक रहात आहेत'' या शब्दात पंतप्रधान राजीव गांधीनी गोव्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. घटक राज्य अधिकृतरीत्या कधी सुरू करायचे एवढीच काय ती बाब राहिली होती.

अखेर गोव्याला घटक राज्याचा दर्जा देणारे घटनादुरुस्ती विधेयक संसदेमध्ये एकमताने मंजूर झाले. गोव्याच्या तमाम जनतेचे स्वप्न पूर्ण झाले. गोवा मुक्त झाला तेव्हा गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या राजकीय पक्षाला बहुमताने गोमंतकीय जनतेने निवडून दिले व महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष सत्तेवर आला. सत्तेवर आल्यानंतर त्वरित राजीनामे द्यायचे आणि पेचप्रसंग निर्माण करायचा अशी ''ट्रॅजडी'' म. गो. पक्षाने आखली होती. तसे झाले नाही. त्या पक्षाने राजसत्ता राबवली. विलीनीकरणाविरोधी अशा युनायटेड गोवन्स पक्षाच्या हाती सत्ता आली नाही. सत्ता त्याना हुलकावणी देतच राहिली अखेर विलीनीकरण की संघप्रदेश यासाठी ''ओपिनियन पोल'' घेण्यात आला व गोमंतकीय जनतेने संघप्रदेशाच्या दिशेने आपला कौल दिला. गोव्याचे राजकारण म. गो. आणि यु. गो. या दोन स्थानिक पक्षांच्या चक्रात फिरत होते. चक्राच्या केंद्रस्थानी भाऊसाहेब बांदोडकर आणि डॉ. जॅक सिकेरा असेच होते. बहुजनसमाज भाऊसाहेबाना देव मानत होता. भाऊसाहेबांच्या निधनानंतर म. गो. पक्षाच्या लोकप्रियतेला ओहोटीही लागली. गोव्यामध्ये कॉंग्रेस पक्ष रुजू लागला, त्यातील एक कारण म्हणजे कॉंग्रेस पक्षात आणि लोकदलामध्ये सामील करण्याचे बाबू नायक आणि इराज्मू सिकेरा यांचे निर्णय. म. गो. नेत्यांच्या लोकप्रियतेला लागलेली ओहोटी हेही एक कारण होते. कॉंग्रेस आणि म. गो. अशा दोन पक्षाना गोव्यात लोकप्रियता लाभली. दोन्ही पक्षानी घटक राज्याची मागणी केली आणि शेवटी घटक राज्य मिळाले. ३० मे १९८७ रोजी गोव्याला घटक राज्याचा दर्जा देण्याचे ठरले. त्यादिवशी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते हा सोहळा होणार होता. परंतु २९ मे रोजी चरणसिंग यांचे निधन झाले. देशभर सुतक पाळण्यात आले. आणि ३० मे रोजी पंतप्रधान येणार होते तो कार्यक्रम पुढे ढकलला. २ जून १९८७ ही तारीख ठरली. ३० मे रोजी होणारा राज्योत्सव रद्द झाला. पण भारतीय प्रजासत्ताकाचे २५ वे राज्य म्हणून गोव्याच्या पहिल्या मंत्रिमंडळाचा शपथविधी करण्याचे ठरले. गोव्यातील साऱ्या जनतेला आनंद झाला. म. गो. चे नेते रमाकांत खलप यानी पण आनंद व्यक्त करून म्हटले, ''राज्याचा दर्जा मिळाला असला तरी गोव्याच्या आर्थिक स्वायत्ततेबद्दल गोमंतकीयांच्या मनात बऱ्याच शंका आहेत.''

केंद्र सरकारने ठोस आश्वासन दिलेले नाही असे असले तरी स्थानिक

सत्ताधारी नेते गोव्याला खास दर्जाचे राज्य दिले जाईल असे आश्वासन देत होते. योजना खर्चावर केंद्रीय कर्जावर तर बिगर नियोजन खर्चासाठी काही प्रमाणात केंद्रीय अनुदानावर गोव्याला अवलंबून रहावे लागते. महसूल व खर्चातील मोठ्या प्रमाणातील तफावत कशी दूर केली जाईल ही एक समस्या होती. रमाकांत खलप म्हणाले, ''गोव्यातील पाटबंधारे प्रकल्पाचे बांधकाम रेंगाळत आहे. परिणामी खर्च १५ ते २० पटीने वाढला आहे. गोव्यातील प्रमुख पूल कोसळणार आहेत. गोव्यातील साखर कारखाना, मच्छिमारी महामंडळ, गोमांस प्रकल्प, राज्यसहकारी बँक आणि अन्य संस्था अनागोंदी कारभारामुळे गोत्यात आल्या असून त्याला गोवा सरकारचे धोरण कारणीभूत आहे. गोव्यातील बेरोजगारी वाढली असून पर्यटनामुळे ''एड्स''ची नवी डोकेदुखी गोमंतकीयाना सतावत आहे.

पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते घटक राज्य सोहळा मोठ्या दिखाखाने संपन्न झाला. पंतप्रधान म्हणाले, ''अलगअलग भाषा, धर्मांचे, जातीचे, प्रांताचे गोवेकर असून गोव्यात गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. या भावनिक एकात्मतेची देशाला आज अत्यंत गरज असून गोव्याने याबाबतीत देशापुढे एक आदर्श घालून दिला आहे, त्यानंतर राजीव गांधी यानी पत्रकार परिषद घेतली. त्यात ते म्हणाले, ''गोव्याला घटक राज्य मिळाले. अधिकाराबरोबर जबाबदारी वाढली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी गोव्यातील साधनसंपत्तीत वाढ होणे आवश्यक आहे.'' या पत्रकार परिषदेत कोंकणीवर अन्याय होत आहे असा प्रश्न एका पत्रकाराने विचारला तेव्हा ते म्हणाले, ''अहो दोनच महिने झाले कोंकणी राज्यभाषा होऊन एवढ्यातच तिच्यावर पक्षपात झाला असे म्हणता, आश्चर्य आहे.'' घटक राज्य निर्माण झाले आणि गोमंतकीय जनतेच्या आशाआकांशा पूर्ण झाल्या.

: अकरा :

भाषा प्रस्थापन, साहित्य संवर्धन

गोवा मुक्त झाल्यादिवसापासून कोकणी–मराठी वाद सुरू झाला. खरे म्हटले तर दोन्ही भाषांच्या समर्थकानी आपापल्या भाषांच्या प्रस्थापनेसाठी, संवर्धनासाठी आणि आग्रहासाठी वेगवेगळ्या मंचावर पण एकमेकांचा पाणउतारा न करता प्रचार करायला पाहिजे होता. पण तसे झाले नाही. मराठीवादी, कोकणीवाल्यांचा उपहास करू लागले तर कोकणीवाले, मराठीवाल्यांची टिंगल करू लागले. उपहास, टिंगल, चेष्टा यानी विरोधी पक्षाची मते जिंकली जात नाहीत हे दोघेही विसरले. भाषा विधेयकाच्या वेळी तर दोन्ही भाषिक दुराग्रही बनले. एकमेकावर शब्दांबरोबर दगडांचे प्रहार करू लागले. आज परिस्थिती थोडीशी बदलली आहे. गोव्यात कोकणी अकादमीबरोबर गोमंतक मराठी अकादमी स्थापन झाली आहे. दोन्ही भाषिकांची संमेलने भरत आहेत. दुर्दैवाने सरकार दरबारात अजूनही इंग्रजी भाषा मानाची जागा घेऊन बसली आहे. कोंकणी आणि मराठी भाषिक जर असेच विरोधी रूप घेऊन बसू लागले तर एक दिवस दोन्ही भाषा पुस्तकी स्वरुपात रहातील. व्यवहारामध्ये, सरकारी कामकाजामध्ये इंग्रजी भाषा मालकीण होईल.

कोकणी भाषिक एकाहून जास्त राज्यात पसरले असल्याने भाषा सुत्राच्या सहाय्याने त्याना एकत्र जोडण्याचे काम अखिल भारतीय कोकणी साहित्य परिषद करीत होती. पण कोकणी लेखकाना एकत्रित आणण्यासाठी एका व्यासपीठाची गरज होती. ती गरज कोकणी भाषा मंडळाने पुरी केली. भारतीय व अखिल कोकणी लेखक संमेलने भरू लागली. पहिले संमेलन १९६८ साली लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली भरले. बा. भ. बोरकर स्वागताध्यक्ष होते. दुसरे संमेलन रवींद्रबाब केळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तिसरे संमेलन उदय भेंब्रे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. ए. जॉर्ज स्वागताध्यक्ष होते. चौथे संमेलन रे. फा. आंतोनियु पेरेर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तर पां. पु. शिरोडकर हे स्वागताध्यक्ष होते. पांचवे संमेलन कोकणीचे कोशकार श्रीपाद रघुनाथ देसाई यांच्या अध्यक्षतेखाली भरले. सहाव्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा.

शांताराम हेदे हे होते. हल्ल्याळचे स्वामी सुप्रिय हे सातव्या संमेलनाचे अध्यक्ष होते. आठवे संमेलन दामोदर मावजो यांच्या अध्यक्षतेखाली भरले. एन्. शिवदास हे स्वागताध्यक्ष होते. या आठही संमेलनामध्ये संविधानाच्या आठव्या परिशिष्टात कोकणीचा अंतर्भाव करणे, भारतीय ज्ञानपीठसारख्या संस्थेने पुरस्कारासाठी कोकणी साहित्याचा विचार करण्याबाबतची मागणी करणे, गोव्याची राज्यभाषा म्हणून कोकणी करणे, पणजी आकाशवाणीवरची सारी निवेदने कोकणीत करण्याची मागणी, दूरदर्शनवर कोकणी कार्यक्रम प्रसारीत करण्याची मागणी, अशा विविध मागण्या करणारे ठराव या साऱ्या संमेलनामधून झाले. नवव्या संमेलनाचे अध्यक्ष चा. फ्रा. द कोस्ता हे होते. प्रा. अरुण साखरदांडे हे स्वागताध्यक्ष होते. राज्यभाषेचा मान कोकणीला मिळवून दिल्याबद्दल या संमेलनात गोमंतकीय जनतेचे अभिनंदन करण्यात आले. दहावे संमेलन गुरुनाथ केळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षा होत्या सौ. कमल पार्सेकर.

कोकणी भाषा मंडळ कोकणी भाषेच्या विकासाचे काम करीत होते. मुक्ततेनंतर कोकणी–मराठी वादामध्ये गोमंतकीय तरुणांची एक पिढी कोकणीच्या रक्षणासाठी तत्पर झाली. त्यांच्या निष्ठेने कोकणी भाषेला मानाचे स्थान मिळू लागले. १९७५ मध्ये केंद्रीय साहित्य अकादमीने कोकणी ही भारताची एक स्वतंत्र साहित्यिक भाषा अशी मान्यता दिली. साहित्य अकादमीची पारितोषिके कोकणीतून लिहिल्या गेलेल्या ग्रंथाना मिळू लागली. या साऱ्या चळवळीमुळे कोकणी भाषेचा आणि साहित्याचा सर्व अंगानी शास्त्रशुद्ध विकास व्हावा या हेतूने गोवा सरकारने १९८४ साली गोवा कोकणी अकादमीची स्थापना केली. कोकणी भाषेची वाढ व्हावी, तिचे साहित्य फुलून यावे आणि त्या साहित्यामधून गोव्याच्या संस्कृतीचे दर्शन व्हावे, सगळ्या शास्त्रांचे ज्ञान शक्यतो लवकर कोकणीत आणावे. तत्वज्ञानापासून विज्ञानापर्यंतचे शिक्षण देण्याचे सामर्थ्य कोकणीला यावे, जगातील साऱ्या भाषातील आणि भारतीय भाषातील अभिजात साहित्य कोकणीत भाषांतर व्हावे आणि त्या साहित्यातून कोकणी साहित्याला नवी दिशा प्राप्त व्हावी यासाठी कोकणी अकादमीची स्थापना झाली. अकादमीचे प्रत्यक्ष कार्य १९८६ पासून सुरू झाले. कोकणीचे कार्य जोरात चालावे या दृष्टीने अकादमीमध्ये सहा विभाग केले व एकेक विभाग

एक एका मान्यवराकडे सोपवला. १) भाषाशास्त्र डॉ. काशिनाथ महाले, २) कोशशास्त्र पांडुरंग भांगी, ३) संगीत पं. जीतेंद्र अभिषेकी, ४) लोकवेद डॉ. मनोहरराय सरदेसाई, ५) साहित्य रवींद्र केळेकर व ६) शिक्षण आणि साहित्य प्रा. जॉन कुरैय आफोंस. कोकणी अकादमीने कोकणी शब्दसागराचा प्रकल्प हाती घेतला आहे. गोव्यातील सण व लोककला यांच्या चित्रफिती तयार करून घेतल्या आहेत. रवींद्र केळेकर यानी लिहिलेले महाभारत प्रकाशित व्हायला अकादमीने सहाय्य केले आहे. कोकणी अकादमीने बालमेळावे घडवून आणले आहेत. कोकणी भाषा विज्ञानविषयक त्रैमासिक प्रसिद्ध केले आहे. साहित्याचे चार मेळावे आयोजित केले आहेत. अशा विविध कार्यक्रमानी कोकणी अकादमी समृद्ध झाली आहे.

गोव्याला घटक राज्य मिळावे, कोकणी ही एकमेव राज्यभाषा व्हावी, आठव्या परिशिष्टात समावेश व्हावा या हेतूने पुंडलिक नायक या नामवंत कोंकणी लेखकाच्या नेतृत्वाखाली 'कोकणी प्रजेचो आवाज' ही संघटना स्थापन झाली. आपली उद्दिष्टे साध्य होईपर्यंत ही संघटना कार्यरत रहाणार पण उद्दिष्टे साध्य झाल्यानंतर या संघटनेचे विसर्जन होईल, असे निवेदन पुंडलिक नायक यानी केले. स्वराज्य प्राप्तीनंतरसुद्धा काँग्रेस राहिली तसा प्रकार आम्ही करणार नाही असे पुंडलिक नायक म्हणाले. भाषा आंदोलनाध्ये कोकणी प्रजेचो आवाज या संघटनेचा सिंहाचा वाटा आहे. या संघटनेने तरुण वर्गाला आकर्षित करून घेतले. कोकणी आंदोलनाची मुहूर्तमेढ कोकणी प्रजेचो आवाज या संघटनेने घातली. पुंडलिक नायक, एन्. शिवदास, दत्ता नायक, दिलीप बोरकर यासारखे साहित्यिक या संघटनेचे नेतृत्व करीत होते; परंतु कोकणी प्रजेचो आवाज ही संघटना फार थोडा काळ त्यांच्या हातात राहिली.

आज कोकणी भाषेची चळवळ हिंदु बहुजनसमाजात रुळते आहे. साहित्य अकादमीचे पुरस्कार गोमंतकीय लेखकाना लाभत आहेत. रवींद्र केळेकर, द. के. सुखठणकर, र. वि. पंडित, मनोहरराय सरदेसाई, बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई, दामोदर मावजो, पुंडलिक नायक, जे. बी. मोरायश, प्रकाश पाडगांवकर, अ. ना. महांबरे, चंद्रकांत केणी, दी कॉस्त, रमेश वेळुस्कर आणि मीना काकोडकर हे साहित्य अकादमी पुरस्कार विजेते होत. मुक्तीनंतर कोकणी कविताचे प्रवाह दिसतात. पहिला

बाकीबाब यानी निर्माण केलेल्या गेय कवितांचा. त्यामध्ये गजानन रायकर, यशवंत केळेकर, उदय भेंब्रे हे कवी येतात. तर दुसरा प्रवाह मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेचा आणि तिसरा प्रवाह र. वि. पंडितांचा. याशिवाय पांडुरंग भांगी यांची कविता आत्मचिंतनाची. शंकर रामाणींच्या कविता विलक्षण ताकदीच्या. नव्या कवीमध्ये प्रकाश पाडगांवकर, रमेश वेळुसकर, माधव बोरकर, पुंडलिक नायक,अरुण साखरदांडे हे कवी आहेत. कथेमध्ये अग्रगण्य चंद्रकांत केणी. शिवाय सुमंत केळेकर, उदय भेंब्रे, सुरेश काकोडकर, अच्युत तोटेकर, गुरुनाथ केळेकर, दामोदर मावजो, शीला कोळंबकर, पुंडलिक नायक, मीना काकोडकर, दत्ता श्री. नायक, एन्. शिवदास हे नामवंत कथाकार आहेत. कादंबरीच्या बाबतीत कोकणी साहित्य समृद्ध नाही. पुंडलिक नायक यांचे 'अच्छव' आाणि दामोदर मावजो यांची 'कार्मेलीन' या दोन कादंबऱ्या लक्षणीय आहेत. रोमन लिपीमध्ये लिहिलेल्या तशा कादंबऱ्या फार आहेत पण त्यामध्ये साहित्यिक गुण असलेली एखादीच अपवादात्मक कादंबरी सापडेल. चिंतनशील लेखकांमध्ये रवींद्रबाब केळेकर, फादर पेरेर, लक्ष्मणराव सरदेसाई व बाकीबाब यांची गणना करावी लागेल. विनोदी लेखकामध्ये अ. ना. महांबरे, दत्ताराम सुखटणकर, लक्ष्मीनारायण पारज यांची नावे घ्यावी लागतील. कोकणी नाटकामध्ये पुंडलिक नायक, अनिरुद्ध बीर ऊर्फ उपेंद्र तिंबलो, दिलीप बोरकर, रवींद्र नमशीकर, दत्ता श्री. नायक, एन्. शिवदास, विनायक खेडेकर यांची नाटके नाट्यपूर्ण व लोकप्रिय ठरली. एकांकिकेच्या बाबतीत गोव्यातील तरुण लेखकानी कोकणीमध्ये बाजी मारली आहे. महाविद्यालयीन स्पर्धेत सादर करण्यात येणारी एकांकिका जास्त करून कोकणीच होतात. सुनापरान्त हे कोकणी दैनिक दिमाखाने प्रसिद्ध होऊ लागले.

मुक्तीनंतरच्या या पंचवीस वर्षात गोव्यातील मराठी साहित्याला उधाण आले. साहित्यातील सर्व अंगामध्ये ते बहरून गेले. मुक्तीपूर्व काळात गोव्यातील मराठी वाङ्मय समृद्ध नव्हते असा याचा अर्थ नव्हे. गोव्याचे टिळक म्हणून ज्यांचा गौरव झाला ते भारतकार हेगडे देसाई समर्थपणे पोर्तुगीज सत्तेशी झुंज देत होते. "भारत" या नियतकालिकातील त्यांच्या साहित्याला विलक्षण अशी धार होती. बा. भ. बोरकर, बा. द. सातोस्कर, जयवंतराव सरदेसाई, व्यंकटेश अनंत पै

रायकर, वि. स. सुखठणकर यांच्या लेखनशैलीवर महाराष्ट्र खुष होता. मराठी कथाविश्वामध्ये महादेवशास्त्री जोशी आपले वेगळे स्थान टिकवून उभे होते. अ. का. प्रियोळकर, जनाप्पा कामत, बाळकृष्ण सावर्डेकर आणि पांडुबाब पिसुर्लेकर संशोधन करीत होते. बाकीबाब बोरकरांप्रमाणे दा. अ. कारे, शंकर रामाणी यानाही काव्यक्षेत्रात मान मिळत होता. शिवाय मनोहर हिरबा सरदेसाई, गोपाळकृष्ण भोबे, सा. घ. कंटक, ह. वि. देसाई, वि. का. प्रियोळकर, महाबळेश्वर सरदेसाई हे मराठी साहित्यात मोलाची भर घालत होते. असे जरी असले तरी मराठी साहित्याची वाटचाल ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे होती त्या प्रमाणात होत नव्हती. गोव्यातील मराठी साहित्यकांची एक फळीच स्वातंत्र्यलढ्यात गुंतली होती. भारतीय संस्कृतीची राखण करण्यासाठी सज्ज होती. साहित्यरचना जवळजवळ त्यानी सोडली होती.

गोवा मुक्त झाला आणि साहित्यक्षेत्रातील शैथिल्य नाहीसे झाले. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात चैतन्य आले. साहित्यक्षेत्र या गोष्टीला अपवाद नव्हते. गोवा मुक्त झाल्याबरोबर गोव्यामध्ये गोमन्तक, नवप्रभा, राष्ट्रमत, गोमंतवाणी, प्रदीप ही दैनिके प्रकाशित होऊ लागली. त्यांच्या साप्ताहिक आवृत्तीमध्ये मराठी साहित्य प्रसिद्ध होऊ लागले.

आकाशवाणीवरून नभोनाट्य, युववाणीमध्ये कथा, कविता प्रसारित होऊ लागल्या, यात्रिक, सागर, समीर, प्रेरणा, लोकभारत या साप्ताहिकानी नवोदित लेखकांचे साहित्य प्रसिद्ध केले. मुक्तीपूर्वीच्या गोमंतकीय मराठी साहित्याला किंचितसा विकाराचा वास येतो अशी टीका होत होती. मुक्तीनंतरच्या काळात मराठी साहित्यामध्ये विकाराचे गालबोट दिसत नाही. त्यामध्ये प्रादेशिकता दिसते. सामाजिक जाणीव आढळते आणि तरुण पिढीची आक्रंदने व्यक्त झालेली दिसतात.

गोव्याच्या मराठी साहित्यामध्ये गोवा दिसणे साहजिक आहे. गोव्याचे लोकजीवन, लोकसंस्कृती, गोव्याचा निसर्ग या साहित्यामधून उमटू लागला. गोव्याच्या प्रेमात पडलेले माधव गडकरी यानी ''असा हा गोमंतक'' या आपल्या देखण्या पुस्तकामध्ये गोव्याचे सौंदर्य टिपले. गोव्याच्या माणसापासून माशापर्यंत साऱ्या गोष्टी त्यानी रसिकतेने सांगितल्या. ''श्री सरस्वती मंदिर'' ने 'गोमंतकाची प्रतिमा' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. बा. द. सातोस्कर यानी ''गोमंतकाची प्रकृती आणि संस्कृती'' याचा

शोध घेण्याचा प्रयत्न केला. सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यास उपयुक्त असा हा ग्रंथ आहे. काशिनाथ दामोदर नायक यानी गोमंतकाची सांस्कृतिक घडण दाखवली. गोव्यातील बहुतेक देवस्थानचे इतिहास विनायक धुमे यानी लिहिले. सौ. नंदिनी म्हाडेश्वर यानी गोव्यातील नामवंत व्यक्तीवर आधारीत 'गौरव गोमंतकाचा' हे पुस्तक लिहिले. नारायण कारवार या समाजशोधनकारानी पण आपल्या आठवणीवर आधारलेले गोव्याचा मुक्तिलढा व माझी गांधीयात्रा हे पुस्तक लिहिले.

गोव्याच्या लोकजीवनावर आणि लोकसंस्कृतीवर मुक्तीनंतरच्या काळात काही पुस्तके प्रसिद्ध झाली. विनायक खेडेकर यांचे ''गोमंतकाची लोककला'' हे पुस्तक आकर्षक ठरले. वसुधा माने यांचे ''धालो'',ज. स. सुखठणकर यांचे ''रुपडे'' आणि गोव्याचे ज्येष्ठ संगीततज्ञ मलबाराव सरदेसाई यांचे ''खांब घुमटाच्या सावलीत'' ही पुस्तके प्रसिद्ध झाली. कृष्णा मोये याचे 'नाटक झाले जन्माचे' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. याशिवाय श्रीनिवास दामोदर नायक यांची ''माझे समकालीन'' आणि ''स्मृतीची चाळता पाने'' ही दोन पुस्तके आणि केशव अनंत नायक यांचे ''समाजसेवेची पाच तपे'' हे पुस्तक गोव्याच्या सामाजिक जीवनाची माहिती देणारे ठरले. डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यानी सतराव्या शतकातील बोलीची माहिती दिली. दत्ता दामोदर नायक आणि त्यांचे सहकारी यानी सत्तरी तालुक्यातील माहिती दिली. र. वि. प्रभुगांवकर यानी ''सत्तरीचे दोन दरवाजे'' ही पुस्तिका लिहिली. के. ना. बर्वे यानी गोमंतकीय कलाकारांवर पुस्तके लिहिली. मोगुबाई कुर्डीकर, ज्योत्स्ना भोळे आणि मास्टर दत्ताराम यांची आत्मकथने वामन राधाकृष्ण यानी सादर केली. सोहिरोबा आंबये यांचे चरित्र व कविता हे पुस्तक बाकीबाबनी लिहिले.

गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या मान्यवंतानी पण गोव्याच्या मराठी साहित्यात भर घातली. मोहन रानडे यांचे 'सतीचे वाण' हे पुस्तक गाजले. विश्वनाथ लवंदे यानी हुतात्म्यांची माहिती देणारे 'व्यर्थ न हो बलीदान' हे पुस्तक लिहिले. प्रभाकर वैद्य यांनी नगरहवेली संग्रामाची माहिती सांगितली. डॉ. विनायक मयेकर यानी आपल्या हद्दपारीतील अनुभव ''माझा काळा विजनवास'' या पुस्तकात सांगितला. लक्ष्मीकांत भेंब्रे यानी पोर्तुगीज राजवटीपूर्वीचे गोव्यातील ''धार्मिक वाङ्मय'' हा ग्रंथ लिहिला. पां. पु. शिरोडकर यानी ''आठवणी माझ्या कारावासाच्या'' व

मनोहर हिरबा सरदेसाई यानी "गोवा दमण दीव स्वातंत्र्य लढ्याचा .तिहास" दोन खंडात प्रसिद्ध केला. वामन राधाकृष्ण यांच्या 'गोवा मुक्तीसंग्राम' या पुस्तकाला गोमंत विद्या निकेतन पारितोषिक व न.चि. केळकर पुरस्कार प्राप्त झाला. मनोहर सरदेसाई यांचा 'लाल ताऱ्यांच्या प्रकाशात' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. उदय भेंब्रे यांचे 'ब्रम्हास्त्र' हे पुस्तक ओपिनियन पोलच्या अभ्यासात उपयुक्त असे आहे.

गोमंतकीय लेखकानी विविध प्रकारचे लेखन करून मराठी साहित्य समृद्ध केले. ऐतिहासिक लेखनामध्ये पांडुरंग पिसुर्लेकर यांचे संशोधन, सं. शं. देसाई आणि डॉ. प्रकाशचंद्र शिरोडकर यांनी लिहिलेले ग्रंथ, रामचंद्र गडेकर यांचे "लईराईचे अग्निदिव्य"ही पुस्तके नमूद करता येतील. कॉम्रेड नारायण देसाई यानी मार्क्सवादाची माहिती दिली. गोमंतकाच्या प्राचीन संस्कृतीबाबत अनंत धुमे यांचे लेख आणि सीताकांत लाड यांची "न मिळे मौज ही पुन्हा" ही मराठी रंगभूमीवरची लेखमाला गाजली. दाजी पणशीकरांचे 'महाभारत', 'सूडाचा प्रवास' हे पुस्तक, अ. का. प्रियोळकर यांचे "हिंदुस्थानाचे दोन दरवाजे" हे पुस्तक आणि रवींद्र केळेकर यांचे जपानवरचे पुस्तक अशी ही पुस्तके रसिकांना आवडली. रत्नकांत रामनाथकार यांच्या 'प्रेमरंग' या संगीतविषयक पुस्तकामुळे संगीतप्रेमी वाचकाना नव्या चित्राची ओळख झाली. ज. स. सुखठणकर यांचे "धर्मानंद कोसंबीचे चरित्र" लोकप्रिय ठरले. महात्मा फुले यांच्या चरित्रावर लिहिलेली नारायण आठवले यांची 'प्रभंजन' कादंबरी गाजली. तिला पारितोषिकही मिळाले.

गोव्यातील मराठी साहित्यामध्ये समीक्षेचे दालन रिकामे राहिले नाही. डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, रवींद्र घवी, प्रल्हाद वडेर, प्रा. अशोक जोशी यानी समीक्षात्मक लेखन केले.

मुक्तीनंतरच्या या पंचवीस वर्षात गोव्यात मराठी ललित साहित्य पुष्कळ झाले. महादेवशास्त्री जोशी, बा. द. सातोस्कर, चंद्रकांत काकोडकर, लक्ष्मणराव सरदेसाई, बा. भ. बोरकर, सुभाष भेंडे या मान्यवंतानी कथा कादंबऱ्या लिहिल्या. शिवाय वि. ज. बोरकर, अरुण हेबळेकर, यशवंत कर्णिक यानी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले. सौ. वासंती नाडकर्णी, स. शं. देसाई, सुरेश वाळिंबे, गणाधीश खांडेपारकर, लक्ष्मीदास बोरकर, जयराम पां. कामत, गो. वि. वैद्य, प्रा.

शशी सरदेसाई, मुनीर शेख, रत्नकांत पावसकर, भालचंद्र मडकईकर, ग. गो. आजरेकर, ग. खं. पवार, रामेश्वर लांजेकर, बा. सा. पवार, कुमुद बांदोडकर, सुधाकर प्रभू, डॉ. विठ्ठल ठाकूर, सौ. रेखा ठाकूर, डॉ. किशोरी पै, गुरुनाथ नाईक, ज्ञानेश्वर कोलवेकर, जनार्दन शिंक्रे, मुरलीधर कुलकर्णी, सुशांता नेसरीकर, शरद दळवी, नंदकुमार कामत, र. वि. प्रभुगावकर, पांडुरंग फळदेसाई, डॉ. अभय वैद्य, रा. शं. ग्रामोपाध्ये यानी गोव्यातील मराठी साहित्य समृद्ध करण्यास हातभार लावला. विनोदी लेखनामध्ये विजय कापडी आघाडीवर आहेत.

मुक्तीनंतर गोव्यात काव्यप्रकारांना भरती आली. बा. भ. बोरकर, दा. अ. कारे, शंकर रामाणी या नावाकडे गोमंतकीय मराठी कविता थांबली नाही. नरेंद्र बोडके, पुष्पाग्रज, सुदाम मोटे, अवधुत कुडतरकर, नीलिमा आंगले, सौ. पद्‌मश्री वामन राधाकृष्ण, दशरथ परब, प्रतिभा कामत, दादू परब, विष्णु वाघ, विठ्ठल ठाकूर, शरद नरेश, चित्रसेन शबाब, इब्राहिम अफगाण, लिना पेडणेकर, मेघना कुरंदवाडकर, मीना समुद्र, सु. म. तडकोड, प्रकाश नाईक, बा. सा. पवार, उदय सुखठणकर दादू मांद्रेकर इत्यादी कवीनी काव्याचा फुलोरा टवटवीत ठेवला. सुदेश लोटलीकर याना 'अभोगत' काव्यसंग्रहाबद्दल काणेकर पारितोषिक मिळाले. दैनिक 'गोमन्तक' ने नवोदित लेखकांच्या पुस्तक प्रकाशनाची योजना आखली. या योजनेला प्रतिसाद चांगला मिळाला. या योजनेमार्फत आत्माराम जोग यांची ''काही कथा काही व्यथा'', पु. शि. नार्वेकर यांचे ''विघ्नहर्ता'', विठ्ठल ठाकूर यांचे ''भार'', मोहन बुगडे यांचे ''शेवाळ'', उदय सुखठणकर यांचे 'स्वप्नगंधा'' अशी पांच पुस्तके प्रसिद्ध झाली. या योजनेचे स्वागत झाले. गोमंतक मराठी अकादमीचे 'कृतज्ञापूर्वक', 'मोगरा फुलला', पां. पु. शिरोडकर यांच्या 'आठवणी', गोविंद नाईक यांचे 'सर्वेपि 'सुखिनः संतु' हे नाटक, डॉ. विठ्ठल ठाकूर यांचे 'चाकोरी' व इतर एकांकिका, प्रातिनिधीक कविता संग्रह व कथा संग्रह अशी सात पुस्तके प्रकाशित केली.

गोमंतकीय मराठी साहित्याची वाटचाल तशी आशादायक आहे. बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई, दा. अ. कारे हे आपल्याला सोडून गेलेले असले तरी गोव्यातील मराठी कविता पोरकी झालेली नाही. शंकर रामाणी अजूनही प्रतिभेने समृद्ध अशा कविता लिहित आहेत. शंकर रामाणींची कविता हळुवार कोवळी शब्दकळा घेऊन येते आणि ज्ञानेश्वराची

जवळीक सांगत निखळ, निराकार दुःखसंवेदनाचा सूर घेते. नरेंद्र बोडके आणि श्रीकांत कासकर -हे- दोन्ही कवी स्वतःचे वेगळे स्थान घेऊन प्रायोगिकतेबरोबर प्रतिभेशी नाते जोडणारे, नरेंद्र बोडके यांच्या काव्याला तात्विक चिंतनाची जोड दिसल्यामुळे त्यांची कविता मन अस्वस्थ आणि चिंतनमय करून टाकते.

कथा कादंबरीमध्ये यशवंत कर्णिकानी गोव्याच्या जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या. पण ते गोवा सोडून गेल्यामुळे त्यांच्या साहित्याला गोमंतकीय साहित्यामध्ये स्थान द्यावे की काय असा प्रश्न पडत आहे. माधव गडकरी, द्वा. भ. कर्णिक, वसंत देशमुख, मधु मंगेश कर्णिक, नारायण आठवले यानी गोव्यात असताना लिहिलेल्या वाङ्मयाला गोमंतकीय साहित्य म्हणायचे का ? हा जसा प्रश्न आहे तसाच मूळ गोमंतकीय पण मुंबईत वास्तव्य करणारे सुभाष भेंडे, वि. ज. बोरकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, सरिता पत्की, दामोदर कोसंबी या मान्यवंतांच्या साहित्याला गोमंतकीय साहित्य म्हणावयाचे का ? हाही प्रश्न आहे. जयराम पां. कामत आणि अरुण हेबळेकर यांच्या साहित्यामध्ये मानवी मनाच्या अंतर्व्यवहाराचे चित्रीकरण नाविन्यपूर्ण विषयाचा आधार घेत केलेले आढळते. ज्ञानेश्वर कोलवेकर प्रादेशिक विचार, आचार आणि बोली यांचा वापर सुरेखपणे करतात. मराठी साहित्यामध्ये गोव्याच्या लेखकांनी प्रादेशिकता आणली पण ती प्रादेशिकता वरवरची वाटू लागली. त्यात विचाराची खोली दिसत नाही. गोव्याच्या सामाजिक जीवनाचे खरेखुरे दर्शन त्यामध्ये आढळत नाही. मागास वर्गाचा शोध अजून घेतलेला नाही. मुंडकार–भाटकार यामधील संघर्ष, देवळाचे महाजन आणि देवळांचे सेवेकरी यामधील तेढ दिसत नाही. गोव्यातील उपेक्षित माणूस गोव्यातील साहित्यात उपेक्षित आहे. राजाराम पैंगिणकरांचे ''मी कोण'' हे पुस्तक गाजले. पण त्या पुस्तकात निर्माण केलेला प्रश्न अनुत्तरीत आहे.

मुक्तीनंतर मराठी साहित्य विविध रंगभूमी प्रकारात विस्तारीत होत गेले पण गोव्यातील मराठी रंगभूमी अपेक्षेप्रमाणे वाढली नाही. मुक्तीपूर्वी गोव्यात नाटके होत ती जत्रांमध्ये आणि काल्यांमध्ये. पण तो प्रकार हौशी होता. तालिमी घेतल्याशिवाय नट रंगमंचावर येत असे. आणि ''हांव जुस्त करतां'' असे सांगत नाटकाचा ''फियास्को'' करीत असे. संगीत नाटकाची चलती होती. पारंपारिक नाटकांना गर्दी होत होती. परंतु प्रत्यक्षात

गोव्यातील मराठी रंगभूमी दिशाहीन होती.

मुक्तीनंतर गोमंतक साहित्य सेवक मंडळाने गोवा पातळीवर नाट्यस्पर्धा सुरू केल्या. त्र्यं. वि. पर्वते, वामन राधाकृष्ण, गुरुनाथ नाईक यांना नाट्यलेखनाची बक्षिसे मिळाली. पण रंगभूमीला योजनाबद्ध करणे जमले नाही. त्यानंतर नाट्य अकादमीने नाट्यस्पर्धांची जबाबदारी स्वीकारली. नाट्यस्पर्धामध्ये गाजलेल्या मराठी नाटकाचे सुविहित प्रयोग अल्प तिकिटात दाखवले. कला अकादमीच्या स्थापनेनंतर या नाट्यस्पर्धा कला अकादमीकडे गेल्या. सर्व कलांना उत्तेजन देण्यासाठी अस्तित्वात आलेल्या कला अकादमीने मात्र साहित्य पारितोषिकाची योजना व्यवस्थित राबवली नाही. पारितोषिकांची संख्या आणि रक्कम कमी ठेवली. मडगांवच्या गोमंत विद्यानिकेतनने मात्र साहित्य वाढीसाठी चांगली योजना कार्यान्वित केली. बक्षीसांची रक्कम चांगली ठेवली. गोमंतक साहित्य सेवक मंडळाने ''स्वातंत्र्योत्तर मराठी कथा'' आणि ''कविता'' अशी दोन महत्वाची पुस्तके प्रसिद्ध केली. व नरेंद्र बोडके यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. कला अकादमीने सुरुवातीच्या काळात संगीत कार्यक्रमासाठी भरपूर रक्कम खर्च केली. चांगले कलाकार पेश केले. पण नंतर तीही योजना टिकली नाही. मात्र महाराष्ट्राच्या स्पर्धेशी संलग्न करून कला अकादमीने नाट्यस्पर्धा मात्र यशस्वी केल्या. नाट्यकलाकारांना व्यापक क्षेत्र मिळाले आणि आपण कुठे आहोत याची चाचणी घेता आली. या स्पर्धेमधून कला शुक्लेंदु, पार्से युवक संघ, नवरंग स्टार्स, ड्रॅमॅटिक असोसिएशन वास्को, हंस संगीत मंडळी, स्वस्तिक ड्रॅमेटिक असोसिएशन, मराठी भाषा परिषद – नाट्य शाखा अशा संस्था पुढे आल्या. दिग्दर्शनामध्ये डॉ. विजय थळी, प्रदीप तळावलीकर, परेश जोशी, रवींद्र आमोणकर, विश्वनाथ नाईक, मनोहर सावकार, मनोहर भोसले यासारखे दिग्दर्शक पुढे आले. ''लोककथा ७८'', ''महानिर्वाण'', ''चार्वाक'' यासारखी नाटके डॉ. विजय थळी यानी गोमंतकीय लोककला–लोकसंगीत यांचे सहाय्य घेऊन नव्या पद्धतीने बसवली. परेश जोशी यानीही आपल्या दिग्दर्शनामध्ये वेगळा थाट दाखवला. नाट्यामध्ये टीमवर्क किती महत्वाचे असते हे रवींद्र आमोणकरानी दाखवले व अत्यंत कठीण असा फार्स प्रकार गोव्यामध्ये लोकप्रिय केला. विश्वनाथ नाईक यांचा भर पारंपारिक नाटकाकडे. त्यांनी प्रायोगिक नाटकेही सादर करून समन्वय साधला. गोव्यातील नाटकांना

महाराष्ट्राच्या नागरी स्पर्धामध्ये बक्षिसे मिळाली. महाराष्ट्र राज्याच्या नागरी नाट्य स्पर्धेमध्ये 'नवरंग स्टार्सचे', 'कर्ता कर्म क्रियापद' हे नाटक पहिले आले राजू शिंदे यांच्या नाट्य लेखनाची तारीफ झाली.

गोव्यातील मराठी रंगभूमीची ही चढती वाटचाल असली तरी या साऱ्या संस्थांना नाट्यलेखक लाभला नाही. गोव्यामध्ये नाट्यलेखक काही कमी नाहीत. नाट्यसृष्टीतील मान्यवंत भिकू पै आंगले तर त्यामध्ये आहेतच. शिवाय चंद्रकात पार्सेकर, जयानंद मडकईकर, सुहास सावर्डेकर, रमाकांत पायाजी, ज्ञानेश्वर आजगांवकर, र. अ. टोपले, लिंगनाथ नाईक, कृष्णा मोये, महाबळेश्वर रेडकर, साईदास आपटे, महाबळेश्वर सैल, गोकुळदास मुळवी, सुभाष खडपकर, गोविंद नाईक असे नाटककार आहेत. शिवाय नाट्यलेखनाच्या स्पर्धेमध्ये त्र्य. वि. पर्वते, वामन राधाकृष्ण, गुरुनाथ नाईक, गोविंद नाईक, यशवंत कर्णिक, वासंती नाडकर्णी, तातोबा वेलिंगकर, सौ. आशा विजय थळी, मोहन बुगडे, चोखा कांबळे, राजीव शिंदे, विष्णु वाघ इत्यादिना बक्षिसे मिळाली. परंतु स्पर्धेमध्ये टिकाव धरणारे नाट्यलेखक गोव्यातील संस्थाना मिळाले नाहीत. महाराष्ट्रामध्ये नामवंत संस्थापाशी त्यांचा खास नाट्यलेखक असतो. गोव्यात तसे झाले नाही. अशोक पाटोळे यांच्या नाटकाच्या संहिता घेऊन गोव्यात नाटके सादर करण्यात आली. नाट्यस्पर्धेप्रमाणे नाट्यशिबिरे घेण्यात आली. कला अकादमी आणि गोमंत विद्या निकेतन या दोन संस्थानी शिबिरे आयोजित केली. ''कला शुक्लेंदु'' ने बालनाट्य शिबीर घेतले. गोव्यातल्या नाट्यवेडावर आधारीत 'नाट्यवेडा गोमंतक' हा कार्यक्रम वामन राधाकृष्ण, इंजिनीयर लक्ष्मीनारायण पारज आणि महेंद्र फळदेसाई यांनी सादर केला. रामकृष्ण फळदेसाई या कार्यक्रमाचे आयोजक होते. गोव्यात एकवीस प्रयोग झाले आणि प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला दाद दिली. हंस संगीत मंडळीच्या युवा पिढीने 'धमाल गोवा' हा सुंदर कार्यक्रम सादर करुन धमाल उडवली.

गोव्यातील मराठी रंगभूमीला महाराष्ट्र, दिल्ली असे व्यापक क्षेत्र मिळाले. पण नाट्यसहिंतेबाबतीत प्रगती झाली नाही. महाविद्यालयीन आणि विद्यालयीन स्तरावर एकांकिका स्पर्धा झाल्या. या स्पर्धासाठी गोमंतकीय लेखकानी एकांकिका लिहिल्या. पण नाटके लिहिण्यापर्यंत त्यांची मजल गेली नाही. गोव्याचे काही तरुण नाट्यशिक्षणासाठी दिल्लीस

गेले. जोसलकर यानी मराठीप्रमाणे हिंदी रंगभूमी गाजविली. कला अकादमीच्या नाट्यशिक्षण विभागाचे ते संचालक आहेत. धर्मानंद वेर्णेकर यांच्या दूरदर्शन मालिका लोकाना आवडू लागल्या आहेत. प्रदीप वेर्णेकर सपत्नीक गोव्यात नाट्यसृष्टीमध्ये प्रयोग करीत आहेत.

मुक्तीनंतर गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे कार्य सुरू झाले. १९६२ मध्ये पणजी गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. उद्‌घाटक न. वि. गाडगीळ होते. स्वागताध्यक्ष दा. अ. कारे होते. १९६५ साली म्हापसा येथे बारावे अधिवेशन ग. दि. माडगुळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. नाथ पै उद्‌घाटक व र. अ. टोपले हे स्वागताध्यक्ष होते. १९६६ साली १३ वे अधिवेशन अनंत काणेकर यांच्या अध्यक्षतेखाली फोंडा येथे भरले. अप्पासाहेब पवार उद्‌घाटक व गजानन रायकर हे स्वागताध्यक्ष होते. त्यानंतर साहित्य सेवक मंडळाचे कार्य थोडेसे रेंगाळले. पण नंतर माधवराव गडकरी यांच्या प्रयत्नामुळे साहित्य सेवकाचे कार्य पुन्हा सुरू झाले. १९७५ मध्ये १४ वे अधिवेशन व्यंकटेश माडगुळकर यांच्या अध्यक्षतेखाली वास्को येथे भरले. वसंत कानेटकर उद्‌घाटक होते तर वसंतराव जोशी हे स्वागताध्यक्ष होते. गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गोमंतकीय ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकालाच द्यावे असे १९७७ च्या संमेलनाच्यावेळी ठरले व त्यानुसार ७७ मध्ये कुडचडे येथे लक्ष्मणराव सरदेसाई अध्यक्ष झाले. चंद्रकांत काकोडकर स्वागताध्यक्ष झाले. संमेलनाचे उद्‌घाटन माधवराव गडकरी यानी केले. १६ वे साहित्यसंमेलन पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली डिचोली येथे भरले. हरीश झांट्ये स्वागताध्यक्ष होते तर लक्ष्मीकांत भेंब्रे हे उद्‌घाटक होते. मंगेशीला १७ वे अधिवेशनाचे अध्यक्ष होते बा. द. सातोस्कर. स्वागताध्यक्ष जीतेंद्र अभिषेकी होते. उद्‌घाटक होते गंगाधर गाडगीळ. १९८७ मध्ये म्हापसा येथे १८ वे अधिवेशन प्रा. स. शं. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली भरले. उद्‌घाटक रणजीत देसाई होते तर प्रा. गोपाळराव मयेकर हे स्वागताध्यक्ष होते. १९ वे संमेलन पेडणे येथे व्यंकटेश अनंत पै रायकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. स्वागताध्यक्ष गुरुदास सावळ होते तर उद्‌घाटक रमाकांत खलप होते. साहित्य संमेलनाचा सुवर्णमहोत्सव मोठ्या दिमाखाने संपन्न झाला. दत्ता सराफ यानी सुवर्णमहोत्सवासाठी फार परिश्रम घेतले.

प्रभाकर भुसारी, रामकृष्ण फळदेसाई, प्रा. शशिकांत सरदेसाई, व्यंकटेश आंगले, प्रा. अरुण साखरदांडे, वामन राधाकृष्ण, प्रा. प्रल्हाद वडेर, प्रा. रवींद्र घवी, नरेंद्र बोडके, श्रीकांत कासकर, लक्ष्मीनारायण पारज, तुळशीदास मळकर्णेकर, भगवंत नायक, विनायक नाईक इत्यादि कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर व सहकार्यावर गोमंतक साहित्य मंडळाची प्रतिष्ठा उंचावली. या वर्षात मंडळाने अनेक कार्यक्रम केले. ठिकठिकाणी मेळावे भरले. इतकेच नव्हे, मध्यंतरीच्या काळात वामन राधाकृष्ण,प्रा. अरुण साखरदांडे, रवींद्र घवी, लक्ष्मीनारायण पारज यानी कोकणी–मराठी साहित्यिकाना एकत्र आणून समन्वय वाद साधण्याचा प्रयत्न केला. तो प्रयोग यशस्वी झाला असता तर दोन भाषिक साहित्यिकामधून दुरावा कमी झाला असता.

१० सप्टेंबर १९८५ रोजी इंदिरा काँग्रेस पक्षाच्या गोवा शाखेने आणि त्याच्या विधीमंडळ शाखेने संयुक्त बैठकीत राज्यभाषेचा प्रश्न मांडला. या बैठकीत गोव्याची भाषा कोकणी करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला व सरकारकडे पाठवण्यात आला. हा ठराव प्रसिद्ध होताच मराठी प्रेमी व मराठी भाषिक जनता एकत्रित झाली. १२ सप्टेंबर रोजी फोंडा येथे जाहीर सभा होऊन लढ्याची घोषणा देण्यात आली. १४ सप्टेंबर रोजी म्हापसा येथे अनंत टोपले सभागृहात गोमन्तक मराठी भाषा परिषदेने एक सभा घेतली व त्या सभेमध्ये गोव्यात जेवढ्या मराठी संस्था आहेत त्याना एकत्रित करून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या धर्तीवर एक समिती स्थापन करावी असे ठरले. १६ सप्टेंबर १९८५ रोजी गोमंतक साहित्य सेवक मंडळाच्या सभागृहात पां. पु. शिरोडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली व गोव्यातील वेगवेगळ्या मराठी संस्थानी एकत्रित होऊन मराठी राज्यभाषा प्रस्थापन समिती (गोमंतक) अशी संस्था स्थापन करण्यात आली. पां. पु. शिरोडकर अध्यक्ष आणि शशिकांत नार्वेकर सरचिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले. चिटणीस म्हणून अरुण निगळये, मोतीलाल देसाई व उदय म्हार्दोळकर नियुक्त झाले. प्रत्येक घटकाचा प्रमुख उपाध्यक्ष झाला. म. गो. पक्षातर्फे रमाकांत खलप, भाबांगो तर्फे शशिकला काकोडकर, जनता पक्षातर्फे शिवाजी देसाई, कम्युनिस्टातर्फे नामदेव हरमलकर, गोमंतक साहित्य सेवक मंडळातर्फे डॉ. प्रल्हाद वडेर, मराठी भाषा परिषदेतर्फे मनोहर हिरबा सरदेसाई, मराठी पत्रकार संघातर्फे चंदू कासकर असे

उपाध्यक्ष नेमण्यात आले. शिवाय प्रा. गोपाळराव मयेकर, बा. द. सातोस्कर याना उपाध्यक्षपद देण्यात आले. माधवराव तळावलीकर यांची खजिनदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. या बैठकीत म. गो. आणि भाबांगो या दोन्ही पक्षानी मराठी व कोकणी या दोन्ही भाषा असाव्यात अशा अर्थाची निवेदने केली. जमलेल्या प्रेक्षकानी याला विरोध दर्शवला व लढा चालू असेपर्यंत आपआपल्या पक्षाच्या मंचावरून हा प्रश्न हाताळू नये असे मान्य करण्यात आले. २ ऑक्टोबर ८५ रोजी पणजी आझाद मैदानावर महामेळावा भरला. मराठी राज्यभाषा होईपर्यंत लोकशाही मार्गाने व शांततामय रीत्या लढा चालविण्यासाठी लोकानी प्रतिज्ञा घेतली. १७ नोव्हेंबर १९८५ रोजी मडगांवला मेळावा भरला. समितीने ग्रामपंचायतीना आवाहन केल्याबरोबर एकशे एक्याणव पंचायतीपैकी एकशे बावीस पंचायतीनी मराठी राज्यभाषा करा असे ठराव करून सरकारकडे पाठविले. ॲड् रमाकांत खलप, प्रा. गोपाळराव मयेकर व शिवाजी देसाई असे त्रिसदस्य शिष्टमंडळ पंतप्रधान राजीव गांधी याना भेटले. मराठीचे गोव्यातील स्थान ऐतिहासिक आहे हा मुद्दा पंतप्रधानानी मान्य केल्याचे शिष्टमंडळाने जाहीर केले.

राज्यभाषा विधेयक १७ जुलै १९८६ रोजी विधानसभेत मांडले जाणार असल्याचे जाहीर होताच १० जुलै रोजी भाषा विधेयकाची होळी करण्यात आली. भाषा विधेयक संमत झाल्यानंतर ९ फेब्रुवारी १९८७ रोजी गोवा 'बंद' पाळण्यात आला. गोमंतकातील मराठी भाषा, साहित्य संस्कृती यांचे सर्वतोपरी संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी एक प्रभावी संस्था निर्माण करण्याची आवश्यकता वाटल्यावरून गोमंतक मराठी भाषा परिषदेच्या कार्यकर्त्यानी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांची भेट घेतली व गोमंतक मराठी अकादमी स्थापन करावी अशी विनंती केली. तुम्ही अकादमी स्थापन करा सरकार आर्थिक सहाय्य देईल असे मुख्यमंत्र्यानी आश्वासन दिले. अठराव्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनात गोमंतक मराठी अकादमीच्या प्रस्थापनेविषयीचा ठराव संमत झाला. ही मराठी अकादमी खऱ्या अर्थाने लोकांची व्हावी व लोकांच्या आर्थिक सल्ल्यावर उभी रहावी म्हणून निधी गोळा करण्याचे ठरले. 'गोमंतक'चे संपादक नारायण आठवले यानी गावोगांव फिरून झोळी–दिंडीच्या सहाय्याने सात लाख रुपये जमा केले. माधवराव गडकरी यानी आपल्या एकसष्ठीपूर्ती

समारंभात त्याना मिळालेले एक लाख रुपये मराठी अकादमीला दिले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यानी मुख्यमंत्री निधीतून दीड लाख रुपये दिले. २ जानेवारी १९८८ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते गोमंतक मराठी अकादमीचे उद्घाटन पणजी येथे मा. दिनानाथ मंगेशकर कला मंदिरात झाले. मराठी अकादमीने पहिल्या वर्षात मराठी शिक्षण परिषद भरवली. जन्मशताब्दी निमित्ताने मराठी संगीत नाट्य स्पर्धा आयोजित केली. तालुकावार मेळावे भरवले. पुस्तके प्रकाशित केली. ज्ञानेश्वर सप्तशताब्दी महोत्सवानिमित्त कार्यक्रम आयोजित केले. चित्ररथस्पर्धा यशस्वी केली. गोमंतकीय मान्यवराना माना सदस्यप्रदान सोहळा आयोजित केला. पुस्तकाना पारितोषिक देण्याची, पुस्तक प्रकाशनाला अनुदान द्यायची योजना कार्यान्वित केली.

आज गोव्यामध्ये कला अकादमीप्रमाणे गोमंतक मराठी अकादमी, मडगांवचे विद्यानिकेतन, वास्कोचे गोमंतकालिका साहित्य पुरस्कार जाहीर करते.

गोव्यामध्ये मध्यंतरीच्या काळात भाषा प्रतिष्ठानासाठी अगर भाषेच्या आग्रहासाठी मोर्चे झाले, हरताळ झाले, हिंसा झाली. आज वातावरण बदलले आहे. कोकणी मराठी वाद वाढण्याऐवजी दोन्ही भाषात साहित्य निर्मिती करण्याचे काम गोव्यातील साहित्यिकानी केले पाहिजे असे वाटू लागले आहे. 'मराठी हटाव', अगर 'कोकणी हटाव' या घोषणा करून काही उपयोगी नाही. दोन्ही भाषांची पाळेमुळे गोव्यात रुजली आहेत. इंग्रजी भाषा अजून शहरापुरती आहे. पण खेडेगावांत ती पोचते आहे. अशिक्षित प्रौढाना सुद्धा कोकणी अगर मराठी शिकण्याऐवजी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे असे वाटू लागले आहे. इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे. पण इंग्रजीचे भूत लहान मुलाच्या मानगुटीवर बसता कामा नये.

: बारा :

१९८९ ची निवडणूक

गोव्याला घटक राज्य मिळाल्यानंतर त्वरित राज्यसभेवरील गोव्याच्या जागेसाठी कोणाला उभे करावे असा प्रश्न निर्माण झाला. काँग्रेसतर्फे गोवा प्रदेश समितीचे सरचिटणीस जॉन फर्नांडिस उभे राहिले. म. गो. पक्षातर्फे एम. एस्. प्रभू उभे राहिले. जॉन फर्नांडिस याना १९ मते पडली तर एम्. एस् प्रभू यांना ९ मते पडली. हंगामी गोवा विधानसभेचे सभापती म्हणून दयानंद नार्वेकर यांची निवड झाली तर उपसभापती म्हणून शंभु भाऊ बांदेकर यांची निवड झाली. २ जुलै १९८७ रोजी गोवा घटकराज्य विधानसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले. साधनसंपत्तीत पुरेसी वाढ करुन आर्थिक तूट भरून काढू असा दिलासा मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यानी दिला. राष्ट्रपती झैलसिंग यानी गोव्याला भेट दिली. पणजी, मडगाव, वास्को, फोंडा, म्हापसा येथे थेट टेलिफोन संपर्क साधण्याची पद्धत सुरू झाली. राष्ट्रीय एकात्मता टिकवून फुटीर शक्तीविरुद्ध लढा देण्याचा निर्धार गोवा विधानसभेत करण्यात आला. ५ सप्टेंबर १९८७ रोजी कोकणी महाभारत खंडाचे प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. भारतीय युवा मंचने गोवाभर संदेश यात्रा काढली. ५ ऑक्टोबर ८७ मध्ये भारतीय इतिहास परिषद भरली. इतिहासाचे अज्ञान हेच सर्व राजकीय समस्यांचे निदान असे गोव्याचे राज्यपाल डॉ. गोपालसिंग यानी प्रतिपादन केले. गोव्यामध्ये सोळा प्रादेशिक पक्षाची परिषद या नावाने गोव्यात परिषद भरली पण प्रत्यक्षात पक्षश्रेष्ठी आले नाहीत. राष्ट्रीय समाजवादी पक्ष, अरुणाचल प्रदेश पीपल्स पार्टी व एकता पक्ष एवढेच लोक मंचावर दिसले. १२ डिसेंबर ८७ रोजी सौ. शशिकला काकोडकर यांच्यासह नऊ जणाना म. गो. मध्ये स्थान देण्यात आले. त्यामध्ये दिओझिन रिबेलो, शंकर साळगांवकर, मधु बाळ्ळीकर, विनायक चोडणकर, रोहिदास नाईक, प्रा. शशिकांत सरदेसाई, नारायण नाईक व महेश बांदेकर हे होते. सुशिक्षित बेकाराना भत्ता द्यावा व तो दरमहा २५० रु. असावा अशी मागणी लुईझिन फालेरो यानी केली व त्यासाठी आंदोलनाची घोषणा केली. १९८७ वर्षाच्या अखेरीस म्हापसा येथे पेडे मैदानावर जंगी महार परिषद भरली. परिषदेस

वीस ते पंचवीस हजार लोक उपस्थित होते. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी हरिजन निवासी शाळा सुरू करण्याची घोषणा समाजकल्याण मंत्र्यानी केली. ही घोषणा कार्यान्वित झाली नाही.

जानेवारी १९८८ मध्ये मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांच्यावरील अविश्वासाचा ठराव फेटाळला. निकुबाब कारापूरकर या ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानीचे निधन झाले. 'गोल्डन गोवा' या अनुबोधपटावर विरोधी पक्षाने टीका केली. २९ मार्च रोजी पणजी येथे मुंडकारांचा भव्य मोर्चा निघाला. म. गो. आमदार रवी नाईक यानी मांडलेल्या मुंडकार (हुसकावण्यापासून संरक्षण) दुरुस्ती विधेयक फेटाळण्याच्या निषेधार्थ सात हजार मुंडकरानी मोर्चा काढला. याबद्दल तत्संबंधी मंत्री शेख हसन म्हणाले की, गोव्यामध्ये मुंडकार प्रकरणी साठ हजार खटले होते. त्यातील फक्त ३९७९ खटले शिल्लक आहेत. त्यामुळे हे दुरुस्ती विधेयक आणण्याची गरज नाही. क्षत्रिय भंडारी समाजाचा अमृत महोत्सव मार्चमध्ये संपन्न झाला. या महोत्सवाचे उद्‌घाटन ब्रम्हानंद स्वामी यानी केले.

१८ मे रोजी स्वातंत्र्यसेनानी पुरुषोत्तम काकोकडर यांचा ७५ वा वाढदिवस संपन्न करण्यात आला. महाविद्यालयात शिक्षण मोफत करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री प्रतापसिंग राणे यानी केली. २७ जुलै ८८ मध्ये गोव्यातील एक आदर्श शिक्षक नारायण वासुदेव लाड यानी आपली पत्नी सौ. शालिनी (वय ५८), विवाहित मुलगी शैला दिलीप महात्मे (वय ३२), नात गौतमी दिलीप महात्मे (वय वर्षे २), व आपली अविवाहित मुलगी कु. अनुजा लाड (वय २६) यांच्यासह आपल्या सावर्डे दत्तवाडी येथील घरामागील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. आगामी निवडणुकीत कोकणी समर्थक आघाडी स्थापन करण्यासाठी गोवा कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता १७ ऑगस्ट १९८८ रोजी डॉ. विल्फ्रेड डिसोझा यानी बोलून दाखविली. मुख्यमंत्री प्रतापसिंग राणे यानी हरीश झांट्ये यांच्याकडून वीज आणि माहिती खाते काढून घेतले आणि वीज खाते डॉ. बार्बोझाकडे व माहितीखाते सुभाष शिरोडकर यांच्याकडे सुपूर्द केले. २३ नोव्हेंबर ८८ रोजी राष्ट्रपती आर. व्यंकटरामन् यानी गोव्याला भेट दिली. त्यानिमित्त झालेल्या त्यांच्या सत्कारसोहळ्यात त्यानी गोव्याबद्दल गौरवोद्‌गार काढले. ते म्हणाले, "एकमेकाशी सलोख्याने रहाणारे गोमंतकीय साऱ्या देशासाठी एक आदर्श आहेत. बा. भ.

बोरकर, रवींद्र केळेकर, मनोहरराय सरदेसाई कुठल्या भाषेत लिहितात हे महत्वाचे नाही तर त्यानी काय लिहिले हे महत्त्वाचे मांडवी नदी, गोव्यातील चर्चेस, मंदिरे आणि मशिदीच्या परिसरातून एकाच लिपीत वहात असते. त्याच्यामुळे गोव्यातील हवा व वातावरण संयमी आहे.'' गोव्यातील बसभाडे वाढवण्यात आल्याबरोबर वातावरण तंग झाले. आंदोलनाची धमकी देण्यात आली. पण जनतेचे हित पाहून बसभाडेवाढ निम्म्याने कमी करण्यात आली. गोमंतकीय हे पोर्तुगीजांचे वंशज आहेत व ते रोमन कॅथॉलिक धर्मानुयायी आहेत असे एअर इंडियाच्या १९८९ च्या कॅलेंडरवर छापण्यात आले होते. त्यावरून गोव्यात व गोव्याबाहेरील गोमंतकीयांमध्ये असंतोष पसरला. अखेर एअर इंडियाने दिलगिरी व्यक्त करून कॅलेंडर रद्द केले. फातोर्डा येथील पं. नेहरु क्रीडा संकुलाचे उद्‌घाटन उपराष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते झाले. ३० जानेवारी रोजी गोव्यातील चाळीस मतदारसंघाचा अंतिम आराखडा जाहीर करण्यात आला.

म्हापसा येथील गँगवारमध्ये बळी पडलेल्या थॉमस तावारीस याचा मृतदेह सांताक्रुज येथे गोवा काँग्रेसच्या शिबिरात आणून अर्धा तास व्यासपीठावर ठेवण्यात आला. व 'म्हापसा बंद' चे आवाहन करण्यात आले. तावारीस यांच्या खुनाच्या निषेधार्थ गोवा काँग्रेसने आयोजित केलेल्या 'म्हापसा बंद' मध्ये हिंसा झाली, लुटालूट झाली. या गुंडगिरीच्या निषेधार्थ दुसऱ्या दिवशी म्हापसा 'बंद' पाळण्यात आला. तावारीस यांचा खून राजकीय वैरातून झाला असे डॉ. विली डिसोझा यानी जाहीर केले. ७ मे ८९ रोजी गोवा क्षत्रिय मराठी समाजाचे अधिवेशन म्हापसा येथे भरले. दयानंद नार्वेकर व चंद्रकांत चोडणकर यानी या अधिवेशनासाठी पुढाकार घेतला होता. या समाजाला राजकीय प्रतिनिधीत्व देण्याची मागणी अधिवेशनात करण्यात आली.

घटक राज्याच्या दुसऱ्या वर्धापनदिनी बेकार युवकांची भरती करून घेण्यासाठी भू-सेना स्थापण्याचा गोवा सरकारचा निर्णय जाहीर करण्यात आला. भू-सेनेच्या प्रशिक्षित युवकाना प्रत्येक खेड्यापाड्यात पाठविण्यात येऊन शेती आणि ग्रामीण विकासासारख्या अन्य कामात मदत करण्यास सांगण्यात येईल. कोकणी प्रजेचो आवाज या संघटनेच्या कार्यकर्त्यानी कोप्रआ निमंत्रक पुंडलिक नारायण नायक यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा

काँग्रेसमध्ये ८ जून ८९ रोजी प्रवेश केला. त्यांच्या कृतीमुळे कोकणी प्रजेचा आवाज ही संघटना संपुष्टात आली.

गोवा काँग्रेसचे इंदिरा काँग्रेसशी विलीनीकरण होणार या बातम्या पसरत होत्या पण डॉ. विली डिसोझा व त्यांचे सहकारी याबाबत मोकळ्या मनाने बोलत नव्हते. पण १४ जुन रोजी विलीनीकरणाची कबुली डॉक्टरनी दिली. सहा वर्षांनंतर हे विलीनीकरण होत आहे. १९८० मध्ये गोवा विधानसभेच्या निवडणुका झाल्या तेव्हा डॉ. डिसोझा अर्स काँग्रेस गोवा शाखेचे अध्यक्ष होते. अर्स काँग्रेसने इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला व प्रतापसिंह राणे यांच्या नेतृत्वाखाली गोव्यामध्ये इंदिरा काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. डॉ. डिसोझा याना अध्यक्षपदावरून काढून मंत्रिमंडळात घेण्यात आले. पण नेतृत्व बदलाची मागणी मान्य न झाल्यामुळे १४ ऑगस्ट १९८३ मध्ये त्यानी गोवा काँग्रेस हा नवा पक्ष स्थापन केला. १९८४ मधील निवडुकीत गोवा काँग्रेसचा एक उमेदवार निवडून आला.

२२ जून १९८९ रोजी गोवा काँग्रेसचे इंदिरा काँग्रेस पक्षात औपचारीकरित्या विलीनीकरण झाले. भारतीय विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष केरकर यानी केलेल्या गैरव्यवहाराबद्दल चौकशी सुरू झाली. महामंडळाशी आपला संबंध नाही असे समाजकल्याण मंत्री हरीश झांट्ये यानी जाहीर केले. ११ जुलै १९८९ रोजी ॲड्. पांडुरंगबाब मुळगांवकर यांचा त्याना ७० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. गोव्याचे नवे राज्यपाल म्हणून खुर्शिद आलमखान यानी राज्यपालपदाची सूत्रे हाती घेतली. २५ जुलै रोजी गोवा काँग्रेसच्या नेत्याना व कार्यकर्त्यांना समावून घेण्यासाठी गोवा प्रदेश काँग्रेसची विस्तारीत समिती स्थापन झाली. ऑगस्ट महिन्यात सचिवालयातील विनयभंग प्रकरण पुढे आले. अतिमहनीय व्यक्तीने सचिवालयात काम करणाऱ्या तरुणीचा विनयभंग केला असे प्रथम सांगण्यात आले. ती व्यक्ती म्हणजे सभापती दयानंद नार्वेकर असे खलप यानी पत्रकार परिषदेत जाहीर केले. हे केवळ राजकीय कारस्थान आहे. मी निष्पाप आहे असा निर्वाळा सभापतीनी २२ ऑगस्ट रोजी दिला. 'नार्वेकर हटाव' च्या मागणीसाठी जन आंदोलनाची घोषणा झाली. स्वातंत्र्यसैनिकानीही कृती समिती स्थापन केली. स्वातंत्र्यसैनिक विनायक पडियार, सौ. प्रशांती तळपणकर व कु. वासंती पांचाळ यानी उपोषण सुरू केले. सभापती दयानंद नार्वेकर यानी दोन

दिवसात राजीनामा न दिल्यास नागरी कृती समिती आंदोलन तीव्र करील अशी घोषणा १३ सप्टेंबर ८९ रोजी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला. सचिवालय, कॉंग्रेसभवन व पोलीस ठाण्यावर दगडफेक केली. नार्वेकर यानी राजीनामा न दिल्यास त्याना पक्षातून बडतर्फ केले जाईल असा ठराव गोवा प्रदेश कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांच्या तातडीच्या बैठकीत संमत करण्यात आला. १६ सप्टेंबर १९८९ रोजी सभापती दयानंद नार्वेकर यानी राजीनामा दिला व सहा दिवस चाललेले आंदोलन संपले. सर्व विरोधी पक्षानी आपल्याविरुद्ध कितीही कुभांडे रचली तरी दयानंद नार्वेकर राजकारणातून कधीच संपणार नाहीत. आपले कार्यकर्ते हेच आपले खरे भांडवल असून त्यांच्या पाठिंब्यावर अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपला लढा चालू राहील अशी घोषणा हळदोणे येथे झालेल्या भव्य सभेत दयानंद नार्वेकर यानी केली.

केंद्रीय मंत्रिमंडळाने निवडणूका त्वरीत घेण्याचा निर्णय आकस्मिकरीत्या घेतला व त्यानुसार निवडणुक आयोगाने लोकसभेच्या निवडणुका २२ आणि २४ नोव्हेंबर १९८९ रोजी घेण्यात येईल अशी घोषणा केली. व पाच तारखेला गोव्यातील विधानसभा निवडणुका घेतल्या जातील असे जाहीर केले. गोव्यातील ७ लाख ३४ हजार मतदार या निवडणुकीतील मतदानात भाग घेतील अशी आंकडेवारी जाहीर झाली. गोवा विधानसभेच्या नावेली मतदारसंघातून कॉंग्रेसचे उमेदवार लुइझिन फालेरो बिनविरोध निवडून आले. श्री. फालेरो १९८० मध्ये नावेली मतदारसंघातून निवडून आले. १९८४ मध्ये ते परत नावेलीमधून गोवा कॉंग्रेस उमेदवार म्हणून निवडून आले. गोवा विधानसभेत गोवा कॉंग्रेसचे ते एकमेव उमेदवार होते. १९८९ मध्ये ते बिनविरोध निवडून आले. उरलेल्या ३९ जागांसाठी २९६ उमेदवार रिंगणात उतरले होते. सेरावली गांवातील कायतान जेकसिन फर्नांडिस या वयोवृद्ध इसमाच्या निधनामुळे मुरगांव लोकसभा निवडणूक व कुडतरी व वेळ्ळी या गोवा विधानसभेच्या दोन मतदारसंघांच्या निवडणुका रद्द करण्यात आल्या.

तिकीटावरून प्रत्येक पक्षामध्ये बंडे झाली. अनंत नरसिंह नायक ऊर्फ बाबु नायक हे कॉंग्रेसमधील ज्येष्ठ बंडखोर बनले तर म. गो. मध्ये बाबुसो गांवकर यानी बंडखोरी केली. त्याना मडकई मतदारसंघ हवा होता. त्याना मडकई मतदारसंघच हवा होता तो त्याना देण्यात आला

नाही. बाबु नायक हे मडगांवचे राजे, त्यांची उपेक्षा करण्यात आली. बाबुसो गांवकर यांचे बंड म. गो. परंपरेतील आहे. बाबुसो हे म. गो. चे आघाडीचे नेते होते. विधानसभेमध्ये त्यांचे कार्य विरोधकास शोभेसे होते. काँग्रेस आमदारांच्या बुद्धिमत्तेचे वाभाडे त्यानी अनेकदा काढले होते. म. गो. च्या आठ आमदारांपैकी त्यांची कामगिरी बरीच वरची होती. म. गो. च्या आठ आमदारांपैकी बाबु दिवकर यानी यावेळी आपण उभे रहाणार नाही असे सांगितले. उरले सात आमदार. या सातपैकी सहा आमदाराना तिकिटे मिळाली. मग बाबुसो यानी काय घोडे मारले ? बाबुसो यानी बंड केले म्हणून आरडाओरड चालू होती. काँग्रेस श्रेष्ठीनी एखाद्या नामवंत नेत्याला तिकीट दिले नाही. म्हणून त्याने बंड केले की आपण इंदिरा काँग्रेसच्या हुकुमशाहीविरुद्ध बोलतो व त्या बंडखोरांचे अभिनंदन करतो. मग बाबुसोच्या बंडाबद्दल एवढा आकस का ?

म. गो. या खेपेला सत्तेवर येईल असे बहुजन समाजाला वाटत असल्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारानी पक्ष नेत्याकडे धाव घेतली. म. गो. नेत्यानी तसे काही उमेदवार, निवडून काढले होते. श्री. गुरुदास सावळसारख्या निष्ठावान कार्यकर्त्यानी पेडणे मतदारसंघात काम सुरू केले होते. पहित्या यादीत त्यांचे नावही जाहीर झाले होते. मग अकस्मात राष्ट्रीय पक्षात होते तसे झाले. राष्ट्रीय पक्षांची यादी बदलते. इकडचे तिकडे होतात व तिकडचे इकडे होतात. म. गो. नेही तसे केले. वास्कोचे नेते पेडणे येथे आले.

म. गो. ने काँग्रेस विरोधकाबरोबर युती करण्याचे जाहीर केले. नार्वेकर प्रकरणात म. गो. नेते इतर विरोधी पक्षाबरोबर नाचले. म. गो. च्या काही समर्थकाना याबाबत नाराजी व्यक्त करावी लागली. युती होणार अशा वावड्या उठवल्या गेल्या. भाजप,जनता, कम्युनिस्ट या राष्ट्रीय पक्षाचे नेते मोठ्या आशेने वाट पाहू लागले. विधानसभेच्या एक दोन जागा व लोकसभेच्या दोन्ही जागा प्रत्येक राष्ट्रीय पक्षाच्या गोवा शाखेने मागितल्या होत्या. जनता पक्षाने शिवाजी देसाई, भाजपने जी. वाय. भंडारे किंवा माधव धोंड अशी नावे सुचवली होती. गोलोपचे इराज्मू सिकेरा उभे होते. या सर्वांना मधाचे बोट लावून म. गो. चे नेते गंमत बघत होते. शेवटपर्यंत त्यानी निश्चित धोरण सांगितले नाही. गोव्यात म. गो. आणि इंदिरा काँग्रेस हे दोनच पक्ष प्रमुख आहे. त्यानी युती करण्याची गरज नाही. दोन्ही

पक्षांच्या अनुनयायांचे तेच मत होते. पण म. गो. नेत्यानी हे स्पष्टपणे सांगायला पाहिजे होते. कम्युनिस्ट पक्षाचे नारायण पालेकर इच्छुक उमेदवार होते. त्या सर्वाची म. गो. नेतृत्वाने दांडी उडवली. राजकारणात सर्व क्षम्य असे मानणाऱ्या राष्ट्रीय पक्षांच्या रांगेत म. गो. पक्ष जाऊन बसला.

राष्ट्रीय पक्षांचा दबदबा जास्त असतो. अनुयायामध्ये फूट पाडून, पक्ष शिस्तीच्या नावाखाली नकोअसलेल्या निष्ठावानाना दूर फेकले जाते. म. गो. ने तेच केले. कितीतरी निष्ठावानाना डावलले. अँड्. दशरथ सावंत हे म. गो. चे निष्ठावान कार्यकर्ते. नेतृत्वाच्या अलोकशाही वागणुकीवर त्यानी टीका केली. ती त्याना नडली. ते डोईजड होतील म्हणून त्याना तिकीट नाकारण्यात आले. आपले तिकिट निश्चित आहे. तुमची तरफदारी मी करतो असे ते इतर इच्छुक उमेदवाराना म्हणत होते. म. गो. चे नेतृत्व म्हणेल, ''त्याना मतदारसंघातील मतदाराचा विरोध होता'' विरोध कुणीही कुणालाही करू शकतो. प्रियोळमधील इच्छुक उमेदवार डॉ. काशिनाथ जल्मींच्या उमेदवारीला विरोध करतील, मडकईचे शेकडो मतदार रवी नाईकच्या उमेदवारीला विरोध करतील. पण ते विरोध धरून चालायचे असतात का ?

म. गो. पक्षाने ३३ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. मांद्रेहून रमाकांत खलप, पेडणेहून शंकर साळगांवकर, धारगाळहून देऊ मांद्रेकर, थिवीहून विनायक नाईक, म्हापशाहून प्रा. सुरेंद्र सिरसाट, शिवोलीहून अशोक साळगांवकर, कळंगुटहून श्रीकांत मळीक, साळगांवहून पुनाजी आचरेकर, हळदोणेहून रत्नाकर चोपडेकर, पणजीहून पुष्पशील केरकर, ताळगांहून रमेश सिलीमखान, सांताक्रुजहून अॅड. महेंद्र रायकर, सांत आंद्रेहून काशीनाथ गोवेकर, कुंभारजुवेहून धर्मा चोडणकर, डिचोलीहून पांडुरंग राऊत, मयेहून बाबुराव देसाई, फोंड्याहून शिवदास वेरेकर, प्रियोळकर डॉ. काशिनाथ जल्मी, मडकईहून रवी नाईक, शिरोड्याहून रामदास तोपयो नाईक, मुरगांवहून जॉन वाझ, वास्कोहून डॉ. मिस्कीन मिर्नेझिस, फातोर्डाहून सूर्यकांत लोटलीकर, कुंकळीहून शाबू देसाई, सावर्डेहून मोहन आमशेकर, सांगेहून राणु प्रभु देसाई, कुडचडेहून डॉ. अनिल प्रभुदेसाई, केपेहून प्रकाश वेळीप, काणकोणहून संजय बांदेकर, पैगीणहून गोविंद आचार्य असे तेहतीस उमेदवार उभे केले.

काँग्रेसने ३७ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. मांद्रेहुन सौ. संगीता परब, पेडणेहून राजू तळवणेकर, धारगळहून शंभू भाऊ बांदेकर, थिवीहून प्रेमनाथ मावलिंगर, म्हापशाहून श्यामसुंदर नेवगी, शिवोलीहून चंद्रकात चोडणकर, कळंगुटहून सुरेश परुळेकर, साळगांवहून डॉ. विल्फ्रेड डिसोझा, हळदोणेहून दयानंद नार्वेकर, पणजीहून जे. बी. गोन्साल्वीश, सांत आंद्रेहून आमिलकार आल्वारीश, ताळगांवहून सोमनाथ जुवारकर, सांताक्रुजहून व्हिक्टर गोन्साल्वीस, कुंभारजुवेहून सौ. निर्मला सावंत, डिचोलीहून हरीश झाट्ये, मयेहून मनोहर परब गांवकर, पाळीहून चंद्रकांत वेरेकर, पर्येहून प्रतापसिंग राणे, वाळपईहून अशोक परब, फोंड्याहून मोहन नाईक, प्रियोळहून बाबला तारकर, मडकईहून श्याम नाईक, शिरोड्याहून सुभाष शिरोडकर, मुरगांवहून शेख हसन, वास्कोहून सायमन डिसोझा, कुठ्ठाळीहून माविन गुदिन्हो, लोटलीहून डॉ. लुईश प्रोत बार्बोझा, बाणावलीहून चर्चिल आलेमांव, फातोर्डाहून लुईश कार्दाज, मडगांवहून दिगंबर कामत, कुकळीहून मानु फर्नांडिस, सावर्डेहून माधवराव देसाई, सांगेहून पांडु वासु नाईक, कुडचडेहून डॉमनिक फर्नांडिस, केपेहून वैकुंठ देसाई, काणकोणहून सुरेश काणकोणकर, पैंगीणहून वासु पायक गांवकर असे उमेदवार काँग्रेसने उभे केले.

भारतीय जनता पक्षातर्फे मांद्रेहून लक्ष्मीकांत पार्सेकर, धारगळहून विश्वनाथ आर्लेकर, पणजीहून माधव धोंड, फोंड्याहून सुनील देसाई, मुरगांवहून सौ. आशा साळकर, वास्कोहून शिवराम लोटलीकर, डिचोलीहून रामनाथ देसाई, कुंभारजुवेहून श्रीपाद येसो नाईक असे आठ उमेदवार उभे केले.

बहुजन समाज पक्षाने पेडणेहून अर्जून आसोलकर, सांताक्रुजहून अवधुत शिरोडकर, कुंभारजुवेहून आनंद चोडणकर,डिचोलीहून अनिरुद्ध फडते, पाळीहून दामोदर शिरोडकर, पर्येहून सौ. सुंदरी गावस, वाळपईहून अब्दुल रझाकखान, मडकईहून राजाराम नाईक असे आठ उमेदवार उभे केले. शिवसेनेने पेडणेहून विजय कामूलकर, थिवीहून सुहास नाईक, म्हापशाहून रामप्रसाद जोशी, शिवोलीहून मधुकर शिरोडकर, पाळीहून उमेश मांद्रेकर, शिरोड्याहून योगानंद बोरकर, पैंगीणहून प्रभाकर पैगीणकर असे सात उमेदवार उभे केले. मार्क्सवादी पक्षाने पेडणेहून गोपीनाथ राव, मयेहून कमलाकांत गडेकर शिरोड्याहून मॅथ्यू पेरेरा, मुरगांवहून सीताराम

मांद्रेकर, असे चार उमेदवार उभे केले. कम्युनिस्ट पक्षाने कुंभारजुवेहून खिस्तोपर फोन्सेका, पाळीहून जॉर्ज वाझ, फोंड्याहून प्रदीप शिरगांवकर, सावर्डेहून यशवंत खेडेकर असे चार उमेदवार उभे केले. जनता दलाने पणजीहून माधव बीर, ताळगांवहून गुरु शिरोडकर, वास्कोहून प्रकाश परुळेकर, कुकळीहून रमेश उत्तम देसाई असे चार उमेदवार उभे केले. जनता पार्टीने मुरगांवहून दिलीप मांद्रेकर, कुडचडेहून प्रकाश देसाई, केपेहून इमझा खान असे तीन उमेदवार उभे केले. गोवा लोक पक्षाने थिवीहून अर्जून पडते, कळंगुटहून डॉ. रिकार्ड माश्कारेन, साळगांवहून ॲड. झुआर्व पणजीहून इराज्मो सिकेरा, ताळगांवहून माथानी साल्ढाणा, सांताक्रुजहून व्हिक्टोरिया फर्नांडिस, सांत आंद्रेहून दिलीप बोरकर, कुठ्ठळीहून आंतोन फर्नांडिस, लोटलीहून सेल्सो डायस, बाणावलीहून आर्फोंस कुरैय, पैंगीणहून प्रशांत नाईक असे अकरा उमेदवार उभे केले. या निवडणुकीत गोव्यात सत्तर टक्के मतदान झाले. गोवा विधानसभेच्या चाळीस जागापैकी दोन मतदारसंघातील निवडणूका उमेदवाराच्या निधनामुळे रद्द करण्यात आल्या. उरलेल्या अडतीस जागापैकी एक जागा बिनविरोध कॉंग्रेस उमेदवार लुईझिन फालेरो यानी जिंकली होती. अडतीस जागापैकी कॉंग्रेसने कळंगुटहून सुरेश परुळेकर, साळगांवहून डॉ. विल्फ्रेड डिसोझा, पणजीहून जे. बी. गोन्साल्वीस, ताळगांवहून सोमनाथ जुवारकर, सांताक्रुजहून व्हिक्टर गोन्साल्वीस, पर्येहून प्रतापसिंग राणे, वाळपईहून अशोक परब, शिरोड्याहून सुभाष शिरोडकर, मुरगांवहून शेख हसन, वास्कोहून सायमन डिसोझा, कुठ्ठाळीहून मावीन गुदिन्हो, लोटलीहून बार्बोझा, नावेलीहून लुईझिन फालेरो, बाणावलीहून चर्चिल आलेमाव, फातोर्डाहून लुईश कार्दोज, कुंकळीहून मान्युएल फर्नांडिस, कुडचडेहून डॉमनिक फर्नांडिस, पैगीणहून वासु पायक गांवकर अशा अठरा जागा जिंकल्या.

म. गो. पक्षाचे मांद्रेहून रमाकांत खलप, पेडणेहून शंकर साळगांवकर, धारगळहून देऊ मांद्रेकर, थिवीहून विनायक नाईक, म्हापशाहून प्रा. सुरेंद्र शिरसाट, शिवोलीहून अशोक नाईक साळगांवकर, हळदोणेहून रत्नाकर चोपडेकर, कुंभारजुवेहून धर्मा चोडणकर, डिचोलीहून पांडुरंग राऊत, मयेहून सौ. शशिकला काकोडकर, पाळीहून विनयकुमार उसगांवकर, फोंड्याहून शिवदास वेरेकर, प्रियोळहून डॉ. काशिनाथ जल्मी,

मडकईहून रवी नाईक, सावर्डेहून मोहन आमशेकर, सांगेहून राणु प्रभू देसाई, केपेहून प्रकाश वेळीप व काणकोणहून संजय बांदेकर असे अठरा उमेदवार निवडून आले.

काँग्रेसचे अठरा व म. गो. चे अठरा असे आमदार निवडून आल्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला. विधानसभेत दोन अपक्ष उमेदवार निवडून आले. मडगांवचे अपक्ष उमेदवार अनंत नरसिंह नायक हे काँग्रेस बंडखोर होते. त्यानी काँग्रेसचा विरोध केल्यामुळे त्यांचा पाठिंबा म. गो. पक्षाला होता. ते धरून म. गो चे १९ आमदार होऊ लागले. दुसरे अपक्ष आमदार कार्मो पेगादो होते. ते सांत आंद्रेहून निवडून आले होते. त्यानी म. गो. ला पाठिंबा दिला तर म. गो. चे वीस आमदार झाले असते व काँग्रेसचे १८ राहिले असते. व सरकार म. गो. पक्षाचे झाले असते. डॉ. पेगाद यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी म. गो. पक्ष व इंदिरा काँग्रेस पक्ष यानी धावपळ सुरु केली. पण डॉ. पेगाद यानी काँग्रेसला पाठिंबा दिला व गोव्यामध्ये पुन्हा पेच निर्माण झाला. म. गो चे अठरा आमदार व अपक्ष आमदार अनंत नरसिंह नायक मिळून एकोणीस आमदार झाले तर काँग्रेसचे अठरा व अपक्ष आमदार डॉ. कार्म पेगाद मिळून एकोणीस आमदार झाले. आपल्याला मिळालेल्या मताच्या टक्केवारी प्रमाणे आपल्याला जास्त मतदारांचा पाठिंबा आहे असे म. गो. चे अध्यक्ष रमाकांत खलप यानी म्हटले तर राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस राज्यपाल खुर्शिद आलम खान यानी केली.

दरम्यान, राज्यपालानी तात्पुरते सभापती म्हणून धारगळहून निवडून आलेले देऊ मांद्रेकर यांची नियुक्ती केली. या नियुक्तीला एवढा विलंब का लागला यासंबंधी टीका होऊ लागली. सभापती नार्वेकर यानी राजीनामा दिल्यानंतर तात्पुरते सभापती नेमता आले असते किंवा नवी विधानसभा निवडून आल्याबरोबर ताबडतोब तात्पुरते सभापती नेमायला हवे होते असे काहींचे म्हणणे होते. उपसभापती शंभू बांदेकर निवडून आले नाहीत. म्हणून त्याना सभापती नेमले नाही ही समजूत खोटी आहे. शंभू बांदेकर निवडून आले असते तरीसुद्धा त्यांची तात्पुरते सभापती म्हणून नियुक्ती झाली नसती. नवी विधानसभा भरेपर्यंत सभापती अस्तित्वात असतो, इतर सभासदांबरोबर उपसभापतीही जातात. नव्या विधानसभेत नवे सभापती निवडले जातात. राज्यपालानी देऊ मांद्रेकर यांची केलेली

निवड सर्वात जास्त वयाचे म्हणून झाली.

राष्ट्रपती राजवट येवो वा न येवो त्याकडे आता लोकांचे लक्ष लागलेले नव्हते. लोक आता वाट पहात होते ते वेळ्ळी व कुडतरी या दोन मतदार संघाकडे. मध्यंतरी राणे यानी सहा आमदाराना घेऊन म. गो. त यावे अशा सूचना करण्यात आल्या. आयाराम, गयारामचे राजकारण गोव्यात सुरू होऊ नये असे वाटणाऱ्या लोकाना पक्षांतराची भाषा बोलणाणाऱ्यांचा राग आला. म. गो. तले सहा काँग्रेसमध्ये शिरणार अशी हूल उठविण्यात आली. पण त्यावर कुणी विश्वास ठेवला नाही. काँग्रेस ही सध्या बुडणारी बोट आहे. बुडणाऱ्या बोटीतून उंदीरसुद्धा बाहेर पडतात असे म्हणतात. त्यामुळे म. गो. चे लोक काँग्रेसमध्ये सामील होतील ही कल्पना स्वप्नरंजीत मानली पाहिजे अशी त्यावेळची परिस्थिती होती. त्यावेळच्या परिस्थितीकडे काळ अशी पावले टाकीत होता.

काँग्रेस हे सध्या बुडणारे जहाज आहे असे आपण म्हणतो पण काँग्रेस श्रेष्ठी तसे मानायला तयार नव्हते. या निवडणुकीत मिळालेल्या अपयशापासून काँग्रेस पक्ष काही धडा शिकला असेल असे वाटत नाही. काँग्रेस कार्यकर्ते आणि काँग्रेसश्रेष्ठी दोघेही आपल्याच तोऱ्यात आहेत. वेळ्ळी आणि कुडतरी या दोन मतदारसंघात कुणी उभे रहावे हे अजुनही निश्चितपणे ठरत नाही यासारखे दुर्दैव नाही. ज्या दोन जागावर काँग्रेसचे भवितव्य अवलंबून आहे. त्या जागाबाबतीत अजूनही ओढाताण चालू असावी हे पक्षश्रेष्ठीचा वचक कमी झाल्याचे चिन्ह आहे. काँग्रेस पक्षाने नेतेपद निवडणूक अगर उमेदवार निवडूक याबाबतीत पूर्वीसारखा घोळ चालू होता. १९६३ च्या पहिल्या निवडणुकीच्यावेळी जे चालू होते तेच याही निवडणूकीवेळी चालू झाले. त्यावेळी के. के. शहा यायचे, मांडवीत रहायचे आणि आपल्याला लहरीप्रमाणे आणि जो त्यांच्यापुढे नाचेल त्याच्या मनाप्रमाणे कौल द्यायचे. या खेपेला बुटासिंग आले. सर्फराज अहमद येत आहे. त्याचे म्हणणे ऐकून त्याप्रमाणे असंतुष्ट काँग्रेसजन वागतील का हाच प्रश्न झाला. बुटासिंग स्वतः आपटले आहेत. पंजाबप्रश्नाचा घोळ त्यांच्यामुळे झाला असा आरोप त्यांच्यावर होता. इंदिरा काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व डळमळले आहे. त्यांची विश्वासार्हता नाहीशी झाली आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसचे तारू वाऱ्यावर हेलकावे खात होते.

वेळ्ळी व कुडतरी या दोन मतदारसंघात काँग्रेसबरोबर सरळ लढत

व्हावी यासाठी प्रयत्न चालू झाले. गोलपने आपले अंग काढून घेतले होते व गोव्यातील दोन प्रमुख पक्षावर आरोप केले. खलप यानी युती केली असती तर हा प्रसंग आला नसता असे इराज्मूबाबचे म्हणणे आहे. त्या म्हणण्यात तथ्य आहे. पण तेच आरोप पुनः पुन्हा करण्यात काही अर्थ नाही. त्यामुळे गोव्याची कोंडी सुटणार नाही. ''या दोन्ही मतदार संघात सिंहाच्या निशाणीवर कुणी उभे रहाणार नाही. जनता दलाची निशाणी या दोन्ही मतदारसंघात मतदाराना आवाहन करणार आहे. केंद्रामध्ये जे सरकार असेल तेच सरकार गोव्यात येणे शहाणपणाचे'' असे अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधी सांगत होते. व मतदार काँग्रेसला मत देत होते आज दिल्लीमध्ये जनता आघाडीचे राज्य आहे तेव्हा त्यांच्याच उमेदवाराला मत द्या असे ते लोक या खेपेला सांगतीलही. काँग्रेस पक्षाला या गोष्टीचा विचार करावा लागणार आहे. म. गो. पक्षाने जनता आघाडीत सामील होऊन ही कोंडी सोडवावी अशाही सूचना यायला सुरुवात झाली. अर्थमंत्री मंधू दंडवते यांची मध्यस्थी याबाबतीत यशस्वी होण्याजोगी आहे. एकूण ते दिवस महत्वाचे होते. वेळ्ळी व कुडतरी विधानसभा निवडणुकाची तारीख सात जानेवारी ठरली. मुरगांव लोकसभा निवडणुकाही याच दिवशी ठरल्या. मुरगांव लोकसभेसाठी काँग्रेसचे उमेदवार एदुआर्द फालेरो आहेत तर जनता दलाने ॲड. फार्दिन रिबेलो याना उभे केले आहे. कुडतरीमधून विधानसभेसाठी काँग्रेसचे सार्दीन आहेत तर आगुस्तीन बार्बोझा हे जनता दलाचे उमेदवार आहेत. वेळ्ळी विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या कुमारी फॅरेल फुर्तादो उभ्या आहेत तर जनता दलाचे गाब्रीयल रॉड्रीग्ज आहेत.

दक्षिण गोवा लोकसभा निवडुकीपेक्षा गोव्यातील मतदाराना वेळ्ळी व कुडतरी मतदारसंघाच्या निवडणुका जास्ती महत्वाच्या वाटल्या. लोकसभा निवडणुकीत फालेरो आले काय ? किंवा रिबेलो काय, सर्वसामान्य जनतेला त्याचे सोयरसुतक लागले असे दिसले नाही. दिल्लीमध्ये काँग्रेस सरकार नसल्यामुळे फालेरो राज्यमंत्री किंवा कॅबिनेट मंत्री होतील व कर्जवाटप मुक्पणे करतील असे काही नाही. रिबेलो निवडून आल्यामुळे पोर्तुगालचे दागिने परत मिळतील यावर लोकांचा विश्वास नाही, म. गो. चे नेते दिल्लीच्या वाऱ्या करू लागले आहेत. पूर्वी काँग्रेस सरकार असताना इथले काँग्रेस पुढारी दिल्लीच्या वाऱ्या करीत असत. म.

गो. नेत्यांची पाळी आलेली आहे. भाऊसाहेब बांदोडकर असताना प्रशासकीय कामासाठी फक्त म. गो. नेते दिल्लीत वाटाघाटीसाठी जात होते. इतर कामासाठी नव्हे. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर म. गो. नेते कितीवेळा मुंबई–दिल्लीस गेले याची माहिती त्यानी म. गो. कार्यकर्त्यांना दिल्यास बरे होईल.

मुरगांव लोकसभेच्या निवडणुकीत फर्दिन रिबेलोस पाठिंबा दिल्याबद्दल अनेक म. गो. कार्यकर्ते नाराज झाले. मुरगाव मतदारसंघात काही असे विधान सभा मतदारसंघ आहेत जिथे म. गो. चे बल मोठे आहे. या मतदारसंघातील मतदारसंघात या वेळेला चक्राला मत द्या असे सांगणे म. गो. कार्यकर्त्यांना कठिण वाटले. आणि सिंहावर शिक्का मारा हे ऐकण्याची संवय झालेल्या मतदाराला चक्रावर शिक्का मारा असे ऐकणे पसंत पडले नाही. शिवाय मराप्रसने रिबेलोच्या पसंतीबाबत नाखुषी व्यक्त केली. ही नाखुषी अनेक म. गो. पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवडली. प्रचाराच्या बाबतीत रिबेलो यांच्या प्रचाराला अजून एवढी धार यायला पाहिजे तेवढी आलेली नाही. उलट फालेरो याचा प्रचार व्यवस्थित चालू आहे. निवडून आलेले काँग्रेस उमेदवार फालेरोच्या प्रचारकार्यात सहभागी झालेले होते. आणि फालेरो याना निवडून आणण्याच्या खटपटीत होते. केंद्रातले राष्ट्रीय आघाडीचे सरकार टिकणार नाही असे त्याना वाटत होते. रामजन्मभूमि, काश्मीर अशा प्रश्नावेळी भाजप आग्रही मत मांडेल व राष्ट्रीय आघाडीला ते मान्य करणे परवडणार नाही असा काँग्रेसवाल्यांचा कयास होता. एक वर्ष फार तर हे सरकार टिकेल व त्यानंतर पुन्हा काँग्रेस सत्तेवर येईल अशी त्यांची समजूत होती व काँग्रेस सत्तेवर आल्यास फालेरो कॅबिनेट मंत्री होतील असे त्याना वाटत होते. फालेरो यांची ही जमेची बाजू होती. उलट म. गो. मधील रिबेलो बद्दलची नाराजी ही रिबेलोची वजाबाकी होती. तशात काही सांगणे कठिण होते. एक गोष्ट खरी की गोव्यातील जनतेचे लक्ष लोकसभा निवडणुकीपेक्षा वेळ्ळी व कुडतरी मतदारसंघाकडे होते. प्रत्येक पक्षाचा नेता मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने रचत होता. तटस्थपणे या निवडणुकीत पहाणारा एक कार्यकर्ता मला म्हणाला, ''खलप आणि राणे या दोन नेत्यांचे अनुयायी आपला नेता मुख्यमंत्री होईल या कल्पनेत दंग आहेत. दोन्ही पक्षातील काही आमदार मंत्री होण्याच्या स्वप्नात आहेत व त्यानी जोधपुरी कोट शिवायला दिले आहेत.'' या

म्हणण्यातला मिश्किलपणा जर सोडला तर सत्ता काबीज करण्याची स्वप्ने दोन्ही पक्षनेते पहात होत यात शंका नव्हती. सत्ता कुणाच्या गळ्यात माळ घालते ते त्या बारा दिवसात दिसणार होते.

वेळ्ळी व कुडतरी या मतदारसंघातील बंडखोरी मिटलेली नव्हती. त्यामुळे काँग्रेस उमेदवार निवडून येणे कठीण असे. म. गो. समर्थकांचे म्हणणे होते तर काँग्रेसमधील बंडखोरी मिटलेली आहे तेव्हा काँग्रेस उमेदवाराचे यश निश्चित आहे तर काँग्रेसचे नेते गोव्यात का येत आहेत ? असा प्रश्न लोक काँग्रेसवाल्याना होते असे स्थानिक काँग्रेस जनांचे म्हणणे होते.

प्रचार करण्यास सोपे जावे म्हणून काळजीवाहू राणे सरकारने काही सुधारणा करायला सुरुवात केली होती. त्यांच्या या नव्या उपक्रमाना विरोधकानी हरकत घेतली होती. जी कामे इतक्या वर्षात झाली नाही ती इतक्या त्वरित कशी झाली असा आक्षेप होता. काळजीवाहू सरकारने ''रुटीन'' कामे करायची असतात. महत्वाच्या सुधारणा करायच्या नसतात. असा संकेत होता. हा संकेत लक्षात घ्यायचा नाही असे राणे सरकारने ठरवले होते. पण त्यांचा डाव यशस्वी झाला नाही. गंमत अशी या दोन मतदारसंघाच्या निवडणुका अशा सुधारणावर अवलंबून नाहीत. हे राणे सरकारने ओळखायला हवे होते व विरोधकाना टीकेची संधी देता कामा नये होती. रस्ते केले, वाहतुकीची साधने वाढवली म्हणून मतदार या खेपेला काँग्रेस सरकार सत्तेवर आणायचे की नाही या मुद्यावर मतदान करणार नव्हते. या दोन मतदारसंघातील मतदाराना काँग्रेस सरकार नको असेल तर ते काँग्रेसला मत देणार नाहीत. आणि हवे असेल तर मत देणार होते. या निवडणुका अटीतटीच्या होणार आहेत. गोव्याचेच येत्या पाच वर्षाचे भवितव्य या दोन मतदार संघावर अवलंबून होते. निवडणूक निकालानंतर पुन्हा एकवीस एकवीस झाले तर फेरनिवडणुकीची शक्यता होती.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष आणि इंदिरा काँग्रेस पक्ष या दोन पक्षातील अंतर्गत फूट त्या पक्षाला आणि पर्यायाने या राज्याला बाधक ठरली. आता आणखी एका राष्ट्रीय पक्षाच्या गोवा शाखेला अंतर्गत फुटीची पोटदुखी जडली होती. पक्षाच्या अंतर्गत फुटीचे चित्र नवे नव्हते. पण या महत्वाच्या निवडणुकीमुळे ते जनतेसमोर उघड झाले होते. भाषेच्या

प्रश्नावरून जनता दलाच्या गोवा शाखेत फूट पडली. फर्दिन रिबेलो हे एक तरुण कार्यकर्ते, ख्रिश्चन समाजातील बहुजन जमातीतले आणि राष्ट्रवादी विचारसरणीचे असल्यामुळे त्याना जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला होता. पण कोकणी-मराठी वाद सुरू झाल्यानंतर रिबेलो यानी कोकणीचा हट्ट धरला व लोकमानसात जनता दल पक्ष रुजवण्याचा असेल तर कोकणीचा आग्रह धरला पाहिजे अशी भूमिका घेतली. उलट शिवाजी देसाईनी मराठीचा आग्रह धरला व या वादामुळे जनता पक्षाचे गोवा युनिट खिळखिळे झाले, अगोदरच या पक्षामध्ये अनुयायी कमी, कार्यकर्ते कमी, पक्षात आहेत सारे बुद्धिवादी या बुद्धिवाद्यांचे इतरांशी जमणे कठीण त्यामुळे या गटाने त्या गटाच्या पदाधिकाऱ्यांना बडतर्फ करावे आणि त्या गटाने या गटाला गचांडी द्यावी असे प्रकार घडले. कुठला जनता पक्ष खरा हे सांगणे सुद्धा कठीण झाले. अखेर एका गटाने कार्व्हाल्यू याना पक्षाध्यक्ष नेमले व मान्यता मिळवली. त्यातले एक पदाधिकारी म. गो. च्या तिकिटावर उभे राहिले व निवडूनही आले. शिवाजी देसाई गटाने सर्वमान्य असा उमेदवार लोकसभेसाठी निवडला होता. पण त्या उमेदवाराला पुढे आणता आले नाही. तो उमेदवार पत्रकारितेमध्ये वावरणारा व स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे त्याला विरोध झाला नसता.

जनता राष्ट्रीय पक्षाच्या गोवा शाखांचे दुर्दैव हे की त्यांचे दिल्लीतले नेतृत्व म. गो. पक्षाशी जवळीक ठेवते व त्यामुळे स्थानिक गट वाढू शकत नाही. काँग्रेसमधील मराठी गटाला महाराष्ट्र काँग्रेसने कधीच पुढे येऊ दिले नाही. सतत म. गो. पक्षाच्या नेतृत्वाला चुचकारले. गोव्यामध्ये म. गो. चे असलेले महत्वाचे स्थान ओळखून त्या पक्षाला जवळ करणे हिताचे आहे असे त्याना वाटत होते. जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने पण तोच कित्ता गिरवला आणि स्थानिक नेतृत्व दुबळे करुन टाकले. प्रजासमाजवादी पक्ष असताना काय किंवा जनता पक्ष असताना काय ते मूठभर निष्ठावंत कार्यकर्ते या पक्षात होते त्यांचे कौतुक त्या पक्षाच्या वरिष्ठांनी कधी केले नाही. आजही ही परिस्थिती बदलली नाही. म. गो. पक्षाचे नेते दिल्लीला जातात. जनता दलाच्या नेत्याना भेटता. बिचारे स्थानिक जनताचे नेते आपली ही नेतृत्वहीन स्थिती मिटल्या डोळ्यानी पाहतात. भाजपने काँग्रेस विरोधासाठी समन्वय भूमिका घेतली. गोव्याच्या वेळ्ळी व कुडतरी मतदारसंघाच्या निवडणुका होऊन निश्चित परिस्थिती होईपर्यंत प्रतापसिंग

राणे यांचे काळजीवाहू सरकार अस्तित्वात आले. म. गो. ने या गोष्टीला विरोध केला. मुक्तीदिन वेगळा साजरा केला. वेळ्ळी मतदारसंघात कु. फॅरेल फुर्तादो याना ८९६२ मते मिळून त्या विजयी झाल्या. जनता दलाचे रॉड्रीग्ज याना २२५६ मते पडली. कुडतरी मध्ये फ्रान्सिस्को सार्दिन याना ८८७६ मते पडून ते विजयी झाले. जनतादलाचे आगुस्तीने बार्बोझा याना ३९३६ मते पडली. विधानसभेमध्ये काँग्रेसचे २० व अपक्ष एक मिळून एकवीस उमेदवार झाले. तर म. गो. १८ व अपक्ष मिळून एक असे १९ उमेदवार झाले.

वेळ्ळी व कुडतरी मतदारसंघाचा निकाल अपेक्षित लागला. सार्दिन व कु. फुर्ताद निवडून येतील याबद्दल बहुतेकाना खात्री होती. पण प्रतिपक्षावर एवढी मात करतील अशी अपेक्षा नव्हती. सार्दिन ४९४० मते जास्त मिळवून विजयी झाले तेव्हा कु. फुर्ताद त्याहून जास्त मते मिळवून विजयी होणार असे निदान लोकानी केले व ते खरेच ठरले. दक्षिण लोकसभा मतदारसंघामध्ये मतदान कमी झाले. त्यामुळे फालेरो निवडून आले असे म्हणतात ते तितकेसे खरे नाही. प्रियोळ व केपे हे दोन मतदारसंघ सोडले तर म. गो. च्या मतदारसंघात मतदार जिद्दीने बाहेर आले नाहीत. याची तीन कारणे असू शकतात. १) दक्षिण गोवा लोकसभा मतदारसंघात कुणी निवडून येईना आपल्याला त्याचे काय असा विचार मतदारानी केला.

२) फालेरो यानी केलेल्या कार्यामुळे त्याना विरोध कशाला असे. म. गो. समर्थकाना वाटले.

३) फार्दिन रिबेलो यांच्या कोंकणी प्रेमामुळे म. गो. समर्थकाना निरुत्साही बनवले. प्रियोळचे डॉ. जल्मी व केपेचे प्रकाश वेळीप यानी त्याच मतदाराना मतदान करायला बाहेर काढले. सासष्टी तालुक्यातील मतदारसंघानी फालेरो याना मत देण्याबाबतीत जिद्द दाखवली. वेळ्ळी व कुडतरी मतदारसंघातील काँग्रेस उमेदवारांचे फालेरो याना सहाय्य लाभले हे खरे पण बाणावली, नावेली, कुठ्ठाळी, लोटली या मतदारसंघातील मतदारानी चांगले मतदान केले व फार्दिन रिबेलो बरोबर वाटचाल करणारे फालेरो या मतदारसंघामुळे घोडदौडीने पुढे गेले. नावेली मतदारसंघात फालेरोना ९०१२ तर रिबेलो याना १५६४ अशी दरी दिसली व ही दरी वाढत गेली. गोव्यात इंदिरा काँग्रेसला यश मिळाले त्यामध्ये राणे यांचा

वाटा मोठा होता. पूर्वी यू. गो. आणि म. गो. स्थायिक पक्ष होते. त्यावेळी कॅथोलिकांचे मतदारसंघ यु. गो. कडे असे समीकरण होते. प्रतापसिंह राणे यानी उत्तरेकडचे मतदारसंघ आपल्याकडे ओढून घेतले व काँग्रेस सत्तेवर आणली. या खेपेला काँग्रेस विरोधकाची हवा असताना कळंगुट, ताळगांव, पणजी, पर्ये, वाळपई हे कॅथोलिक प्रबल्य नसलेले मतदारसंघ जिंकले. विजयानंतर प्रतापसिंग राणे यांचा निवेदन साहजिकच आत्मविश्वासाने भरलेली आहेत. व बंडखोराविरुद्ध पावले उचलण्याची जिद्द वाखाणण्याजोगी होती. कुठल्याही पक्षश्रेष्ठींनी आपला पक्ष ढिला सोडता कामा नये आणि शिस्तीच्या चौकटीत बांधला पाहिजे. विजय मिळवल्याच्या आनंदात वस्तुनिष्ठ दृष्टिकोन काँग्रेस नेत्यानी स्विकारला हे बरे झाले. दूरदर्शनला दिलेल्या आपल्या मुलाखतीत मुख्यमंत्री प्रतापसिंग राणे यानी विरोधकांवर आरोप केले नाहीत. विरोधकांची शक्ती त्यानी मान्य केली व कार्यक्रमावर भर देणार असे जाहीर केले. उलट विरोधी पक्ष नेते रमाकांत खलप यानी काँग्रेसने जातीय प्रचार केला असा आरोप केला. काँग्रेस आली तर ख्रिश्चनांचे राज्य होणार व म. गो. आला तर हिंन्दूचे राज्य होणार असा दोन्ही बाजूने प्रचार झाला. मुख्यमंत्री कुठल्या धर्माचा आहे या पेक्षां तो कसा आहे हे पाहणे महत्वाचे, हे दोन्ही पक्षानी सांगायला पाहिजे होते. काँग्रेस निवडून आल्यास कॅथोलिक मुख्यमंत्री होणार व राणेसकट हिंन्दू आमदार म. गो. मध्ये येणार असाही प्रचार झाला. पण जाणकारांचे मत राण्यानाच मुख्यमंत्रीपद मिळणार असे होते व ते बरोबर ठरले.

या निवडणुकीत म. गो. पक्षाकडे आलेला सत्तेचा पेला दूर गेला, आझाद मैदानावर शपथविधी करण्यासाठी उत्सुक असलेले खलप अपयशी ठरले. राजकारणात सुद्धा दैवाचा भाग जास्त आहे असे म्हणणारा एक वर्ग प्रत्येक राज्यात असतो. गोव्यातही तो आहे. त्या वर्गाचे म्हणणे असे की राणे नशीबवान आहेत. राणेविरुद्ध इतक्या तक्रारी झाल्या विरोधकांचे बूट दिल्लीला जाऊन जाऊन झिजले. तरीपण राणे मुख्यमंत्री झालेच. उलट खलप दुर्दैवी. तोंडाशी आलेले घास काढून घेतला. याबाबतीत मी. म. गो. कार्यकर्त्यांशी व पडेल उमेदवारांपाशी चर्चा केली. त्यांचे म्हणणे असे की, खलप यानी उमेदवारांच्या बाबतीत चुकीची निवड केली. सुरुवातीला आघाडी करू असे जाहीर केले. वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या नेत्याना शेवटपर्यंत झुलवत ठेवले, नाईक, तारी, देसाई, गौडमराठा वगैरे जातीच्या

पुढाऱ्याना पण आश्वासने दिली व अखेरच्या क्षणी हवे ते केले. अध्यक्ष या नात्याने आपल्या उमेदवाराच्या प्रचारकार्यात सक्रीय भाग घेतला नाही. त्या मानाने शशिकला काकोडकर फिरल्या व अपक्ष उमेदवाराना दिलासा दिला. आल्यानंतर पक्षनेत्याना जबाबदार धरले जाते. त्याप्रमाणे सर्वसाधारण मतदाराना म. गो. च्या अपयशाला खलप जबाबदार आहेत असे वाटते. खलप यानी शेवटपर्यंत राजकीय पक्षप्रमुखाना आशेवर तरंगत ठेवले. काँग्रेस विरोधी पक्षाशी आणि विशेषतः गोलोप पक्षाशी समझोता केला तर पणजी, सांताक्रुज जागा मिळाल्या असत्या. परंतु राजकारणात जर व तर ला महत्व नसते. शिवाय अपयशाचे खापर जर खलपावर टाकणार असाल तर यशाचे धनीही त्यालाच करावे लागणार. आठवरून अठरा जागा मिळण्याची किमया झाली त्याचे श्रेय पण तुम्ही खलप याना का नाही देत ?

अखेर इंदिरा काँग्रेसचे सरकार गोव्यात सत्तेवर आले. घटक राज्याचे हे पहिले अधिकृत सरकार इंदिरा काँग्रेसचे असले तरी तांत्रिक दृष्ट्या ते समिश्र सरकार म्हणावे लागेल. गोव्यात समिश्र सरकार अस्तित्वात येणार ही रमाकांत खलप यांची भविष्यवाणी एका अर्थी खरी ठरली. या समिश्र सरकारात म. गो. पक्ष सहभागी नाही हे दुर्दैव.

गोव्यातील अस्थिरता संपली व इंदिरा काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले. ही बातमी कळते न कळते तोच राणे रांची निवड झाल्याची बातमी आली. ही बातमी प्रसिद्ध होते न होते तोच मंत्रिमंडळ जाहीर झाले आणि त्यामागोमाग खातेवाटप जाहीर झाले. या साऱ्या प्रकारात इतकी घाई दिसून आली की अशीच घाई जर सुधारणा करण्याबाबतीत प्रशासनाने केली तर गोव्याचे नंदनवन होईल असे अनेकानी मिष्किलपणे म्हटले. विनोदाचा हा भाग सोडला तर झाले हे बरे झाले असे अनेकानी म्हटले. त्यामुळे निदान जिंकलेला आणि हरलेला असे दोन्ही पक्ष जमिनीवर उभे राहून सिंहावलोकन करतील. निवडणुकीनंतर म. गो. पक्षातील अनेक कार्यकर्त्यानी, गोव्याचे नवे समिश्र सरकार टिकणारच नाही असा निर्वाळा दिला होता. मंत्रीमंडळ स्थापनेच्या दिवशी गैरहजर असलेल्या व हजर असलेल्या काही इच्छुकांच्या वर्तुणुकीने विरोधकांच्या वरील निर्वाळ्यावर शिक्कामोर्तब बसेल असा आशावाद अनेकानी व्यक्त केला.

आजच्या नव्या मंत्रीमंडळात एकूण पाच मंत्री आहेत. मुख्यमंत्री

सोडले तर एक हिंन्दु आहे व चार कॅथोलिक आहेत. पण नाराज झालेल्या इच्छुकांची संख्या जास्त आहे. राजीव गांधीनी मंत्रिमंडळ बनवले त्यावेळी एक मंत्री म्हणे रात्रभर आपल्या शेजारी टेलिफोन ठेवून बसला होता. राजीवजींचा आपल्याला फोन येईल असे बिचाऱ्याला वाटले होते. पण अखेरपर्यंत फोन आला नाही. त्याची झोप गेली व मंत्रीपदही गेले.

दरम्यान, खासदार एदुआर्द फालेरो याना गोवा प्रदेश इंदिरा काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी नेमून म. गो. पक्षातील कार्यकर्त्यांना जाग आणली. हिंन्दू मुख्यमंत्री आणि ख्रिश्चन पक्षाध्यक्ष अशी ही विभागणी होती. श्रीमती सुलोचना काटकर यांच्या दुबळ्या नेतृत्वामुळे बंडखोर बळावले आणि काँग्रेसला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही अशी टीका होत होती ती आता बंद होणार. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका व्हाव्यात आणि सभासदानी निवडलेली कार्यकारिणी कार्यरत व्हावी अशी इच्छा काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये होती.

म. गो. पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये हीच भावना बळावलेली होती. म. गो. पक्षाची युवक संघटना होती. महिला संघटना होती. कार्यकारिणी होती. पण साऱ्या संघटना फक्त शिबिरासाठी किंवा अधिवेशनासाठी वापरल्या जातात अशी टीका सुरू झाली. या निवडणुकीमध्ये गोलोपसारख्या स्थानिक पक्षाशी युती केली असती तर आणखी काही जागा म. गो. ला मिळाल्या असत्या असे कार्यकर्त्यांचे म्हणणे व या संबंधीचा निर्णय रमाकांत खलप अगर डॉ. जल्मी यानी स्वतःच्या जबाबदारीवर घेतला. कार्यकारिणीला विचारले नाही अशी तक्रार आहे. पक्षहिताच्या दृष्टीने जुने उगाळून उपयोगी नसते. नवे हुडकून काढायचे असते. गोव्यातील सारे पक्ष लोकशाही पद्धतीने चालत नाहीत. वर्षानुवर्षे त्यांच्या पक्षांतर्गत निवडणुका होत नाहीत इतकेच काय प्राथमिक सभासद नोंदणीही होत नाही. अशा तक्रारी होत्या. या तक्रारीना यापुढे अर्थ रहाता कामा नये. म. गो. पक्ष आणि इंदिरा काँग्रेस पक्ष हे दोनच पक्ष गोव्यात प्रमुख आहेत. गोलोप आपली विश्वासार्हता वाढवण्याचा प्रयत्न करीत होता. या तिन्ही पक्षानी आपल्याला संघटना बळकट करण्यासाठी झटले पाहिजे. असे केले गेले नाही तर दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य पसरेल व त्याचा फायदा समाजद्रोह्याना मिळेल.

१९८९ सालची निवडणूक अभुतपूर्वक ठरली. राणे सरकार सत्तारुढ झाले. २३ जानेवारीला राणेनी विश्वासदर्शक ठराव जिंकला.

: तेरा :

राजकारण पक्षबदलूंचे

प्रतापसिंह राणे यांच्या नेतृत्वाखालील सरकार जेमतेम तीन महिने पुरे करते न करते तोच सभापती डॉ. लुईश प्रोत बार्बोझा यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या सात आमदारानी २४ मार्च १९९० रोजी राणे मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेतला. या सात फुटीर काँग्रेस आमदारांनी गोवन पीपल्स पार्टी हा नवा गट स्थापन केला. नेतेपदी सभापती डॉ. लुईश प्रोत बार्बोझा यांची निवड करण्यात आली. गोव्यात होऊ घातलेले नवे मंत्रिमंडळ राष्ट्रीय आघाडीचा भाग असेल असे स्पष्ट निवेदन रेल्वेमंत्री जॉर्ज फर्नांडिस यानी केले. २६ मार्च रोजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यानी राजीनामा दिला. डॉ. बार्बोझा यानी मुख्यमंत्री होण्यासाठी सभापतीपदाचा राजीनामा दिल्यास काँग्रेस सोडून गेलेल्या सात आमदाराना उपसभापती अपात्र ठरवतील अशी भीती वाटत असल्यामुळे हंगामी व्यवस्था म्हणून चौदा दिवसासाठी चर्चिल आलेमाव याना मुख्यमंत्रीपद देण्याचे ठरले. म. गो. पक्षाने बाहेरून पाठिंबा द्यायचे पण ठरले नंतर गोव्यातील एका संपादकाच्या सल्ल्यानुसार म. गो. ने या सरकारात भाग घेतला. चर्चिल आलेंमाव मुख्यमंत्री तर रमाकांत खलप उपमुख्यमंत्री झाले. रवी नाईक, डॉ. काशिनाथ जल्मी, अशोक नाईक साळगांवकर, जे. बी. गोन्साल्वीश, माविन गुदिन्हो हे केबिनेट दर्जाचे मंत्री झाले. तर रत्नाकर चोपडेकर, सोमनाथ जुवारकर, लुईश कार्दोझ हे राज्यमंत्री झाले. सभापती डॉ. बार्बोझा यांची आमदारकी रद्द करावी या विरोधी काँग्रेस आमदारांच्या याचिकेवर विचार करण्यासाठी डॉ. जल्मीच्या एक सदस्य समितीने निर्णय द्यावा असे ठरले. ११ एप्रिल रोजी प्रकाश वेळीप यांची उपसभापतीपदी निवड झाली. १४ एप्रिल १९९० रोजी डॉ. बार्बोझा यांच्या सरकारचा शपथविधी झाला. डॉ. बार्बोझा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री रमाकांत खलप झाले. सौ. शशिकला काकोडकर, चर्चिल आलेमांव, रवी नाईक, डॉ. काशिनाथ जल्मी, जे. बी. गोन्साल्वीस, अशोक नाईक साळगांवकर, माविन गुदिनो हे कॅबिनेट दर्जाचे मंत्री बनले तर सोमनाथ जुवारकर, रत्नाकर चोपडेकर, लुईश कार्दोझ हे राज्यमंत्री झाले.

म. गो. आमदाराना वेगवेगळ्या महामंडळाची चेअरमनपदे देण्यात आली. २६ एप्रिल रोजी गोवा विधानसभेचे सभापती म्हणून प्रा. सुरेंद्र शिरसाट यांची निवड झाली. २२ जून १९९० पासून गोव्यात दूरदर्शनच्या कार्यक्रमाची निर्मिती सुरू झाली. शनिवार, रविवार सोडून इतर दिवशी संध्याकाळी सात ते साडेसात वाजेपर्यंत अर्धा तास कोंकणी कार्यक्रम सुरू झाले.

कोंकणी मराठी अथवा इतर प्रादेशिक भाषा माध्यम म्हणून स्वीकारणाऱ्या प्राथमिक शाळानाच अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला. यामुळे इंग्रजी माध्यमातील शाळेत ज्यांची मुले शिकत आहेत त्यानी निषेध व्यक्त केला. मोर्चा काढला. पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारचे मुख्यमंत्री डॉ. बार्बोझा यानी केलेल्या खातेवाटपावरून म. गो. गटात असमाधान व्यक्त होऊ लागले. पुलोआ सरकारमधून बाहेर पडा अशी मागणी. म. गो. कार्यकर्ते करु लागले. उत्तर गोवा विकास प्राधिकरणावर पूर्वसंमती न घेता उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याबद्दल म. गो. पक्षाचे संयुक्त चिटणीस चंद्रशेखर दिवकर यानी आक्षेप घेतला व राजीनामा दिला. याशिवाय पुलोआ सरकारचे अस्तित्व म. गो. पक्षाला घातक आहे असे स्पष्ट मत व्यक्त करून चंद्रशेखर दिवकर यानी म. गो. पक्षाच्या संयुक्त चिटणीसपदाचाही राजीनामा दिला. म. गो. पक्षाच्या कार्यकारिणीचे एक सदस्य मोतीलाल बांदेकर यानीही राजीनामा दिला. पुलोआ सरकारमधील मतभेत वाढतच गेले. माध्यमबदल कृति समितीने इंग्रजी माध्यमाच्या मागणीसाठी मोर्चा काढला. पालकांच्या या मोर्चाने सतरा वाहनांची मोडतोड केली, मुख्यमंत्री डॉ. बार्बोझा यांच्या बंगल्यावर दगडफेक केली. दुसऱ्या दिवशी 'बंद' ची हाक दिली. दक्षिण गोव्यात 'बंद' गोवाला हिसक वळण लागले. पण शैक्षणिक धोरणांत कोणताही बदल होणार नाही असे शिक्षणमंत्री सौ. शशिकला काकोडकर यानी जाहीर केले. पुलोआ सरकारच्या प्राथमिक शिक्षण धोरणाचा निषेध करण्यासाठी काँग्रेसने मडगांव येथे 'जेल भरो' आंदोलन केले. काँग्रेसच्या दहा आमदारांसह पांच हजार नागरिकानी स्वतःला अटक करून घेतली. त्यांची नंतर सुटका करण्यात आली. शैक्षणिक माध्यम धोरणात बदल नाही असे मुख्यमंत्री डॉ. बार्बोझा यानी जाहीर केले. इराकने कुवेतवर हल्या केल्यामुळे तिथले परदेशीय निर्वासित बनले. कुवेतमधील गोमंतकीय सुखरूप यावेत म्हणून

सरकारने प्रयत्न केले. काही मंत्री कुवेतमध्ये जाण्यासाठी उत्सुक झाले पण त्याना परवानगी मिळाली नाही. तुमची कार्यपद्धती बदला असा इशारा म. गो. शिष्टमंडळाने डॉ. बार्बोझा याना दिला.

पक्षांतर केल्याने एखादा आमदार अपात्र ठरतो की काय यांचा निर्णय सभापतीनीच द्यायचा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जाहीर केल्याची घोषणा उपमुख्यमंत्री रमाकांत खलप व कायदामंत्री डॉ. काशीनाथ जल्मी यानी विधानसभेत केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या अभिप्रायामुळे काँग्रेसचा त्याग केलेले सात आमदार अपात्र ठरतात की काय याचा निर्णय सभापतीच देतील असे स्पष्टीकरण डॉ. जल्मी यानी केले.

काँग्रेसचा त्याग करून पुरोगामी लोकशाही आघाडीत सामील झालेल्या काँग्रेसच्या सात आमदाराना अपात्र ठरविण्यात यावे अशी विनंती करणारा अर्ज विरोधी पक्षनेते डॉ. विली डिसोझा यानी सर्वोच्च न्यायालयात केला. हा अर्ज सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर आला असता एखादा आमदार अपात्र ठरतो की काय हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला पक्षांतरविरोधी कायद्याने दिलेला नाही असा अभिप्राय न्या. शेट्टी यानी दिला. सदर कायदाच घटनाबाह्य आहे डॉ. विली डिसोझा यांच्या मुद्यावर मात्र घटना खंडपीठासमोर पुढे सुनावणी ठेवली गेली.

सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यानी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत करून त्याबद्दल समाधानही व्यक्त केलेले असले तरी सर्वोच्च न्यायालयाने कोणताही निर्णय दिला नसल्याचा दावा अर्जदार डॉ. विली डिसोझा यानी केला. गोव्यातील सात आमदाराना अपात्र ठरविण्यात यावे हा अर्ज सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर सुनावणीस आला असता या अर्जावर घटना खंडपीठासमोर सुनावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्रिसदस्यीय खंडपीठ त्यावर विचार करू शकत नाही असा अभिप्राय न्या. शेट्टी यानी व्यक्त केला व सुनावणी स्थगित केली असे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे. या अर्जावर सुनावणी झालीच नसल्याने एखादा आमदार अपात्र ठरतो की काय हे केवळ सभापतीच ठरवू शकतात असा निर्णय देण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे डॉ. विली गटाने म्हटले.

गोवा प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी शांताराम नायक यांची नियुक्ती करण्यात आली. एदुआर्द फालेरो यानी प्रकृतीच्या कारणावरून

राजीनामा दिला होता व मध्यंतरीच्या काळांत आमदार फ्रान्सिस सार्दिन कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पहात होते.

माजी सभापती डॉ. बार्बोझा यानी काँग्रेसचा त्याग केल्याने त्याना अपात्र ठरविण्यात यावे म्हणून काँग्रेस आमदार लुईझिन फालेरो यानी अर्ज केला. त्यावरील प्रतिक्रिया सात दिवसाच्या आत कळवा अशी नोटीस डॉ. जल्मी यानी डॉ. विली डिसोझा यांच्यावर बजावली होती. सर्वोच्च न्यायालयाने या अर्जावरील सुनावणी घेण्यास स्थगिती दिल्याने आपण तुमच्या नोटिसीला उत्तर देऊ शकत नाही असे डॉ. विली डिसोझा यानी आपल्या उत्तरात म्हटले. आपल्या पत्रासोबत त्यानी सर्वोच्य न्यायालयाच्या संबंधित आदेशाची प्रत जोडली. दि. ७ ऑगस्ट रोजी जी परिस्थिती होती ती कायम राखण्यात यावी असे या आदेशात म्हटले.

सर्वोच्च न्यायालयात डॉ. विली डिसोझा यानी जो अर्ज केला त्यात आपल्या नावाचा उल्लेख प्रतिवादीत करण्यात आलेला नसल्याने सदरचा स्थगिती आदेश बंधनकारक नसल्याचा दावा डॉ. जल्मी यानी केला. त्यामुळे आपल्यासमोर असलेल्या अर्जावरील सुनावणी चालू करणार असल्याचे त्यानी स्पष्ट केले. विरोधी पक्षाचे नेते म्हणून डॉ. विली डिसोझा यानी आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नकार दिल्याने त्यांच्या जवळ या विषयावर सांगण्यासारखे काहीच नाही असे आपण गृहीत धरणार असल्याचे डॉ. जल्मी यानी पुढे सांगितले.

सरन्यायाधीश सव्यासाची मुखर्जी यांचा स्थगिती आदेश हा विधिमंडळाच्या कार्यात न्यायसंस्थेचा हस्तक्षेप असून त्याबद्दल गोवा विधानसभेत हक्कभंगाचा प्रस्ताव आपण मांडणार असल्याची पुस्ती डॉ. जल्मी यानी जोडली.

पक्षांतर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश बंधनकारक नसेल तर डॉ. काशिनाथ जल्मी यानी आपली सुनावणी जलदगतीने पूर्ण करून आपला निर्णय द्यावा असे उघड आव्हान डॉ. डिसोझा यानी त्याना दिले. आमदार लुइझिन फालेरो यांच्या मूळ तक्रारीवरल तक्रारीत सभापती व विद्यमान मुख्यमंत्री डॉ. लुईश बार्बोझा यांचे उत्तर डॉ. जल्मी याना मिळाले. डॉ. बार्बोझा यांचे हे उत्तर श्री. फालेरो यांच्याकडे पाठवून त्यांची प्रतिक्रिया मिळविली की डॉ. जल्मी आपला निर्णय देऊ शकतील. सर्वोच्च न्यायालयाची त्याना भीती वाटत नसेल तर आपला निर्णय देऊन मोकळे

व्हावे, असे प्रतिपादन डॉ. डिसोझा यानी केले. सर्वोच्च न्यायालयाची त्याना भीती वाटत आहे व त्यामुळेच ते निर्णय देणे लांबणीवर टाकीत असल्याचा दावा त्यानी केला.

पक्षांतर कायद्याखाली गोवन पीपल्स पार्टीच्या आमदाराना अपात्र ठरवण्याबाबतचा हा वाद चालू असताना पणजी विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी कुणाला नेमावे यासंबंधी वाद सुरू झाला. म. गो. ने पणजी विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदासाठी गोव्यातले नामवंत आर्किटेक्ट रमेश कामत यांचे नाव सुचवले. चर्चिल आलेमांव यानी त्याला विरोध केला. याबाबत घोळ बराच काळ चालला. पणजी विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून रमेश कामत यांच्या नावाला अखेर गोवन पीपल्स पार्टीच्या सभासदानी संमती दिली. पण नंतर रमेश कामत यानी स्वतः होऊन राजीनामा दिला. गोव्यातील सारी विकास प्राधिकरणे मोडीत काढा असे म. गो. कार्यकर्त्यानी म्हणायला सुरुवात केली. पीडीए (पणजी डेव्हलेपमेंट ॲथोरिटी) ही पीडाच आहे असा उपहासपूर्ण उल्लेख सर्वसामान्य माणूस म्हणू लागला.

मुख्यमंत्र्यांच्या वागणुकीवर व कार्यपद्धतीवर म. गो. गटाने सातत्याने टीका सुरु केली. कार्यपद्धतीत बदल न झाल्यास पाठिंबा काढून घेऊ अशा धमक्याही देण्यात आल्या. बार्बोझा आणि खलप यांचे हे शीतयुद्ध फार काळ टिकले नाही. ४ डिसेंबर १९९० रोजी म. गो. पक्षाने मुख्यमंत्री डॉ. बार्बोझा यांचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे गोव्यातील पुलोआ सरकार अल्पमतात आले. नवे सरकार बनवण्याबाबत म. गो. किंवा गोवन पीपल्स पार्टीला कॉंग्रेस पाठिंबा देणार नाही असे प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष शांताराम नायक यानी सांगितले. गोपीपामध्ये फूट पडली. सातापैकी तिघानी खलप पुलोआ गटाला पाठिंबा दिला. पुलोआचे नवे नेते रमाकांत खलप यानी आपणाकडे २२ आमदार आहेत तर बार्बोझा यानी आपल्यापाशी २४ आमदार असल्याचे सांगितले. राज्यपाल खुर्शीद आलम खानयानी अल्पकालीन राष्ट्रपती राजवट जाहीर केली. पण विधानसभा बरखास्त न करता निलंबीत केली. बहुमत दाखवा व सरकार बनवा असे त्यानी राजकीय नेत्याना सांगितले. विधानसभा बरखास्त करा अशी मागणी स्वातंत्र्य सैनिक संघटनेने केली. ही अशी राजकीय धुमाळी चालू असताना साहित्य क्षेत्रात अभिमानास्पद घटना घडली. गोव्यातील कोकणी

कवी रमेश वेळुस्कर याना कोकणी पुस्तकाबद्दल साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. राज्यपालांचे सल्लागार म्हणून आल्बान कोत यानी ताबा घेतला. आणि त्याचवेळी म. गो. पक्षामधील फूट जाहीर झाली. काँग्रेसचे तेरा, गोपीपाचे तीन, एक अपक्ष व म. गो. चे सहा असे तेवीस आमदारांचा आपणाला पाठिंबा आहे असे म. गो. चे एक प्रमुख नेते व बार्बोझा मंत्रीमंडळातील मंत्री रवी नाईक यानी जाहीर केले.

तीन जानेवारी १९९१ रोजी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष फुटल्याची घोषणा पक्षाचे संयुक्त सचिव अविनाश भोसले यानी केली. गटाचे नाव म. गो. (रवी नाईक) ठेवण्यात आले. म. गो. पक्ष प्रथम बांदोडकरांच्या वेळी कृष्णनाथ बाबुराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली फुटला होता. १९८० मध्ये सौ. शशिकला काकोडकर यानी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तेव्हा रमाकांत खलप व बाबुसो गांवकर यानी तो पक्ष टिकून धरला. १९८० मध्ये सात आमदार होते. ८४ मध्ये आठ झाले व ८९ मध्ये अठरा झाले अशा वाढत्या संख्येने म. गो. पक्ष जनमानसांत स्थान मिळवू लागला. पण नंतर म. गो. पक्षाने फोडाफोडीचे राजकारण केले. १९९० मध्ये म. गो. पक्ष नेत्याने काँग्रेस फोडली. १९९१ च्या सुरुवातीलाच काँग्रेसने म. गो. पक्षाची दोन शकले केली. पण फूट पडलीच नाही. म. गो. पक्ष एकसंघ आहे असे पक्षाध्यक्ष बाबन नाईक यानी म्हटले. सराकर बनवण्यासाठी आपणाला बोलावण्यात यावे ही मागणी धसास लावण्यासाठी रवी नाईक, डॉ. विल्फ्रेड डिसोझा दिल्लीस गेले.

राष्ट्रपतीच्या राजवटीच्या काळात नव्या राज्यपालाना सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्याची घोषणा केंद्रीय गृहराज्यमंत्री सुबोधकांत सहाय यानी केली. त्यामुळे गोव्यात लोकनिर्वाचित सरकार सत्तेवर येत नाही की काय अशी भीती निर्माण झाली.

२५ जानेवारी १९९१ रोजी गोव्याचे सहावे मुख्यमंत्री म्हणून रवी नाईक यांचा शपथविधी झाला. मुख्यमंत्री रवी नाईक याना पक्षांतर कायद्याखाली अपात्र ठरवावे अशी विनंती करणारा अर्ज म. गो. आमदार डॉ. काशीनाथ जल्मी यानी विश्वासदर्शक ठराव संमत करावा असे ठरले. मुख्यमंत्री रवी नाईक यानी सभापतीकडे सादर केला. गोवा विधानसभेचे अधिवेशन १३ फेब्रुवारी रोजी बोलवण्यात आले व १८ रोजी रवी नाईक यानी विश्वास ठराव संमत करावा असे ठरले. अशोक नाईक साळगांवकर,

पांडुरंग राऊत, विनयकुमार उसगांवकर व शंकर साळगांवकर हे चार बंडखोर म. गो. आमदार, सभापतीनी अपात्र ठरवलेले दोन माजी म. गो. आमदार रत्नाकर चोपडेकर व संजय बांदेकर याना मंत्रिमंडळात घेऊन मुख्यमंत्री रवी नाईक यानी मंत्रिमंडळाचा विस्तार केला. पाठकण्याच्या दुखण्यामुळे मुख्यमंत्री रवी नाईक सोहळ्यास उपस्थित राहू शकले नाहीत. विधानसभेचे अधिवेशन १३ फेब्रुवारी ९१ रोजी सुरू झाले. राज्यपालांच्या अभिभाषणावेळी म. गो. आमदारानी अडथळे आणले. त्यानंतर मुख्यमंत्र्यानी विश्वासदर्शक ठराव संमत करून घेतल्याशिवाय इतर कुठलेही कामगाज करणे योग्य ठरत नसल्याने सोमवार दि. १८ रोजी दुपारी अडीच वाजेपर्यंत विधानसभभा स्थगित करण्याचा निर्णय सभापती प्रा. सुरेंद्र शिरसाट यानी जाहीर केला. या निर्णयाला सत्ताधारी कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या आमदारानी हरकत घेतली. चिडलेल्या आमदारानी सभागृहातच अभिनव विधानसभा घेऊन कामगाज चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. ते कामकाज बेकायदेशीर असल्याचे प्रा. शिरसाट यानी सभागृह तहकुबीनंतर जाहीर केले.

१५ फेब्रुवारी रोजी सभापती प्रा. सुरेंद्र शिरसाट यानी मुख्यमंत्री रवी नाईक याना पक्षांतर कायद्याखाली अपात्र ठरविले. रवी नाईक यांच्या विरुद्ध आंदोलन करावे यासाठी बोलविण्यात आलेल्या म. गो. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत गोंधळ झाला. पोलीस बोलवावे लागले. विधानसभेमध्ये १८ फेब्रुवारी १९९१ रोजी मुख्यमंत्री रवी नाईक यानी विश्वासदर्शक ठराव २४ विरुद्ध ११ मतानी जिंकला. गोवन पीपल्स पार्टीच्या माविन गुदिन्हो, जे. बी. गोन्साल्वीस व सोमनाथ जुवारकर यानी पाठिंबा दिल्यामुळे विश्वासदर्शक ठरावाला २४ मते मिळाली. रवी नाईक यांच्या अपात्रतेला मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने स्थगिती दिली. मुख्यमंत्री आजारी असल्याने आवश्यक ते पुरावे सादर करण्यासाठी त्यानी मागितलेली मुदत नाकारण्यात आल्याचा दावा न्यायालयाने ग्राह्य धरला. उपसभापती प्रकाश वेळीप यांच्याविरुद्धचा अविश्वासाचा ठराव २४ विरुद्ध ११ मतानी संमत करण्यात आला. कॉंग्रेस आमदार सायमन डिसोझा यांची उपसभापतीपदी निवड झाली. त्यांचे प्रतिस्पर्धी म. गो. चे मोहन आमशेकर याना १२ मते पडली. अकरा महिन्यापूर्वी ज्या पद्धतीने सायमन डिसोझा यांची उचलबांगडी झाली होती तशीच उचलबांगडी प्रकाश वेळीप

यांची झाली. सभापती सुरेंद्र शिरसाट यांच्या विरुद्धचा अविश्वास ठराव २३ विरुद्ध १२ मतानी संमत झाला. काँग्रेसचे बार, गोवन पीपल्स पार्टीचे सहा, बंडखोर म. गो. चे चार व एक अपक्ष आमदार अशी मते ठरावाच्या बाजूने तर म. गो. ची अकरा व एक अपक्ष आमदार अशी बारा मते विश्वासदर्शक ठरावाच्या विरुद्ध पडली. माजी सभापती सुरेंद्र शिरसाट यानी दिलेला निर्णय उपसभापती सायमन डिसोझा यानी फिरवला व रत्नाकर चोपडेकर व संजय बांदेकर याना आमदार म्हणून पुन्हा पात्र ठरवण्यात आले.

म. गो. पक्ष संघटना व म. गो. विधीमंडळ पक्षात फूट पडलेली आहे. हे उपलब्ध पुराव्यानुसार सिद्ध होत असल्याने मुख्यमंत्री रवी नाईक याना अपात्र ठरवणारा माजी सभापती प्रा. सुरेंद्र शिरसाट यांचा निर्णय आपण रद्दबातल ठरवित असल्याचा निकाल उपसभापती सायमन डिसोझा यानी दिला. माजी केंद्रीय मंत्री भानुप्रकाश सिंग यांची गोव्याच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली. दैनिक हेराल्डचे मुख्य वार्ताहर अँथनी फर्नांडिस यांच्यावर हल्ला करण्यात आला. 'गोवा प्रोटेक्टर्स' सारख्या संघटनावर बंदी घालण्याचा विचार सरकार करीत आहे अशी घोषणा मुख्यमंत्र्यानी केली. रवी नाईक यांचा पणजी येथे भव्य सत्कार झाला. गुंडगिरीचा बंदोबस्त करण्यासाठी खास पोलीस पथक स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यानी केली. प्रोटेक्टर्सच्या व्हिक्टोरीया फर्नांडिस याना रासुका खाली अटक करण्यात आली. १२ एप्रिल ९१ रोजी म. गो. गो. गटाचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण झाले. अ. भा. काँग्रेसचे सरचिटणीस जनार्दन पुजारी यांच्या उपस्थित हा सोहळा पार पडला. पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या राजीनाम्यामुळे उत्पन्न झालेल्या पेच प्रसंगामुळे लोकसभा निवडुका जाहीर झाल्या. गोव्यातील लोकसभा निवडणूक २३ मे रोजी घेण्याचे ठरले.

म. गो. तर्फे उत्तर गोव्यांत प्रा. गोपाळराव मयेकर व दक्षिण गोव्यात एम्. एस्. प्रभू उभे राहिले तर काँग्रेसतर्फे उत्तर गोव्यात हरीश झांट्ये तर दक्षिण गोव्यात एदुआर्द फालेरो उभे राहिले. भा. ज. प. तर्फे उत्तरेत मनोहर पर्रीकर तर दक्षिणेत श्रीपाद नाईक उभे राहिले. अखिल भारतीय गोवा सत्याग्रही अधिवेशन पणजी येथे २७ एप्रिल रोजी भरले. पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. तर स्वातंत्र्यसेनानी ना. ग. गोरे संमेलनाचे अध्यक्ष होते.

म. गो. पक्षाची जनजागृत यात्रा निवडुकीच्या संदर्भात प्रमुख

शहरावर फिरली. १२ मे रोजी मंगेशी येथे सारस्वत मेळावा भरला. २१ मे रोजी राजीव गांधी यांची हत्या झाली. गोव्यातील लोकसभेच्या निवडणुकांची तारीख पुढे ढकलण्यात आली. १२ जून रोजी गोव्यात लोकसभा निवडणुका होतील असे जाहीर झाले.

दरम्यान १६ मे रोजी गोव्याचे माजी मुख्यमंत्री व बाणालीचे आमदार चर्चिल आलेमांव यांचे बंधू आल्वेनाझ आलेमांव व कस्टम अधिकारी कॉस्तांव फर्नांडीस यांच्यामध्ये झालेल्या झटापटीत आल्वेनाझ आलेमांव यांच्या मानेवर दोन इंची चाकूच्या तीक्ष्ण पात्याचे वार झाले व त्यातच आल्वेनाझ यांचा अंत झाला. चर्चिल आलेमांव यांच्या वाढदिवशी व त्यांचे दुसरे बंधु केनडी आलेमांव यांच्या लग्नाच्या दिवशी ही भयानक घटना घडली. त्यानंतर १८ मे रोजी पोलिसाना हवे असलेले जकात अधिकारी कॉस्तांव फर्नांडीस हे पोलिस अधिकाऱ्यासमोर हजर झाले. स्वत:चा जीव धोक्यात घालून संशयित स्मगलरला ताब्यांत घेण्याचा प्रयत्न करणारा कॉस्तांव फर्नाडिस यांचा जाहीर गौरव झाला पाहिजे अशी मागणी ॲड्. पॅट्रीक दिनीझ व ॲड्. संपद प्रभुदेसाई यानी केली. कॉस्तांव फर्नांडिसला राष्ट्रपतीपदक द्यावे असे उद्‌गार कस्टमचे अतिरिक्त जिल्हाअधिकारी आ. सुंदरम् यानी पत्रकारासमोर काढले. आल्वेनाझ आलेमांव स्मृतीला आदरांजली वाहण्यासाठी सिटीझन्स ऑफ डेमॉक्रसीतर्फे मडगांव येथे भरलेल्या शोकसभेत नामवंत कायदेपंडित व खासदार राम जेठमलानी यानी जोपर्यंत या देशातील सर्वोच्च न्यायालय आपला अंतीम निर्णय देत नाही तोपर्यंत आल्वेनाझ आलेमांवचा मृत्यू स्मगलिंग प्रकरणी झाला असे कुणी म्हणू शकत नाही असे उद्‌गार काढले. चर्चिलबंधु आल्वेनाझ आलेमांव मृत्यू प्रकरण जाणून घ्यायचे होते. परंतु मुख्य निवडणुक आयुक्त शेषन यानी सरळ उत्तर न देतां उद्धटपणा केला. त्यांचा मंत्रीमंडळ वाढीला विरोध असावा असे वाटते. परंतु ज्या पद्धतीने ते बोलले ती पद्धत आक्षेपार्ह आणि अपमानकारक होते. म्हणून मीही मग मंत्र्यांना शपथ देण्याचा निर्णय घेतला' रवी नाईक मंत्रीमंडळात तीन नव्या मंत्र्यांना घाईघाईने उरकण्यात आलेला शपथविधी हा सत्तालोलुपतेचा किळसपणा नमुना असल्याची प्रतिक्रिया म. गो. पक्षाने व्यक्त केली. राजीवजींच्या निधनाच्या बाराव्या दिवशी मंत्रीमंडळाचा विस्तार करून काँग्रेसने औचित्यभंग केल्याचा आरोप भाजपचे उपाध्यक्ष कृष्णलाल शर्मा यानी

केला. पोलिसानी अटक केलेल्या जकात अधिकारी कॉस्तांव फर्नांडिस याची जामिनावर सुटका करण्यास उत्तर गोव्याचे सत्र न्यायाधिश एस्. बी. नाईक यानी नकार दिला. पण मुंबई उच्च न्यायालयाच्या पणजी येथील खंडपीठाने त्यांची सशर्त मुक्तता केली. आरोपीना २५ हजार रूपयांची हमी द्यावी व सध्या कस्टम कार्यालयात रहावे व पोलीसाना हवे तेव्हा उपलब्ध व्हावे, या त्या अटी होत्या.

१ जून १९९१ रोजी सात सदस्य रवी नाईक मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. डॉ. विली डिसोझा, फ्रान्सिस सार्दिन व लुइझिन फालेरो याना मंत्रीमंडळात स्थान मिळाले.· डॉ. विली डिसोझा हे उपमुख्यमंत्री झाले. तर फ्रान्सिस सार्दिन व लुइझिन फालेरो याना कॅबिनेट दर्जा देण्यात आला. राज्यपाल भानुप्रकाश सिंग हे पत्रकारांशी बोलनाता म्हणाले, ''निवडणूक प्रक्रिया चालू असताना मंत्रीमंडळात वाढ करणे हे आचारसंहितेचा भंग करणारे आहे की काय हे मला जाणून घ्यायचे होते. परंतु मुख्य निवडणूक आयुक्त शेषन यानी सरळ उत्तर न देता उद्धटपणा केला. त्यांचा मंत्रीमंडळ वाढीला विरोध असावा असे वाटते. परंतु ज्या पद्धतीने ते बोलले ती पद्धत आक्षेपाई आणि अपमानकारक होते. म्हणून मीही मग मंत्र्याना शपथ देण्याचा निर्णय घेतला.'' रवी नाईक मंत्रीमंडळात तीन नव्या मंत्र्याना घाईघाईने उरकण्यात आलेला शपथविधी हा सत्तालोलुपतेचा किळसवाणा नमुना असल्याची प्रतिक्रिया म. गो. पक्षाने व्यक्त केली. राजीवजींच्या निधनाच्या बाराव्या दिवशी मंत्रीमंडळाचा विस्तार करुन काँग्रेसने औचित्यभंग केल्याचा आरोप भाजपचे उपाध्यक्ष कृष्णलाल शर्मा यानी केला.

११ जून रोजी सासष्टी तालुक्यातील दोन आमदार स्मगलिंग एजंट असल्याची माहिती गोव्याचे अतिरिक्त कस्टम कलेक्टर दयाशंकर यानी दिली. १२ जून रोजी लोकसभा सदस्यासाठी मतदान झाले. १४ जून रोजी गोवा प्रोटेक्टर्सचे अध्यक्ष रुडाल्फ फर्नांडिस दुपारी अडीच वाजतां पणजी येथे प्रथम न्यायाधिश दिवेकर यांच्यासमोर शरण आले. ते हजर झाले तेव्हा पोलिसाना या घटनेची माहिती नव्हती. कुणीतरी पोलिसाना ही गोष्ट सांगितली. पोलीस अधिकारी त्वरित हजर झाले त्यानी रुडाल्फ ला बेड्या ठोकून राष्ट्रीय सुरुक्षा कायद्याखाली अटक केली. १८ जून रोजी गोवा सरकारने अठ्ठेचाळीस स्वातंत्र्यसैनिकांचा सत्कार केला. व त्याच दिवशी

राज्य सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ केली. १९ जून रोजी गोव्याच्या मंत्रिमंडळाचा आणखी विस्तार झाला. सुभाष शिरोडकर, डॉ. कार्म पेगाद, वासु पायक गांवकर व सुरेश पुरुळेकर मंत्री झाले. रवी नाईक यांचे मंत्रिमंडळ १४ सदस्यांचे झाले.

लोकसभा निवडणुकीत पणजी मतदारसंघामध्ये (उत्तर गोवा) काँग्रेसचे उमेदवार हरीश नारायण झांट्ये याना ८८३३६ मते मिळाली तर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे उमेदवार प्रा. गोपाळराव मयेकर याना ३०८८९ मते मिळाली. अशा रितीने झांट्ये हे ५७४७ मतांची आघाडी घेऊन विजयी झाले मुरगांव मतदारसंघात (दक्षिण गोवा) काँग्रेसचे उमेदवार एदुआर्द फालेरो याना ९३०९८ मते पडली तर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे उमेदवार एम्. एस्. प्रभू याना ३३८६० मते पडली. अशा रितीने काँग्रेसचे एदुआर्द फालेरो ५९२३८ मतांची आघाडी घेऊन जिंकून आले. या लोकसभा निवडणुकीत म. गो. पक्षाचा धुव्वा उडाला. उत्तर गोव्यातील मांद्रे, पेडणे, धारगळ, थिवी, म्हापसा, कुंभारजुवे या म. गो. च्या मतदारसंघानी आपली निष्ठा काँग्रेसकडे वळवली. दक्षिणेला प्रियोळ मतदारसंघ तेवढा आपली म. गो. वरील निष्ठा टिकवून राहिला. ही सहानुभूतीची लाट आहे असे विरोधी पक्षानी म्हटले. मुक्तिनंतरच्या गोव्यात पहिली निवडणूक झाली तेव्हा विधानसभेत आणि लोकसभेत एकही काँग्रेस उमेदवार निवडून झाली तेव्हा निवडून आला नाही. १९६३ ते १९९१ पर्यंतच्या काळात गोव्यात अनेक घडामोडी झाल्या, सामान्य माणसाच्या मनात आणि वागणुकीत बदल झाला. राजकीय विचारसरणीत सुद्धा फार मोठा बदल झाला आणि १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत गोव्याच्या दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या. काळ बदलला आणि मतदारही बदलला.

: चौदा :

उपसंहार

लोकसभा निवडणुकीनंतर गोव्यामधील मतदार बदलला अशी चिन्हे दिसू लागली. मुख्यमंत्री रवी नाईक मंत्रिमंडळाला लोकांची सहानुभूती मिळू लागली, तोच कोकण रेल्वे मार्ग बदल प्रश्न उफाळून आला. हा बदल करावा अशी मागणी फक्त सासष्टी तालुक्यातील काही प्रतिष्ठितानी सुरू केली. त्या मार्गात बदल करून तो मार्ग उसगांव, फोंडा परिसरातून न्यावा अशी मागणी गोवा लोकपक्षाचे सरचिटणीस माथानी सालढाणा यानी केली.

रेल्वे मंत्रालयाच्या सुधारीत आराखड्यानुसार गोव्यातील रेल्वे मार्गाची एकूण लांबी १०६.५ किलोमिटर असेल. पेडणे, बार्देश, डिचोली, तिसवाडी, मुरगांव, सासष्टी, केपे व काणकोण या आठ तालुक्यातील हा मार्ग जातो.

पेडणे तालुक्यातील पोरस्कडे गावातून कोकण रेल्वे गोव्यात प्रवेश करील. पोरस्कडे गावातील रेल्वे मार्गाची लांबी १.१४ कि. मी. असेल. खाजनेतील मार्गाची लांबी ०.७८ कि. मी. तर पेडणे गावांतून ३.२६ कि. मी. लांबीचा मार्ग जाईल. गोव्यातील पहिले स्टेशन मालपे होईल. धारगळ गावातून ३.८६ कि. मी. मार्ग जातो. कोलवाळ नदीवर धारगळ येथे पूल होऊन रेवोडा गावात रेल्वे येईल.

बार्देश तालुक्यातील रेवोडा, थिवी,शिरसई व अस्नोडा या गावातून रेल्वे जात असून प्रत्येक गावातील रेल्वेमार्गाची लांबी खालीलप्रमाणे आहे. रेवोडो ३.१२ कि. मी. थिवी २.२२ कि. मी. शिरसई १.१६६ कि. मी. अस्नोडा ०.६४ कि. मी.

शिरगांव, मये, वायंगिणी, हातुर्ली व नार्वे या डिचोली तालुक्यातील पाच गावातून रेल्वे जात असून प्रत्येक गावातील रेल्वे मार्गाची लांबी खालील प्रमाणे आहे. शिरगांव १.४२, मये ४.८४, वायंगिणी ०.७१, हातुर्ली ०.२९, नार्वे १.९५ कि. मी.

तिसवाडी तालुक्यातील मळार, एला, करमळी, आजोशी, मंडूर नेवरी–ओ. ग्रांद, या सहा गावातून मार्ग जाईल. प्रत्येक गावातून जाणाऱ्या मार्गाची लांबी कि. मी. मध्ये खालीलप्रमाणे आहे. मळार २.६९, एला

२.६५, करमळी ३.१५, आजोशी १.६६, मंडूर ०.६८, नेवरा–ओ–ग्रांद २.७७.

जुवारी नदीवर होणाऱ्या पुलावरून सांकवाळ गावात रेल्वे प्रवेश करील. मुरगांव तालुक्यातील सांकवाळ व कुठ्ठाळी या दोन गावातून मार्ग जाईल. सांकवाळ गावातून अर्धा कि. मी. मार्ग जात असून कुठ्ठाळी गावातून ४.९८ कि. मी. मार्ग जातो.

एकूण २८ कि. मी. मार्ग सासष्टी तालुक्यातील जात असून नागोवा २, कासावली ०.४६, आरोशी १.२८, उतोर्डा १.३,माजोर्डा १.२२, कलाता १.२६, नुवे ०.९६, टुकोळी ०.९९, सेरावली ०.९०, बाणावली २.८६, मडगांव ०.६, आके १.६५, नावेली ३.३, धर्मापूर २.५, सारझोरा १.१५, वेरोडा ४.५३, कुंकळ्ळी १.२२ कि. मी. या गावातून तो जातो.

बाळ्ळी १.३५, बेंदोर दाम १.५५, तिणेय २.१२, कोर्डे, ०.६, पाडी १.३२, बार्शे ३.३१, चावरी ३.६४, केपे १.३ कि. मी. अशी केपे तालुक्यातील रेल्वे जाईल.

काणकोण २.११, नगर्से–पाळोले १.९३, पैंगिण २.५९ व लोलये ८.२५ कि. मी. असा काणकोण तालुक्यातील मार्ग आहे.

या मार्गाबद्दल कुणाची तक्रार नव्हती. पण २ सष्टेंबर १९९१ रोजी परराष्ट्र राज्यमंत्री एदुआर्द फालेरो यानी सासष्टी तालुक्यातील रेल्वे मा बदलण्याची मागणी केली. कोकण रेल्वेचा सध्याचा मार्ग गोव्याच्या दृष्टी "सौंदर्यविध्वंसक" आहे. त्याचा फेरविचार करण्यासाठी तज्ञांची समिता नियुक्त करण्यात यावी असे ते म्हणाले.

कोकण रेल्वेचा गोव्यातील मार्ग निश्चित करताना गोमंतकीय जनतेला विश्वासात घेणे गरजेचे होते. गोमंतकीयांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असा हा निर्णय केवळ मंत्री आणि आधिकाऱ्यानी घ्यावयाचा नसून जनमताचा विचार करणे आवश्यक आहे. गोव्याचे सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे असे मत परराष्ट्र राज्यमंत्री श्री. फालेरो यानी व्यक्त केले.

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील राजकीय नेते तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री आपले निर्णय गोव्यावर लादत आले असल्याचा गंभीर आरोप श्री. फालेरो यानी केला. महाराष्ट्र व कर्नाटकचे नेते जे काही ठरवतील ते डोळे झाकून आम्ही स्वीकारावे काय ? असा सवालही श्री. फालेरो यानी केला. कोकण

रेल्वेचा मार्ग निश्चित करताना आपणाला कोणीच विश्वासात घेतले नसल्याचा आरोपही त्यानी केला. कोकण रेल्वेसाठी आपण पर्यायी मार्ग सुचविणार नाही, त्यासंबंधीचा निर्णय तज्ञानी घ्यायचा आहे असे त्यानी संबंधित प्रश्नावर सांगितले. या प्रश्नावर सखोल अभ्यास व चर्चा झाली पाहिजे असे मतही त्यानी व्यक्त केले.

कोकण रेल्वेमुळे गोव्याचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक नुकसान होणार असेल तर कोकण रेल्वे गोव्यात न आणता सावंतवाडीहून सरळ कारवारला का नेऊ नये असा प्रश्न विचारला असता त्याचा विचार तज्ञ समितीने करावा असे त्यानी सुचविले.

लोंढा ते वास्को रेल्वेचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करण्यात यावे ही मागणी गेली ३० वर्षे पडून आहे. लोंढा ते मुरगांव मार्गाचे रुंदीकरण करण्यासाठी केवळ १२० कोटी रु. खर्च आला असता. कोकण रेल्वेच्या १०५ कि. मी. ला १९३ कोटी खर्च येणार असल्याची माहिती श्री. फालेरो यानी दिली. महाराष्ट्र व कर्नाटक या राज्याना कोकण रेल्वे हवी आहे म्हणून तातडीने काम हाती घेण्यात आले असल्याचा आरोपही श्री. फालेरो यानी केला.

सासष्टी तालुक्यातून जाणाऱ्या मार्गामध्ये किरकोळ बदल करण्यात आले आहेत. याबाबत वाहतूकमंत्री पांडुरंग राऊत यानी म्हटले की "सासष्टी तालुक्यातील उतोर्डा ते सेरावली या सुमारे १९ कि. मी. मार्गासाठी सध्या रेल्वेच्या ताब्यात असेलेली जमीनच वापरण्यात येणार आहे. त्यामुळे उतोर्डा, माजोर्डा, बेताळभाटी व सेरावली या गावांत रेल्वेमुळे काहीच नुकसान होणार नाही" ओल्ड गोव्याच्या चर्चेसना कोकण रेल्वेमुळे धोका आहे असा प्रचार होतो तो खोटा आहे हे सांगताता वाहतूकमंत्री म्हणाले, "जुने गोव्यातील चर्च प्रकल्पापासून सुमारे अडीच कि. मी. वरून रेल्वे मार्ग जात असल्यामुळे त्याचा कोणताही अनिष्ट परिणाम जुने गोवा येथील चर्चेसवर होणार नाही. फालेरो यानी सुचवलेल्या मार्गातून रेल्वे नेल्यास त्याचा फार मोठा परिणाम गोव्याच्या पर्यावरणावर होईल. रेल्वेचा खर्च २६० कोटीनी वाढणार असून रेल्वेकाम पुरे व्हायला किमान दीड वर्षे जादा लागेल"असेही राऊत यानी सांगितले. सासष्टी तालुक्यातील मार्ग बदलण्याची मागणी उपमुख्यमंत्री डॉ. विली डिसोझा यानीही केली. कोकण रेल्वे मार्गात कोणताही बदल खपवून घेणार नाही

असे म. गो. चे अध्यक्ष बाबन नाईक यानी जाहीर केले.

कोकण रेल्वे गोव्याच्या आठ तालुक्यातून जात असून सर्वात कमी नुकसान सासष्टी तालुक्याचे होत असल्याचे म. गो. सचिव डॉ. विल्फ्रेड मिश्किता यानी सांगितले. सासष्टी तालुक्यात कोकण रेल्वे जुन्या मार्गाला लागूनच जात असल्याने केवळ पाच मीटर जादा जमीन ताब्यात घेतली जाणार आहे. सासष्टी तालुक्यात फक्त एकच घर रेल्वेखाली जात आहे अशीही माहिती डॉ. मिश्किता यानी दिली.

सासष्टी तालुक्याचे नुकसान होऊ नये म्हणून रेल्वे मार्गात बदल करून तो फोंडा, सांगे या भागातून नेण्यात यावा या श्री. फालेरो यांच्या सूचनेला त्या भागातील जनतेचा तीव्र विरोध असल्याचे आमदार मोहन आमशेकर यानी सांगितले. साळावली धरणामुळे सांगे तालुक्यातील शेकडो कुटुंबांचे नुकसान झाले आहे. सत्तरी तालुक्यातील हणजुणे धरणामुळे असेच शेकडो कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागले आहे. या धरणाचे पाणी मात्र सासष्टी, बार्देश आदी तालुक्याना मिळणार आहे. आता आणखी त्याग करण्यास आम्ही तयार नसल्याचे श्री. आमशेकर यानी स्पष्टपणे बजावले.

कोकण रेल्वे मार्ग बदल करण्याबाबतचा हा वाद गोव्यापुरता मर्यादित राहिला नाही तर त्याचे पडसाद लोकसभेतही उठले. ५ सप्टेंबर ९१ रोजी परराष्ट्र राज्यमंत्री एदुआर्द फालेरो यानी कोकण रेल्वे संबंधात केलेल्या काही विधानाचा प्रश्न माजी केंद्रीय मंत्री श्री. जॉर्ज फर्नांडिस यानी लोकसभेत उपस्थित केला. शून्य प्रहरात ही बाब त्यानी उपस्थित केली तेव्हा कामकाज खात्याचे राज्यमंत्री श्री. आर्. कुमारमंगलम् यानी त्यास आक्षेप घेतला. या बाबीची पूर्वसूचना फर्नांडिस यानी मंत्र्यांना द्यावयास हवी होती असा आक्षेप कुमारमंगल यानी घेतला व शून्य प्रहराचा वापर यासाठी व्हायला नको आहे असे ते म्हणाले. विरोधी पक्षनेते लालकृष्ण अडवाणी यानी फर्नांडिस यांची बाजू घेऊन म्हटले "पत्रकार परिषदेत मंत्र्यांनी केलेल्या विधानाचा फर्नांडिस हे केवळ संदर्भ देत होते. पूर्वसूचना दिली गेली नाही म्हणून फर्नांडिस याना रोखता येणार नाही. लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील यानी सांगितले की फर्नांडिस याना अडवणे कठीण आहे. परंतु शिष्टाचारानुसार त्यानी ही बाब संबंधित मंत्र्यांच्या निदर्शनास आणावी व आवश्यक वाटल्यास हा प्रश्न उद्या हाती घ्यावा जॉर्ज फर्नांडिस यानी कोंकण रेल्वेमार्ग बदलाचा प्रश्न दुसऱ्या दिवशी लोकसभेत आणला.

ते म्हणाले, ''आपल्या दोन सहकारी मंत्र्याविरुद्ध सौंदर्यविध्वंसनाचा आरोप लावून मंत्र्यानी घटनेच्या ७५ (३) कलमाचा भंग केला आहे. याबद्दल त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई केली पाहिजे. शिवाय दिल्ली–मंगलोर जोडणाऱ्या १५०० कोटी रुपयांच्या कोकण रेल्वेला सभागृहाने दोन वर्षापूर्वी मंजुरी दिली आहे. गोव्याचे हे मंत्री या योजनेला बुडवू पहात आहेत. वर्तमानपत्रात आलेल्या बातमीचा संदर्भ देऊन फर्नांडिस म्हणाले की, श्री. फालेरो हे केवळ योजनेमध्ये अडथळे आणत नाही तर हा प्रकल्प म्हणजे गोव्याच्या जनतेला सौंदर्य विध्वंस करणारी कृती आहे.'' असे या प्रकल्पाचे वर्णन करीत आहेत. मंत्र्यांची चमत्कारिक अवस्था मी जाणू शकतो. गोव्यातून जाणाऱ्या या प्रकल्पाविरुद्ध गोव्याची वाहतूक लॉबी दडपण आणत आहे.''

जॉर्ज फर्नांडिस यांच्या आरोपाला उत्तर देताना एदुआर्द फालेरो म्हणाले, ''कोकण रेल्वे प्रकल्पासंबंधी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मी रेल्वेमंत्री श्री. सी. के. जाफर शरीफ व रेल्वे राज्यमंत्री मल्लीकार्जुन यांची नावे घेतली नव्हती. माझ्या मतदारसंघातील लहानशा भागातून जाणारी रेल्वे वाट लोकवस्तीतून जात असल्यामुळे तिथल्या नागरिकाना तो मार्ग पसंत नाही. येत्या कित्येक पिढ्याना त्या मार्गामुळे त्रास होणार आहे म्हणून तो मार्ग बदलायला हवा आणि तो बदल तज्ञांच्या सल्ल्याने व्हायला हवा. संबधित तज्ञांचा निर्णय दोन महिन्याच्या आत द्यायला हवा.'' कोकण रेल्वे मार्ग बदलाची मागणी कॅथॉलिक समाजातील मतलबी नेत्यांनी सुरु केली आहे असा समज गोव्यात पसरू लागला. कोकण रेल्वे मार्गासंबंधी जो काही निर्णय घ्यायचा असेल तो रेल्वेमंत्री जाफर शरीफ घेतील असे मुख्यमंत्र्यांनी २५ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत सांगितले. रेल्वे मार्ग बदलाची मागणी मान्य झाल्याचे निवेदन परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री एदुआर्द फालेरो यानी २९ ऑक्टोबर ९१ रोजी पत्रकार परिषदेत केले.

आणखी एक महत्वाची घटना जुलै अखेरीस घडली. पोर्तुगीज राजवटीखालील गोवा मुक्त होण्यास सहा दिवस असताना पोर्तुगालने लिस्बनला नेलेले बांक नासिओनाल उलत्रामारीन'' या पोर्तुगीज बँकेतील सोने लिस्बन येथे एका सोहळ्यात अधिकृतरीत्या भारताच्या स्वाधीन करण्यात आले.

सोने हस्तांतर करण्याच्या या सोपस्कारावर बीएन्यू या पोर्तुगालच्या

कार्यालयात शिरायला पाहू लागले. पोलिसानी हस्तक्षेप करून निदर्शकाना पांगवले. आर्चबिशपाचा अवमान करणाऱ्या निदर्शकांचा ''गोवा बचाव चळवळी''ने निषेध केला व आर्चबिशपने घेतलेल्या धोरणाला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला. पण आपण पाद्रीना मारहाण केली नाही असा खुलासा अखिल गोवा माध्यम बदल पालक संघटनेने केला. शिष्टमंडळाशी भेट घेण्यास नकार दिला म्हणून काही लोकानी आर्चबिशपच्या दारावर लाथा मारल्या असे संघटनेने म्हटले. आर्चबिशपना शिव्या दिल्या त्या वैफल्यग्रस्त बनल्यामुळे अशी मखलाशी त्यानी केली. गोव्यातील साऱ्या धर्मीय लोकानी आर्चबिशपचा अवमान करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध केला. ''६ सप्टेंबर ९१ रोजी घडलेला अतिशय दुर्दैवी व वाईट प्रकार घडल्यानंतर ज्यानी ज्यानी या ना त्या प्रकारे व्यक्तीशः किंवा गटामार्फत स्वतः भेटून किंवा पत्रे लिहून तसेच संपादकीय,वृत्ते, निवेदन किंवा वृत्तपत्रातील पत्राद्वारे आम्हाला त्यांच्या तीव्र भावना कळवल्या व आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्या सर्वांबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोत ''असे जाहीर पत्रक आर्चबिशपनी काढले.

उपसभापती सायमन डिसोझा यांच्याविरुद्ध आणलेल्या अविश्वास ठरावावरील मतदानात सौ. शशिकला काकोडकर यानी भाग घेतला नाही त्यामुळे म. गो. पक्षात खळबळ माजली. सौ. शशिकला काकोडकर यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करू नये अशी कारणे दाखवा नोटीस शशिकला काकोडकर यांच्यावर बजावण्यात आली. ''उपसभापती सायमन डिसोझा यांच्याविरूद्धचा अविश्वास ठरावाच्या चर्चेवेळी सभागृहात जे घडले ते पाहून मी उद्वीग्न झाले एकंदर प्रकाराचा उबग आला व त्याच परिणाम म्हणून ठरावावरील मतदानात भाग न घेता मी बसून राहिले'' असे उत्तर म. गो. च्या कार्याध्यक्षा व मयेच्या आमदार यानी दिले. या उत्तराने जास्त संतप्त झाले ते डॉ. काशिनाथ जल्मी म. गो. नेस्तनाबूत करण्याचे हे कारस्थान आहे असा आरोप डॉ. जल्मीनी केला व त्यांच्याविरुद्ध कारवाई करून पक्ष वाचवावा अशी मागणी त्यानी केली.

गोवा विद्यापीठाने चालू शैक्षणिक वर्षापासून त्रिसत्र परीक्षा पद्धत लागू करण्याचा निर्णय घेतला. या त्रिसत्रपद्धतीनुसार वर्षभारातील कामासाठी ३० गुण तर वार्षिक परीक्षेसाठी ७० गुण दिले जातात. ही पद्धती बंद करा अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. गोवा विद्यापीठाच्या

पदाधिकाऱ्यांशी बोलणी केली. पण त्यानी विद्यार्थ्यांचे समाधान झाले नाही. त्यानी विद्यापीठ आवारात मोडतोड केली. विद्यार्थ्यानी केलेल्या दगडफेकीत पोलीस उपाध्यक्षकं प्रेमानंद बोरकर जखमी झाले. दुसऱ्या दिवशी मुरगावमध्ये विद्यार्थ्यानी मिरवणूक काढली. गोवा दिद्यार्थी कृती मंचाने पुरस्कार केलेला गोवा 'बंद' काही शहरापुरताच मर्यादित राहिला. पण विद्यार्थ्यांची एकजूट कायम राहिली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा विचार करण्यासाठी प्राचार्य समितीची बैठक भरली व त्रिसत्र परीक्षा पद्धतीची कार्यवाही यंदा स्थगित करण्याचा निर्णय विविध महाविद्यालयाचे प्राचार्य आणि अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला.

म. गो. चे उमेदवार डॉ. काशिनाथ जल्मी यांचा पराभव करून काँग्रेसचे शेख हसन हरुण विधानसभेच्या सभापतीपदी निवडून आले. शेख हसन हरुण याना २७ मते पडली तर डॉ. काशिनाथ जल्मी याना ११ मते पडली. गोवा संसदीय क्षेत्रामधील ही नोंद करण्याजोगी घटना घडली. त्याचबरोबर भारताच्या इतिहासात कधीही न घडलेली गोष्ट गोव्याच्या राजकीय जीवनात घडली. या घटनेचे प्रतिसाद देशभर पसरले. दिल्लीसारख्या प्रमुख शहरात तर या गोष्टीला महत्व देण्यात आले. पण केरळसारख्या राज्यातील वृत्तपत्रातसुद्धा या गोष्टीला प्रमुख स्थान देण्यात आले. गोव्याच्या माजी मुख्यमंत्र्याना काफेपोसाखाली अटक करण्यात आली ही ती घटना होय.

कस्टमच्या गोवा विभागाने चर्चिल व त्याचे बंधू आणि इतर साथीदार सोन्याच्या स्मगलिंगमध्ये गुंतलेले असल्याचा भक्कम पुरावा गोळा करून दोन आठवड्यापूर्वी दिल्लीत केंद्रीय गुप्तचर महसुली मंत्रालयाकडे पाठिवला. त्या पुराव्याची छाननी करून मंगळवार दि. १० सप्टेंबर रोजी केंद्रीय गुप्तचर महसूल मंत्रालयाने गोवा कस्टमला चर्चिल आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध कॉफिपोसाखाली कारवाई करण्यासाठी अनुमती दिली. लागलीच गोवा कस्टमचे अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. दयाशंकर यानी चर्चिल, जॉकीम, सियाब्रो तसेच चर्चिलचा ड्रायव्हर व इतर दोघा साथिदाराना कॉफिपोसाखाली अटक करून स्थानबद्ध करण्याची विनंती गृहसचिव या नात्याने मुख्यसचिव श्री. पी. व्ही. जयकृष्णन् यांच्याकडे एका अर्जान्वये केली. त्यासाठी प्रत्येकाविरुद्ध ३४० पानांची एकेक आरोपपत्रही सादर करण्यात आले. मुख्यसचिव श्री. जयकृष्णन् यानी

''काफेफोसा''खाली अटक करण्याची ''त्या'' सहाजणांविरुद्ध वॉरंट काढले. त्यावर मुख्यमंत्री रवी नाईक यांच्या सह्या घेतल्या आणि त्यानुसार कारवाई करण्याचा लेखी आदेश पोलीस महानिरीक्षक श्री. यदुराम आर्. धुरिया याना दिला.

पोलीस चर्चिल आलेमांवच्या वार्का येथील चर्चिलच्या घरात गेले. त्यानी घराभोवती वेढा घातला. चर्चिलच्या दोन भावापैकी सियाब्रो त्याना मिळाला. चर्चिल व जॉकीम सांपडले नाहीत. त्यांच्या शोधासाठी पोलीस सर्वत्र फिरले आणि मग अकस्मात परत त्यानी चर्चिलच्या वार्का येथील घराला पुन्हा वेढा दिला. पोलीस डेप्युटी सुप्रिटेंडंट संतोबा देसाई काही महिला पोलिसासमवेत घरात घुसले. एक खोलीला कुलूप होते. ते कुलूप पोलिसानी तोडले. आत लपून बसलेला ज्योकीमला त्यानी पकडले. सियाब्रो व ज्योकिम याना मडगांव पोलीस स्टेशनवर ठेवण्यात आले. त्यांच्यावरील ३४० पानी आरोपपत्र त्याना वाचून दाखवण्यात आले व प्रत्येक पानावर त्यांच्या सह्या घेण्यात आल्या. कॉफिपोसाखाली अटक चुकविण्यासाठी बेपत्ता झालेल्या चर्चिल आलेमांव यास दुसऱ्या दिवसापर्यंत हजर राहण्याचा आदेश देण्यात आला व हजर न झाल्यास त्यांच्या राहत्या घरासह सर्व मालमत्ता जप्त केली जाईल असे जाहीर करण्यात आले आणि अखेर १० सप्टेंबर च्या मध्यरात्रीपासून बेपत्ता झालेले गोव्याचे माजी मुख्यमंत्री व बाणावलीचे आमदार चर्चिल आलेमांव १३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजून २५ मिनिटाने पोलीस प्रमुख यदुराम धुरिया यांच्यासमोर शरण आले. कायदेशीर सोपस्कार पूर्ण केल्यानंतर रात्रौ ९ वाजून ५५ मिनिटानी त्याना ''कॉफिपोसा'' खाली अटक करून त्यांची रवानगी आग्वाद तुरुंगात करण्यात आली. गेले तीन दिवस आपण ट्रॉलरवर होतो असे चर्चिलनी पोलिसाना सांगितले. कॉफिपोसाखाली झालेली आपली अटक राजकीय हेतूने करण्यात आली असून त्याला मुख्यमंत्री रवी नाईक जबाबदार असल्याचा आरोप आग्वाद तुरुंगाच्या वाटेवर असताना चर्चिल आलेमांव यानी केला. एका वर्षात आपण रवी नाईक यांचे सरकार पाडू असा इशाराही त्यानी दिला व मुख्यमंत्री रवी नाईक यास मटका बुकी म्हटले

स्मगलींग प्रकरणांत आपला कोणत्याही प्रकारे हात नसून राजकीय हेतूने आपल्याला स्थानबद्ध करण्यात आल्याचा आरोप श्री. चर्चिल

आलेमांव यानी केला होता. त्याच्या अटकेत आव्हान देणारा अर्ज कनिष्ठ बंधु केनडी व रेजिनोल्डचा पत्नीने केला होता. त्या अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठासमोर झाली व गोव्याचे माजी मुख्य मंत्री व बाणावलीचे आमदार चर्चिल आलेमांव व अन्य तिघाना "काफेफोसा" खाली स्थानबद्ध करणारा कस्टमचा आदेश गोवा खंडपीठाने रद्द ठरवला. त्यामुळे चर्चिल आलेमाव व अन्य तिघेजण यांची मुक्तता करण्यात आली.

स्थानबद्ध कायद्यामुळे एखाद्याचे स्वातंत्र्य सामान्य कायद्याचा अवलंब न करता हिरावून घेण्यात येत असल्यामुळे घटनेचा कलम २२ (५) नुसार सर्व आवश्यक तांत्रिक बाबींची काटेकोर पूर्तता करण्याची सक्ती असते. ज्याला अटक करायची त्याच्या विरुद्धचा सर्व पुराव्याची व आधारांची त्याला ताबडतोब माहिती द्यावी लागते, ज्याच्या आधारे त्याला आपली बाजू मांडता यावी. आलेमांव बंधुचे वकील बॅ. राम जेठमलानी यानी स्थानबद्धतेस आव्हान देताना घटनेचा २२ (५) कलमाचा भंग होत असल्याचे सांगितले. आलेमांव बंधुंच्या वतीने पंधरा मुद्दे सादर करण्यात आले पण दोनच मुद्द्यावर भर देण्यात आला. ज्या कागदपत्राच्या आधारे स्थानबद्धतेचा आदेश जारी करण्यात आला ती सारी कागदपत्रे आलेमाव बंधुना द्यायला हवी होती. ती दिली नसल्यास सदर कागदपत्रांचा उल्लेख आलेमांव बंधूच्या मुक्ततेस पुरेसा आहे असे बॅ. राम जेठमलानी यानी पहिल्या मुद्द्यावर बोलताना म्हटले. कागदाचा उल्लेख असलेल्या पंचनाम्याच्या प्रती चर्चिल आलेमांव याना देण्यात आल्या होत्या असे पब्लिक प्रॉसिक्युटर गुरुदास भोबे यानी उत्तर दिले. कागदपत्र पुराव्याची जबाबदारी नसून स्थानबद्धती चे कागदपत्र मागून घ्यायचे असतात असे केंद्र सरकारच्या वकील श्रीमती रंजना देसाई यानी म्हटले व आदेश जारी करताना सदर कागदपत्रे विचारात घेतली नव्हती असे सांगितले. जेठमलानी यानी उपस्थित केलेल्या पहिल्या मुद्यावर भर देऊन त्याचे म्हणणे ग्राह्य मानले व आलेमांव बंधुच्या मुक्ततेचा आदेश न्यायमूर्ती गुरुदास कामत व न्यायमूर्ती एम्. एन. काझी यानी जॉकीम आलेमांव व रेजिनाल्ड रॉड्रिग्ज मुक्त झाले. या निकालाविरुद्ध कस्टम खाते सर्वोच्य न्यायालयात अपील करील असे अतिरिक्त कस्टम कलेक्टर दया शंकर यानी पत्रकारपरिषदेत सांगितले. सर्वोच न्यायालयाने अपील फेटाळले.

स्मगलर प्रकरणी गोव्याचे दोन मंत्री गुंतल्याचे वृत्त गोव्यातील एका दैनिकात प्रसिद्ध झाल्याबरोबर गोव्याचे राज्यपाल भानुप्रकाश सिंह यानी क्रीडामंत्री संजय बांदेकर व मच्छिमार मंत्री रत्नाकर चोपडेकर याना बोलवून घेतले व स्पष्टीकरण मागितले. दोन्ही मंत्र्यांनी या बाबत संयुक्त पत्रकार परिषद घेतली व आपल्यावरचे आरोप बिनबुडाचे आहेत असे जाहीर केले. चर्चिल आलेमांव यानी दिलेल्या इशाऱ्याबाबत बोलताना रवी नाईक यानी ठामपणे सांगितले की, 'मुख्यमंत्रीपद गेले तरी चालेल पण राज्यातील गुंडगिरी, तस्करी मी बंद करणारच.' कॉफिपोसाखाली अटक करून तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आलेल्या चर्चिल आलेमांव यानी 'व्ही. आय्. पी.' ट्रीटमेंट पाहिजे असा आग्रह धरला पण कायद्याबाहेर खास अशी ट्रीटमेंट त्याना दिली जाणार नाही असा खुलासा करण्यात आला. आग्वाद तुरुंगात असलेले चर्चिल आलेमांव रवी नाईक मंत्रिमंडळ पाडण्याची भाषा करीत असून कदाचित् तो पैशाच्या बळावर तो हे बोलत असावा असे मुख्यमंत्री रवी नाईक यानी २५ सप्टेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. आठव्या परिशिष्टात कोकणीला स्थान द्या अशी मागणी गोवा मंत्रि मंडळाने केंद्र सरकारकडे केल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

घटनेच्या आठव्या परिशिष्टात कोकणीचा अंतर्भाव करण्याची मागणी करण्याचा जो ठराव गोवा सरकारने संमत केला त्याचे गोवा कोकणी अकादमीने स्वागत केले. गोवा सरकारचा हा निर्णय म्हणजे कोकणीच्या विकासाच्या मार्गात योग्य दिशेने उचलेले महत्वाचे पाऊल आहे असे प्रसिद्ध कोकणी लेखक पुंडलिक नारायण नायक म्हणाले. अखिल भारतीय कोकणी परिषदेने पण या ठरावाचे स्वागत केले. आठव्या परिशिष्टातील समावेशामुळे शिक्षण, साहित्य व संस्कृती या क्षेत्रात कोकणीला विशेष प्रोत्साहन मिळेल असे अ. भा. कोकणी परिषदेचे उपाध्यक्ष व माजी आमदार उदय भेंब्रे म्हणाले. या निर्णयावर टीका करताना मराठी राज्यभाषा प्रस्थापन समितीने असे म्हटले की रवी नाईक यानी आपली मराठी निष्ठा मांडवीत बुडवली. हा निर्णय गोव्यातील मराठी भाषिकांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे अशी प्रतिक्रिया गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे अध्यक्ष व म. गो. चे आमदार विनायक नाईक यानी व्यक्त केली.

घटनेच्या आठव्या परिशिष्टात कोकणीचा समावेश करण्यात यावा

अशा आशयाचा ठराव गोवा विधानसभेत यापूर्वीच संमत केलेला असल्याने पुन्हा तोच ठराव संमत करावा हा एक विनोद असे उपमुख्यमंत्री डॉ. विली डिसोझा म्हणाले. कोकणीला आठव्या परिशिष्टात समावेश करायचा झाल्यास लोकसभेत घटना दुरुस्ती विधेयक आणावे लागेल. मंत्रिमंडळाने शिफारस केली म्हणून समावेश होणार नाही असेही डॉ. विली डिसोझा म्हणाले.

कोणा एकाची इच्छा वा अनिच्छा म्हणून नव्हे तर लोकमताची कदर घेऊन २० ऑगस्ट १९९२ रोजी घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर केले गेले. घटनेच्या आठव्या परिशिष्टात कोकणी, मणिपुरी व नेपाळी या भाषांचा समावेश करणारे ते महत्वाचे विधेयक होते. वरील तिन्ही भाषांचा आठव्या परिशिष्टात समावेश करण्यसाठी व त्याना मंजुरी देण्यासाठी एरवीचे सर्व सोपस्कार बाजूला ठेवण्यात आले व लोकसभेत विधेयकाला ३४३ सदस्यांचा पाठिंबा मिळाला. कुणीही विरोध केला नाही. या निर्णयाचे गोव्यात मोठ्या प्रमाणात स्वागत झाले. 'याचे सारे श्रेय समस्त देशवासीयाना द्यायला हवे' असे ज्येष्ठ कोकणी नेते व साहित्यिक ॲड. उदय भेंब्रे यानी म्हटले. 'या विजयाचे श्रेय कोकणीतून नाटक, तियात्र, गीते आणि साहित्यनिर्मिती करणाऱ्याना द्यावे लागेल' असेही ॲड. उदय भेंब्रे यानी कोकणीप्रेमीच्या जाहीर सभेत जाहीर केले. कोकणी माणसाचे स्वप्न पुरे झाले असे मत साहित्य अकादमी पुरस्कार विजेते व कोकणी कवी रमेश वेळूसकर यानी व्यक्त केले. कोकणी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या विकासाचे ध्येय गाठणे कोकणी अकादमीला आता सहज शक्य आहे' असे उद्‌गार डॉ. मनोहरराय सरदेसाई यानी काढले. पुंडलीक नायक, तानाजी हळर्णकर, डॉ. अल्वीन गोमश यानीही या घटनेचे स्वागत केले. 'कोकणीच्या आठव्या परिशिष्टात समावेश झाल्यामुळे मराठीचे कोणतेही नुकसान होणार नाही. या पूर्वीही साहित्य अकादमीने कोकणीला मान्यता दिल्यामुळे मराठीचे कोणतेही नुकसान झाले नाही. परंतु कोणतीही भाषा कोणावरही लादली न जाता लोकानी ती स्विकारली पाहिजे' असे गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष शशीकांत नार्वेकर म्हणाले.

गोमंतक मराठी अकादमीने गोव्यातील व गोमंतकीय मान्यवराना मानद सदस्य देऊन गौरव केला. साहित्य अकादमीवर शशीकांत नार्वेकर

यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

गोव्यातील कोकण रेल्वेची समस्या सुटली नाही. प्रा. मधू दंडवते व जॉर्ज फर्नांडिस यानी कोकण रेल्वे प्रकल्पाला चालना दिली. जॉर्ज फर्नांडिस रेल्वे मंत्री असताना गोव्यात पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. कोकण रेल्वेने तयार केलेल्या मुळ आराखड्यानुसार कोकण रेल्वे म्हापसा, पर्वरी, पणंजी मार्गे आगशीला जात होती. राष्ट्रीय हमरस्ता क्रमांक १० ला समांतर असा हा मार्ग होता. रमाकांत खलप यानी म्हापसा, पर्वरी, पणजी वगळण्याची विनंती केली. रेल्वेने ती मान्य केली. नावेलीचे आमदार लुईझीन फालेरो यानीही नावेली परिसरातील मार्गात बदल सुचवला. तोही मान्य झाला. डिसेंबर १९९० मध्ये गोवा सरकारने कोकण रेल्वे प्रकल्पाला अधिकृत मान्यता दिली व युध्द पातळीवर काम सुरु झाले. पण नंतर एक मोठी अडचण निर्माण झाली. मये ते बाळ्ळी या मार्गात बदल व्हावा अशी मागणी पुढे आली. सासष्टीच्या काही नेत्यानी या मागणीसाठी जोर धरला. मोर्चा काढला. आंदोलनाची धमकी दिली. लोकमत काही मार्गबदलास अनुकूल दिसेना. आर्चबिशप राऊल गोन्साल्विश यानी मार्ग बदल व्हावा असे म्हणून या वादात भाग घेतला. मार्ग बदल मागणीसाठी कॉंग्रेसचे शिष्टमंडळ दिल्लीस जायचे ठरले. पण मुख्यमंत्री रवी नाईक यानी नकार दिला. या वादाला धार्मिकतेचे स्वरुप येऊ लागले. कोकण रेल्वेबाबत उच्चस्तरीय बैठक भरली या बैठकीत कोकण रेल्वे महामंडळाने केलेले काम, मान्यूएल मिनेझिस यांच्या एक सदस्यीय समितिचा अहवाल, डॉ. कमल चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पर्यावरण समितीचा अहवाल सादर करण्यात आले. पंतप्रधानानी मार्गबदल करण्यात मान्यता दिली नाही व पण नंतर कुठून काडी फिरली कोण जाणे, मये ते बाळ्ळी या ५२ कि. मी. च्या कोकण रेल्वे मार्गाला स्थगिती देण्यात आली. स्थगितीच्या निषेधार्थ म. गो. आमदारानी विधानसभचे कामकाज बंद पाडले. रेल्व काम पुन्हा सुरु व्हावे म्हणून स्थगितीच्या निषेधार्थ ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रवींद्रनाथ रायतूरकर यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय कोकण रल्वे मार्गबदलविरोधी कृती समिती स्थापन झाली. व तिने ''गोवा बंद'' यशस्वी करुन दाखवला. गोवा महाराष्ट्र व गोवा कर्नाटक सीमेवरील लोकानी या बंदमध्ये भाग घेतला. गोव्यात त्या दिवशी एकही बस येऊ शकली नाही. पोरस्कडे ते मये आणि बाळ्ळी ते पोळे या मार्गाला कुणाचाच

विरोध नाही. मार्गबदलाचा अभ्यास करणाऱ्या ''नॅटवॅक'' संस्थेने माशेल, खांडोळा, वरगांव, केरी, कोडार, निरंकाल, दाबाळ, कामारफोंड, म्हैसाळ, कुडचडे असा मार्ग सुचवला आहे. ''नॅटवॅक'' संस्था मार्गबदलाबाबतीत खंबीर नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत कोकण रेल्वे प्रकल्पासंबंधी चर्चा झाली. या प्रकल्पाला विलंब झाल्यामुळे खर्च वाढला व खास जादा निधीचा आग्रह धरण्यात आला. रेंगाळेलेले काम त्वरीत सुरु झाल्यास जादा खर्च सोसायची आपली तयारी आहे असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यानी म्हटले व बाकीच्या राज्यानी याला कबुली दिली. गोव्याच्या मुख्यमंत्र्यानी जादा खर्चाबद्दल कुरकुर केली. अखेर कोकण रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भातील सर्व बाबींवर विचार करुन संभाव्य अडचणी व इतर मुद्दे समजावून घेण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती ओझा यांचा एक सदस्यीय आयोग स्थापन केला गेला. आयोगाचा निर्णय अंतीम राहील असेही रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले.

गोवा राज्याबद्दल अनेकांच्या अपेक्षा होत्या. लहान राज्ये असावीत असे म्हणणारे तर गोव्याकडे आशेने पहात होते. पण गोव्यात घडलेल्या पक्षांतर प्रश्नानी साऱ्यांच्या अपेक्षा भंग झाल्या. राजकीय नेत्यानी या साऱ्या प्रकरणात ज्या उड्या मारल्या त्या मन अस्वस्थ करणाऱ्या होत्या. अखेर या साऱ्या प्रकरणाचा निकाल लागला. गोव्याचे मुख्यमंत्री रवी नाइक अपात्र ठरवण्यात आले. या साऱ्या प्रकरणाचा इतिहास असा...

पुरोगामी लोकशाही आघाडी सरकार कोसळण्यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. बार्बोझा आणि म. गो गट यामध्ये मतभेद झाले. व म. गो. मंत्र्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर मुख्यमंत्र्याना किती आमदाराचे पाठबळ आहे हे पाहाण्यासाठी त्यावेळचे राज्यपाल डॉ. खुर्शीद आलम खान यानी लगेच विधानसभा अधिवेशन बोलावले. म. गो. आमदारांनी मुख्यमंत्र्याच्या विरोधात मतदान करावे असा आदेश म. गो. पक्षाने काढला. पण संजय बांदेकर व रत्नाकर चोपडेकर हे ठरावादिवशी सभागृहात गैरहजर राहिले. इतकेच नव्हेतर राज्यपालाना सादर केलेल्या डॉ. बार्बोझा यांच्या समर्थनपर निवेदनावर स्वाक्षरी केली, असा दावा करुन डॉ. काशीनाथ जल्मी यानी सभापतीपुढे पक्षांतरबंदी कायद्याखाली याचिका सादर केली. या याचिकेवर सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यानी २१ डिसेंबर १९९१ रोजी संजय बांदेकर

व रत्नाकर चोपडेकर याना अपात्र ठरविले.

दरम्यान राज्यपाल खुर्शीद आलम खान यानी अल्पकालीन राष्ट्रपती राजवट जाहीर केली. विधानसभा बरखास्त केली नाही तर ती निलंबित केली. राज्यापालानी राजकीय नेत्याना बहुमत दाखवा व सरकार बनवा असे सांगितले. काँग्रेसचे तेरा, गोवन पीपल्स पार्टीचे तीन, एक अपक्ष व म. गो. चे सहा अशा तेवीस आमदाराचा आपल्याला पाठींबा आहे असे म. गो. चे एक नेते व डॉ. बार्बोझा मंत्रीमंडळातील एक मंत्री रवी नाईक यानी जाहीर केले. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष फुटल्याचे पक्षाचे संयुक्त चिटणीस अविनाश भोसले यानी जाहीर केले. २५ जानेवारी १९९१ रोजी गोव्याचे सहावे मुख्यमंत्री रवी नाईक यांचा शपथविधी झाला. मुख्यमंत्री रवी नाईक याना पक्षांतर बंदी कायद्याखाली अपात्र ठरवावे अशी विनंती करणारा अर्ज म. गो. चे आमदार डॉ. काशीनाथ जल्मी यानी सभापतीपुढे सादर केला. १५ फेब्रुवारी १९९१ रोजी पक्षांतर बंदी आरोपाखाली घटनेच्या १० व्या परिशिष्टाच्या ६ व्या परिच्छेदाखाली रवी नाईक याना अपात्र ठरविले. रवी नाईक यांच्या अपात्रतेला मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने स्थगिती दिली. त्या नंतर उपसभापती प्रकाश वेळीप यांच्याविरुध्द अविश्वास ठराव २४ विरुध्द ११ मतानी संमत करण्यात आला. त्यानंतर सभापती सुरेंद्र सिरसाट यांच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव २३ विरुध्द १२ मतांनी संमत झाला. प्रभारी सभापती या नात्याने काम करणारे उपसभापती सायमन डिसौझा यानी सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यानी दिलेला निर्णय फिरवला. रत्नाकर चोपडेकर व संजय बांदेकर याना आमदार म्हणून पात्र ठरविले. म. गो. पक्ष संघटना व म. गो. विधीमंडळ पक्षात पूट पडली आहे हे पुराव्यानिशी सिध्द होत असल्याने सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यानी रवी नाईक यांच्याबद्दल दिलेला निर्णय प्रभारी सभापती सायमन डिसौझाने रद्दबातल ठरविला. अशा रितीने रवी नाईक पात्र ठरले. त्यानंतर आमदार चर्चील आलेमांव व आमदार डॉ. जल्मी यानी रवी नाईक व अन्य दोन मंत्र्याच्या फेरपात्रतेविरुध्द उच्च न्यायालयात याचिका सादर केली. पुष्कळ विलंबाने याचिका दाखल झाल्या या कारणाने त्या याचिका फेटाळून लावण्यात आल्या. या निर्णयाविरुध्द चर्चिल आलेमांव व डॉ. जल्मी यानी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ मार्च रोजी या प्रकरणाचा निकाल दिला.

गोव्याचे मुख्यमंत्री श्री. रवी नाईक व त्यांच्या मंत्रिमंडळातील दोन सहकारी श्री. रत्नाकर चोपडेकर व श्री. संजय बांदेकर यांना विधानसभेचे तत्कालीन सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यांनी अपात्र ठरविल्यानंतर त्याना फेरपात्र ठरविणारा उपसभापती श्री. सायमन डिसौझा यांचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने अवैद्य ठरविला तथापि श्री. शिरसाट यांच्या निवाड्याला स्थगिती देऊन या एकंदर प्रकरणाची मुंबई हायकोर्टाच्या गोवा खंडपीठाने नव्याने सुनावणी करावी असा आदेश दिला.

न्या. जे. एस. वर्मा यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय खंडपीठाच्या निवाड्यामुळे प्रा. सुरेंद्र सिरसाट यानी सभापती या नात्याने दिलेला निवाडा जरी कार्यान्वित झालेला असला तरी त्यांच्या निवाड्याला आव्हान देऊन मुख्यमंत्री तसेच दोन मंत्र्यांनी मुंबई हायकोर्टाच्या गोवा खंडपीठाकडे केलेल्या याचिका दाखल करून घेतेवेळी खंडपीठाने दिलेली स्थगिती पुनरूज्जीवित केली.

सभातीच्या निवाड्याविरूध्द तिन्ही याचिकांवरील सुनावणी ३० एप्रिल पर्यंत पूर्ण करावी असा आदेशही सुप्रीम कोर्टाने दिला.

घटनेच्या १० व्या परिशिष्टानुसार सभापतीला त्याने पक्षांतरबंदी संदर्भात एकदां दिलेल्या निर्णयावर फेरविचार कण्याचा वा तो बदलण्याचा मुळीस अधिकार नाही असे स्पष्ट करुन सुप्रीम कोर्ट श्री. सायमन डिसोझा यांच्या फेरपात्रता निर्णयाबाबत हायकोर्टात गुदरण्यात आलेल्या तीन याचिका विलंबाचे कारण देऊन फेटाळण्याचा गोवा खंडपीठाचा निर्णय रद्द ठरविला. अपात्र ठरवण्याच्या आदेशाविरुध्दच्या याचिका दाखल करून घेतल्या.

कोर्टाने पुढे म्हटले की श्री. रवी नाईक याना गोवा विधानसभा पदावरून अपात्र ठरविणारा १५ फेब्रुवारी १९९१ रोजीचा व .त्यांचे दोन मंत्रीमंडळ सहकारी श्री. रत्नाकर चोपडेकर व श्री संजय बांदेकर याना अपात्र ठरविणारा १३ डिसेंबर १९९० चा आदेश कार्यवाहीत यावा.

श्री. रवी नाईक यानी आपल्या अपात्रेविरुध्द हारकोर्टात केलेली व नंतर त्यानी उत्सुकता न दाखविल्यामुळे २४ फेब्रुवारी १९९१ चा रोजी फेटाळली गेलेली याचिका कोर्टाने पुनरूज्जीवित केली असून त्यांच्या पात्रतेस स्टे देणारा अंतरीम आदेशही पुनरूज्जीवित केला.

न्या. वर्मा यांच्या नेंतृत्वाखालील या खंडपीठांत न्या. पी. बी सावंत

व न्या. एन. एम. कासलीवाला यांचा समावेश होता. त्यांनी आपल्या ४० पानी निवाड्यांत सभापतीनी एकदा दिलेला निर्णय परत फिरविण्याच्या अधिकारांबाबत कायद्याचा चिकित्सक दृष्टीतून उहापोह केलेला असून सभापतींच्या आदेशांवरील त्रुटी न्यायालयीन फेर अभ्यासांतून दूर होऊ शकतील असे म्हटले.

'आमच्या मते अपात्रता प्रश्नावर परत निर्णय द्यायचा कोणताच अधिकार घटनेच्या १० व्या परिशिष्टानुसार सभापतींना पोचत नाही.' असे कोर्टाने निवाड्यात म्हटले आहे. मात्र जरी सभापतीना त्यानी एकदा दिलेल्या निवाड्यावर परत निर्णय देण्याचा अधिकार नसला तरी सभापतीच्या निवाड्याची न्यायिक छाननी व्हायलाच हवी, सभापतीचा निर्णय अंतिम नव्हे व म्हणून त्या विरूध्द कोर्टात दाद मागता येते. व न्यायलय हेच या निवाडयावरील अपिलासाठी उचीत स्थान होय असे नमूद करुन सभापतींच्या निवाडयांतील त्रुटी दूर करण्याचा अधिकार न्यायालयाचाच आहे हे मान्य झाल्यावर तो अधिकार सभापतीस नाही हे आपोआपच सिध्द झाले असे कोर्टान पुढे म्हटले.

अपात्रतेविरुध्द मर्यादित न्यायालयीन फेरविचार अधिकारामुळे ज्या काही त्रुटी राहतात त्या दूर करण्याचा सभापतीस अंगभूत अधिकार आहे हा मुख्यमंत्र्यांचे वकील श्री. फली नरीमन यांचा दावा कोर्टाने फेटाळून लावला.

श्री. नाईक व त्यांच्या दोन मंत्रिमंडळ सहकाऱ्यांच्या फेरापात्रतेस आवाहन देऊन गुदरलेल्या याचिका मुंबई हायकोर्टाच्या गोवा खंडपीठाने याचिकादारांची हयगय हे कारण पुढे करून फेटाळून लावायला नको होत्या असे सांगून १० व्या परिशिष्टाखाली सभापतींना त्याच्या निवाड्यावर फेरविचार करण्याचा अधिकार आहे की काय या मुख्यमुद्यावर हायकोर्टाने विचार करण्यासाठी नकार दिला याचा उल्लेख सर्वोच्च न्यायालयाने केला. अर्जास नेमका कुठे विलंब झाला हे शेवटी कोर्टाने आपल्या इच्छेनुरुप ठरवायचे आहे. असे नमूद करुन बेकायदेशीरपणास आळा घालणे वा अधिकाराचा दुरुपयोग राखण्यासाठी कोर्टाचा हस्तक्षेप आवश्यक असतो असे न्यामूर्तीनी पुढे म्हटले.

हे लोक शेवटी जनतेमध्ये उच्च जागा भूषवित असतात व तेथे ते असताना त्याच्या विरुध्द झालेल्या आरोपामुळे याचिका संपूर्णतः विलंदाच्या

मुद्यावर फेटाळणे उचित नव्हे असे म्हटले.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे हे संक्षिप्त रुप आहे. पक्षांतर कायद्याखाली निर्णय बदलण्याचा, त्याचा फेरविचार करण्याचा अधिकार उपसभापतीना व प्रभारी सभापतीना सोडाच, पण ज्यानी तो निर्णय दिला त्या सभापतीना देखील नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले. राजकीय दृष्ट्या उपयोगी असे निर्णय देताना सभापतीने काटेकोपणे विचार करावा हा त्या मागचा हेतू असेल. सभापतीच्या निर्णयाला फेरविचार करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे असे सांगून न्यायालयाचे सर्वोच्च स्थान स्पष्ट केले.

१४ मे १९९२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने मुख्यमंत्री रवी नाईक व दोन अन्य मंत्री रत्नाकर चोपडेकर व संजय बांदेकर याना अपात्र ठरवणारा तत्कालिन सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यांचा निर्णय वैद्य घोषित केला. तत्कालिन सभापती प्रा. सुरेंद्र सिरसाट यांचा निर्णय न्यायमुर्तींनी उचलून धरला व तो निर्णय पक्षपाती नसल्याचे सांगितले. मुख्यमंत्री रवी नाईक याना नैसर्गिक न्याय मिळत नसल्याचा दावा खोडून काढताना न्यायमुर्ती म्हणाले की विधानसभेतील सदस्य हे जनतेने निवडून दिलेले असतात तेव्हा न्याय देताना जनतेचा विचार करावा लागतो. जनतेच्या भल्यासाठी नैसर्गिक न्याय बाजूला ठेवावा लागतो. पक्षांतरविरोधी कायदा उचलून धरणे हे न्यालालयाचे कर्तव्य आहे व पक्षांतर करणे ही राजकीय क्षेत्राला लागलेली कीड आहे. ही कीड वेळीच नष्ट करायला हवी. योग्य न्याय देऊन ही कीड नष्ट करणे हे न्यायालयाचे काम आहे असे उद्‌गार न्या. पाटील यानी काढले. अपात्रता प्रकरणी लौकरांत लौकर निकाल द्यावा अशा आशयाची निनावी पत्रे न्यायमुर्तींना येत होती. त्यात काही धमकीवजा पत्रे होती. ‘तुम्ही योग्य वेळी निकाल न दिल्यास तुमच्या सात पिढ्याना शाप लागेल अशा धमक्या काही पत्रात होत्या. सात जन्म सोडा आमचा पुनर्जन्मावर विश्वास नाही असे न्यायमुर्ती गुरुदास कामत यानी म्हटले व न्यायालयात जमलेल्या लोकानी त्याना दाद दिली. गोवा खंडपीठाचे न्या. गुरुदास कामत व न्या. पाटील यानी दिलेला हा निकाल १११ पुष्ठाचा आहे. या निकालामुळे गेल्या निवडणूकीनंतर १७ मे रोजी २७ महिने सत्तेवर असलेल्या आपल्या मंत्रीमंडळाचा राजीनामा रवी नाईक यानी दिला. डॉ. विल्फ्रेड डिसोझा

यानी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

२५ जानेवारी १९९१ रोजी रवी नाईक सरकार सत्तेवर आले व १७ मे १९९३ रोजी सत्तेवरून गेले. चालू विधानसभेच्या कालावधीतले रवी नाईक हे चौथे मुख्यमंत्री. प्रतापसिंग राणे, चर्चिल आलेमांव, डॉ. बार्बोझा यांच्यानंतर रवी नाईक सरकार सत्तेवर आले. रवी नाईक यानी सहा महीने सत्तेवर रहावे आणि त्यानंतर डॉ. विल्फ्रेड डिसोझा याना मुख्यमंत्रीपद द्यावे असा करार झाला होता व त्याला राजीव गांधी साक्षीदार होते असा डॉ. विलीचा दावा ! रवी नाईक म. गो. पक्ष (रवी नाईक गट) घेऊन बसले असते तर त्याच्या कर्तृत्वाला बंधन पडले असते. त्यानी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि कॉंग्रेसपक्षात आपली जागा मजबूत केली. गोव्यातील बहुजनसमाजात कॉंग्रेसला स्थान दिले. चवदा आमदाराना मंत्री बनवले. त्यांच्या मंत्रीमंडळावर टीका झाली पण त्यानी त्याकडे दुर्लक्ष केले. ते एक प्रबळ संघटक होते. त्याचा फायदा त्यानी घेतला. व अनेक कार्यकर्त्यांना कॉंग्रेसमध्ये आणले. परिसरातील गुंडागिरीला आळा घलण्यात ते यशस्वी ठरले. गोपीपा सदस्याना कॉंग्रेस प्रवेश दिला नाही. कोंकण रेल्वे प्रकल्पाचा मार्ग बदलात त्यानी विरोध केला. बहुजनसमाजातील एक तडफदार आणिं कर्तृत्ववान नेतृत्व अपात्रतेच्या प्रकरणामुळे अस्त पावले. त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली असली तरी सत्ता संपादन करण्यासाठी व सत्ता टिकवण्यासाठी त्यानी जे प्रकार केले ते मात्र बरोबर नव्हते.

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. विल्फ्रेड डिसोझा यानी गोवन पीपल्स पार्टीच्या पांच सदस्याना कॉंग्रेसमध्ये प्रवेश मिळवून दिला. त्याना प्राथमिक सदस्यत्व दिल्याची अधिकृत घोषणा प्रदेश अध्यक्ष शांताराम नायक यानी केली. चर्चिल आलेमांव याना मात्र प्रवेश देण्यात आला नाही. २४ मार्च १९९० या दिवशी चर्चिल आलेमांव, डॉ. लुईश प्रोत बार्बोझा, जे. बी गोन्साल्विश, मार्विन गुदिनो, सोमनाथ जुवारकर, आलेक्स लुईश कार्दोज व श्रीमती फॅरेल फुर्तादो यानी कॉंग्रस सोडली. व गोवन पीपल्स पार्टी स्थापन केली. गोपीपा आणि म. गो. मिळून पुरोगामी लोकशाही आघाडी सरकार स्थापन झाले. सहा जण मंत्री बनले व श्रीमती फॅरेल आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा झाल्या. या मंडळीत मतभेद दिसू लागले. डॉ. बार्बोझा, चर्चिल आलेमांव व श्रीमती फॅरेल यांचे विचार एकीकडे तर बाकीच्यांचे विचार दुसरीकडे असे चित्र दिसू लागले. हे आघाडी सरकार

सत्तेवर असताना फुटीर कॉंग्रेसजनाच्या अपात्रतेवर विचार झाला. कॉंग्रेस पक्ष सत्तेवर सोडतेवेळी त्या पक्षाच्या तिकीटावर निवडून आलेले सात आमदार एक होते. म्हणून सभापतीने त्याच्या अपात्रतेचा अर्ज फेटाळून लावला. परंतु नंतर पक्षांतर बंदी कायद्याखाली विधानसभापतीच्या पक्षांतराला व त्याच्या गोवन पीपल्स पार्टीत सामील होण्याच्या कृतीविरुध्द अर्ज दाखल करण्यात आला. या अर्जावर विचार करण्याचे काम सभापतीने डॉ. काशिनाथ जल्मी यांच्याकडे सोपवले. डॉ. जल्मी यानी भूतपूर्व डॉ. बार्बोझा यांच्या गोपीपा प्रवेशामुळे पक्षांतरबंदी कायद्याखाली डॉ. बार्बोझा याना अपात्र ठरवले. सर्वोच्च न्यायालयात डॉ. बार्बोझा यानी दाद मागितली. पण डॉ. बार्बोझा यांचा अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. अशा रितीने गोवन पीपल्स पार्टीमध्ये सहा सदस्य राहिले. त्यातले चर्चील आलेमांव वगळता इतर सदस्याना कॉंग्रेसमध्ये प्रवेश मिळाला.

मुक्त गोव्याच्या राजकीय जीवनातील या अशा महत्वाच्या घटना आहेत. गोव्याच्या मुक्तीसाठी भारतातल्या साऱ्या राज्यांतून सत्याग्रही आले. काश्मीर ते कन्याकुमारी व गुजरात ते गौहट्टी अशा सर्व राज्यातील नागरिकानी गोवा मुक्त व्हावा यासाठी देहदंड सोसला. आयुष्यातील काही वर्षे तुरुंगात घालवली. गोवा राज्य हे आदर्श राज्य व्हावे हा त्या मागचा हेतू होता. सामान्य माणूस मुक्तीमुळे खुश झाला. आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या प्रगतीआड कुठलीही बंधने येणार नाहीत असे त्याला वाटले. शिक्षण मिळण्याच्या सुविधा आपल्याला मिळतील. गुणवत्तेप्रमाणे आणि लायकीप्रमाणे नोकऱ्या मिळतील. बढत्या मिळतील असे वाटले. पण त्यांच्या साऱ्या साऱ्या अपेक्षांचा राजकीय नेत्यानी चक्काचूर केला. स्वताचा स्वार्थ साधण्यासाठी पक्ष बदलले. कोणत्याही प्रकारे सत्ता संपादन करायची हेच ध्येय समोर ठेवले. नीती, सदाचाराला तिलांजली दिली. निवडणूकीसाठी झालेला खर्च कसा मिळवावा हा तर हेतू होताच पण आपल्या पुढील चार पिढ्यांचे कल्याण व्हावे हाही हेतू या स्वर्थामागे लपला होता. पक्षांतर बंदी कायद्याखाली पक्ष बदलता येत नव्हता. पक्षाच्या एक तृतीयांश सभासदांना पक्ष बदलता येत होता. त्यातली ही एक पळवाट होती. त्या पळवाटेचा फायदा घेऊन पक्षांतर बंदी कायद्याची जी लक्तरे गोव्यात काढण्यात आली त्याला पर्याय नव्हता. पक्षाच्या स्वार्थासाठी एखाद्याला अपात्र ठरवणे, तो पात्र व्हावा म्हणून सभापतीची उचलबांगडी

करणे. मग कुणीतरी त्या निर्णयविरुध्द न्यायालयाकडे धाव घेणे. अपात्र की पात्र या विषयाभोवती जनतेचे लक्ष केंद्रीत करणे. गोव्याच्या अलिकडच्या इतिहासाचे हे सार आहे.

परिशिष्ठ क्र. १

मुक्त गोव्यातील विधानसभा निवडणूकांचे निकाल

१९६३ ची निवडणूक

विजयी उमेदवार *

१ – पेडणे मतदार १०८८२ ☆ मतदान ६४९४

१] विश्वास जसवंतजी देसाई (अपक्ष)	७४	
२] नारायण आत्माराम देसाई नाईक (शे. प.)	१३२३	
३] काशिनाथ अनंत शेट गांवकर (म. गो.)	३१३५	*
४] वैकुंठ शेणवी धेंपे (कॉं.)	१९१२	

२ – मांद्रे मतदार १४६६५ ☆ मतदान १०२९८

१] विजय कामूलकर (म. गो.)	६६६३	*
२] दत्ताराम वामन देसाई (अपक्ष)	२७४	
३] वसंत लक्ष्मण देसाई (अपक्ष)	१४८	
४] सदाशिव देसाई (यु. गो.)	१५३६	
५] विठ्ठल नारायण परब (शे. प.)	२२९	
६] भानुदास नीळकंठ पोळजी (अपक्ष)	४७	
७] रघुनाथराव वासुदेव देशप्रभू (कॉं.)	१४१०	

३ – शिवोली मतदार १२३१६ ☆ मतदान ९०९१

१] बेनिफासियो डायस (यु. गो.)	३५१७	
२] रोड्रिग्ज लुझियो (कॉं)	९९०	
३] पांडुरंग शेट शिरोडकर (म. गो.)	४५८४	*

४ – कळंगुट मतदार १४२५० ☆ मतदान १०४११

१] पुनाजी आचरेकर (म. गो.)	३६३३	
२) आनस्वीकर डिमेलो (अपक्ष)	६७	
३] रुडाल्फ डिमेलो (कॉं)	१३७६	
४] जॉन डिसोझा (यु. गो.)	५३३५	*

५ – हळदोणे मतदार १२८६९ ☆ मतदान९८३०

१] शांताराम धोंड (अपक्ष)	३९
२] चंद्रकांत नाईक (म. गो.)	३४२१
३] जुझे मार्टिन्स (काँ)	१०५७
४] ओर्लांद सिर्केर लोब (यु. गो.)	४९३५ *
५] पांडुरंग वळवईकर (अपक्ष)	३७८

६ – म्हापसा मतदार ११४५७ ☆ मतदान ८६७५

१] आत्माराम करमळकर (काँ)	१३३४
२) मारिय कार्दोज (अपक्ष)	५७
३] रघुनाथ टोपले (म. गो.)	४५११ *
४] जगन्नाथ महांबरे (यु. गो.)	२७७३

७ – थिवी मतदार ११२७६ ☆ मतदान ८६३१

१] बाबुराव कारेकर (यु. गो.)	१५७५
२] शंभू पालयेकर (म. गो.)	५०४२ *
३] माधव पै बीर (काँ.)	७६७
४] केशव यशवंत मुळगांवकर (अपक्ष)	४४०
५] पांडुरंगराव राणे (अपक्ष)	२३
६] जॉर्ज वाझ (शे. प.)	१७४

८ – डिचोली मतदार १०४३४ ☆ मतदान ८१०५

१] गोपाळ आपा कामत (काँ.)	११६३
२] गणबा दुभाषी (अपक्ष)	११४
३] सांतू देऊ पळ (अपक्ष)	६९
४] कुसुमाकर कडकडे (म. गो.)	६४२० *
५] शिवाजी दुभाषी (यु. गो.)	३४९

९ – पाळी मतदार १०३५० ☆ मतदान ७६१७

१] अच्युत शेणवी उसगांवकर (म. गो.)	५४२६ *
२] सिप्रियान डिसोझा (यु. गो.)	७२१
३] शिवाजी गोविंदराव देसाई (अपक्ष)	७६
४] पांडुरंग मुळगांवकर (काँ.)	१४००

१० – सत्तरी मतदार ११५४३ ☆ मतदान ७४७९

१] अश्रफ आगा (म. गो.)	२१४६	
२] बाबुराव देसाई (काँ.)	१३८४	
३] जयसिंगराव व्यंकटराव राणे (अपक्ष)	३५२५	*
४] तातोबा आपाजी राणे (यु. गो.)	३६४	

११ – पणजी मतदार ८५७८ ☆ मतदान ६५७०

१] जुझे व्हिक्टर तेलीस (अपक्ष)	३२	
२] गोविंद कृष्णा शेणवी धुमे (म. गो.)	२३४७	
३] दामोदर घोंड (अपक्ष)	५९	
४] आल्वर पेरेरा (काँ.)	१३७१	
५] जॅक सिकेरा (यु. गो.)	२७६१	*

१२ – सांताक्रुज मतदार १२२२३ ☆ मतदान १००२०

१] ज्यॉकी आराऊझ (यु. गो.)	४९२१	*
२] तुकाराम काणकोणकर (काँ.)	११५७	
३] इमर्सियान डायस (अपक्ष)	८६	
४] नारायण हरी नाईक(म. गो.)	३६९०	
५] जॉकी ब्रागांझ (शे. प.)	१०५	
६] रजनीकांत भांडारी (अपक्ष)	३१	

१३ – सांत आंद्रे मतदार १११४२ ☆ मतदान ८८०३

१] मारीय एलविन पिंत (काँ.)	६४६	
२] तेवतोन पेरेर (यु. गो.)	६०७२	*
३] ऑगस्तिन डिमेल (अपक्ष)	६९	
४] जुझे रोड्रिग्ज (अपक्ष)	२५	
५] विश्वनाथ लवंदे (म. गो.)	३९६०	
६] मधुसूदन शिरोडकर (अपक्ष)	११	

१४ – सांत–इस्तेव्ह मतदार ११३४२ ☆ मतदान ८६९८

१] दत्ताराम चोपडेकर (म. गो.)	५६४१ *
२] शांताराम नारायण झांट्ये (अपक्ष)	२३३२
३] मुकुंद शेट (अपक्ष)	८४
४] शंकर पांडुरंग सरदेसाई (कॉं.)	६४१

१५ – मडकई मतदार १०९९५ ☆ मतदान८३१६

१] सुमंत केळेकर (अपक्ष)	२४६
२] राजाराम गोवेकर (अपक्ष)	२२
३] जयकृष्ण पुतू नाईक (कॉंग्रेस)	११२४
४] वसंत वेलिंगकर (म. गो.)	६९२४ *

१६ – फोंडा मतदार ११४७४ ☆ मतदान ८४६९

१] जगन्नाथ घाणेकर (अपक्ष)	१२१
२] यशवंत दुलाजी नाईक बोरकर (अपक्ष)	६४
३] गजानन रायकर (अपक्ष)	५४२४ *
४] जनार्दन कामत रेडकर (यु. गो.)	१६२१
५] माधव उपेंद्र शेणवी तळावलीकर (कॉं)	१०६६
६] मुकंद शिंक्रे (म. गो.)	७६०
७] फ्रान्सिस आंतोनिया सुवारीश (अपक्ष)	१३

१७ – शिरोडा मतदार १३०१६ ☆ मतदान६११३

१] पुंडलीक सगुण नाईक (म. गो.)	६३६६ *
२] रामा कृष्णा हेगडे (कॉं.)	१८०७

१८ – सांगे मतदार ११८७८ ☆ मतदान ७९४७

१] चंद्रकांत काकोडकर (शे. प.)	१७३
२] बाबल सावळो तारी (अपक्ष)	७८
३] मुकुंद पंचवाडकर (अपक्ष)	९८
४] लक्ष्मीकांत भेंब्रे (कॉं.)	१३५८
५] क्रिस्ताव फुर्तादि (यु. गो.)	१६८३
६] टोनी फर्नांडिश (म. गो.)	४५८१ *

१९ – काणकोण मतदार १२७६४ ☆ मतदान ९१३५

१] गणबा देसाई (म. गो.)	५८५४	*
२] शिवराम देसाई (कॉं.)	१२९२	
३] राऊल बॉस (यु. गो.)	१९१६	
४] मोहन भट (अपक्ष)	७३	

२० – केपे मतदार ९१९२ ☆ मतदान ६७३४

१] फर्नांडिस कॉस्त (अपक्ष)	९५	
२] दत्ताराम देसाई (म. गो.)	३७६६	*
३] शाबू देसाई (अपक्ष)	१२५	
४] ग्लोरिय फुर्तादं (अपक्ष)	११०	
५] डॉ. विनायक मयेकर (कॉं.)	६९०	
६] आल्वा आराउझ (यु. गो.)	१९४८	

२१ – कुडचडे मतदार ११६०८ ☆ मतदान ८३२९

१] विठ्ठल सुब्राय करमली (म. गो.)	३०४२	*
२] दिवाकर काकोडकर (शे. प.)	७७२	
३] पुरुषोत्तम काकोडकर (कॉं.)	१६०१	
४] मारियन फेर्नांदिस (अपक्ष)	२००	
५] फेलिसियु फर्नांदिस (अपक्ष)	४०	
६] मंगेश पुतू वस्त (अपक्ष)	६५	
७] शेख इशानी शेख कादर (यु. गो.)	२५६९	

२२ – कुकळ्ळी मतदार १२८५२ ☆ मतदान ८१६२

१] आर्सिलीन आल्मेद (अपक्ष)	२२५	
२] जॉन कार्ल्हालो (अपक्ष)	२२८	
३] झालिय कुतिन्ह (अपक्ष)	७९	
४] गोविंद प्रभू देसाई (म. गो.)	१३८९	
५] सेर्सीन पाइश (अपक्ष)	२७८	
६] रॉक सांतान फर्नांडिस (अपक्ष)	१४१९	
७] इरोन फेरेर (कॉं.)	९४९	
८] साबास्तांव माझोरेल (यु. गो.)	३५७५	*

२३ – बाणावली मतदार ११७३२ ☆ मतदान ७८३२

१] शावियर फुर्तादं (अपक्ष)	१०९	
२] मावरील फुर्तादं (यु. गो.)	५२४१	*
३] लॉरेन्स इरेन बार्रुश् (काँ.)	१७११	
४] इलु मिरांद (अपक्ष)	१३२	
५] मिंगेल रोड्रिग्ज (म. गो.)	३४८	
६] मारीय रोड्रिग्ज (अपक्ष)	२०८	
७] आंतोनिया व्हिएगश (अपक्ष)	८९	

२४ – नावेली मतदार १३७६६ ☆ मतदान ९६११

१] रघुनाथ सांतू कामत (म. गो.)	१९६४	
२] इमैर्सन डायस (अपक्ष)	१२१	
३] आल्वर फुर्तादं (यु. गो.)	५९५३	*
४] थॉमस फुर्तादं (अपक्ष)	८०३	
५] रेईश जेकीन बेर्नादं (काँ.)	७५०	

२५ – मडगांव मतदार ९५९२ ☆ मतदान ५६७०

१] आनास्तीसय आल्मेद (अपक्ष)	६७	
२] रवींद्र केळेकर (काँ.)	१११३	
३] नाझीया झिन फेर्नांदिश (अपक्ष)	१०२	
४] सदानंद गोविंद बोरकर (म. गो.)	२२०८	
५] वासुदेव नारायण सरमळकर (यु. गो.)	३५८०	*

२६ – कुडतरी मतदार १३१९८ ☆ मतदान ६९८७

१] जुझे फ्रान्सिस काब्राल (काँ.)	१५७३	
२] आल्वेर्स कारदोझ (अपक्ष)	१९४२	
३] इनियु आंतोनिय पिमेंत (यु. गो.)	४७२७	*
४] नाझारीन फेर्नांदिस (अपक्ष)	२८४	
५] कामिल रोड्रीग्ज (अपक्ष)	६१	

२७ – कुडाळी मतदार ११३९८ ☆ मतदान ८३४९

१] लिगोरीय कॉत कारव्हाल्य (कॉं.)	९०३	
२] फ्रान्सिस कुन्ह (अपक्ष)	६०३	
३] लुईश प्रोत बार्बोझा (यु. गो.)	५७२०	*
४] बेर्ता ब्रागांझा मिनेझिस (शे. प.)	२१०	
५] आसीन इनसेनीय (अपक्ष)	४२५	
६] व्यंकटेश वेरेकर (म. गो.)	४८८	

२८ – मुरगांव मतदार ११३३३ ☆ मतदान ८२०४

१] दत्तात्रय देशपांडे (कॉं.)	१९३१	
२] जेराल्ड पेरेरा (शे. प.)	१६११	
३] उर्मिदा माश्कान्हेन्सस (यु. गो.)	३२८९	*
४] विश्वंभर कृष्णा साळकर (म. गो.)	१८७२	

२९ – दमण

१] कालीदासभाय पटेल (कॉं.)

३० – दीव मतदारसंघ

१]जीवानी (अपक्ष) *

१९६७ ची निवडणूक

विजयी उमेदवार *

१ – पेडणे मतदार ११६६७ ☆ मतदान ७४८०

१] बाबल किनळेकर (म. गो.)	४४९९ *
२] श्रीकांत गोविंद प्रभुदेसाई (यु. गो.)	३४६
३] शिवाजी देसाई (प्रसप)	१६९
४] भाऊसाहेब देशमुख (अपक्ष)	२१८१
५] काशिनाथ विनायक बोंद्रे (अपक्ष)	२४
६] शिवाजी जगन्नाथ देसाई (अपक्ष)	८९
७] नलिनी यशवंत पार्सेकर (अपक्ष)	१४६
८] तुकाराम स्वार (अपक्ष)	२६

२ – मांद्रे मतदार १४९४२ ☆ मतदान ९६४०

१] अँथनी डिसोझा (म. गो.)	६२०७ *
२] मनोहर खानोलकर (सिकेरा गट)	१५४०
३] मंगेश आंबये (अपक्ष)	१४८
४] शिवराम देसाई (अपक्ष)	४१
५] मंगेश मुकुंद गाड (अपक्ष)	४४५
६] माधव चव्हाण (अपक्ष)	७३
७] मनोहर हिरु नाईक (अपक्ष)	१७६
८] यशवंत पार्सेकर देसाई (अपक्ष)	१८७
९] राजाराम शेट गावकर (अपक्ष)	१५५
१०] विजय कामूलकर (अपक्ष)	२२

३ – शिवोली मतदार १४०१२ ☆ मतदान १०२७९

१] पुनाजी आचरेकर (म. गो.)	५१७५ *
२] झोफरीन डिसोझा (यु. गो. सिकेरा)	४५५०
३] काशीनाथ शिरोडकर (अपक्ष)	१३२
४] दिगंबर अनंत प्रभू (अपक्ष)	५०
५] पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर (अपक्ष)	३५४
६] फर्नांडिस सांतान (अपक्ष)	१२

४ – कळंगुट मतदार १५७१६ ☆ मतदान ११६५७

१] रामचंद्र मयेकर (म. गो.)	४६३३	
२] व्हालेंतीन सिकेरा (सिकेरा गट युगो.)	६३२९	*
३] श्रीमती विलमा सोझा (यु. गो. फुर्तादं)	२४६	
४] दोडीजेस आंद्राद (अपक्ष)	१३७	
५] जुझे पिंत (अपक्ष)	५४	
६] महादेव कदम (अपक्ष)	८	
७] मार्क फर्नांडिस (अपक्ष)	१३२	
८] इसमेल इर्नेस्ट (अपक्ष)	५८	

५ – हळदोणे मतदार १४३२६ ☆ मतदान १०५२७

१] नरसिंह महांबरे (म. गो.)	३९६९	
२] ओर्लाद सिकैर लोबो (यु. गो.)	६०८४	*
३] आनासीलेत डिसिल्वा (अपक्ष)	९४	
४] जुआंव काब्राल (अपक्ष)	१६८	
५] डेव्हिड लोबो (अपक्ष)	१७७	
६] आनंद शिवा साळकर (अपक्ष)	३५	

६ – म्हापसा मतदार १४४२७ ☆ मतदान १०४१६

१] गोपाळ मयेकर (म. गो.)	५४७५	*
२] तुकाराम कारेकर (सिकेरा यु. गो.)	४०४०	
३] जॉर्ज आंद्राद (अपक्ष)	१५१	
४] कृष्णा डिचोलकर (अपक्ष)	४६	
५] जर्नादन गोरे (अपक्ष)	१४	
६] थॉमस मार्टीन (अपक्ष)	२५३	
७] कानोबा नाईक (अपक्ष)	२५	
८] व्यंकटेश सावंत (अपक्ष)	४११	

७ – थिवी मतदार १२१६४ ☆ मतदान ७७७२

१] जयसिंगराव राणे (म. गो.)	४६७१	*
२] नारायण नाचनोडकर (सिकेरा युगो.)	१७९४	
३] शशिकांत वाल्हेदेकर (पीएसपी)	१७२	
४] माधव बीर (अपक्ष)	८६९	
५] झोटिको डिसौझा (अपक्ष)	३४	
६] फ्रान्सिस लोबो (अपक्ष)	११९	
७] शंभू पालयेकर (अपक्ष)	२३	

८ – डिचोली मतदार ११४६७ ☆ मतदान ८३११

१] दत्ताराम चोपडेकर (म. गो.)	५५६५	*
२] शिवाजी दुभाषी (सिकेरा गट)	३०५	
३] सांतू पळ (पीएसपी)	६५५	
४] दाजीसाहेब प्रभुदेसाई (अपक्ष)	१५	
५] पाश्केल फर्नांडिस (अपक्ष)	३०	
६] आत्माराम मयेकर (अपक्ष)	२४२	
७] मनोहर परब गांवकर (अपक्ष)	४४४	
८] गोपाळ बाबी परब (अपक्ष)	१२७	
९] शांताराम सावंत (अपक्ष)	११४९	
१०] व्यंकटेश राणे सरदेसाई (अपक्ष)	११९	

९ – पाळी मतदार १३१९६ ☆ मतदान ८७१२

१] अच्युत शेणवी उसगांवकर (म. गो.)	५६७१	*
२] शिवाजी देसाई (प्रजा समाजवादी)	२०९	
३] सिरान माश्कन्हेसा (सिकेरा गट)	७३६	
४] जॉर्ज वाझ (अपक्ष)	८९	
५] शाणू पेडणेकर (अपक्ष)	४६	
६] य. केशव शेणवी उसगांवकर (अपक्ष)	१९६१	

१० – सत्तरी मतदार १२८१९ ☆ मतदान ७३९७

१] गोपाळ आपा कामत (म. गो.)	२९६२	*
२] जयसिंगराव वेंकटराव राणे (प्रसप)	४४९	
३] दत्ताराम शिरोडकर (सिकेरा गट)	७५१	
४] अश्रफ आगा (अपक्ष)	१८४	
५] सगुण दार्ते (अपक्ष)	३७८	
६] बाबुराव देसाई (अपक्ष)	१०६८	
७] गुरुदास शिरोडकर (अपक्ष)	५७२	
८] कृष्णराव राणे (अपक्ष)	४२४	
९] शंकर महादेव बोर्डेकर (अपक्ष)	५०	
१०] अनंत तेली (अपक्ष)	५३०	
११] काशीनाथ तेंडुलकर (अपक्ष)	२९	

११ – पणजी मतदार १३४९४ ☆ मतदान ९६३७

१] माधवराव तळावलीकर (म. गो.)	३७७६	
२] यशवंत देसाई (सिकेरा) यु. गौ.	३८४६	*
३] वेविंद डायस (अपक्ष)	१	
४] चंद्रकांत राऊल नाईक (अपक्ष)	१४	
५] हरी कुडचडकर (अपक्ष)	९६	
६] शरद केणी (अपक्ष)	१३८	
७] विश्वनाथ लवंदे (अपक्ष)	७३	
८] पांडुरंग मुळगांवकर (अपक्ष)	१०५१	
९] विठ्ठल बाबलो नाईक (अपक्ष)	४	
१०] नथूरमल (अपक्ष)	३८	

१२ – सांताक्रुझ मतदार १५२९० ☆ मतदान ११८२३

१] आल्फ्रेड आर्फोंस (म. गो.)	१२१	
२] जॅक सिकेरा (सिकेरा गट)	७०६७	*
३] जे. एल. आराऊजो (फुर्तादो गट)	४०४५	
४] घनश्याम शावियार फर्नांडिस (अपक्ष)	९	
५] जुआंव फर्नांडिस (अपक्ष)	१२८	
६] सदाशिव सरदेसाई (अपक्ष)	७५	
७] वैकुंठ शेणवी दुकळे (अपक्ष)	३५८	

१३ – सांत आंद्रे मतदार १३७१६ ☆ मतदान ९८४३

१] आगुस्तीन मेल (म. गो.)	३४६६
२] तेवतोन पेरेर (सिकेरा गट)	५६५० *
३] घनश्याम फर्नांडिस (अपक्ष)	२२
४] जुझे फर्नांडिस (अपक्ष)	३०८
५] जुझे कॉंत (अपक्ष)	३१
६] श्रीमती व्हिक्टोरिया फर्नांडिस (अपक्ष)	३४८
७] यशवंत कारापूरकर (अपक्ष)	१०

१४ – सांत–इस्तेव्ह मतदार १४४०१ ☆ मतदान ९६८७

१] प्रताप बकाल (म. गो.)	५२९६ *
२] जेकश तिमोतो (यु. गो.)	३३५५
३] कामील फुर्तादो (अपक्ष)	३७
४] नारायण चोडणकर (अपक्ष)	७१
५] विनायक चोडणकर (अपक्ष)	४६०
६] कायतान दुमिंग (अपक्ष)	८१
७] जॉन फर्नांडिस (अपक्ष)	२५८
८] मधुसूदन शिरोडकर (अपक्ष)	४७
९] नारायण नाईक (अपक्ष)	७९
१०] अंतोनिया नोरोन्य (अपक्ष)	११

१५ – मडकई मतदार ११८६७ ☆ मतदान ८४४२

१] दयानंद बाळकृष्ण बांदोडकर (म. गो.)	७८०० *
२] तुळशीदास कामत (सिकेरा गट)	४२३
३] मधु खेडेकर (अपक्ष)	७१
४] सच्चिदानंद म्हार्दोळकर (अपक्ष)	५०
५] नारायण पांडुरंग तारी (अपक्ष)	९८

१६ – फोंडा मतदार १३६०६ ☆ मतदान ९३१९

१] शशिकला गुरुदत्त काकोडकर (म. गो.)	७११४	*
२] शांताराम केशकामत (सिकेरा गट)	१५६७	
३] गजानन रायकर (अपक्ष)	१५२	
४] नारायण शेटकर (अपक्ष)	१२७	
५] मुकुंद शिंक्रे (अपक्ष)	६३	
६] दामोदर तारी (अपक्ष)	२६६	

१७ – शिरोडा मतदार १४५५४ ☆ मतदान ९६२४

१] फ्रान्सीस फर्नांदिस (सिकेरा गट)	१२९४	
२] विठ्ठल करमली (म. गो.)	४५७१	*
३] आंतोनिया सोझ (अपक्ष)	१४४	
४] रघुनाथ देसाई (अपक्ष)	९४०	
५] लुइश अपोलीन(अपक्ष)	९०	
६] जयकृष्ण शिरोडकर (अपक्ष)	८५७	
७] चंद्रकांत पार्सेकर (अपक्ष)	२८०	
८] राया शिरोडकर (अपक्ष)	३८९	
९] देवीदास तिरोडकर (अपक्ष)	३९०	

१८ – सांगे मतदार १२६१५ ☆ मतदान ७८६४

१] वासुदेव मोरजकर (म. गो.)	४६४६	*
२] रमझान अब्दुल लतीफ (सिकेरा)	२७८५	
३] विष्णु हरिश्चंद्र नाईक (अपक्ष)	४०	
४] दामोदर रघुनाथ परब (अपक्ष)	२१०	
५] दशरथ व्यंकटेश तेलंग (अपक्ष)	१७५	

१९ काणकोण मतदार १३१४६ ☆ मतदान ८६९६

१] मंजु गांवकर (म. गो.)	५१२६	*
२] मोतीलाल देसाई (सिकेरा)	२१४१	
३] जनार्दन विष्णू देसाई (अपक्ष)	७५८	
४] हरि प्रभू देसाई (अपक्ष)	१२६	
५] मधु कामत (अपक्ष)	४३०	
६] ना. भि. ना. गांवकर (अपक्ष)	१०९	
७] राया काळे (अपक्ष)	२७	

२० – केपे मतदार १००८६ ☆ मतदान ६६५७

१] सुहास दलाल (यु. गो.)	१७३४	
२] शाबा कृष्णाराव देसाई (म. गो.)	२९५५	*
३] क्रिस्ताव फुर्तादि (अपक्ष)	१८	
४] दत्ताराम देसाई (अपक्ष)	६८	
५] शाबू बाबली देसाई (अपक्ष)	३५९	
६] देवाप्पा देसाई (अपक्ष)	५५६	
७] काशीनाथ देसाई (अपक्ष)	९५	
८] नारायण हेदो देसाई (अपक्ष)	५८७	
९] आलेवेत देवगे (अपक्ष)	१४९	
१०] विनायक पडीयार (अपक्ष)	१४३	

२१ – कुडचडे मतदार १३११५ ☆ मतदान८५३६

१] अब्दुल रझाक (सिकेरा गट)	३६५७	*
२] डॉ. निळू शाबा देसाई (म. गो.)	३५१९	
३]अरविंद देसाई (अपक्ष)	१४३	
४] टोनी फर्नांडिस (अपक्ष)	६५८	
५] मातेइश पीटर (अपक्ष)	१५१	
६] लक्ष्मण मधू देसाई (अपक्ष)	७८	
७] दुर्गानंद सावर्डेकर (अपक्ष)	३४०	

२२ – कुंकळ्ळी मतदार १३९५२ ☆ मतदान ८६५२

१] आनासीय आल्मेद (फुर्तादि गट)	११५२	
२] रॉक सांतान फर्नांदिश (सिकेरा गट)	३७७४	*
३] मोहन जयवंत कालेकर (म. गो.)	१७२०	
४] जासीन फुर्तादि (अपक्ष)	१०३०	
५] जी. आर फर्नांदिश (अपक्ष)	१०१	
६] पिओ लॉरेन्स (अपक्ष)	८३७	
७] पाईश गारसन (अपक्ष)	३०	

२३ – बाणावली मतदार १४००६ ☆ मतदान ८७५८

१] श्रीमती एल्. मिरांद (सिकेरा गट)	६५२८	*
२] लिम लेयतांव (फुर्तादि गट)	९६४	
३] शंकर भांडारी (अपक्ष)	१२१	
४] फिलोमिन मार्टीन (अपक्ष)	३३	
५] फाबीयाव कॉस्त (अपक्ष)	१००८	
६] जॉकीम कॉस्त (अपक्ष)	१०५	

२४ – नावेली मतदार १७७१५ ☆ मतदान ११०६३

१] लिओ वेल्हा (सिकेरा गट)	६५४५	*
२] लॉयल फुर्तादि अल्वार (फुर्तादि गट)	१२६४	
३] पोलीकार्म डिसिल्वा (म. गो.)	२८३१	
४] एदुआर्द नारेत (अपक्ष)	३२	
५] एमर्लिन डायस (अपक्ष)	२२१	
६] रोपान वाझ पेद्र लॉरेन्स (अपक्ष)	१०७	

२५ – मडगाव मतदार १३१८५ ☆ मतदान ८४७३

१] अनंत नरसिंह नायक (सिकेरा गट)	४९०५	*
२] वेंकटरामन पुरुषोत्तम सावर्डेकर (म. गो.)	२८३२	
३] गंगाधर भांडारे (अपक्ष)	६८	
४] अनंत कुडचडकर (अपक्ष)	९४	
५] थॉमस डायस (अपक्ष)	१३३	
६] नुरुद्दीन मवानी (अपक्ष)		

२६ – कुडतरी मतदार १६९९० ☆ मतदान १०१६३

१] रॉक बार्रेत (सिकेरा गट)	८७७८	*
२] एनीय पिमेंत (फुर्तादि गट)	२००	
३] आंतोनिय रस्तीबैर (अपक्ष)	१०७	
४] जुझे काब्राल (अपक्ष)	३३७	
५] आंद्र कार्दोझ (अपक्ष)	३५६	
६] जेअप लाजारीय (अपक्ष).	१८३	

२७ – कुड्डाळी मतदार १३९१५ ☆ मतदान ९०५८

१] डॉ. लुईश प्रोत बार्बोझा (सिकेरा गट)	६९७७	*
२] बेनिसीय रिबेलो (अपक्ष)	२८९	
३] बर्नाद गोमेश (अपक्ष)	१३०	
४] लिगोर कॉंत कारव्हाल्य (अपक्ष)	१६६७	

२८ – मुरगांव मतदार २२२५३ ☆ १२०८१

१] रॉबर्ट मेनिझिस (सिकेरा गट)	३९३२	
२] गजानन पाटील (म. गो.)	५५७०	*
३] अंकुश तांडेल (प्रसप)	२२०	
४] कृष्णा भागकर (अपक्ष)	४०	
५] दत्ताराम देशपांडे (अपक्ष)	६६१	
६] फ्रेडी डिमेल (अपक्ष)	४९	
